# मिळून साऱ्याजणी

पुणे । वर्ष एकविसावे । अंक तिसरा-चौथा । ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ (जोडअंक) । पृष्ठसंख्या १२० । किंमत ₹ १००/-

Miloon Saryajani I Pune I Vol. 21 I Issue 3rd-4th I October-November 2021 (Joint Issue) I Pages 120 I Price Rs. 100/-



'ती', 'ते' आणि 'तो' यांचा
स्वत:शी आणि परस्परांशी
नव्यानं संवाद होण्यासाठी...
मासिक नव्हे चळवळ!


MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
नव्या युगातील करिअर्सचे एकमेव प्रवेशद्वार!
शिका २००+ डिजिटल स्किल्स
mscit.mkcl.org
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
करिअर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
तुमच्या करिअरच्या स्वप्नांना द्या उंच भरारी
klic.mkcl.org
अकाउंटिंग
प्रोग्रामिंग
ग्राफिक डिझाईनिंग
डिजिटल आर्ट
हार्डवेअर व नेटवर्किंग
विक्री व बँकांचे व्यवस्थापन
कोर्स उपलब्ध: केंद्रात/घरी कंप्यूटरवर/स्मार्टफोनवर
प्रवेशासाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा किंवा
अधिक माहितीसाठी मिस्ड कॉल द्या 022-43661661.

# विमुक्ता कमला, आखरी सलाम!

'सब जुल्मोंसे आझादी...' हा कमला भसीनचा कणखरपणे दिलेला लोकप्रिय नारा तिच्या पश्चातही दुमदुमत राहील. मिश्किलपणे विनोदाचा आधार घेत कमला पितृसत्ताक पुरुषप्रधान व्यवस्थेतले अन्याय, विसंगती, विषमता यांची खिल्ली उडवत स्त्री-पुरुषांचं प्रबोधन अथकपणे पाच दशकं करत राहिली. 'हो, मी फेमिनिस्ट आहे आणि मी हसतेदेखील!' असं म्हणणारी पंचाहत्तरीतली सदाबहार तरुणी हसत हसत काळाच्या पडद्याआड गेली. कमला देशभर आणि दक्षिण व पूर्व आशियाई देशांमध्ये पायाला भिंगरी लावून स्त्री-पुरुष समानतेचा विचार समाज मनात रूजवत राहिली. मथुरा बलात्कार, शहाबानो केस, भँवरी देवी बलात्कार, सतीविरोधी आंदोलन सगळीकडे ती सक्रीय होती. 'माझा आत्मसन्मान मी माझ्या योनीत ठेवलेला नाही. योनी फक्त शरीराचा एक भाग आहे तिथे तुमच्या घराण्याची इज्ज़त ठेवायला तुम्हाला कुणी सांगितलं होतं? बलात्कार झाल्यावर इज्ज़त जाते ती त्या बलात्कार करणाऱ्याची, त्या बाईची नाही', असं समाजाला ठणकावून सांगण्याचं बळ तिनं स्त्रियांना दिलं. 'पितृसत्ताक व्यवस्थेनं सर्वात जास्त नुकसान पुरुषांचं केलंय. त्यांच्यातली संवेदनक्षमता, प्रेम, ममत्त्व जणू गोठून गेलं आहे. त्यांच्या आतलं कोवळं, नाजूक मन मरून गेलंय... पुरुषांमधली हिंसात्मक मर्दानगी त्यांना माणूस होण्यापासून दूर ठेवते. समाज मुलग्यांचं भावनिक खच्चीकरण करत जातो आणि हळुहळू त्यांचं रुपांतर पुरुषी आक्रमकतेत होतं'. असं स्पष्ट करत पुरुषांना जागं करण्याचं पायाभूत काम कमलानं केलं. कमलाच्या तेजस्वी कार्याची स्मृती जागवत, स्त्रीवादाची मशाल अशीच धगधगती ठेवूया.

विमुक्ता कमला, 'साऱ्याजणी'चा आखरी सलाम!






**ऑक्टोबर – नोव्हेंबर**
**(जोड अंक) २०२१**


संस्थापक–संपादक
**स्मृतिशेष विद्या बाळ**
**संपादक** : गीताली वि. मं.
**व्यवस्थापक** : मानसी घाणेकर
**संपादन साहाय्य** : पूनम बा. मं.
**कार्यालयीन व्यवस्थापन** :
प्रगती सावंत, आशा देशमुख
**मुखपृष्ठ चित्र** : सुजाता केळकर
**अंक जुळणी–अंक मांडणी** :
सारद मजकूर, पुणे
**आतील सुलेखन व चित्रे** :
राजू देशपांडे, गिरीश सहस्रबुद्धे,
सीमा कांबळे, कमलाकर पाटील
आणि इंटरनेटवरून साभार
**मुद्रितशोधन** :
हृषीकेश पाळंदे आणि साऱ्याजणी
**अक्षरजुळणी** : नीला देशपांडे
**सल्लागार** :
दीपा देशमुख, जमीर कांबळे
**माध्यम संवादक** :
रसिका भट लिमये
मो. ९६५७४७०९२०
**कार्यालयीन पत्ता** :
फ्लॅट नं.१०१, पहिला मजला,
नचिकेत को–ऑप. हौ. सोसायटी,
प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४, एरंडवणा,
पुणे–४११००४
**कार्यालयीन संपर्क** :
०२०–२५६५३९३८, ७४४७४४९६६४
saryajani@gmail.com
**कार्यालयीन वेळ** :
सोम. ते शुक्र. दु. १२ ते ५

**वार्षिक वर्गणी**
व्यक्तीसाठी ५०० रु.
संस्थेसाठी ७०० रु.
(अधिक तपशील पान क्र. १५ वर)




# पानोपानी


**शांतीसंवाद**
गीताली / ६
**रोया, अलका... अफगाणिस्थानातील स्त्रिया**
सुषमा देशपांडे / ८
**कथा / आईसब्रेक**
नीरजा / १२
**विद्रोह व सहिष्णूतेच्या उत्कट इतिहासाची**
**गाथाकार गेल ऑम्वेटच्या रचनांचे एक उत्सव पर्व : (१९४१–२०२१)**
कल्पना कन्नाबिरान, अनुवाद: लता प्रतिभा मधुकर / १८
**तालिबानी मूलतत्त्ववाद, राष्ट्रवाद आणि स्त्रीप्रश्न**
समीना पठाण, संजयकुमार कांबळे / २२
**कथा / त्या दोघी**
भारती पांडे / २६
**'मिळून साऱ्याजणी'चा बत्तीसावा**
**वाढदिवस : कलाकार आणि माणूस**
प्रतिनिधी / ९६
**कविता** / कल्पना दुधाळ, राहूल शिंदे,
आसावरी काकडे / ९७–९८
**पुस्तकांच्या मनात / अर्वाचीन आरण :**
**पीडितांच्या प्रतिकाराचे शब्दरूप** / भगवान फाळके/ १००
**कथा / गंगा आये कहा से**
नीलिमा बोरवणकर / १०४
**कथा / हमीदा बेगम**
निशा संजय डांगे–नायगावकर / ११०
**कविता** /अश्विनी धोंगडे, आश्लेषा महाजन / ११२
**सामाजिक पालकत्वाची चळवळ बनावी**
आनंद नाडकर्णी / ११३
**वाचणारे लिहितात** / ११७
**प्रतिनिधी यादी** / ११८

**खास विभाग**

# अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

**अतिथी संपादक : नितीन जाधव, काजल बोरस्ते**

**ऐसे दस्तूर को हम नही मानते!**
राही श्रुती गणेश / ३०
**माझ्या निवडणुकीची गोष्ट**
सत्यजीत सीमा संजय / ३२
**कोरोनामुळे हललेला गावगाडा आणि ग्रामविकासाकडे पाहण्याची दृष्टी**
हर्षाली घुले / ३६
**कथा** / **I Don't Believe in Soulmates but...**
मुक्ता बाम / ४०
**डिस्कशन फोरम**
**पॉलीॲमरीच्या नावानं चांगभलं!**
मयुरी धुमाळ / ४६
**जोडीदार एक की अनेक?: नैतिकतेची ऐशीतैशी**
अभिषेक शरद माळी / ४८
**मोनो, पॉली, अमूकतमूक आणि माणूस**
हृषीकेश पाळंदे / ५० अस्मिता ए. एस. नेवसे / ५२
**#हॅशटॅग लैंगिकता**
**ज्याची त्याची लैंगिकता**
संदेश कुडतरकर / ५४
**भिंती मोडून पडण्यासाठी... : अंजली पाटील**
मुलाखतकर – श्वेता पाटील, नितीन जाधव, काजल बोरस्ते,
शब्दांकन: शुभम गुरव, संचिता खेबडे / ५८
**कविता** / प्रदीप कोकरे, निलेशकुमार, विजय बेंद्रे, सुशोभित सक्तावत, अनुवाद – इंद्रजित उगले, योजना यादव / ६३
**मी प्रवासी मुक्त अस्तित्वाची**
प्रणाली चिकटे / ६६
**'ठसन' आगामी कादंबरीचा अंश**
अविनाश उषा वसंत / ६८
**स्पर्धा परीक्षा : डोळ्यांना दिसणारं उघडं वास्तव!!!**
अर्जुन नलावडे / ७२
**एक दिन दुनिया में बंदूकों से जादा प्रेमपत्र होंगे**
प्रशांत सागर,
मुलाखतकार आणि शब्दांकन –
सुशील संगीता प्रकाश / ७६
**तरुण इकरस, हतबल डेडालस आणि 'नवी उमेद'**
प्रथमेश पाटील / ७८
**कविता** / प्रज्ञा जयश्री संजय / ८०
**माणसाचेच गाणे गावे माणसाने**
प्रियांका तुपे / ८१
**तरुणांची पत्रं** /
प्रज्वली नाईक, ऋचा दिनकर,
श्वेता सीमा विनोद / ८६
**आशा सेविकांना मानाचा मुजरा**
ऋषिकेश आंधळकर / ९०
**तरुणाईचं मन वाचणारं पुस्तक** / **आपल्याला काय त्याचं?** – श्वेता सीमा विनोद / सुव्रत जोशी / ९३
**मिम्सच्या चष्म्यातून वास्तवाकडे बघताना...**
सुदर्शन जगताप / ९५

निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीचे मिळून साऱ्याजणी मासिक मुद्रक, प्रकाशक गीताली वि. मं. यांनी युनिक ऑफसेट, १५२३, सदाशिव पेठ, आनंदशिल्प, पुणे ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, नचिकेत को-ऑप. हौ. सोसायटी, प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४, एरंडवणा, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : गीताली वि. मं.**

'MiloonSaryajani' Monthly is owned by Niramaya Public Charitable Trust, Printed and Published by Getaali V. M., Printed at Unique Offset, 1523, Sadashiv Peth, Anandshilp, Pune 411030 and Published at Flat No.101, 1st floor, Nachiket CHS, Prabhat Road, Lane No.4, Erandawana, Pune 411004. **Editor - Geetali V. M.**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही. अंकात प्रसिद्ध केलेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# शांतिसंवाद



प्रिय वाचक,
सस्नेह नमस्कार!
दीपावलीच्या हार्दीक शुभेच्छा!

येती दिवाळी आपल्या सर्वांना आरोग्यदायी, सुख-समाधान आणि शांतीची जावो ही सदिच्छा! यासाठी या अंकातला अमन की ओर... प्रेमाला पर्याय नाही! हा विशेष विभाग आपल्याला प्रेमाची साथ देईल, असा विश्वास वाटतो. या विभागाचे अतिथी संपादक आहेत 'साऱ्याजणी'च्या 'यूथ कनेक्ट'मधले सक्रीय साथी नितीन आणि त्याची मैत्रीण काजल. या विभागाचं संपादन करताना या दोघांनीही त्यांच्या नेहमीच्या धावपळीच्या जगण्याशी सामना करत अतिशय परिश्रमपूर्वक, संतुलित विचार करत लेख, कविता, कथा, पत्रं, मिम्स आदि साहित्य मिळवलं. या विषयावर त्यांनी दोघांनी स्वत: आधी खूप विचार, चिंतन-मनन केलं याची प्रचिती त्यांनी तयार केलेलं टिपण वाचून मला आली. हा विभाग सकस - समृद्ध असेल याची खात्री वाटली आणि सुयोग्य तरुणांच्या हाती हा विभाग सोपवला असं वाटून मी निर्धास्त झाले.

अमन की ओर... प्रेमाला पर्याय नाही! या विषयी एक मोठा विभाग संपादित करायचा म्हटल्यावर तरुण संपादकद्वयींच्या मनात प्रश्नकल्लोळ निर्माण झाला. अमन की ओर जायचंय म्हणजे नक्की कुठे जायचंय? मुक्काम माहीत असलेल्या या प्रवासाची सुरुवात कुठून होतेय? रस्ते कसे आहेत? आमच्या पिढीच्या शब्दकोशातली शांतता नेमका कुठला अर्थ घेऊन येते? तिथंवर पोचायचं कसं? पोहोचलोच कधी शांततेपर्यंत, तर मग पुढे काय? प्रेम म्हणजे काय? कुठून येतं? कुठे जातं? शारीर प्रेमाच्या पल्याड पाहून काही दिसतंय का? की नुसताच भास? प्रेमाला उगाच भावनेच्या पोत्यात गुंडाळण्यापेक्षा किंवा गुंडाळण्यासोबत व्यवहाराच्या आणि गरजेच्या फूटपट्टीवर मोजून पाहायला हवं का? हवं असेल तर ते कसं मोजणार आणि याच मोजमापातून संघर्षाची काही नवी उत्तरं मिळू शकतात का? असे अनेक प्रश्न उपस्थित करून त्यांच्या उत्तरांकडे घेऊन जाण्याची धडपड नितीन आणि काजल करत राहिले. त्यांची उत्तरं अतिशय सर्जनशील पद्धतीनं प्रगल्भतेनं तरुण मित्र-मंडळींकडून मिळवण्यात ते छान यशस्वी झालेत. त्याचा आविष्कार म्हणजे त्यांनी संपादित केलेला आपला हा विशेष विभाग! आपली आजची तरुणाई चिकित्सकपणे खोलात शिरून विचार करते. ती खूप संवेदनशील आणि क्रियाशीलही आहे, याचा मनाला दिलासा देणारा प्रत्यय हा विभाग वाचताना पदोपदी येतो. तुम्हीही हा विभाग जरूर वाचा आणि तुमच्या प्रतिक्रिया कळवा.

१५ ऑगस्टला आपल्या स्वातंत्र्याला चौऱ्याहत्तर वर्षं पूर्ण झाली, त्याच दिवशी तिकडे अफगाणिस्तानात झालेल्या घडामोडींमुळे सर्व जग चिंताक्रांत झालं आहे. महासत्तांच्या नाकावर टिचून तालिबान्यांनी अफगाणिस्तानात पुन्हा एकदा आपलं वर्चस्व व सत्ता प्रस्थापित केली. लोकशाही, मानवी मूल्यं, स्वातंत्र्य, समता, न्याय आणि स्त्रीवाद अशा सर्व संकल्पनांना अक्षरश: पायदळी तुडवत तालिबानी संघटनांनी पुन्हा एकवार सत्तेवर आल्याचा दावा केला आहे. गेली वीस वर्ष अफगाणिस्तानात लोकशाही होती. तत्पूर्वी १९९६ ते २००१ या काळात तालिबान्यांचा अफगाणिस्तान हा दहशतवादी तयार करणारी आणि निर्यात करणारी फॅक्टरी बनला होता. त्याची पुनरावृत्ती होईल का? या भयानं सर्व जग हादरून गेलं आहे. सत्ता मिळवण्यासाठी क्रौर्य हाच मार्ग आणि धर्म! दिवसेंदिवस उग्र होत जाणाऱ्या क्रौर्याला निरपराध नागरिक बळी पडत आहेत. स्त्रिया आणि मुलं हवालदिल झाली आहेत. देश सोडून गेले ते सुटले, पण राहिलेल्यांचं काय? अनेक प्रगत आणि अप्रगत देशांनी मानवतावादी भूमिकेतून अफगाणी नागरिकांना त्यांच्या देशात आश्रय देण्याचं आश्वासन दिलं असलं, तरी व्यवहारात तिथली स्थानिक जनता त्यांना मनापासून स्वीकारेल का? अशा असंख्य प्रश्नांनी अफगाणिस्तान आणि त्याबरोबरच त्याच्या शेजारची राष्ट्रं घेरली गेली आहेत. या सगळ्यांचे भारतावर लगेचच आणि दूरगामी काय-काय परिणाम होऊ शकतात, याचा सखोल विचार करून तशी रणनीती आणि व्यूहरचना भारतानं शांतपणे आखणं गरजेचं आहे.

दुभंगलेला समाज संकटं पेलू शकत नाही, हे भारतीयांनीसुद्धा लक्षात घ्यायला हवं. स्वार्थी, सत्तांध राजकारणी धर्म आणि जातीच्या नावाखाली अस्मितांचं राजकारण करत समाज विखंडित करून स्वत:ची सत्ता पक्की करतात. याचं भान सामान्य जनतेला येण्यासाठी प्रबोधनाला पर्याय नाही. हे पुन: पुन्हा लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्त्यांनी न थकता समाजाच्या तळागाळातल्या वर्गासहित मध्यम

आणि उच्च मध्यम वर्गातही प्रबोधनाचा नंदादीप सतत तेवत ठेवायलाच हवा.

देशातल्या सामान्य नागरिकांच्या मनामध्ये लोकशाही म्हणजे देशाच्या विकासाला आणि प्रगतीला बाधा आणणारा अडथळा आहे किंवा राष्ट्रवादाच्या अंगानं लोकशाही म्हणजे नेभळटपणा आहे, असं सुनियोजितपणे बिंबवण्यात येतं. त्यातून देशाला सुप्रीम नेता हवा असं, जनमत तयार होतं आणि त्याचं प्रतिबिंब मतदानात उमटतं. सत्तेवर आल्यावर हे 'लोकप्रिय नेते' मनमानी कारभार करू लागतात. ज्यांच्या मतांच्या जीवावर सत्तेत आले, त्या सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत बेफिकीर राहत बेदरकारपणे वागतात. पोटा-पाण्याच्या प्रश्नावर लोकांनी उभारलेली आंदोलनं बळाचा वापर करून चिरडण्यापर्यंत, लोकांचे जीव घेण्यापर्यंत मजल जाते वर शहाजोगपणे अशा जुलमी कृत्यांना, दडपशाहीला राष्ट्रवादाचा गोंडस मुखवटा चढवला जातो. हे सर्व करण्यासाठी समाजातल्या ठराविक वर्गाला 'देशद्रोही' ठरवण्यातही मुख्य प्रवाहातली माध्यमं तसंच सोशल मीडियावर विखारी – विद्वेषी प्रचार करणारे ट्रोल सैनिक दिमतीला हजर असतात. आज भारतातच नाही, तर संपूर्ण जगच फेक न्यूजच्या संकटानं वेढलं गेलं आहे.

लोकशाहीत सुजाण नागरिकत्वासाठी नेमकी व अचूक माहिती गरजेची असते. माध्यमांची भूमिका यात कळीची असते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि माध्यमांच्या स्वातंत्र्याशिवाय देशा-देशांमधील बंधुत्व कायम राखणे, नि:शस्त्रीकरण आणि अधिक चांगली जागतिक व्यवस्था निर्माण करणे खूप कठीण आहे. सत्ताधाऱ्यांचे अत्याचार, असत्य आणि युद्धखोर प्रचारापासून समाजाला वाचवण्यासाठी मुक्त, स्वतंत्र आणि सत्याधारित पत्रकारिता सेवा करत असते, असं प्रतिपादन नोबेल पुरस्कार समितीनं केलं आणि शांततेचा नोबेल पुरस्कार रशियाचे दिमित्री मुरानोव्ह आणि फिलिपिन्सच्या मारिया रेसा यांना जाहीर केला, ही आजघडीची अत्यंत महत्त्वाची घटना आहे, असं 'साऱ्याजणी' मानतं. मूल्यांसाठी झगडणाऱ्या पत्रकारांचे हे दोघे प्रतिनिधी आहेत. खोट्या माहितीच्या प्रसाराविरोधात लढणाऱ्यांना जगाची सर्वोच्च मान्यता यातून मिळाली. या पुरस्कारामुळे आधुनिक जगतात तथ्याधारित माध्यमांचं महत्त्व आणखी वाढण्यास मदत होणार आहे.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असणारा पत्रकारिता हा व्यवसाय जणू रणभूमी झालेला आहे. खरं तर, सत्तेला सत्य सांगणं, सत्ताहीन लोकांचं ऐकलं जातंय याची खात्री करून घेणं, हे पत्रकारितेचं मूलभूत कामच आहे. मात्र अनेकदा शांतता आणि न्यायाच्या गोष्टी केल्या तर पत्रकारांना जीव गमवावा लागतो, ही शोकांतिका आहे. या पार्श्वभूमीवर जीवे मारण्याच्या धमक्यांना भीक न घालता दिमित्री मुरानोव्ह यांनी 'नोकया गॅझेट' या आपल्या वृत्तपत्राचे स्वतंत्र धोरण बदलण्यास नकार दिला. त्यांच्या वृत्तपत्राच्या तथ्याधिष्ठित व व्यावसायिक पत्रकारितेमुळे रशियन समाजाच्या उजेडात न आलेल्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकला गेला आहे.

मारिया रेसा त्यांच्या शोधपत्रकारितेमुळे लोकप्रिय आहेत. रॅप्लर या न्यूज पोर्टलच्या माध्यमातून एकाधिकारशाहीला आव्हान देत फिलिपिन्सचे अध्यक्ष रोड्रियो प्युरेर्टे आणि त्यांच्या धोरणांवर त्या टीका करतात. भ्रष्टाचार आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनावर बोट ठेवत त्या घणाघाती हल्ला करतात. त्यांच्यावर अनेक खटले दाखल करण्यात आले. ठार मारण्याच्या, बलात्काराच्या धमक्या, ट्रोलिंग आणि तुरुंगवास याला न जुमानता अंमली पदार्थांच्या घातक वापराविरोधात तसंच हुकूमशाही, सत्तेचा गैरवापर आणि सरकार पुरस्कृत हिंसा याविरोधात त्यांनी लढा दिला. यासाठी या दोन्ही पत्रकारांचं दिल से अभिनंदन!

आपल्या प्रत्येकाच्या मनात 'एक पत्रकार' असतो. आपला देश अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि लोकशाही अधिकारासंदर्भात खाली खाली जात आहे. अशा वेळी हा पत्रकार कोणत्या बातम्यांच्या शोधात असतो आणि कोणत्या बातम्या पसरवण्याचं काम करतो याकडे लक्ष ठेवू या. लखीमपूर खेरी येथे शेतकरी आंदोलकांच्या जत्थ्यात बेदरकारपणे गाडी घुसवून शेतकऱ्यांना चिरडण्याच्या संतापजनक घटनेच्या निषेधार्थ किती जणांच्या मनातला 'हा पत्रकार पेटून उठला', निदान कितींच्या मनात विद्रोह निर्माण झाला? की हा आपल्याच कम्फर्ट झोनमध्ये मशगुल आहे? याचं प्रामाणिकपणे उत्तर स्वत:च्याच मनाशी देऊ या.

'मिळून साऱ्याजणी'च्या वाचक, वर्गणीदार, लेखक, जाहिरातदार आणि सर्व हितचिंतकांना ही दिवाळी शांतीपूर्ण आनंदाची जावो ही सदिच्छा!

There is no way to Peace, Peace is the way हे लक्षात घेऊन शांतीचा प्रेममय नंदादीप मनामनांत तेवत ठेवू या.

आमेन!

स्नेहांकित

गीताली

१६/१०/२०२१

# रोया, अलका... अफगाणिस्तानातील स्त्रिया!

सुषमा देशपांडे

**अनेक संस्कृतींच्या मिलाफाचा इतिहास असणारा, एकेकाळचा समृद्ध सांस्कृतिक वारसा असणारा अफगाणिस्तान आज उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. खरं तर साहित्य, कला आणि विज्ञान यामध्ये जग समृद्ध करण्यात इस्लामचं मोठं योगदान आहे. रवींद्रनाथांचा 'काबुलीवाला' आपल्या मनात घर करून आहे. भारताला मोठा भाऊ मानणाऱ्या अफगाण जनतेला, विशेषतः स्त्रिया आणि मुलांना आज आपल्या आधाराची नितांत गरज आहे. प्रत्यक्ष मदत करण्याला खूप मर्यादा आहेत तेव्हा त्यांची आठवण जागवत त्यांचा लढवय्येपणा जिवंत राहू दे या सदिच्छेसह त्यांना सलाम!**

**सिनेमा माध्यमातून चांगल्या प्रकारानं बोलता येईल या विचारानं झपाटलेल्या, 'कायदा आणि राजकारण' या विषयात पदवीधर असणाऱ्या रोयानं सिनेमाक्षेत्रात पदार्पण केलं. आर्थिक पाठबळ नसताना, सिनेमा तंत्राशी फारशी ओळखही नसताना रोया आणि अलका या अफगाण भगिनींनी पुरस्कारप्राप्त माहितीपट कसे दिग्दर्शित केले याची ही दिलचस्प कहाणी.**

अफगाणिस्तान तालिबान्यांनी काबीज केल्याच्या बातम्या येऊ लागल्या. बातम्यांच्या माध्यमातून अनेक अफगाणिस्तानच्या स्त्रियांच्या मुलाखती ऐकायला मिळत आहेत. काम करणाऱ्या अनेक स्त्रिया तालिबानी सत्तेने कशा प्रकारे हादरल्या आहेत, हे समजू लागले आणि मला २०१८ मध्ये 'बुसान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात' भेटलेली रोया सादत सतत डोळ्यासमोर यायला लागली. रोयाला संपर्क करण्याचा प्रयत्न केला; पण तिचे ईमेलला उत्तर आले नाही. पूर्वीही ती सहजपणे ईमेलला उत्तर देत नसे. आता तर ती आणि तिची बहीण अलकाची माहिती मिळणे अवघडच होऊन बसले आहे. मी न राहवून 'आज्ञी' या मी काम केलेल्या सिनेम ाचा दिग्दर्शक देवाशिष मखीजा याला 'रोया फारच आठवतेय' असं म्हटलंही. रोयाची ओळख देवाशिषनेच बुसान, कोरियामध्ये करून दिली होती. ही काबुलमध्ये राहणारी, अफगाणिस्तान येथील पहिली चित्रपट स्त्री दिग्दर्शिका. मला आठवतंय, मी कमालीची भारावले गेले होते. मी अवाक झाले होते. काहीच बोलू शकले नाही त्याक्षणी रोयाशी. मात्र, मी तिची मुलाखत घ्यायची असे ठरवले आणि तिनेही सहजपणे दुसऱ्या दिवशी सकाळी भेटायची वेळ दिली. (परतल्यावर मी महाराष्ट्र टाईम्स या दैनिकात रोयावर लेखही लिहिला होता.)

तिचा पेहराव म्हणजे, केसावर, केस दिसणार नाहीत अशी घेतलेली आणि मान दिसणार नाही अशी बांधलेली ओढणी, अंगभर घातलेला झगा. चेहरा शांत. मला प्रथम भेटली तेव्हा रोया तिच्या मुलाखतीसाठी चालली होती. तिचा चित्रपट– 'लेटर टू द प्रेसिडेंट' बुसान महोत्सवात निवडला गेला होता. तेव्हा अफगाणातील तालिबानच्या ऐकलेल्या कथा मला आठवत होत्या. मात्र, तेव्हा अफगाणीस्तान तालिबानच्या ताब्यात नव्हते.

बुसानमध्ये त्या दिवशी मी तातडीने तिच्या चित्रपटांबाबत इंटरनेटवर मोबाईल वापरून शोध सुरू केला. चक्क तिचा 'थ्री डॉट्स' नावाचा चित्रपटच मला मिळाला. मी आयुष्यात पहिल्यांदाच Laptop बरोबर नसल्याने मोबाईलवरच तो पाहिलाही. 'लेटर टू द प्रेसिडेंट' आणि 'थ्री डॉट्स' दोन्ही चित्रपट अफगाणिस्तानातील स्त्री प्रश्नावर आहेत. 'थ्री डॉट्स'चे चित्रीकरण ग्रामीण भागात झाल्याचे लक्षातच येते.

२०१८ आणि त्या आधीच्या काळात अफगाणात ती चित्रपट करत असली, तेव्हा सत्ता तालिबान्यांच्या हातात नसली, तरी तालिबानच्या काळात ती शिकली कशी असेल! तिला घरच्यांची साथ कशी असेल? अनेक प्रश्न मनात घर करून होते, अगदी सिनेमा–माध्यम हाताळायचे तिने कसे ठरवले? रोया भेटताच मी माझे प्रश्न तिच्या पुढ्यात टाकले. तिने मुलाखत रेकॉर्ड करायलाही परवानगी दिली.

रोयाच्या चेहऱ्यावर किंचित हसू आले. रोया बोलू लागली, ''थ्री डॉट्स

हा माझा सिनेमा मी आज परत पाहते, तर मलाच प्रश्न पडतो, हा सिनेमा मी केला आहे! कसा केला मी ! माझ्या गावातला तो पहिला चित्रपट होता. चित्रपट माध्यम मी कशी शिकले? याचा उत्तर बालपणापासून द्यावं लागेल. जेव्हा मी शाळेत पाचवीत होते, तेव्हा मी नाटक केले होते. काही खास कार्यक्रमासाठी. ते मला खूप आवडले होते. मग मी हळूहळू गोष्टी लिहायला लागले. त्याच काळात तालिबान-इरा सुरू झाला आणि माझी शाळा बंदच झाली. मुलींना शाळेत जायला बंदी आली. गोष्टी आवडत होत्या, त्यामुळे घरी गोष्टी स्वत: लिहिणं व गोष्टी वाचणं सुरू झालं. यामुळे पुस्तकं वाचायचा नाद लागला. जेव्हा गोष्ट सांगण्यासाठी चित्रपट माध्यम निवडावंसं वाटलं, तेव्हा हे माध्यम सुरुवातीला पुस्तकं वाचून समजून घेतलं. गोष्टी सांगायला मला आवडत असावं. गोष्ट सांगण्याच्या ओढीतून मी 'थ्री डॉट्स' बनवला. आज मला कळतं 'थ्री डॉट्स' तांत्रिकदृष्ट्या खूप चांगला नाही आहे. असायला हवे तसे तंत्रज्ञ कामासाठी नव्हते. कोणी टीमही नव्हती बरोबर, असेही म्हणता येईल. मात्र, या सिनेमामुळेच माझी सिनेमातंत्राशी जास्त ओळख झाली. माझा प्रयत्न प्रामाणिक होता, त्यामुळे असेल, या सिनेमाला चित्रपट महोत्सवात बक्षिसे मिळाली. २००३ साल होतं ते. ही माझ्या आयुष्यात एक चांगली आणि वेगळीच सुरुवात होती, असे खात्रीने म्हणू शकते मी. माझ्या देशाबाहेरच्या चित्रपट जगाशी माझी ओळख झाली. विविध चित्रपट महोत्सवात अनेक चित्रपट दिग्दर्शकांशी भेटी झाल्या. सिनेमा या माध्यमातून काही चांगल्या प्रकारे बोलता येईल, म्हणता येईल असे जाणवले.'' रोया तिच्या शांत लयीत बोलली होती. रोयाला चित्रपटाच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांवर समाजाशी संवाद सुरू करता येईल, असं वाटत होतं.



*अलका सादत आणि रोया सादत*

रोयाला खरं तर, नर्स म्हणून काम करायला परवानगी मिळाली होती. महिला रुग्णांचा इलाज महिलाच करू शकतात, ही काम करायला परवानागी मिळण्यामागची मूळ संकल्पना होती. तिथे रुग्णालयात तिने स्वत:च्या कथा सांगण्याचा प्रयत्न केला. रुग्णालयाचा प्रमुख तालिबानींच्या संपर्कातील होता. परिणामी, रोयाच्या नोकरीवर परिणाम झाला.

रोया मूळची 'हेरत' नामक शहरात जन्माला आली. तिथल्याच हेरत विद्यापीठात तिने 'कायदा आणि राजकारण' विषयात पदवी प्राप्त केली. या शिक्षणाच्या कालावधीत रोयाने ३ शॉर्ट फिल्म केल्या. चित्रपटाच्या भाषेने तिला पछाडले होते. चित्रपट बनवण्याच्या आधी रोया नाटके लिहायची. तालिबानी सत्तेच्या दिवसात, अफगाणातील महिलांसाठी नाटके लिहायची. तालिबानची सत्ता गेल्यावर तिने सिनेमा करायला सुरुवात केली.

चित्रपट करायचा तर आर्थिक पाठबळाची गरज असते. रोयाला सांगायच्या गोष्टी या पाठबळाशिवाय ती सांगणार कशी? चित्रपट व चांगल्या डॉक्युमेंटरी बनवण्यासाठी खरं तर २००३ सालीच रोया आणि तिची धाकटी बहीण अलका यांनी 'रोया फिल्म हाऊस' नावाने कंपनी सुरू केली. रोया पाठोपाठ तिची बहीण अलका ही याच क्षेत्रात काम करू लागली. अफगाणिस्तानमध्ये महिलांनी सुरू केलेली पहिली फिल्म कंपनी आहे ती. या कंपनीसह रोयाने टूलू टीव्हीत काम करायला सुरुवात केली. या माध्यामातून, तर कधी जाहिराती बनवण्यातून थोडे पैसे मिळत. याच पैशातून हव्या त्या डॉक्युमेंटरी व चित्रपट करायचे, असे त्यांचे सूत्र होते. त्यांचे माहितीपट अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निवडले गेले व अनेक पुरस्कारही मिळाले त्यांना. त्याचेही पैसे त्यांनी चित्रपट निर्मितीत घातले. सिनेमा बनवायचा तर निर्माता मिळणे आवश्यक असते. कोणताही सिनेमा बनवायला, एका स्त्री दिग्दर्शकाला अफगाणातला निर्माता मिळणे तर अवघडच होते, तसेच एखादा परदेशी निर्माताही त्यांच्यामागे उभा राहणे शक्यच नव्हते. कारण अशा निर्मात्याला अफगाणात कोणतीच आर्थिक सुरक्षितता मिळत नाही, इंश्युरंस काढता येत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्माते म्हणून काम करणारेही अफगाणमध्ये चित्रपट निर्मितीत पैसे टाकत नाहीत. रोया तेव्हा म्हणाली होती, 'अफगाणिस्तानमध्ये शहरे तशी सुरक्षित आहेत; पण एखादा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतला निर्माता पुढे आला, तर तो साऊथ

अफगाणमध्ये झालेल्या बॉम्ब ब्लास्टची बातमी ऐकतो. मला फोन करून विचारतो, 'रोया तू कशी आहेस?' 'बॉम्बची जागा आणि मी काम करत असलेली जागा खूप दूर आहे, असे मी सांगितले, तरी पण त्या निम र्त्यांना ताण येतो. ते निर्मिती करणे नाकारतात. माघारी फिरतात.'

रोयाने 'थ्री डॉट्स'हा तिचा पहिला चित्रपट कसा पूर्ण केला? पहिल्या चित्रपटाचा तिचा अनुभव कसा होता? या चित्रपटाबाबत रोया म्हणते, 'मी वेडी होते तेव्हा.' चित्रपट करायचा या वेडाने ती झपाटलेली होती. या चित्रपटाचे चित्रीकरण गावात, माळरानात झाले, शहरापासून दूर. त्या काळात तालिबानी सत्तेत नसले तरी ते अशा ग्रामीण भागात खूप सारे माईन लपवून ठेवत. आपण त्या भागात फिरत असू आणि माईन पायाखाली आले तर स्फोट होत. रोयाचे चित्रपट शूट करण्याचे लोकेशन असेच ग्रामीण होते. रोयाने चित्रीकरणाच्या जागा स्वत: फिरून तपासणी करायला सुरवात केली. माईन असेल तिथे तर बरोबर काम करणाऱ्या लोकांना त्रास होता कामा नये, असं वाटायचं. तपासणी नंतर कलाकार व तंत्रज्ञांना तिथे बोलवले जायचे. इतरांची काळजी घेणे अगदीच योग्य आणि आवश्यक असले तरी यात रोयाचाच जीव जाऊ शकला असता याचंही भान तेव्हा रोयाला नव्हते. या अशा वेडेपणात आपणास काही होऊ शकले असते, याचे भान तिला जाणवतं आणि रोया बोलता बोलता स्वत:लाच हसते. हसत म्हणते, 'फिल्म पूर्ण करायची याच विचाराने झपाटली गेली होते.

सिनेमात काम करणारे कोणीही अभिनेते व्यावसायिक नव्हते. तर, गावातलेच लोक चित्रपटात काम करत होते.' अफगाणिस्तानमध्ये शिक्षणाचा अभाव म्हणायचं की माणसं चित्रपट जगाबाबत अनभिज्ञ असतात म्हणायचं! 'थ्री डॉट्स' चित्रपटाच्या चित्रीकरणात घडलेल्या गोष्टी रोया सांगत होती. त्या सिनेमात एक लग्नाचे दृश्य आहे. लग्न सोहळ्याचं चित्रीकरण झालं. तो दिवस संपला आणि 'वर' झालेला नट जिच्याशी चित्रपटात विवाह झाला आहे, त्या मुलीला स्वत:च्या घरी घेऊन जायचे आहे म्हणून हटून बसला. त्याचे म्हणणे होते, 'माझे तिच्याशी लग्न झाले आहे, माझी बायको मी घरी घेऊन जाणार. तो माझा अधिकार आहे.' त्याला रोयाने समजावले तरी तो ऐकेना. सतत म्हणत राहिला, 'या मुलीशी माझा विवाह झाला आहे. तिला घेऊनच म ला घरी जायला हवे.' रोयाने विविध प्रकारे हे लग्न सत्य नाही, हे खोटं खोटं केलेलं लग्न आहे, सांगितले. हे त्याला पटता पटेना, मोठा कठीण क्षण निर्माण झाला होता. अभिनय करणं हे काम आहे, वगैरे त्याला समजत नव्हतंच. रोयाला त्या मुलीलाही सांभाळणे आवश्यक होतं. आणि 'वर' झालेल्या अभिनेत्यालाही दुखावून चालणार नव्हते. अफगाणिस्तान येथील शिक्षणाचा अभाव यामुळे हे घडत होतं म्हणायचं की पुरुषांना असलेले अधिकार, हक्क, आम्ही म्हणू तेच होईल हा आग्रह दिसतो यात! अशा या प्रसंगातून मार्ग काढणं हीसुद्धा सम स्या होऊ शकते, हे फक्त सत्य. शेवटी त्याने रोयाचं म्हणणं मान्य केलं आणि रोयाचा जीव भांड्यात पडला.

२००६ साली एशियन फिल्मचा अभ्यास करायला रोया बुसान, कोरियाला आली आणि बुसानमध्येच चित्रपट तंत्राचा अभ्यास एका छोट्या कोर्सद्वारा तिने केला. पुढे अफगाणमध्ये परतल्यावर तिथे नसलेल्या चित्रपट तंत्राच्या सोयी रोया व अलका सादत यांनी निर्माण करायचा प्रयत्न सुरू केला. चित्रीकरणानंतर पोस्ट प्रोडक्शनसाठी लागणारे आधुनिक तंत्रज्ञान जे अफगाणमध्ये उपलब्धच नव्हते ते या बहिणींनी अफगाणमध्ये आणले. तरी रोयाला सतत एक खंत वाटत असल्याचे म्हणाली होती, 'तालिबानी स्त्रियांच्या, मानवी हक्कांच्या आणि लोकशाहीच्या विरोधात होते. तालिबान-इरा संपला; पण तालिबानी काळात अनेक लोकांची मने तालिबानी झाली आहेत. हे लोक अफगाणमध्येच राहत आहेत. हे लोक स्त्रियांच्या आणि त्यातही माध्यमांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या विरोधात आहेत.' हे बोलताना रोया सांगत होती ते चक्रावणारं आहे. त्या काळात २०१८ च्या सुमारास काबुलमध्ये रोयाने बनवलेला चित्रपट थिएटरमध्ये लागत होते मात्र शहरातल्या स्त्रियांना तो पाहायला जायची परवानगी नव्हती. फक्त पुरुष सिनेमाला जाऊ शकत होते. सिनेमा स्त्रिया, मुले पाहू शकत नाहीत. पुढे जाऊन रोया म्हणत होती, 'अफगाणमध्ये पुरुषांनाही चित्रपट बनवणे सोपे नाही आहे. सरकार आपल्या राजकीय बाबींमध्ये मश्गुल आहेत. सांस्कृतिक गोष्टींचे त्यांना काहीच पडले नाही आहे. पण इथल्या गोष्टी जगाला सांगायला हव्यात, ते आवश्यक आहे, म्हणून मी चित्रपट करत राहणार. हेरत शहरातले सिनेमा थिएटर पूर्वीच तालिबान्यांनी पाडले. आज काबुलमध्येही चांगली सिनेमा थिएटर नाही आहेत. तेव्हा खूपच काम करायला हवं.'

हे तालिबानची सत्ता नसताना बोलणारी रोया... आज रोया आणि अलका काय करत असतील हा प्रश्न जाणवत राहतो. त्यांनी कष्टाने निर्माण केलेले जग उद्ध्वस्त केलं गेलं असणार हेही जाणवत राहतं.

जगाशी इंग्रजीत संवाद करणारी रोया, शाळेत आपल्यासारखाच इंग्रजी एक विषय होता तिला, त्यात ती काय शिकली असणार! गरज म्हणून नंतर वर्गात बसून शिकण्याची तिची तयारी

नव्हती. कारण परिस्थिती तशी नव्हती. मुलींसाठी शाळाही बंद पडल्या. पुढे इंग्रजी चित्रपट पाहून, लोकांचे ऐकत तिने हे तंत्र अवगत केले आहे. गेल्या १० वर्षांत अफगाणात औपचारिक इमेल वगैरेसाठी इंग्रजीचा खूप वापर सुरू झाल्याचे तिने सांगितले होते. मात्र, इमेलचा खूप वापर ती करू शकत नाही, असे लक्षात आले. आता तर तिची खबरबात कोण देणार!

सिनेमागृहात जाऊन एखादी स्त्री चित्रपट पाहू शकत नाही, हे ऐकल्यावर मला भारतात उभी राहिलेली स्त्री चळवळ नजरेसमोर यायला लागली. अफगाणमध्ये स्त्री चळवळ कशी असेल? असा प्रश्न पडला. हे विचारल्यावर मात्र, आमच्या देशात ५ स्त्रिया मंत्री आहेत. पार्लमेंटमध्ये २० टक्के स्त्रिया आहेत. सामाजिक कामात खूप महिला activist आहेत. मानवी हक्कांबाबत स्त्रिया काम करत आहेत. असे काहीशा अभिमानाने रोया सांगत राहिली. पुढे जाऊन मात्र, हे वातावरण काबुल, हेरत अशा शहरात दिसते. या शहरात मुली शिक्षण घेत आहेत. मात्र, काही शहरातही मुलींना शाळेत जाता येत नाही आहे, असेही खिन्नपणे म्हणाली.

रोयाच्या जन्मापूर्वी रशियन वॉर. मग सिव्हील वॉर, मग तालिबानची सत्ता यामुळे ४०-५० वर्षापूर्वीपासून अफगाणिस्तानातील वातावरण वाईट झालं आहे, असे रोयाला वाटत होतं. आता पिढ्यान् पिढ्या सर्व ठीक व्हायला जातील. साऊथ अफगाणमध्ये, पाकिस्तान बॉर्डर जवळचं वातावरण मुली शिकण्यासाठी चांगले नाही आहे, असेही मोकळेपणाने ती म्हणाली होती. स्वत:च्या, स्त्रियांच्या हक्कांबाबत जागरूक असलेली रोया स्वत:ला activist मात्र म्हणवत नाही. मात्र स्त्रीचे मन, त्यांचे प्रश्नच रोया चित्रपटात हळुवारपणे हाताळते. अलकाच्या माहिती चित्रपटात तर अफगाणातील स्त्रियांचे विदारक चित्र तिने दाखवले आहे. हे चित्रपट आपल्याला इंटरनेटवर उपलब्ध आहेत. अलका सादत ही पुढे जाऊन लेखन दिग्दर्शनासह कॅमेराही स्वत:च हाताळू लागली. कॅमेरा चालवणारी अफगाणिस्तानातील ती पहिली स्त्री आहे. तिच्या ४० डॉक्युमेंटरीजना आंतरराष्ट्रीय बक्षिसे मिळाली आहेत. युट्यूबवरच्या तिच्या काही डॉक्युमेंटरीज पाहून अस्वस्थ व्हायला होतं.

आम्ही भेटलो तेव्हा रोयाचे वय जेमतेम ३४-३५ होते. (१९८३ सालचा तिचा जन्म आहे) साधारण २००८ पासून रोया काबुलमध्ये राहाते. तिची आईही खूप प्रेमळ आहे. तिच्या आईचे वडील हे शिकलेले गृहस्थ होते. त्यामुळे आई रोयाच्या मागे उभी राहिली, असे तिला वाटते. मात्र, रोयाच्या वडलांनी आधार दिला. हे सांगताना रोया म्हणते, वडलांचा आधार इथे खूप महत्त्वाचा असतो. तो नसेल तर तुम्ही काहीच करू शकत नाही. काका मंडळी सुरुवातीला माझ्या कामाबाबत खूप नाराज होती. नंतर ठीक झाले. रोयाने वडलांचा पाठिंबा आहे म्हटल्यावर समाजाच्या बोलण्याकडे लक्षच दिलं नाही. आजवर चित्रपट बनवण्याचं काम करताना कोणी स्त्री अफगाणिस्तानातल्या लोकांनी पाहिलीच नव्हती, तेव्हा लोक विरोधात बोलणारच, हे रोयाने गृहीत धरले होते. रोयाचे पतीही लग्नानंतर समर्थपणे तिच्या मागे उभे राहिले. ते विद्यापीठात शिकवतात. शिवाय, ते चांगले लेखक आहेत, असे रोया सांगते. वडलांचा आणि नवऱ्याचा पाठिंबा लक्षात घेता हळूहळू समाज बदलेल, अशी तिला आशा होती.

अफगाणमधील प्रश्न दाहक होतेच, आता जास्तच दाहक झाले आहेत. अफगाणमधील स्त्रियांचे, मुलींचे, मुलांचे प्रश्न हे रोया व अलकाच्या सिनेमाचे विषय होते. चित्रपट माध्यमाने रोया व अलकाची जगाशी ओळख करून दिली आहे. अफगाण सोडून जाण्याची त्यांना इच्छा नव्हती. तिथे राहून तिथल्या गोष्टी जगाला सांगण्यासाठीच त्यांचं जगणंच आता सिनेमा झालं होतं.

मुलींचे शिक्षण इथपासून तालिबान्यांनी निर्माण केलेले प्रश्न लक्षात घेता, आज रोया-अलका कुठे आहेत? माहीत नाही. रोयाला तेव्हा बातम्यांमध्ये येणाऱ्या हिंसाचाराच्या बातम्यांची चिंता नव्हती. चिंता होती, तालिबानची सत्ता पुन्हा आली तर! नेमके तेच घडले आहे. रोया, अलका हार मानणाऱ्या नाही आहेत, त्या लढत राहायचा विचार करतील.

अफगाणच्या या लढवय्या स्त्रियांना भारताचा सलाम!

***सुषमा देशपांडे, पुणे***
*sushama.deshpande@gmail.com*

❀❀❀

मिळून साऱ्याजणींला
हार्दिक शुभेच्छा
**वृंदावन**
७५९, प्रभात रोड कॉर्नर,
डेक्कन जिमखाना कॉर्नर,
पुणे ४११००४
फोन नं. ०२०-२५६७४२०८
✻ कन्फेक्शनरी
✻ ड्रायफ्रुट
✻ बेकरी प्रोडक्ट्स
✻ ग्रोसरी
अस्सल महाराष्ट्रीयन पदार्थ मिळण्याचे एकमेव ठिकाण

# आईसब्रेक

## नीरजा

### कथा

पाऊस रिपरिपत होता केव्हापासून. या आठवड्यात दिवसभर असाच रिपरिपणार म्हणून सांगितलं होतं वेदर पोर्टलवर. तो बाहेर पडला, तेव्हा पावसाबरोबर आलेला थंड वारा त्याच्या हाडात शिरला. झपझप पावलं टाकतं तो रस्त्यावर आला. चिटपाखरूही नव्हतं आजूबाजूला. बऱ्याचदा नसायचं. क्वचित कधीतरी माणसं दिसायची. वाहनांची वर्दळही नसायचीच फारशी. अंगावर आदळणारी भारतासारखी गर्दी या देशात तशी कुठंच नव्हती. स्टुटगार्ट तसं गजबजलेलं शहर होतं. पण जिथल्या शाळेत तो शिक्षक म्हणून काम करत होता, तो भाग थोडा उंचावर होता. छोटी छोटी प्रसन्न घरं आणि हिरव्यागार बागा. एखाद्या हिल स्टेशनला असल्यासारखं वाटायचं. उन्हाळ्यातले काही दिवस सोडले तर कायम धुक्याची चादर पसरलेली असायची. आजही पावसाचे ढग खाली आलेले होते आणि दाट होत चाललं होतं धुकं. अंगात घातलेला ओव्हरकोट पुरेसा वाटत नव्हता त्याला. अजून सवय होत नाही या हवेची. सहा वर्षं होऊन गेली होती आता. पण, ना या हवेची सवय होतेय, ना इथल्या माणसांची. आपलं शरीर आणि मन ज्या देशात, ज्या वातावरणात, ज्या संस्कृतीत जन्मतो त्या त्या मातीचं बनत जात असावं बहुतेक. त्यामुळेच दुसऱ्या मातीत गेलं की, रुजायला वेळ लागतो सगळ्यांनाच.

समोर स्टेशन दिसायला लागलं तसा वेग वाढवला त्यानं. दुरून येणारी ट्राम पाहिली त्यानं. पकडायची होती ती त्याला कोणत्याही परिस्थितीत. ती गेली तर पुन्हा अर्धा तास वाट पाहावी लागणार होती. त्यानं पाय उचलले. पण काय झालं अचानक कळेना. पायात मणामणाचं ओझं असल्यासारखं वाटायला लागलं त्याला. ट्राम शिरत होती स्टेशनात आणि तो वर होता. जिना उतरून त्याला धावत जायचं होतं; पण पावलं घट्ट रुतल्यासारखी झाली होती जमिनीत. त्यानं एकवटलं स्वतःला स्वतःमध्ये आणि धावायला लागला तो. पण तोंडाला लावलेल्या मास्कमुळे नीट श्वास घेता येईना. खाली उतरेपर्यंत धाप लागली होती त्याला आणि ट्राम निघून गेली होती, स्टेशनावरच्या पाचदहा माणसांना घेऊन. जणू काही तो नव्हता वाटला तिला तिचा. म्हणून सोडून गेली एकट्याला अनाथ त्या एकाकी स्टेशनावर.

दूर जाणाऱ्या ट्रामच्या दिव्याकडे पाहत राहिला तो खूप वेळ. मग जड झालेल्या पावलांनी चालत एका एकाकी बेंचजवळ आला आणि हाताची घडी गच्च छातीशी घेऊन बसून राहिला तो, पुढच्या ट्रामची वाट पाहत. धुक्याची चादर आता स्टेशनावरही पसरली होती. वाराही वाहायला लागला होता. वाऱ्याचं एक एक आवर्त दूर सारत होतं त्या धुक्याला. त्यातून अचानक एक बाई समोर आली त्याच्या. हात पसरून मागत होती ती काहीतरी. चेहरा ओळखीचा होता त्या बाईचा. कुठं भेटली ती प्रथम. लंडनमध्ये की पॅरिसमध्ये, की म्युनिकमध्ये? आठवत नाही. पण भेटली होती ती, तो इथं आला त्या वर्षी. हिजाब घातलेली, गोरीपान; पण उदास चेहऱ्याची. सारं काही हरून बसलेली. प्राणाच्या आकांतानं कुठंतरी धावू पाहणारी. कशापासून तरी सुटका हवी असलेली. हरवलेल्या पण, करुण चेहऱ्यानं हात पसरून उभी होती. चिकाटीनं उभी राहून आर्जवं करत होती. कोणासाठी. तिच्या लांबलचक गाऊनचं हातात आलेलं टोक घट्ट धरून असलेल्या पिंगट डोळ्यांच्या मुलीसाठी की पाठीवर बांधलेल्या लेकुरवाळ्या मुलासाठी. ती बडबडत होती कोणत्यातरी अनाकलनीय भाषेत आणि काहीच कळत नव्हतं त्याला. तो उभा होता हातात कॅमेरा घेऊन. फोटो काढत होता त्यावेळी त्याच्या सोबत आलेल्या मित्रांचे आणि ती अचानक कॅमेऱ्याच्या फ्रेममध्ये आली. मित्रांना फोकसमध्ये आणत होता तो कॅमेऱ्याच्या, तर हा लांबलचक पुरातन संदुकीसारखा आडवा चेहरा आदळला डोळ्यांवर. तेव्हा हललाच होता तो कॅमेऱ्यासकट.

अजून आठवते आहे ती. डोक्यात घट्ट बसून राहिली. किती वेळा हलवून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला; पण नाही पडली बाहेर. आताही तशीच उभी होती ती. धुक्याची चादर फाडून उभी होती. त्याला वाटलं अंगावर येऊन आदळेल ती त्याच्या. तो मागे सरला. तेवढ्यात आलेल्या धुक्याच्या ढगात नाहीशी झाली ती पुन्हा. कसला खेळ चालला आहे हा. तो डोळे फाडून पहात राहिला एकटक; पण काहीच दिसेना धुक्याच्या ढगांशिवाय. मग पुन्हा एकदा विरळ झाला तो पडदा आणि समोर आला तो लॉराचा खळाळत्या डोळ्यांचा प्रसन्न चेहरा. हसून साद घालत होती ती त्याला. मागे मागे जात बोलवत होती ती त्याला. त्यानं पाय उचलले पुढे जाण्यासाठी. पण पुन्हा एकदा पावसाचा ढग आला मध्ये. तो हताश बसून राहिला त्या बेंचवर. वाऱ्याचा लोट उठला पुन्हा एकदा आणि धुक्याची चादर विरून गेली पूर्णपणे. समोर कोणीच नव्हतं. ना लॉरा, ना हात पसरून करुण डोळ्यांनी साद घालणारी ती बाई.



काय झालंय आपल्याला? का होताहेत हे असे भास सकाळपासून. सकाळी बाबा स्वप्नात आले होते, प्रथमच. खरं तर त्यानं बंद केली होती केव्हाच त्याच्या मनाची, त्याच्या स्वप्नांची दारं त्यांच्यासाठी. आणि तेही नव्हते आले कधीच ते दार उघडून. मग आज अचानक का बरं आले. काही झालं नसेल ना त्यांना? कल्पनेनं शहारला तो. मग विचार झटकून त्यानं घड्याळाकडे पाहिलं. अजून वेळ होता पुढच्या ट्रामसाठी.

पाऊस दाटून आला होता गच्च. घट्ट दाट ढगांचा थर पसरून राहिला होता आकाशावर, खाली, सगळीकडेच. दुपारी चार वाजता पसरलेल्या त्या अंधाराचं भय वाटलं त्याला. त्या काळोखाला छेदून येणारा प्रकाश हवा होता त्याला. तो वाट पाहात राहिला त्याची. दिवस छोटे होत चाललेत. रात्र संपत नाही इथं लवकर. बाकी सगळं बरंच होतं, इथं फक्त हे एकच आवडत नव्हतं त्याला. भली मोठी लांबलचक सावली अंधाराची पसरून राहायची आणि आठवत राहायच्या अंधार वेढून राहिलेल्या अनेक रात्री. विशेषतः त्या हॉस्टेलमधल्या रात्री. बाबांनी हट्टानं टाकलं होतं हॉस्टेलमध्ये. त्रास दिलास तर हॉस्टेलमध्ये टाकतील बाबा, असं आई म्हणायची तो लहान असताना कधी कधी. पण ते खरंच टाकतील असं नव्हतं वाटलं कधी. दहा वर्षांचा होता तो तेव्हा. शिस्त नसलेला मुलगा म्हणून बाबांच्या डोक्यात जायचा तो कायम. म्हणून मिलिटरी स्कूलमध्ये टाकलं त्यांनी.

बाहेर रिपरिपणारा पाऊस आणि आत भरून राहिलेलं कोंदट आकाश. कुठलं तरी हिल स्टेशन होतं ते. तिथली शाळा. कायम पावसाळी हवा. आभाळ भरलेलं असायचं काळ्यादाट ढगांनी कायम. तेव्हाही उजेड लागावा हाताला म्हणून धडपडत राहायचा तो. एकटा बसून आसवं गाळायचा. बाहेरच्या पावसासारखेच वाहत राहायचे डोळे. घराची, आईची आठवण यायची आणि बाबांचा खूप खूप राग. त्यांचा चेहरा आठवला तरी मुठी आवळल्या जायच्या त्याच्या. तेव्हाच ठरवलं होतं त्यानं. आपल्याला या अशा अंधाऱ्या खोलीत कोंडणाऱ्या बापावर सूड घ्यायचा आणि लोटायचं त्यालाही अंधारात. काय काय केलं त्यानं ते डोक्यात ठेवून. कसलाच आनंद घेऊ दिला नाही त्यांना. दहावी होईपर्यंत तसा संपर्क नव्हताच जास्त त्यांच्याशी. सुटीत घरी गेला तरी तो राहायचा नाही जास्त तिथं. आजीकडे निघून जायचा बेळगावला. सगळे समजावायचे त्याला तुझ्या भल्यासाठीच पाठवलं ना. बघ किती छान अभ्यास चाललाय तुझा. शिस्त लागलीय. बघ कसा शांत, गंभीर झाला आहेस.

तो हसायचा मनात. खरंच शांत, गंभीर झाला होता तो की केवळ मुखवटा

होता तो. त्या शांत चेहऱ्याच्या आत सतत लाव्हा उसळत असायचा. सतत राग भरून राहिलेला असायचा जगाविषयी. आपल्यावर अन्याय झालाय ही भावना कायम मनात घेऊन जगत होता तो तेव्हा आणि पुढंही जगत राहिला. आणि त्याच्यावर तो अन्याय करणाऱ्याला सुखानं जगू द्यायचं नव्हतंच त्याला. मग त्यांना ज्या ज्या अपेक्षा होत्या त्याच्याकडून त्याच्या विरुद्ध वागत राहिला. खरं तर त्याला इंजिनिअर व्हायचं होतं तेव्हा. पण जेव्हा कळलं बाबंनाही वाटत होतं त्यानं इंजिनिअर व्हावं म्हणून तेव्हा दहावीला त्र्याण्णव टक्के मिळूनही त्यानं मुद्दाम आर्टस्ला प्रवेश घेतला. जर्मन घेतलं अकरावीला. आणि  कल्चरल एक्स्चेंजच्या माध्यमातून स्कॉलरशीप मिळवून इथं स्टुटगार्टला आला. प्रेमात पडला या शहराच्या. त्या महिन्याभरातल्या काळातच ठरवून टाकलं कायमचं इथंच येऊन राहायचं म्हणून. इथं झालेल्या मित्रांच्या संपर्कात राहिला. लॉरा इथंच भेटली त्याला. त्यांच्या त्या ग्रुपमध्ये एकमेकांच्या नावानं चिडवायला लागले दोघांना आणि त्यांच्या नकळत प्रेमात पडले एकमेकांच्या. तिथून परतल्यावरही मेल लिहित राहिले एकमेकांना. संपर्कात राहिले एकमेकांच्या. मग त्यानं इंग्रजी आणि जर्मन घेऊन बी.ए. केलं. थोडीफार ट्रान्सलेशन्स, शिकवण्या आणि काय काय केलं. इथं येण्यासाठी हवे तेवढे पैसे जमवत राहिला. मॅक्सम्युलर भवन्समध्ये जात राहिला. त्यांच्याशी संपर्क वाढवत होता. परीक्षाही दिल्या. बीएला चांगलेच मार्क्स मिळाले त्याला. त्यामुळे स्कॉलरशीपही मिळाली पीजीसाठी. बाबांनी एक पैसा दिला नाही. त्याला नकोही होता. मग आईनं कर्ज काढलं थोडंसं. बँकेत होती ती. बाबांपासून लपवून पैसे दिले तिने आणि हा आला इथं पुढच्या शिक्षणासाठी कायमचा. तो निघाला तेव्हा त्यांच्या डोळ्यांत दुखरे भाव होते. ते पाहिले तेव्हा सुखावला तो. असेच भाव घेऊन तोही उभा होता हॉस्टेलच्या त्या दारात जेव्हा आईबाबा हात हलवत सोडून गेले होते त्याला. आता रिकाम्या घरात भरून राहिलेला अंधार अंगावर ओढून बसून राहतील कायमचे या भावनेनं बरं वाटलं होतं तेव्हा त्याला. पण तेवढंच. हळूहळू सगळंच विरत गेलं. कसल्याच भावना नाही राहिल्या मनात. ना राग, ना पुरेसं प्रेम.

आई सांगायची अनेकदा, ‘अरे आहेत ते थोडे कडक, त्यांच्या मनाप्रमाणे व्हावं असं वाटतं त्यांना. आपण ऐकलं ना त्यांचं तर त्यांच्याएवढा प्रेम करणारा माणूस नाही.’ वाद घालायचा तो तिच्याशी. म्हणायचा, ‘हे कसंल प्रेम? स्वतःच्या दावणीला बांधून ठेवायचं गळ्यात दोरी बांधून आणि पाठीवरून हात फिरवायचा. मी म्हणेन ती पूर्वदिशा असं वाटत आलंय त्यांना कायम. त्यांनी स्वतः मात्र, त्यांना हवा तो अवकाश मिळवला. आजोबांशी भांडून बाहेर पडले घराच्या, उभे राहिले स्वतःच्या पायावर, स्वतः ला हवं तसंच जगले. आपल्याला मात्र कोंडून ठेवलं त्यांच्या अवकाशात. तुलाही नाही मनासारखं जगता आलं. किती गोष्टी लपवून कराव्या लागल्या. अगदी आमच्यावरचं प्रेमही. नोकरी केलीस तू जन्मभर. पण मिळवलेला पैसा खर्च करायचं स्वातंत्र्य मिळालं का तुला?’ तिला असे प्रश्न विचारले की, म्हणायची, ‘असतो रे एकेकाचा स्वभाव. इतकी कटुता बरी नाही आशु, ती काळजात वागवत राहिलास तर तूही कडवट आणि हेकेखोर बनशील बाबांसारखा.’ ती हे म्हणाली तेव्हा जोरजोरात मान हलवली होती त्यानं. अजिबात त्यांच्यासारखा होणार नाही, असं म्हणायचा तो नेहमीच. पण अलीकडे प्रश्न पडायचा त्याला. आपणही बनत चाललोय का त्यांच्यासारखेच. नात्यातली ओल हरवून बसलो आहोत का आपलं प्रेम लादताना लोकांवर? लॉरा म्हणाली होती त्याला तसं. ती म्हणायची नेहमी, ‘डोंट बी पझेसिव्ह आशु. टिपिकल इंडियन पुरुषासारखा वागतो आहेस तू. आय नेव्हर एक्स्पेक्टेड इट फ्रॉम यू.’

तिच्याबाबतीत का पझेसिव्ह झालो होतो आपण इतके. आणि भारतीय पुरुषांसारखे डॉमिनेटिंग म्हणजे. काय म्हणायचं होतं तिला नेमकं. तिला काय माहीत होतं भारतीय पुरुषांबद्दल. खरंच डॉमिनेटिंग असतात ते. आपल्या बाबांसारखे की आपल्यासारखे?

मी नाही तसा हे कसं पटवून देणार होता तो लॉराला. नाही समजावता आलं तिला त्यावेळी. नाही सांगता आलं त्याला की, त्याच्या आत आत वाहत होता झरा प्रेमाचा. म्हणून तर तिच्यावर प्रेम केलं होतं त्यानं मनापासून. पण तिला पटत नव्हतं ते. ‘तू लाख म्हणशील रे, पण मला दिसला पाहिजे ना तो झरा’, असं म्हणायची ती. त्याच्या मनातला तो झरा मनातच वाहत राहिला. बाहेरचा तो नव्हता वागत त्याच्या आतल्या आशुसारखा.

का झालं असं आपल्या बाबतीत. आई म्हणायची तसं बाबांचंही आपल्यासारखंच होतं का? त्यांच्याही आत असलेली ओल आतच राहिली आणि आपल्याला दिसलेले बाबा वेगळेच होते का? आत आत कोणाबद्दल काही वाटणं आणि बाहेर त्यांच्याशी वागणं यात फरक असतो का? सगळ्यांच्याच बाबतीत होत असावं का हे? लॉरा सोडून गेल्यापासून खूप विचार करायचा तो त्याच्या या अशा वागण्याचा. निराश वाटायचं. जे नाकारत जगलो आयुष्यभर तसेच होत गेलो का आपण या प्रश्नानं हैराण व्हायचा. आत आत तुटायचं त्याच्या पण त्या कळात सोफी भेटली आणि तिनं समजावलं त्याला. ‘तुझ्या आत नसती ती ओल, तर मला कसं समजून घेतलं असतंस, आशु’, असं म्हणायची.

ती म्हणत होती ते खरं असेल कदाचित. ती ओल नसती आपल्या आत तर त्या बाईचे करुण डोळे नसते आठवले वारंवार. आणि बाबांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्याचा नेहाचा मेसेज वाचल्यापासून मनात भरून राहिलेली ही अस्वस्थताही नसतीच आली की वस्तीला.

समोरून प्रकाश दिसला ट्रामच्या दिव्यांचा आणि तो उठला. ट्राममध्ये चढला तेव्हा तीनचार लोक बसलेले होते. एक वयस्कर गृहस्थ आणि एक मुलगा शांतपणे

पुस्तकात डोकं खूपसून बसलेले होते. दुसरा एक तरुण मुलगा कानाला हेडफोन लावून बहुतेक म्युझिक ऐकत होता. बसल्या जागेवर त्याच्या पायांनी आणि हातांनीही ताल धरलेला होता. आणि एक बाई आपल्या छोट्या मुलाला घेऊन बसली होती. कसल्यातरी विचारात बाहेर पाहत होती. प्रत्येक जण आपल्यातच मग्न असतो इथं. स्वतःच्या जगात नाहीतर पुस्तकांच्या. मुंबईत लोकल ट्रेनमध्ये जसा संवाद होतो सहज, तसा संवाद नाही होत इथं. संवाद साधण्यानं आपलं खाजगीपण हरवून जाईल ह्याचं भय वाटतं प्रत्येकाला. लॉराला म्हणायचा तो अनेकदा. किती कोरडी माणसं आहेत तुमच्याकडची म्हणून. तेव्हा ती फणकारत म्हणायची, 'याला कोरडं असणं नाही म्हणत. प्रत्येकाला आपला स्पेस लागतो. आपला वेळ आणि जागा यावर अकारण कोणी आक्रमण करत असेल तर नाही आवडत कोणालाच. मलाही आवडत नाही.'

खरं तर त्यालाही आवडत नव्हतंच की. बाबांनी त्याच्या आयुष्याच्या त्यांच्या हातात घेतलेल्या दोऱ्या तोडून तोही आलाच होता की इथं. पण तरी असं बोललं की त्याच्या आत वाढत चाललेल्या कोरडेपणाला उत्तर दिल्यासारखं वाटायचं त्याला. त्याच्या मनात चाललेल्या या कल्लोळाची कल्पना नाही करता आली लॉराला. खरं तर, बीए करून तो आला पुढच्या शिक्षणासाठी तेव्हा लॉरा आणि त्यावेळी भेटलेले मित्रच आधार झाले होते. इंग्रजी आणि जर्मन घेऊन एम.ए. करत होता तो इथं, तेव्हा तीही त्याच्या सोबतच होती युनिव्हर्सिटीत. दोन वर्ष एकत्र राहिले. पण खूप काळ जवळ राहिल्यावर सगळंच बिनसलं. त्याला जे हवं होतं तिच्याकडून ते नाही मिळालं त्याला आणि तिला जे हवं होतं त्याच्याकडून ते तो नाही देऊ शकला. लॉराचे आणि त्याचे खटके वाजायला लागले आणि एक दिवस निघून गेली ती त्याला सोडून. तेव्हा अस्वस्थ असायचा तो. त्या काळातच सोफी भेटली त्याला.

सोफी खूपच वेगळी होती. प्रगल्भ होती जास्त. सोसलेली माणसं असतात तशी. खरं तर, ती इथली नव्हतीच. ती पोलिश होती. इथं नोकरीसाठी आली होती. इथं आल्यावर पोटापाण्यासाठी तो ज्या हॉटेलमध्ये पूर्वी काम करत होता, तिथंच रिसेप्शनिस्ट म्हणून काम करत होती. रात्री राहण्यासाठी घर नव्हतं स्वतःचं. म्हणून रात्रीची शिफ्ट करायची. दिवसा कुठंतरी सामान पाठीवर बांधून फिरायची. कधी युनिव्हर्सिटीत तर कधी बिबलोथेकच्या लायब्ररीत बसून अभ्यास करायची. संध्याकाळी हॉटेलमध्ये यायची. तिथं रात्री पाठ टेकण्यासाठी जागा मिळायची. तिथंच ओळख झाली तिच्याशी. हळूहळू गप्पा सुरू झाल्या. एकमेकांशी बोलणं आवडायला लागलं. आणि मग सहवास वाढत गेला. आवडायला लागले ते एकमेकांना. या शाळेत शिक्षकाचा जॉब मिळाला आणि त्यानं हॉटेलमधला जॉब सोडला. त्याकाळात एकमेकांशिवाय राहू शकत नाही, याची जाणीव व्हायला लागली आणि आता अलीकडेच एका वर्षापूर्वी बिबलोथेकजवळ घर भाड्यानं घेतलं होतं दोघांनी मिळून आणि शेअर करत होते ते सगळंच.

त्यानं चाळा म्हणून फोन उघडला आणि मेसेजेस चाळायला लागला. गेले


## नव्यानं वर्गणी भरायची आहे?

| भारत | | | |
|---|---|---|---|
| | वार्षिक | ३ वर्षे | १० वर्षे |
| व्यक्ती | ५००/- | १४००/- | ५०००/- |
| संस्था | ७००/- | १९००/- | ७०००/- |

| भारताबाहेर | | |
|---|---|---|
| | वार्षिक | ३ वर्षे |
| व्यक्ती | ५० यु.एस. डॉलर्स | १२० यु.एस. डॉलर्स |
| संस्था | ६० यु.एस. डॉलर्स | १५० यु.एस. डॉलर्स |

वर्गणी मनीऑर्डरने किंवा 'निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'च्या नावे डिमांड ड्राफ्टने /**AT PAR** चेकने पाठवावी. वर्गणी इंटरनेट बँकिंगद्वारे तसेच, मिळून साऱ्याजणीच्या www.miloonsaryajani.in या वेबसाईटवरूनही भरता येईल.
यासाठी आमचे खाते क्रमांक आहेत –

**युनियन बँक, कर्वे रोड, पुणे**
Saving Ac. No. - **370002010908793**
IFSC - **UBIN0537004.**

**बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वे रोड, पुणे**
Saving Ac. No. - **60029908172**
IFSC - **MAHB 0000116.**

A/C Name :
**Niramaya Public Charitable Trust**

**एक महत्त्वाची सूचना –** वर्गणी ऑनलाईन भरल्यानंतर ७४४७४४९६६४ या क्रमांकावर नांव, पत्ता, वर्गणीची रक्कम आणि वर्गणी कोणत्या बँकेत भरली याची SMS करून माहिती द्यावी, म्हणजे खात्यात जमा झालेली वर्गणी कोणाची आहे हे आम्हांला कळू शकेल.

पंधरा दिवस जवळजवळ रोजचं चॅटिंग चालू होतं त्याचं नेहाशी. बाबांचा रिपोर्ट कोव्हिड पॉझिटिव्ह आल्यापासून तोही अस्वस्थ झाला होता. गेले सहा महिने या देशातही लोक झुंझत होते त्याच्याशी. मृत्यूच्या वाढत्या संख्येनं हवालदिल झाले होते. आता कुठं आटोक्यात आलं होतं सगळं. चार महिने त्याची शाळाही बंद होती. जुलै महिन्यापासून पुन्हा सुरू झालं होतं सगळं. सगळे नियम काटेकोरपणे पाळत होते लोक. भारतात एकूण आनंदच होता. महाराष्ट्रात केसेस जास्त असल्या तरी राज्य सरकार बऱ्यापैकी हाताळत होतं परिस्थिती, असं म्हणत होती नेहा. पण लोक अजून नियम पाळण्याच्या बाबतीत गंभीर नव्हते. त्यामुळे केसेस वाढत चालल्या होत्या. इथंही असे लोक होतेच. लॉकडाऊन पसंत नव्हताच कोणाला. लोकांच्या फिरण्याच्या, कोणतीही गोष्ट करण्याच्या स्वातंत्र्यावर बंधन घातलेलं आवडत नव्हतंच त्यांना. उन्हाळ्यात तर निवांत पडलेले असायचे कोणत्यातरी बागेत नाहीतर, रस्त्यावरच्या बेंचवर पुस्तकं वाचत बसायचे. पण घरात मृत्यू व्हायला लागले तसे लोक शहाणे झाले. इथल्या पंतप्रधानांनी परिस्थिती चांगलीच हाताळली होती. पण शेजारच्या स्पेन आणि इटलीतून येणारे मृत्यूचे आकडे ऐकल्यावर आणि परिस्थिती पाहिल्यावर थरकाप उडायचा. वृद्धांच्या मृत्यूचं प्रमाण जास्त होतं तिथं. माणसं आपल्या माणसांनाच मरताना पाहत होती आणि त्यांच्या जवळही जाऊ शकत नव्हती. ना फ्युनरल होत होतं, ना त्यानंतरचा वेक. भारतातही तेच चालंल होतं. एरवी सगळं करणारे भटजी करोनाच्या भीतीनं सारंच टाळत होते. नेहाच्या नवऱ्याचे काका पुण्यात गेले करोनानं त्यांची बॉडी मिळाली नाहीच. पण पुढचं काही करण्यासाठी कोणी आलं नाही. त्यांचा मुलगा आणि त्याची बायको दोघंच मुळेच्या काठी जाऊन विसर्जन करून आले होते अस्थींचं. बाबांचं काही झालं तर कोण करेल हे सारं.

सरसरून काटा आला त्याच्या अंगावर. कसा झाला त्यांना कोव्हिड कोण जाणे. आई तर सांगत होती घरातून बाहेरही पडत नव्हते ते. सकाळी लवकर उठून भाजी, किराणा आणत होते. पण कशी कुणास ठाऊक सर्दी झाली, घसा खवखवायला लागला. ताप आला. आपल्याला करोना झाला असेल या कल्पनेनंच घाबरले ते. रिपोर्ट यायच्या आधीच आईला म्हणाले होते, 'मी कुठल्या कोव्हिड सेंटरला जाणार नाही' म्हणून आणि खाजगी हॉस्पिटलात गेले. तिथं आई आणि नेहा नजरेला पडतील असं वाटत होतं त्यांना. पण कोणालाच आत पाठवत नव्हते. नेहाचा नवरा– किरण– दिवसातून एकदा जाऊन येत होता. त्यात आईलाही ताप आला. दोन दिवसांपासून किरणलाही ताप होता. तोच शेवटचा मेसेज होता. पण या मेसेजनंतर एकही मेसेज नव्हता नेहाकडून. कसे आहेत सगळे काहीच कळायला मार्ग नव्हता. त्यानं आई आणि किरणची चौकशी केली होती. पण त्याला दोन दिवस झाले, तरी उत्तर नव्हतं नेहाकडून.

नेहा जबाबदारीनं करत होती आईबाबांचं सगळं. आणि तो मात्र साऱ्या जबाबदाऱ्या झटकून निघून आला होता इथं. एवढ्या दिवसात त्यानं स्वतःहून फोन करून चौकशी नव्हती केली बाबांची. तिचेच मेसेज असायचे. कधी तिचा तर कधी आईचा फोन असायचा. पण त्यानं या दिवसांत एकदाही फोन नव्हता केला. बाबांना हॉस्पिटलमध्ये हलवल्याचा पहिला मेसेज आला तेव्हा किंचित अस्वस्थ झाला होता तो. एखादा व्हिडिओ कॉल करावा बाबांना, असं एक दोनदा मनातही आलं त्याच्या. पण नाही केला त्यानं. आपलाही अहं आणि हट्ट वाढत चालला आहे का. गेल्या दोन तीन वर्षांत वाटायला लागलं होतं, आपण आता बाहेर आलो आहोत नातेसंबंधातल्या रागलोभातून. पण अजूनही नाही येता येत असं वाटतंय.

गेले आठ दिवस झुंजताहेत सगळे या व्हायरसशी. आणि तो इथं राहून काहीच करू शकत नव्हता. त्यांना काही झालं तर नसेल ना. नेहा फोन का करत नाही. आई सिरिअस तर नसेल ना झाली. की किरण? काहीच कळत नव्हतं. आईला ताप आल्याचं कळल्यापासून जास्तच हलला होता तो. तिला काही झालं तर. पुढे कधी परतावंसं वाटलं आपल्या देशात तर कुठं जायचं मग आणि कोणासाठी जायचं या भावनेनं भरून येत होतं त्याला. पण का कुणास ठाऊक फोन करण्याचं धाडस नव्हतं होतं त्याला. त्याचा अहं आड येत होताच; पण मनात भयही होतं. फोन केला आणि काही वाईट बातमी मिळाली तर. अनेक वयस्कर माणसांना घेऊन गेलाय हा कोव्हिड. आईबाबाही गेले यात तर काय होईल.

तसं पाहिलं तर काहीच होणार नव्हतं हे माहीत होतं त्यालाही. तो इथंच तर राहणार होता. पुढं कधी जाईल याची शाश्वतीही नव्हती. जेव्हा बंध सोडून येता तुम्ही एखाद्या भूमीचे, तेव्हा उगाच इमोशनल होऊन तिला आठवण्यात काय अर्थ आहे. काय करणार असतो आपण नेमकं त्या देशासाठी, मातीसाठी आणि आईवडलांसाठीही. फार तर पैसे पाठवायचे त्यांच्या अडचणीत. आताही ते आजारी आहेत म्हणून धावत निघालो आहोत का आपण. फ्लाईट्स बंद आहेत हे कारण आहे, फक्त देण्यासाठी. ती सुरू झाली समजा तर तेवढा खर्च करून जाणार आहोत का आपण तिथं. आणि कोणासाठी जायचं. त्या माणसासाठी ज्यानं आपल्याला कधीच समजून घेतलं नाही त्याच्यासाठी. आई म्हणते समजून घे त्याला म्हणून. पण आमच्या सगळ्यांच्या जगण्याचा रिमोट स्वतःच्या हातात ठेवून राहिलेल्या या माणसाला कशासाठी सम जून घ्यायचं?

त्यानं मान हलवली. आणि डोळे मिटून घेतले. कितीही राग राग केला त्यांचा आणि कोणतंही कारण दिलं त्यांच्यावरच्या रागाचं तरी हे काही दिवस उगाचच अस्वस्थ वाटतंय त्याचं काय करायचं? सोफी म्हणते ते खरं आहे. एक काळ

असतो जेव्हा कटुता भरून राहते मनात. ती कायमची राहील असंही वाटत असतं. पण कधीतरी निचरा होऊन जातो साऱ्या रागाचा आणि काहीच वाटत नाही. अगदी काहीच. ती पोचली होती, त्या स्टेजला केव्हाच आणि आता तर शोधायलाही बाहेर पडली होती तिच्या जन्मदात्रीला. हे बायोलॉजिकल पेरेन्टसचं प्रकरण खूपच कॉमन आहे इथं. आपल्याकडे विचारही करणार नाही कोणी. इथं किती सहज स्वीकारलं जातंय त्यांना. पोलंडहून घर सोडून निघाली होती, तिची आई जर्मनीत येण्यासाठी. ट्रेनमध्ये भेटलेल्या जर्मन डॉक्टरच्या प्रेमात पडली. प्रेगनंट झाली. तो निघून गेला होता तोवर. जन्म देऊन तिनंही जबाबादारी झटकली आणि हिची रवानगी फॉस्टर पेरेंटसकडे झाली. तशीच वाढली. अठरा वर्षांची होईपर्यंत तीन जणांकडे वाढली होती ती. काही बरे काही वाईट अनुभव घेतले होते तिने. जन्मताच वाऱ्यावर सोडणाऱ्या आईवर तर राग होताच सोफीचा, पण यातल्या काही फॉस्टर आईवडलांवरही होता. जबाबदारी स्वीकारायची तयारी दाखवून नीट वाढवता आलं नाही त्यांना तिला. अनाथ मुलीला घरी आणल्यावर नेमकं काय करायला हवं होतं याचा विचार नव्हता केला त्यांनी. अन्न, वस्त्र, निवारा देणं म्हणजे नसतं ना सगळं. तिला समजून न घेता वाढवलं त्यांनी. एका घरात तर ज्यांनी जबाबदारी घेतली त्यातल्या बापानंच बलात्कार करण्याचा प्रयत्न केला होता तिच्यावर. सोळा वर्षांची होती ती तेव्हा. मग मात्र स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला तिनं. हा सारा वनवास आणि वणवण जन्म देऊन सोडलेल्या आईमुळेच वाट्याला आली, असं वाटायचं तिला. एकदा भेटून जाब विचारायचा होता तिला. असं म्हणायचीही ती त्याला. तेव्हा तो म्हणाला काय करणार आहेस भेटून. पण अलीकडे कटुता कमी झाली होती तिच्या मनातली. पण या जन्मदात्रीला भेटण्याची इच्छा मात्र होतीच मनात. तिनं मनावरच घेतलं होतं.

सोफीच्या आयुष्याबद्दल आत्ता आत्ता कळलं होतं त्याला. सुरुवातीच्या काळात मात्र काहीच सांगितलं नव्हतं तिनं या विषयी. त्यानंही नव्हतं विचारलं कधी फारसं. इथल्या जगण्याच्या पद्धतीतला तो महत्वाचा भाग होता. प्रायव्हसी जपायलाच लागत होती प्रत्येकाची. भारतातल्यासारखं प्रत्येकाच्या आयुष्यात लुडबूड करणं नव्हतं की नको ते सल्ले देणं नव्हतं. सुरुवातीला तो विचारायचा काही प्रश्न तेव्हा हसून म्हणायची, 'तू सोफी म्हणून प्रेम कर ना माझ्यावर. कोणाची मुलगी, कोणत्या देशातली, कोणत्या धर्माची म्हणून नको करूस. मी करते का तसं.' आणि पटलं त्याला मग. नाहीच केली कधी चौकशी. आता असं वर्षभर एकत्र राहिल्यावर काही गोष्टी कळत गेल्या. पण त्यातही त्याचे सल्ले वगैरे नाही मागितले तिनं कधी. तो काही बोलला तर ऐकायची. त्यालाही समजवायची. पण करायची मात्र तिला हवं तेच.

गेल्या वीकएंडला जोडून आठ दिवसाची रजा टाकून गेली होती ती तिच्या त्या पोलंड सोडून आलेल्या आणि तिलाही सोडून गेलेल्या बायोलॉजिकल आईला भेटायला. हे जैविक नातं खरंच इतकं महत्त्वाचं असतं का? आयुष्याची पंचवीस वर्षं अनेक उंबरठ्यावर भेटलेल्या, थोड्या वेळासाठी आईवडलांची भूमिका करणाऱ्या इतर सर्व माणसांना पुन्हा एकदा भेटण्यापेक्षा जन्मताच नाळ तोडलेल्या त्या आईला का भेटावसं वाटलं असेल तिला? तिला म्हणाला होता तो, 'शुद्ध मूर्खपणा आहे हा. ज्या बाईनं तुझं पुढे काय होईल याचा विचारही केला नाही, अशा बाईचा शोध घेण्यासाठी का निघाली आहेस?' तर हसली होती. म्हणाली, 'का सोडलं मला, काय कारण होतं सोडायचं हे जाणून घ्यायला नको का. आयुष्यभर तिला दोष देत मनात कडवटपणा साठवून ठेवण्यापेक्षा एकदाचा सोक्षमोक्ष लावला तर मी तरी सुखानं जगेन. माझ्या वाट्याला जे आयुष्य आलंय त्या आयुष्यासाठी कायम तिला जबाबदार धरलंय मी. तिनं का केलं हे सारं हे कळून घेतलं तर रात्रीची झोप तरी निवांत लागत जाईल. आणि आशु शेवटी आईस ब्रेक केल्याशिवाय आतल्या झुळझुळणाऱ्या पाण्याचं दर्शन नाही होणार ना.' ती असं बोलली तेव्हा त्यानं तिचा लगेच मुका घेतला होता. इतकी पॉझिटिव्ह विचार करणारी मुलगी आपल्या सोबत आहे याचंच अप्रूप वाटलं होतं त्याला. पण जेव्हा ती म्हणाली, 'तूही एकदा भारतात जाऊन मोकळा होऊन ये. कदाचित तुझे वडीलही वाट पाहत असतील या आईस ब्रेकची.' तेव्हा गप्प बसला होता तो. सोफी गेली गेल्या आठवड्यात म्युनिकला आणि बाबांना कोव्हिडमुळे हॉस्पिटलमध्ये नेल्याचा मेसेज आला नेहाचा. सोफीला काहीच बोलला नाही तो. ती परतण्याची वाट पाहात राहिला फक्त. पण आईस ब्रेक करण्याविषयीचे तिचे शब्द सारखे आठवायला लागले होते अलीकडे.

तो ट्राममधून उतरला. स्टेशनमधून बाहेर पडला. पण त्याला घरी जावंसंच वाटेना. सोफी घरात नव्हती. उद्याची सुट्टी होती त्याची. आणि सुटीच्या दिवशी घरात एकटं राहायचं या कल्पनेनंच कंटाळा आला होता त्याला. तिच्या असण्याचीही सवय झाली होती अलीकडे. मग थोडा वेळ तो बिबलोथेकमध्ये गेला आणि पुस्तकं चाळत बसला. या लायब्ररीत आलं की का कुणास ठाऊक पण एक प्रकारचा सुकून वाटायचा त्याला. शांत व्हायचा तो. अनेकदा लायब्ररीच्या गच्चीवर जाऊन उभा राहायचा आणि पाहत राहायचा त्या शहराकडे, त्यातल्या माणसांकडे. ही आता आपली माणसं आहेत सगळी असं जोरजोरात सांगायचा स्वतःला. मग अस्वस्थता निघून जायची हळूहळू.

आताही तसाच वर गेला. श्वासात हवा भरून घेतली त्या शहरातली. थंडगार हवेनं कुडकुडायला झालं तसा खाली उतरला. त्या अवाढव्य लायब्ररीचे जिने उतरून खाली आला आणि मग चालतच घरी पोचला. लॅचनं दार उघडून आत आला तेव्हा घरात एक वेगळाच पण ओळखीचा सुगंध पसरलेला जाणावला त्याला. सोफी

(पान ११५ वर)

## विद्रोह व सहिष्णुतेच्या उत्कट इतिहासाची गाथाकार

# गेल ऑम्वेटच्या रचनांचे एक उत्सव पर्व : १९४१-२०२१

कल्पना कन्नाबिरान । अनुवाद : लता प्रतिभा मधुकर

**'आंबेडकरी बौद्ध धम्म नव्या युगाचे वैचारिक दिग्दर्शन करू शकतो', अशी भूमिका घेणारी, शोषणमुक्तीच्या ध्यासानं पछाडलेली, कृतीशील विचारवंत गेल ऑम्वेट आता आपल्यात नाही. इतिहासाची आणि संस्कृतीची फेरमांडणी करत भारतातल्या प्रागतिक चळवळींना नवी दिशा देण्यासाठी गेल आयुष्यभर धडपडत राहिली. बुद्धाचे विचार, आंबेडकरांच्या चळवळी यांचा चिकित्सक सखोल अभ्यास करून त्यातली शक्तिस्थळं उणीवांसकट ओळखून जातीअंतासाठी नवी सैद्धांतिक भूमिका विकसित करण्यात तिनं पुढाकार घेतला. स्त्री चळवळीला एक बहुजनवादी नवी दृष्टी गेलनं दिली. भारतातल्या ब्राह्मणेतर सांस्कृतिक प्रवाहांबद्दल असलेलं गेलचं आकलन आणि संशोधन भारतातल्या बहुजनवादी सांस्कृतिक चळवळींसाठी नेहमीच दिशादर्शक राहील. अशा या स्त्रीवादी विदुषी गेलचा वियोग सुसह्य होण्यासाठी तिची विचारसंपदा आपल्याला मदतीचा हात देईल. तिच्या तेजस्वी स्मृतीला 'साऱ्याजणी'चं विनम्र अभिवादन!**

**गेलच्या संपूर्ण लेखनाचा व कार्याचा गाभा 'मैत्र' या संकल्पनेवर कसा आधारलेला होता हे उलगडून दाखवणारा हा अभ्यासपूर्ण लेखाजोखा!**

### स्मरणांजली

क्रांती म्हणजे नेमके काय? क्रांतीचे सामाजिक चरित्र, तिचा इतिहास आणि तिचा प्रवास आपण कसे समजून घेतो? क्रांतीची संकल्पना रुजवताना कृती व सिद्धान्ताचे परस्पर नातेसंबंध कसे असतात? क्रांतीच्या ध्येय शिखरावर पोचण्यासाठी पथदर्शक टप्पे कोणते असतात? काय असतात त्यासाठीचे भौतिक, सामाजिक, ऐतिहासिक आणि ग्रामीण, शहरी तसेच प्रांतीय अवकाशाशी निगडित स्थानिक संदर्भ? क्रांतीसाठी सामूहिक बांधिलकीचे भान कसे निर्माण होते? या क्रांतीसाठीची बांधिलकी दर्शवण्यासाठी, त्या क्रांतीच्या ओढीने चालणाऱ्या गहन, अथक चर्चा आणि प्रेरक संवाद करण्यासाठी कशा, कुठे आणि कोणत्या जागा असतात? अशा प्रश्नांमधून क्रांतीच्या आंतरिक विश्वाचा गेल ऑम्वेट आपल्या लेखनातून शोध घेत निघाली होती. मग ते गेलचे (१९७५ अ, १९७५ ब, १९८०, १९९०) १९७०च्या दशकापासून २००० व त्यानंतरच्या दोन दशकांपर्यंत स्त्रियांच्या चळवळी, स्त्रीवादी कृतीविषयी चिंतन असो किंवा जातीभेदविरोधातील तत्त्वज्ञान, चळवळ, वा राजकारणाचे विश्लेषण असो, गेलच्या लेखनाचा अवकाश असा विस्तारलेला आहे.

गेल्या पाच दशकांमध्ये जनआंदोलनांची स्पंदने टिपत जाताना ती तुम्हाला बदललेले संदर्भ देतेच, तसेच तिच्या स्वत:च्या भूमिकांमध्ये झालेले बदल, विशेषतः ऐतिहासिकदृष्ट्या व्यापक अशा स्त्रीवादी चळवळ, भूमी हक्कांची चळवळ, पर्यावरणवादी संघर्ष, किंवा हिंदुत्ववाद वा बहुसंख्याकांच्या मूलतत्त्ववादी चळवळी या सर्वांच्या पार्श्वभूमीवर तिने टिपलेले वास्तव आणि त्यातून उभे राहणारे चर्चाविश्व तिच्या लेखनातून ती उभे करते. विशेषतः जेव्हा आपल्या अवतीभवती आम्हीच सर्वोच्च अशा वल्गना करणाऱ्या हिंदुत्ववाद्यांच्या अभेद्य उतरंडीच्या या किल्ल्यांमध्ये कशी आणि कुणी भगदाडे पाडली, याचा आढावा घेत या धर्मांध शक्तीला आव्हान देणारे ऐतिहासिक विद्रोह ती समोर ठेवते आणि अशा विद्रोही लढायांबरोबरच सहिष्णुतेची व करुणेची पाखर करीत मानवतेच्या व समतेच्या वाटेवरची स्पंदने ती टिपते. या सामाजिक व ऐतिहासिक संदर्भ असलेल्या विविध काळांमधील घटनांचा मागोवा घेत, ती भारतात आजमितीला आपल्या समोर असलेल्या आव्हानांशी लढण्याचे बळ व शक्यता समोर ठेवते.

या देशातील सामाजिक क्रांतीचा इतिहास व भविष्यातील क्रांतीच्या संभावनेच्या वर्तमानातील संघर्षाला समजून घेण्यासाठी भौतिक व आध्यात्मिक संदर्भात खोलवर रुतलेल्या जातीय विषमतेविरुद्ध दलितांनी केलेला विद्रोह ही एक मार्गदर्शक पायवाट आहे. (ऑम्वेट, २०११).

शहरातील स्वायत्त स्त्रीवादी चळवळीची गेलने केलेली विधायक समीक्षा, मार्क्सवादी समीक्षेच्या चौकटीतून; परंतु पारंपरिक पद्धत बाजूला ठेवून त्यातील विविध समीक्षा पद्धती वापरून गेलने सतत भारतातील हिंदुत्ववादी शक्तींच्या विरोधात उभ्या राहिलेल्या प्रतिरोधाचे आवाज टिपण्याचा व त्याचे विश्लेषण ठेवण्याचा प्रयत्न केला. दलित, बहुजन, आदिवासी, शेतकरी, कामगार, प्रामुख्याने ग्रामीण, बहुतांशी स्त्रिया, असे जे वर्ग समतेसाठी व आत्मसन्मानासाठी लढलेत, जल, जंगल, जमिनीच्या हक्कांसाठी लढतांना ज्यांना प्रथम अस्पृश्यतेविरुद्ध लढावे लागले, समान व योग्य वेतन, मंदिर प्रवेश आणि अन्य नैसर्गिक संसाधनांसाठीसुद्धा लढताना त्यांना येथील सामाजिक विषमतेला तोंड द्यावे लागले, ते संघर्ष गेल आपल्यासमोर ठेवते. (ऑम्वेट,१९९३); तसेच ती या देशातील ब्राह्मणी हिंदुत्ववादी सत्तेची मध्यस्थी नाकारून, आपला ईश्वर स्वत: शोधणाऱ्या दलित बहुजन, आदिवासींच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक रचितांचा धांडोळा घेते (ऑम्वेट,२००३); आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ती जातीविरोधी समीक्षेचे हे अवजार वापरून समकालीन विविध ऐतिहासिक चळवळीनी शासनसत्ता व वर्ग या जोडगोळीविरुद्धच कसा संघर्ष केला होता हे स्पष्ट करीत जात व लिंगभाव विषमतेविरुद्ध सामाजिक क्रांतीचे भिन्नत्व अधोरेखित करते. (ऑम्वेट,२०१४). बुद्ध, कबीर, रविदास, तुकोबा, जोतिबा फुले, इयोथी तास, पेरियार, रमाबाई, आंबेडकर या वारशाच्या मालिकेतून ती आपल्या समोर विद्रोही सांस्कृतिक वारसा ठेवते. युरोपमध्ये झालेल्या दार्शनिक प्रवर्तनाचे रचित ओलांडून ती भारतातील युग प्रवर्तन किती वेगळे होते, इकडे लक्ष वेधते. (ऑम्वेट, २००८अ). कारुणिक बुद्धापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नवयान बुद्ध दर्शनातून तसेच संविधानातून स्वातंत्र्य, समता, समानता आणि मैत्र या आदर्श मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी झालेले संघर्ष,



आवाहने आपल्या साहित्यातून ठेवतांना ती विद्रोहासाठी वापरलेल्या विविध कलाविष्कारांमधून– गाणी, नाटक, जलसे इ. मधून कशी त्या मूल्यांच्या पेरणीसाठी भूमीची मशागत केली गेली, हेसुद्धा ती अनवटपणे ठेवते. (विशेष बघावे : ऑम्वेट २००४, २००८ बी)

दैनंदिन होणारे अत्याचार, त्यांचे जातीय आंतरशाखेय परस्परावलंबी हितसंबंध हे हिंसेच्या व बहिष्कृततेच्या एका व्यवस्थेला खतपाणी घालत असतात, त्यामुळे सम तेवर आधारित व्यवस्थानिर्मितीसाठी जाती निर्मूलनासाठी, तसेच मैत्री व आत्मसन्मान अशी मूल्ये रुजवतांना कायम हिंसेचा व हिंसक शक्तींचा सामना करावा लागला आहे. भारतातील विविध भागात उभी राहिलेली आंदोलने व विद्रोह, गेल जेव्हापासून इथे आली, तेव्हापासून ती स्वतः त्यात खोल रुतली, सहभागी झाली. तिने ही समकालीन जनआंदोलने खूप जवळून बघितली, त्यातील उतार–चढाव, यश–अपयश तिने अनुभवले. आणि तिने या सर्व विद्रोही आवाजांना फक्त विवेचनाच्या नव्हे, तर विश्लेषण व सिध्दान्ताच्या कसोटीवर आपल्या साहित्यात आणले. तिने मार्क्सवाद व भारतातील उत्पादन व्यवस्था, येथील स्थानिक स्त्री चळवळ व स्त्रीवाद, शेतकरी आणि शेतमजूर–भूमिहीन शेतकरी आणि वैश्वीकरण यातील द्वंद्व इत्यादि आपल्या सिद्धान्ताच्या केंद्रस्थानी आणले. (ऑम्वेट, १९९३)

याची काही उदाहरणे बघू या... इंग्रजीमध्ये ती फार्मर आणि पिझन्ट असा फरक मांडते. ती म्हणते भारतीय भाषेत फक्त शेतकरी म्हणजे फार्मर नाही, तर त्यांना किसान, रयत, खेडूत, भूमिहीन शेतकरी, खेतीहर इत्यादि अनेक शब्द आहेत. पाश्चात्त्य बाजार संकल्पनेनुसार फार्मर ही संकल्पना रुजायला लागली. बाजारीकरण व बाजारी शक्तीने त्यांच्या मूळ किसानी, शेतकरी प्रतिमांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांची मुळं हजारो वर्षांच्या परंपरांमध्ये खोलवर रुजली आणि म्हणून त्यांना आधुनिक फार्मर या व्याख्येत न बसवता त्यांना 'पिझन्ट' असे संबोधावे, अशी भूमिका घेतली.

अशी शब्दावली तिने रुजवून इंग्रजीत भारतीय शेतकरी ज्या रूपात अजूनही आहे, त्या स्वरूपात इंग्रजी वाचक व अभ्यासकांसमोर ठेवला व त्या शब्दामागील सिद्धान्तन (तर्कनिष्ठ भूमिका) समोर ठेवले. (ऑम्वेट, १९९८:१४, एन १). तसेच, ती जेव्हा या देशातील ग्रामीण आणि शेतमजूर स्त्रियांबद्दल लिहिते, तेव्हा ती दरवेळी स्त्रीवादी चष्म्यातून त्यांच्याकडे बघत नाही, असे लक्षात येते. तिचे पंडित रमाबाई व ताराबाई शिंदे या १९ व्या शतकातील स्त्रीवादी नायिकांबद्दल लिहितांना त्या कालच्या पितृसत्तेशी त्यांनी दिलेली टक्कर यावर बोलते. (ऑम्वेट, २०११). तेव्हा ती त्या काळातील हिंसा व स्त्रियांवर लादलेली शारीरिक बंधने, त्यांच्या

फिरण्यावर घातलेल्या मर्यादा यांचे वर्णन करतांना ती एक समर्पक शब्द वापरते. ती 'लैंगिक दहशतवाद' हा शब्दप्रयोग करते. (१९९३:८६), हा शब्दप्रयोग किंवा संकल्पना नंतर स्त्रीवादी तत्त्वज्ञ चेरीस क्रम रे (इन फॉस सर्व, १९९९:४) हिने इंग्रजीत पहिल्यांदा सार्वत्रिक केलेला दिसतो.

एका विशिष्ट क्रांतदर्शी दृष्टिकोनाची एक नाळ, एक वंशावळ इतिहासात शोधत ती सामाजिक चळवळींचे कालमापन व मूल्यमापन करते, तेव्हा स्त्रीवादी गेल दलित बहुजन स्टँडपॉइंट बिनधास्तपणे वापरते आणि सरंजामी, जमीनदारी व्यवस्थेतून केलेल्या जाती-आधारित शोषणाच्या परिम णांमधून स्त्री शोषणाचे प्रमेय ती उलगडते, तेव्हा ती त्यातील जात आधारित आणि राजकीय सत्तेला टीकेचे लक्ष्य बनविते. उदाहरणार्थ, ती भारतातील डाव्यांचे विश्लेषण करतांना (१९८५), कॉम्रेड शरद पाटील यांच्या नेतृत्वाखालील सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष असू दे किंवा शरद पाटील यांची शेतकरी संघटना (१९९३) आणि भारतात आल्यावर ज्या संघटनेच्या स्थापनेत तिची प्रमुख भूमिका होती, त्या श्रमिक मुक्ती दलाचीसुद्धा समीक्षा समोर ठेवते. अनेक जन आंदोलनांचा मुख्य सामूहिक चेहरा,स्त्रिया असून त्यांच्या संख्यात्मक, अनुभवजन्य तपशिलांवर ही आंदोलने उभी राहिली आहेत, हे चळवळीतील फार कमी पुरुषांनी मान्य केले, हे वास्तव समोर ठेवतांना ती म्हणते खरेतर डाव्या पक्षांच्या नेत्यांनी ज्या ज्या वेळी आंदोलने केली, तेव्हा तेव्हा त्यांना आंदोलनात स्त्रिया या अधिक लढवय्या व आक्रमक होत्या, असे आढळून आले आहे. (ऑम्वेट ९७८:३७१) या बाबततेत ती पार्थ मुखर्जी यांचे एक अवतरण उद्धृत करते. १९६७ मध्ये नक्सलबारी आंदोलनाचा आरंभ होण्याआधी आदल्या दिवशी दोन स्त्रिया व एक पोलीस मृत आढळले. या घटनेचा ती उल्लेख करते.

हा प्रसंग ती आपल्या समोर मांडते...

प्रोसादुजोत या एका खेड्यात आदल्या दिवशी संध्याकाळी दोन स्त्रियांचे मृतदेह सापडले, त्या बद्दल मोठ्या प्रमाणावर स्त्रियांनी एकत्र येऊन निदर्शने केली. तेथील उपविभागीय अधिकाऱ्याला या बाबत कडक निर्भत्सना करून जाब विचारला. तसेच त्या एवढ्या संतप्त झाल्या होत्या की त्यांनी अर्वाच्य शब्दांत पोलीस अधिकारी व शासनाबाबत आपला संताप व्यक्त केला. कारण त्यांच्या गावातील दोन महिलांचे मृतदेह सापडले होते, यामुळे संतापून सर्व गावकरी रस्त्यावर आले होते. पोलिसांनी केलेल्या घेरावात आपले पुरुष त्यांच्या तावडीत सापडू नये, त्यांना अटक होऊ नये म्हणून संपूर्ण मोर्चाच्या अग्रभागी स्त्रिया आल्या व मोर्चाचे नेतृत्व केले, असा अर्थ यातून निघतो. (संदर्भ : ऑम्वेट १९९३:५१). अशाच प्रकारे गेल (१९८०, मुखर्जी) एका लेखात म्हणते, की एका हल्ल्यात १० मृत व्यक्तींपैकी सात स्त्रियांचा एका लढ्यात मृत्यू झाला. भलेही त्यांच्या अभिव्यक्त होण्याला, बायकी बरळणे किंवा बडबड असे पुरुषप्रधान शब्दकोशांत म्हटले गेले असेल, परंतु या स्त्रियांनी भारतात उभ्या राहिलेल्या ऐतिहासिक विद्रोही आंदोलनांत आपली लढवय्या म्हणून भूमिका वठवली व त्या शहीद झाल्या. (कित्ता).

स्त्रियांचे लैंगिक व सांपत्तिक अधिकार केंद्रस्थानी ठेवून स्त्री-जाती दास्यांतक लोकशाहीवादी क्रांती झाली पाहिजे, असे कॉम्रेड शरद पाटील यांच्या सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या भूमिकेबद्दल (१९९३;१०२) एकीकडे आपले लक्ष वेधते, तर दुसरीकडे शरद जोशी, ज्यांच्या बरोबर ती शेतकरी संघटनेमध्ये सक्रिय होती, त्यांनी १९८६ मध्ये आयोजित केलेल्या चांदवडच्या अधिवेशनात दिलेल्या स्त्री शक्तीच्या जागरणात स्त्री-पुरुष मुक्ती, या नाऱ्यातून जाहीर होत असलेली भूमिका आपल्या लेखनातून वाचकांसमोर ठेवते (१९९३:१८८). आपला जीवनसाथी डॉ. भारत पाटणकर यांच्या सोबत श्रमिक मुक्ती दलाच्या स्थापनेमध्ये गेलने पुढाकार घेतला, त्यावेळी इतर समकालीन डाव्या पक्ष संघटनांपेक्षा जास्त पुरोगामी व स्त्री समावेशक होती, असे आवर्जून गेल सांगते. या सर्व मांडणीतून गेलची भूमिका स्पष्टपणे समोर येते की, कुठल्याही जात विरहित, वर्गविहीन समाजाच्या निर्मितीसाठी चाललेल्या संघर्षांमध्ये जोवर स्त्रियांच्या मुक्तीचा जाहीरनामा पण केंद्रभागी ठेवला नाही तर स्त्रियांचे शोषण त्या नवनिर्माण समाजातसुद्धा सुरूच राहील. म्हणून श्रमिक मुक्ती दल जात निर्मूलन, वर्ग विरहित व स्त्री दास्य मुक्ती या तिन्ही तत्त्वांचा समान पातळीवर आग्रह धरते. (गायकवाड आणि पाटील, २०१७). श्रमिक मुक्ती दलाने प्रामुख्याने खेड्यापाड्यातील परित्यक्ता स्त्रियांची/एकल महिलांची चालवलेली चळवळ व त्यांनी शासनाकडे मागितलेला आर्थिक सहयोग व सामाजिक मान्यता या दोन गोष्टींनी 'टाकून दिलेली' असे लेबल लागलेल्या या एकल स्त्रियांच्या सन्मानाची लढाई उभी राहिली. गेल श्रमिक मुक्ती दलाचे योगदान अशा प्रकारे समोर ठेवते. (ऑम्वेट १९९०:३९). गेल जेव्हा हे सर्व टिपत होती, तो स्त्रियांच्या चळवळीच्या उत्कर्षाचा काळ होता. अशा वेळी दलित, बहुजन, आदिवासी स्त्रियांच्या योगदानाला अधोरेखित करत जागतिक पातळीवर जसे स्त्रियांच्या चळवळीतील आंतरशाखेय संबंध दिसून येतात, तसे भारतातील हे द्वंद्व व व्यामिश्रता गेल विश्वासमोर ठेवते. तिच्याच शब्दांत, शेती करणाऱ्या आणि गरीब भूमि हीन शेतमजूर स्त्रिया या शेतकरी संघटनेत केवळ एका वर्गाचे प्रतिनिधित्व करीत नाहीत, तर त्या एक वर्ग, जात व स्त्रीत्वाचे एकत्रित प्रतिनिधित्व करतात... (ऑम्वेट, १९७५ बी :४४)

आंतरशाखेय परस्पर छेद देणाऱ्या परिघांचा वेध व सौहार्दतेचे प्रयोगगेलच्या एकंदरीत सर्व लेखनातून असे दिसते की सहमती, असहमती असणाऱ्या आणि सम न्वय करणाऱ्या किंवा नाकारणाऱ्या सर्वांना ती आपला सहप्रवासी मानते व त्यांचा मागोवा घेते. ती दलित साहित्य किंवा दलित चळवळ केवळ 'दलित' या शब्दांपुरती संकुचित परिमाणातून जे

वाचतात, अशा वाचकांच्या दृष्टीला एक व्यापक व पर्यायी परिमाण देते, त्यांचा अवकाश वाढवते.

उदाहरणार्थ, परिघावरून मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करणाऱ्यांना गेलने तेथील ग्रामीण दलित स्त्रियांचे जमीन व पाणी हक्कांचे लढे जाती प्रश्नांशी कसे निगडित आहेत आणि त्या कशा जाती व लिंगभाव दोन्ही अन्यायाविरुद्ध कशा लढत आहेत, हे लक्षात आणून दिले.

१९६० ते २०१७ या पाच दशकांमधील पाश्चिमात्य क्रांतीच्या सिद्धान्ताच्या निकषावर तिने येथील दलित–बहुजन विद्रोहाचा विचार वेध घेतला व नव्याने सामाजिक क्रांतीची एक व्याख्या अभ्यासकांसमोर ठेवली. भारतातील मार्क्सिस्ट आणि डाव्या राजकीय चळवळी तिने भारतात आल्यावर एवढ्या जवळून पाहिल्या होत्या की, तिला त्यातील विसंगती दिसली, विचारधारा व कृती यांतील अंतर खूप प्रकर्षाने स्पष्ट झाले. त्या पार्श्वभूमीवर तिने दलित चळवळीचा उदय हा आध्यात्मिक विद्रोहाच्या स्वरूपात बघितला.

किंबर्ले क्रेनशॉ यांनी १९९१ मध्ये भौगोलिक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून अमेरिकेमधील वर्णभेद व इतर सामाजिक घटकांचा एकमेकांवर होणारा प्रभाव, हितसंबंध व यातून होणाऱ्या गुंतागुंतीच्या परिणामांसंदर्भात आंतरशाखेय संबंध दाखवणाऱ्या संकल्पनेला प्रथम जन्म दिला. अश्वेत स्त्रीवाद्यांनी जे वंश, वर्ण, रंग, लिंगभाव व वर्ग यांचे एकमेकांमध्ये गुंफलेले नाते अनुभवांमधून उलगडले व त्याचे आंतरशाखेय सिद्धान्ताच्या आधारे विश्लेषण केले. या सिद्धान्ताच्या आधारे मानवी समाजातील गुलामी, शोषण, सत्तासंबंध यांतील गुंतागुंत व कारणमीमांसा समजून घेता येईल, असे समाजशास्त्रज्ञ पॅट्रिशिया हिल कॉलिन्स आणि सिरमा बिलगे (२०१६) यांनी समोर आणले. अशा प्रकारे त्याचा विस्तार या दोघींनी आपल्या संशोधन समीक्षेच्या संदर्भात केलेला दिसतो. १९७० ते १९८० या काळातील आफ्रिकन अमेरिकन चळवळी व आपल्या देशातील त्याच काळातील दलित चळवळींचे साम्य आपल्याला दिसते. आपल्याकडे पण वसाहत काळातील जातीय विषमता व स्त्रियांना शूद्र मानून त्यांचे जे अधिकार नाकारले गेले त्यावर आधारलेले अनुभव या आंतरशाखेय संकल्पनेमध्ये अंतर्भूत करता येतात. क्रेनशॉप्रमाणे गेल इथे जाती, लिंगभाव यांचे एकमेकांशी अभेद्य संबंध व त्यामुळे होणाऱ्या स्त्रियांवरील हिंसाचाराबद्दलचे वेगवेगळे पोत ती आपल्या समोर ठेवते. खरे तर, विविध पाश्चिमात्य स्त्रीवाद्यांचे संदर्भ तिच्या लेखनात देते. परंतु तरीही गेलच्या लेखनात या अश्वेत आफ्रिकन अमेरिकन स्त्रीवाद्यांच्या आंतरशाखेचे संकल्पनेतून विश्लेषण केलेले आढळत नाही. (ऑम्वेट १९८६, १९८७). ज्यावेळी क्रेनशॉने ही संकल्पना प्रथम सिद्धान्तरूपात ठेवली, त्या १९९० च्या काळात गेल भारतातील शेतकऱ्यांचे प्रश्न, ग्रामीण संघर्ष, आणि जातीभेद विरोधी तत्त्वज्ञान आणि त्या काळातील स्त्री संघर्ष या सर्वांमध्ये ती स्वत: सक्रिय होती व त्यावर तिचे संशोधन व लेखन सुरू होते, त्या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवरील नारीवादी चळवळी व विमर्शामध्ये तुलनेने ती कमी सहभागी दिसते.

परंतु, गेलच्या लेखन व संशोधनातून समोर आलेले दलित बहुजन जहाल स्त्रीवादी दृष्टिकोन व चळवळी संदर्भात आंतरशाखेय दृष्टिकोनातून संशोधन करण्यासाठी अनेक संशोधकांना मार्गदर्शक ठरू शकते. तसेच आज वसाहतवाद व हिंदू धर्मांधतावाद यांच्या चाललेल्या जुगलबंदीसमोरही नव्या चळवळी ज्या या जुगलबंदीला विरोध करत आहेत, त्यांच्या मुळाचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

एकीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर सौहार्दपूर्ण व सामंजस्याने जीवन जगण्या संदर्भात द्वितीय जाहीरनामा २020मध्ये प्रसारित झाला. ज्यांत स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्यामध्ये मानवी सहकार्य, मैत्र, सलोखा, समान मानवी प्रतिष्ठा आणि त्याचे प्रत्यक्ष व्यवहारात आचरण यालाच मानवी मैत्री, सलोख्याचे तत्त्वज्ञान (convivialism) म्हटले जाते. (एडॉल्फ, २०१९) गेलच्या संपूर्ण लेखनाचा व कार्याचा गाभा 'मैत्र' याच संकल्पनेवर आधारित आहे. या संकल्पनेचे मूळ जाती निर्मूलनाच्या तत्त्वज्ञानात आहे, म्हणूनच ते दलित–बहुजन आदिवासी यांनी आपल्या जीवन संघर्षातून शोधलेल्या क्रांतिकारी जीवनमूल्य व शैलीचा आहे. त्यामुळे आता या मैत्र व सलोख्याच्या जाहिरनाम्याच्या अनुषंगाने गेलचे लेखन हे असे अंतर्दृष्टी देणारे ठरेल. व या विचारांचे पीक भविष्यात जितक्या मोठ्या प्रमाणावर येईल, त्याने आजच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील धर्मांध व उजव्या प्रतिगामी शक्तींच्या विरोधात एक संघटित ताकद उभी राहील.

गेलच्या अशा राजकीय, साहित्यिक आणि संशोधनात्मक शैक्षणिक पातळीवर सार्वजनिक जीवनात भारतीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर गेल आपल्या लेखनातून व कार्यातून जुळते. तेव्हा ती कितीतरी आधीपासून हे सौहार्दतेचे स्वप्न पेरत होती असे दिसते. अशी ही क्रांतदर्शी गेल स्वत:च मग दलित बहुजन क्रांतीची, जाती निर्मूलनाच्या विचारांची वाहक व मानवी मैत्र निर्मितीसाठीची एक संवादक बनते.

*(हा मूळ इंग्रजी लेख प्रथम ६ सप्टेंबर २०२१ रोजी 'Indian Cultural Forum' या नियतकालिकात प्रसिद्ध झाला.)*

***कल्पना कन्नाबिरान, हैदराबाद***
*kalpana.kannabiran@gmail.com*
***अनुवाद : लता प्रतिभा मधुकर, पुणे.***
*pmlata1958@gmail.com*
*(संदर्भासाठी लता प्र. म. यांना मेलवर संपर्क साधू शकता.)*

# तालिबानी मूलतत्त्ववाद, राष्ट्रवाद आणि स्त्रीप्रश्न

समीना पठाण। संजयकुमार कांबळे

**जागतिकीकरणाच्या युगात देशातलं राजकारण, देशाची आर्थिक धोरणं, जागतिक अर्थकारण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण हे सर्व धागे एकमेकात गुंतलेले असतात. सगळं जगच एका धाग्यात ओवलं गेल्यानं एका देशात घडणाऱ्या घडामोडींचे पडसाद जगभरात लगेचच उमटतात. महासत्तांच्या कुरघोडीच्या राजकारणानं अफगाणिस्तानचा बळी घेतला आहे. आज फक्त अफगाणिस्तानातच नाही तर जगभर मूलतत्त्ववादानं धुमाकूळ घातला आहे. जनतेलाही उजव्या विचारसरणीच्या नेतृत्वाची भुरळ पडताना दिसत आहे. उजव्या लाटेच्या या प्रभावामुळे जागतिक राजकारण आणि अर्थकारण अस्थितरतेकडे झुकू लागलं आहे. उजव्या लाटेत वाहून जायचं की कणखरपणे स्वातंत्र्य, समता, मैत्रभाव आणि सामाजिक न्याय मानणाऱ्या लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष करत राह्यचं हे ठरवण्याची निर्णायक वेळ आता येऊन ठेपली आहे. आज अफगाणिस्तान जात्यात तर उद्या भारत सुपात अशी अवस्था आहे का हे समजून घेण्यासाठी लेखकद्वयींनं केलेला हा चिकित्सक ऊहापोह वाचायलाच हवा.**

प्रतिभा रानडे यांनी 'अफगाण डायरी' मधून अफगाणिस्तानातील वेदनादायक कथा सांगितल्या आहेत. 'बुरख्याआडच्या स्त्रियां'विषयी सविस्तर लेखन केले. रवींद्रनाथ टागोर यांनी 'काबुलीवाला आणि इतर कथा', तर श्रीदेवी आणि अमिताभ यांच्या 'खुदा गवाह' सिनेमामधून अफगाणिस्तानातील जनजीवनाचा आपणाला परिचय होतो. आतंकवादी संस्कृतीतील स्त्रीचे जीवन कसे उद्ध्वस्त होते, हे अनेक डॉक्युमेंटरीज मधून दिसून येते. पुन्हा एकदा दोन दशकानंतर अफगाणिस्तानमध्ये तालिबानी सत्तेत आले आहेत. २०१९ मध्ये दोहा इथे अमेरिकेबरोबर जो समझोता झाला, त्याने तालिबान्यांसाठी अफगाणिस्तान काबीज करायचा मार्ग मोकळा झाला होता. पण इतक्या लवकर तेही अमेरिकन फौजा परतायच्या आतच तालिबानी अफगाणिस्तान काबीज करतील, याचा कोणालाच अंदाज नव्हता.

तालिबानी राजवटीने अफगाणिस्तानातील स्त्रिया भयभीत झाल्या आहेत. विशेषत: शियापंथी समुदाय वंशसंहाराच्या भीतीने अफगाणिस्तानातून पलायन करू लागला आहे. तालिबान्यांनी पहिल्या राजवटीत शिया समुदायाला आपल्या हिंसाचाराचे लक्ष्य बनवले होते. शियांना तालिबानी मुस्लिम म्हणून मान्यता द्यायला तयार नाही. दुसरीकडे मुली, स्त्रियांना तालिबानी राजवटीत आपले जीवन नरक बनण्याची भीती सतावते आहे. तालिबानच्या पहिल्या राजवटीत स्त्रियांवर कडक निर्बंध लादून अत्याचार करण्यात आले होते. अफगाणिस्तानच्या तालिबानी राजवटीचे चीन, पाकिस्तान आणि रशियाने खुले समर्थन केले आहे. तर, भारताने अजूनही आपली भूमिका जाहीर केलेली नाही. अमेरिकेसोबत अफगाणिस्तानमध्ये भारताने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली असली, तरी ती निरर्थक ठरली आहे.

राष्ट्र आणि स्त्रिया यांच्या परस्पर संबंधांविषयी बरेच लेखन उपलब्ध आहे. राष्ट्रवादाच्या प्रक्रियेत इतर सत्ता अधिक घट्ट झाली हे स्पष्टच आहे. राष्ट्रवादी अभिजन चळवळीने आतले आणि बाहेरचे जग निर्माण करून आपल्या जगामध्ये स्त्रियांवर भारतीय संस्कृती रक्षणाची वाहकाची जबाबदारी लादली व बाहेरच्या जगाचा पुरुषांनी ताबा घेतला. राष्ट्राच्या अनेक आवाजांचा विचार करताना स्त्रीप्रश्नाची चर्चा जशी महत्त्वाची आहे, किंवा समुदाय वर्ग परस्पर संबंधांची चर्चा जशी कळीची आहे, तशाच प्रकारे धर्म या घटकाचा विचारही महत्त्वाचा आहे. अफगाणिस्तानचा विशेषतः हा विचार करता स्त्रीची पारंपरिक प्रतिमा अधिक सनातनी व अधिक पारंपरिक केली. तालिबानने स्त्रीप्रश्नाचे अस्तित्वच नाकारले. त्यांना केवळ माता आणि भगिनी यासारख्या प्रारूपामध्ये अडकवून ठेवले. त्यामुळे प्रस्तुत लेखात स्त्रीवाद व राष्ट्रवादी यांच्यातील नाते, स्त्रीप्रश्नाची जडणघडण, लिंगभावात्मक जाणीव आणि राष्ट्रवाद यांचा परस्पर संबंध लक्षात घेतला आहे. राष्ट्र कल्पित समूह आहे म्हणजे काय? राष्ट्रवादाने मुस्लिम विभाजन कसे घडवून आणले? राष्ट्रवादाचे निरनिराळे आवाज कोणते आहेत? संस्कृती आणि सत्ता यांच्यातील

संबंध लक्षात घेऊन निर्माण होणाऱ्या राष्ट्रवादाची चर्चा केली पाहिजे. ज्या राष्ट्राचे नागरिकत्व एखाद्या व्यक्तीला जन्माने मिळाली आहे व त्या व्यक्तीस अन्य कोणत्या राष्ट्राचे नागरिकत्व आहे, हवे आहे, त्या देशाचा राष्ट्रवाद स्वीकारणे हे ओघानेच येते, असे म्हटले जाते; पण त्यामुळेच कोणत्या प्रकारचा राष्ट्रवाद हे समजून घ्यावे लागते. कोणाच्या दृष्टिकोनातून राष्ट्रवादाची मांडणी केली जात आहे? जरी 'वाद' हा बहुमुखी, बहुप्रवाही असून बहुलता मानणारा आहे, तरी कोणत्या राष्ट्रवादाशी त्याचे नाते समन्वयाचे करायचे याचा विचार करावा लागतो. कोणतेही राष्ट्र हे सर्व स्त्रियांच्या व पुरुषांच्या सर्वंकष प्रगतीतून घडते. अब्राह्मणी स्त्रीवाद आणि अब्राह्मणी राष्ट्रवाद हा जसा भारताच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो, तसेच समन्वय साधणारा स्त्रीवाद हा राष्ट्रवादासाठी आणि स्त्रियांच्या प्रगतीची इच्छा बाळगणारा राष्ट्रवाद हा अफगाणिस्तानातील स्त्री वर्गासाठी पूरक ठरतो. स्त्रीवादी असणे म्हणजे राष्ट्रवादी नसणे आणि राष्ट्रवादी असणे म्हणजे स्त्रीवादी नसणे असे नसते. तरीही, जागतिक स्त्री आणि स्त्रीप्रश्नासाठी राष्ट्राच्या सीमा ओलांडून एकत्र आले पाहिजे. जागतिकीकरणाच्या काळात राष्ट्रवाद मागे पडून देशोदेशींच्या सीमारेषा धूसर होत जातील असे मानण्यात आले होते; पण नेमके याच्या उलट घडते आहे. अमेरिका, युरोपीय देश, साम्यवादी चीन, रशिया आणि अन्य सर्व देशांमधील राष्ट्रवाद भक्कम झाला. प्रत्येक राष्ट्रातील मूलतत्त्ववादी शक्ती सत्तेच्या अवतीभोवती फिरू लागल्या आणि देशांमधील सीमारेषा अधिकच गडद होत गेल्या. जगभरातील वांशिक व सांस्कृतिक विविधता मान्य करतानाही कोणत्याही देशाचा राष्ट्रवाद मागे पडताना दिसत नाही. उलट, अधिकच प्रकर्षाने पुढे येतो. आधुनिक राष्ट्राचे मूलभूत वैशिष्ट्य हे संस्कृती आणि सत्ता यांच्यामध्ये समानता आणणाऱ्या प्रक्रियांमध्ये आहे. राष्ट्राची संकल्पना ही



फक्त राजकीय किंवा फक्त सांस्कृतिक असा कुठला तरी एकच घटक घेऊन मांडणे योग्य नाही. संस्कृती आणि सत्ता यांच्यामध्ये समन्वय साधणे म्हणजे काय तर एकाच वेळी समाजात दोन प्रक्रिया कार्यरत असलेल्या दिसतात. पहिली प्रक्रिया कोणती, तर जी परकीय संस्कृती आहे, त्याच्यापासून दूर जाणारी एक प्रक्रिया आणि परत त्यांच्या हातातली सत्ता हस्तांतरित करण्याची प्रक्रिया. ब्रिटिन आणि भारत असे उदाहरण डोळ्यासमोर आणले, तर लक्षात येईल की एकाच वेळी पाश्चात्त्य संस्कृतीपासून भारताने दूर जाण्याचा प्रयत्न केला. ज्यात ब्रिटिशांच्या हातात सत्ता होती, ती मिळवण्याची पहिली प्रक्रिया आणि दुसरी प्रक्रिया ही आपल्या संस्कृतीतील जे आधुनिक घटक आहेत, त्यांच्यापासून दूर जाणारी प्रक्रिया. त्याच वेळी समाजामध्ये वेगवेगळ्या घटकांचा हातात लोकशाही मार्गाने सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची प्रक्रिया.

**जागतिकीकरण आणि मूलतत्त्ववाद**

जागतिकीकरणाला सुरुवात झाल्यावर जगाचा चेहरा मोहराच बदलला आहे. आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय बाबतीत मुक्त वातावरण तयार झाल्याचे दिसत आहे. देशादेशांतील सीमा पुसट झाल्या. वस्तू, भांडवल, तंत्रज्ञान, सेवा यांची वेगाने वाहतूक होऊ लागली. क्षणार्धात, जगभरामध्ये व्यवहार होऊ लागले. याचबरोबर स्थलांतराचे प्रमाण आणि वेगही वाढू लागला. समाजमाध्यमांच्या उदयाने संवाद वाढले, तशी परस्परांच्या संस्कृतीची ओळख होऊ लागली. माहिती-तंत्रज्ञानाच्या स्फोटाने जग जवळ आले. थॉमस फ्रिडमन या अभ्यासकाने सांगितले की, जागतिकीकरणामुळे सर्व देशांची प्रगतीच्या दिशेने घोडदौड सुरू झाली आहे. सुबत्ता आणि स्थैर्य आल्यावर जगभरात लोकशाहीचे वारे वाहू लागतील. परंतु, भांडवलशाहीमुळे भरभराट होते या कल्पनेला अमेरिकेतील २००८च्या आर्थिक मंदीने सुरुंग लावला. २०११ मध्ये अरब क्रांतीने पेट घेतल्यावर जग एकत्र येण्याऐवजी दुभंगू लागले. सीरिया, इराण, उत्तर कोरिया, युक्रेन या देशांच्या प्रश्नांवरून जगाची विभागणी पुन्हा दोन गटात झाली.

जागतिकीकरणाने विकसित, विकसनशील आणि अविकसित अशा सर्वच देशांना कवेत घेतले. जागतिकीकरणाच्या झंझावातात टिकून राहायचं असेल, तर प्रत्येकालाच बदल करण्याची तयारी करणे गरजेचे आहे. मनुष्यबळाचा विकास हा आजच्या जगात टिकून राहण्याचा मंत्र आहे. त्यासाठी व्यक्तिगत पातळीपासून धोरण पातळीपर्यंत बदलाला सामोरे जाण्याची

आवश्यकता आहे. लोकशाही मार्गावर चालणाऱ्या, समान संधींची व्यवस्था तयार करणाऱ्या नेत्यांची गरज आहे. परंतु, गेल्या काही वर्षांपासून अनेक देशांची वाटचाल उजव्या विचारसरणीच्या दिशेने होताना दिसत आहे. जनतेलाही उजव्या विचाराची मांडणी करणाऱ्या नेतृत्वाची भुरळ पडते आहे. विकासाची स्वप्ने दाखवताना सामाजिक ध्रुवीकरण करून लोकांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्याचा धूर्तपणा या नेत्यांकडे आहे. गौरवशाली संस्कृती, वैभवशाली परंपरा, धर्माभिमान, अभिमानास्पद इतिहास, वंशाभिमान यासारख्या धुंदी चढवणाऱ्या गोष्टींचा उपयोग कसा आणि केव्हा करायचा हे त्यांना चांगलंच माहीत आहे. लोकशाही व्यवस्थेचा पाया मजबूत असलेल्या देशांमध्ये आक्रमक नेत्यांना विरोध होऊ शकतो, पण व्यवस्था कमकुवत असेल तर अशा नेत्यांच्या हाती सत्ता येण्याचा धोका अधिक असतो, कमकुवत व्यवस्थेचा फायदा घेऊन लोकशाहीला नष्ट करण्याचे काम असे नेते करतात.

देशादेशांमधल्या उजव्या लाटेच्या प्रभावामुळे जागतिक राजकारण आणि अर्थकारण अस्थिरतेकडे झुकू लागलं आहे. जगाच्या राजकीय पटलावर जे घडतं त्यामागे गुंतागुंतीचे आर्थिक व सामाजिक प्रवाह दडलेले असतात. देशातील राजकारण, देशाचे आर्थिक धोरण, जागतिक अर्थकारण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण हे सर्व धागे एकमेकांत गुंतलेले असतात. सर्व जगच एका धाग्यात ओवलं गेल्याने एका देशात घडणाऱ्या घडामोडींचे पडसाद जगभरात लगेचच उमटतात. प्रत्येक देशाच्या नागरिकांना आपल्या देशाची प्रगती व्हावी, असं वाटणं साहजिकच आहे; पण त्यासाठी नेतृत्वाने आक्रमक राष्ट्रवादाचा उदोउदो न करता सकारात्मक राष्ट्रवादाचे धोरण आखायला हवे. आक्रमक राष्ट्रवादाच्या विचारातून युद्धाची भीती दाखवली जाते. राष्ट्रहिताच्या नावाखाली जनतेच्या स्वातंत्र्यावर बंधने घातली जातात. अशा प्रकारच्या आक्रमक राष्ट्रवादामुळे ना त्या देशातील जनतेला लाभ होतो, ना जगाला.

आज जागतिकीकरणाच्या लाटेतून आलेल्या उजव्या लाटेचा गंभीर प्रश्न जगापुढे आहे. या लाटेत सामील व्हायचं की मनुष्यबळाचा विकास करायचा? हा विचार सर्वांनीच करण्याची गरज निर्माण झाली आहे. उजव्या विचारसरणीमुळे धार्मिक कायद्यानुसार सत्ता स्थापन होऊ शकते. त्यांना वर्तमान व्यवस्था किंवा जनतेची इच्छा याच्याशी देणंघेणं नसतं. आज्ञाधारी, धर्माच्या नावावर हिंसा करणारी, पारतंत्र्यात जगणारी, नियंत्रित असणारी, अविचारी, भयभीत असलेली जनता यांच्यासाठी शासनाधार असते. त्यांनी धर्मरक्षणासाठी सत्ता स्थापन केलेली असते. त्यामुळे यांचा धर्मग्रंथावर आधारित शिक्षणावर भर असतो. जगातील सर्व धर्म पुरुषसत्ताक असल्यामुळे साहजिकच अशा शिक्षणामुळे सर्व सत्ता पुरुषांच्या हाती जाते. महिलांना स्वतंत्रता दिल्याने कुटुंब, धर्म आणि देशाची हानी होऊ शकते, अशी यांची विचारधारा असते. महिलांना बुद्धी नसते, विचारक्षमता व निर्णय क्षमता नसते अशी यांची धारणा असते. असे सत्ताधारी महिला शिक्षणाच्या विरोधात असतात. त्यांच्या मते महिला फक्त मुले जन्माला घालण्याचे यंत्र आहे. कोणी कसे कपडे घालावे आणि घालू नये हा निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना पाहिजे असतो. या विचारसरणीच्या लोकांचा भिन्नविचारी, मानवता मानणाऱ्या, स्वातंत्र्य मागणाऱ्या, लोकशाही व्यवस्थेचा परस्कार करणाऱ्या, मानवीय संविधानाचा पुरस्कार करणाऱ्या जनतेला विरोधच असतो. त्यांना व्यक्तीपेक्षा राष्ट्र आणि राष्ट्रापेक्षा धर्म मोठा वाटतो, त्यामुळे धर्म धोक्यात असल्याचे भासवून धर्मरक्षणासाठी विरोधकांची हत्या करत सुटतात. अशा विचारसरणीचे प्रतिबिंब राजकारण व समाजकारणात पडते. यामुळे ताणतणाव वाढतच जातात. दोन भिन्न धर्मांमध्ये अविश्वास आणि द्वेष वाढत जातो. सर्वसामान्यांच्या धर्माबद्दलच्या अज्ञानाचा फायदा राजकारणी, संधीसाधू हितसंबंधी लोक घेतात आणि वातावरण गढूळ करतात. याचा परिणाम समाजातील तळागाळातील जनतेला भोगावे लागतात. सत्तेवरील लोक अलगदपणे बाजूला होऊन सुरक्षित राहतात.

मूलतत्त्ववाद हे मनुस्मृतीचेच दुसरे रूप आहे. केवळ अफगाणिस्तानच नव्हे तर जगभरातच मूलतत्त्ववादाने धुमाकूळ घातला आहे. मूलतत्त्ववादावर विजय मिळवायचा असेल, तर संघटित लढा देण्याची गरज आहे. मूलतत्त्ववाद हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य संपवतो. वर्चस्ववाद हा देखील मूलतत्त्ववादच आहे. मूलतत्त्ववाद 'पूर्वग्रही, दुराग्रही, ज्ञानप्रसारबाधक, स्व-पंथाभिमानी वृत्ती सुचवणारी संज्ञा आहे. तालिबानसारखे मूलतत्त्ववादी केवळ स्वत:करता सिद्धान्तांची पारंपरिक मांडणी जपून ठेवण्याचा निर्धार करत नाहीत, तर इतरांवर देखील लादण्याचा प्रयत्न करतात. मूलतत्त्ववाद धर्मवेडेपणाची मानसिक प्रतिमा जागृत करत असतो.

भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशातील मुस्लिम स्त्रियांना, त्या फक्त मुस्लिम आहेत म्हणून जुबानी तलाक देऊन नवरा घराबाहेर काढू शकतो, किंवा एकापेक्षा जास्त विवाह करू शकतो. घटस्फोटितेला पोटगी देणे, हे नवऱ्याचे कर्तव्य मानले जात नाही. जगभरात देखील इस्लामी पुनरुज्जीवनवादी इस्लाम च्या रक्षणासाठी हिंसाचार, दहशतवादी हल्ले करत आहेत आणि इस्लामी प्रतिष्ठा जपण्यासाठी मुस्लिम स्त्रियांवर जुनी बंधने लादत आहेत. मुस्लिम धार्मिक, राजकीय नेत्यांनी स्त्री जीवनविषयक बदल व सुधारणांना कायम विरोधच केल्याचे दिसून येते. मुस्लिम समाजाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांचे शिक्षण मदरशांमधले, फक्त धार्मिक बाबींपुरते मर्यादित असल्यामुळे राजकीय व

सामाजिक समस्यांकडे ते निव्वळ धर्माच्या दृष्टिकोनातूनच बघतात. त्यांचे सगळे प्रयत्न व विचार वैयक्तिक कायदा यावरच केंद्रित झालेले असतात.

स्त्रीवादी भूमिकेतून मुस्लिम स्त्रियांविषयी अभ्यास करताना स्त्रियांचे प्रश्न व त्यामागील कारणे याविषयी जाणून घेताना असे लक्षात आले की, स्त्रियांच्या प्रश्नांच्या मुळाशी फक्त पुरुषसत्ता, धार्मिक कायदे, सामाजिक व्यवस्था नसून त्यासाठी धर्मकारण, राजकारण व समाजकारण हे देखील तितकेच जबाबदार आहेत. प्रतिष्ठा, न्याय, समता या दृष्टिकोनातून स्त्रीविषयक विचार न करता, शरीयतशी बांधिलकी असणारे, 'इस्लाम खतरे में हैं' असे म्हणणारे आणि 'आमच्या धर्मांतर्गत बाबतीत तुम्ही ढवळाढवळ करू नका', अशी घोषणा देणारे स्त्रीचे माणूसपणच नाकारत असतात. यामुळे धर्माची चौकट आणि त्याचे राजकारण यामध्ये मुस्लिम स्त्रिया बंदिस्त झाल्या आहेत. कालानुरूप स्त्रियांवरील दडपणे, त्यांचे प्रश्न व त्यांची परिस्थिती बदललेली दिसत नाही. इस्लामी अस्मिता जपण्याच्या नादात स्त्रियांवरील बंधने वाढतच चालली आहेत. कोणत्याही समाजातील सुधारणा ही झटपट होत नाही. ती गोगलगायीच्या गतीने होत असते. स्वतःच्या अधिकारांसाठी हळूहळू का होईना; पण स्वतः स्त्रीलाच प्रयत्नशील होणे गरजेचे आहे. अन्यायाविरुद्धच्या जाणिवा समृद्ध करून त्याविषयी आवाज उठविण्याची गरज आहे.

**महासत्तांच्या संघर्षाचा अफगाणिस्तानचा बळी**

१९७९ मध्ये रशियन सैन्य अफगाणिस्तानात घुसल्यानंतर कट्टरपंथीयांचे बळ वाढले. रशियन परत गेल्यानंतर हेच कट्टरपंथीय मुजाहिदी सत्तेवर आले आणि पुन्हा अफगाण स्त्रियांवर सगळी बंधने आली. त्यांचे शिक्षण, नोकऱ्या बंद झाल्या. बुरख्याची सक्ती आली. अत्याचारी कारभारला कंटाळलेल्या अफगाण जनतेने ओसामा बिन लादेनसारख्या तालिबानी नेत्याचे स्वागत केले. अफगाणिस्तानावर तालिबानी सत्ता प्रस्थापित झाल्यामुळे अफगाण स्त्रीचे जगणे किडामुंगीच्या जगण्यासारखे झाले. २००१ च्या नाटोच्या आक्रमणादरम्यान तालिबानचा पाडाव झाला व हमीद करझाई राष्ट्राध्यक्ष पदावर आले. हे अध्यक्षीय प्रजासत्ताक २०२१ पर्यंत टिकले. अमेरिकन सैन्याने माघार घेतल्यावर तालिबानने पुन्हा एकदा काबुलसह अफगाणिस्तानचा ताबा घेतला, आणि अफगाणिस्तानात मूलतत्त्ववादाचा नव्या जोमाने प्रवेश झाला.

महासत्तांच्या संघर्षात अफगाणिस्तानचा बळी देण्यात आला. तालिबानी फौजांनी १५ ऑगस्ट रोजी (भारत देश स्वातंत्र्याचा जयघोष करीत असताना) प्रतिकार न झाल्याने सहजपणाने त्या शहरावर कब्जा मिळवला. याची फार मोठी किंमत तेथील स्त्रिया, लहान मुले आणि अल्पसंख्याक धर्मीयांना चुकवावी लागत आहे. तेथील लोकशाहीवादी लोकांना अमानुष राजवटीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तेथील तरुण पिढीच्या स्वप्नांचा प्रश्न निर्माण झाला आहे, याला तालिबान जबाबदार आहे. तसेच, रशिया, चीन आणि अमेरिकेसारख्या महासत्तासुद्धा जबाबदार आहेत. दिवसागणिक उग्र होत जाणाऱ्या क्रौर्याला निरपराध नागरिक स्त्रिया आणि लहान मुले यांना सामोरे जावे लागत आहे. ज्यांना शक्य झाले, त्यांनी अफगाणिस्तानातून पळ काढला. ज्यांना शक्य झाले नाही त्यांचे काय? अफगाणिस्तानात सत्तेच्या जोरावर तालिबान्यांनी आपली पाळेमुळे मजबूत केल्यास पुढे काय, असे अनेक प्रश्न असले, तरी त्याची सोडवणूक कशी करायची हा मुख्य प्रश्न आहे.

तेथील परिस्थितीला तालिबान सोबत जागतिक महासत्ता जबाबदार आहेत. अमेरिकेने अफगाण सेनेला स्वयंपूर्ण केले नाही. अफगाण सैन्य शस्त्रसाहाय्य, आर्थिक मदत इत्यादींबाबत पूर्णपणे अमेरिकेवर अवलंबून होते. अफगाण सरकार पूर्णपणे अमेरिकेच्या नियंत्रणाखाली होते. अमेरिकेने फक्त अफगाणिस्तानचे नुकसान केले नाही, तर जगाचे नुकसान केले आहे. अफगाणिस्तानात तालिबानी टिकून राहण्यामागे व जिंकण्यामागे अफूच्या उत्पादनाचा व व्यापाराचा खूप मोठा हातभार आहे. तालिबानला मोठ्या प्रमाणात पैसा पुरवण्याचे काम उत्पादन करणाऱ्या अफूपासून हेरोइन बनवणाऱ्या, त्याचा व्यापार करणाऱ्यांनी केले आहे. तालिबान या सर्वांवर मोठा कर लावून मोठ्या प्रमाणात पैसा गोळा करायचे. यासोबतच अमेरिकेचा मूळ उद्देश अफगाणिस्तानात लोकशाही स्थापन करण्याचा नव्हताच. अमेरिकेच्या धोरणामुळे अफगाणिस्तानचा प्रश्न कधी सुटणार नव्हता. उलट, त्यांच्या धोरणामुळेच प्रश्न निर्माण झालेला आहे.

**जगभरातील स्त्रीवाद्यांची भूमिका काय आहे?**

माझे अनेक अफगाणिस्तानातील विद्यार्थी होते. त्यांच्यामुळे अफगाणिस्तान विषयक जाणून घेण्याचा योग आला. अफगाणी स्त्रियांचा लढा हा प्रचंड कष्टाचा आहे. मात्र, त्याच वेळी तो संपूर्ण मानवजातीसाठी एक वस्तुपाठ आहे. भविष्यात हा लढा आता अफगाणी स्त्रियांना आणखी धीरोदात्तपणे लढावा लागणार आहे. तालिबानी आक्रमणासमोर अफगाण सैन्याने शस्त्र टाकून शरणागती पत्करल्यावर देशाचे नेते रातोरात परागंदा झाले असताना आणि कर्ते पुरुष वाट मिळेल तिकडे पळ काढत असताना सम ाज, संस्कृती आणि देश वाचविण्यासाठी खंबीरपणे उभ्या राहिल्या त्या या वीरांगणा. अफगाणिस्तानच्या भविष्यासाठी आणि उगवत्या, उमलत्या पिढीच्या सुरक्षेसाठी बंदुकीच्या धाकाला भीक न घालता, मरणाच्या भीतीला न

(पान ९२ वर)

# त्या दोघी

## भारती पांडे

रुग्णालयाच्या त्या तेवढ्या गजबजाटातही त्या दोघी समोरच्या गणपतीच्या मूर्ती समोरच्या प्लॅस्टीकच्या बाकावर मूर्तीकडे एकटक नजर लावून बसल्या होत्या. दोघींचेही डोळे पाण्यानं डबडबले होते आणि
मधूनच एखादा अश्रू खळकन् एखादीच्या सुरकुतल्या गालावरही कोसळत होता.

कसली तरी भयानक चिंता त्या दोघींनाही खाऊन, गिळून टाकत होती, हे उघडच होतं. बघता बघता दोघींच्याही जग पाहिलेल्या डोळ्यांमधून निराधार, निरुपाय पाण्याच्या धारा वाहायला लागल्याच. दोघी एकमेकींबरोबर नव्हत्या, हे त्यांच्या दूर दूर बसण्यावरून स्पष्ट होत होतं.

समोरून येणारे जाणारे त्यांच्याकडे बघत होते; पण त्यांनाही आपापली दुःखं, विवंचना होत्याच. म्हणूनच तर कुणी त्यांना काही विचारलं नाही.

दोघी तशाच एकमेकींशी काही न बोलता सुन्नपणे बसलेल्या होत्या. आणि बोलणार तरी कशा म्हणा. 'सुसंस्कृत' समाजानं काही, नव्हे बरीच बंधनं आपल्या सर्वांवरच लादलेली आहेत. त्यातलंच एक म्हणजे अनोळखी माणसाशी बोलू नये. त्याचं दुःख आपलं हृदय चिरत असलं तरी.

पण काही वेळानं कढ ओसरला तसं एकीनं दुसरीला विचारलं, ''कोन हाये?''

दुसरीनं उत्तर दिलं, ''मुलगी.''

पहिली तिच्या बोलण्यावागण्यावरून कपड्यांवरून फारशी 'सुसंस्कृत' वाटत नव्हती. म्हणूनच तिनं प्रथम बोलायला सुरुवात केली असावी. आणि दुसरी बरी दिसत असली तरी तिचं दुःख आता हृदय फोडून बाहेर खळाळणारच होतं, त्याला अनपेक्षितपणे वाट मिळाली.

''माजीबी मुलगीच हाय. इतक्या दिसांनी पोर जालं पन नशीब हावं ना?''

''का हो? काय झालं?''

### कथा



''आवं, पॉर चांगलं तुडतुडीत हाय. पन ल्येकीला दूद न्हाय बगा थेमभरबी. पॉरगं निस्तं कळवळतंय बगा भुकंनं–दोन दिसांचं पॉर– भायरचंबी चालंना त्याला. आता काय करावं, कळत न्हाईये बगा. त्येला ठिवलंय त्या पेशल खोलीत.''

''असं का? अरे, अरे''

''बगा ना, आमच्या घरान्यातल्या बाया कित्ती जुन्या काळापासून दूदआईचं काम करीत व्हत्या. आन आता बगा माज्या पोरीलाच दूद न्हाई. कसलं पाप क्येल्तं मी कोनत्या जल्मी कुनास ठावं...'

''काय म्हणालात? दूदआई? म्हंजे?''

''आवं मावशी, पूर्वीच्या जमान्यात थोरामोठ्याच्या बायका आपली पोरं अंगावर पाजायच्या न्हाईत. मग नुकती बाळंत जालेली आमच्यासारकी बाई आपल्या पोरासंगट त्या पोरालाबी पाजायची. तिला दूदआई म्हनायचं. जल्मभर त्ये पोरगं तिचे उपकार मानायचं बरं.''

''होय होय––संभाजी महाराजांची एक होती दूधआई असं वाचलंय मी कुठेतरी.''

''व्हय. पर तुमच्या लेकीला काय हुतंय?''

''काय सांगू बाई, कर्माचे भोग आहेत सारे, दुसरं काय म्हणायचं?''

''पर हुतंय काय त्ये तरी सांगा ना.''

''मुलगी चांगली सरळ नॅचरल बाळंत झाली, पण पोरगं अशक्त आहे हो थोडं. थोड्या अपुऱ्या दिवसांचं आहे ना– दूध ओढूच शकत नाहीये. मग तेही त्याच स्पेशल खोलीत आहे आणि पाजताहेत त्याला थेंबथेंब दूध. इकडे लेकीचे हाल होताहेत हो पण. भरपूर दूध येतंय. इवलंसं बाळासाठी नेतात, ते पंपबिंप सगळं झालं; पण पोरीचा त्रास काही संपत नाही. मग काय दुधाच्या गाठी आणि ताप आणि कळवळणं बघवत नाही हो अगदी... म्हणूनच तर इथे येऊन बसलेय. देवासमोर.. तोच काहीतरी उपाय सुचवेल आता...''

''खरंय मावशी तुमचंबी. द्येवाव भरोसा ठिवायचा आन गप बसायचं.

आपल्या हातात काय म्हनायला? पर कायबी म्हना. नातवंडं भुकंनं तळतळताना बगितलं की जीव नकुसा हुतो बगा. आन पोरीचा आतमा दुकतोय तेबी बगवत न्हाई. काय करावं तुमीच सांगा मावशी माला.''

मावशी चांगल्याच विचारात पडलेल्या दिसल्या.

''येते हं. मुलगी वाट बघत असेल...'' असं काहीतरी पुटपुटत त्या निघाल्याच.

त्यांच्याकडे बघताना दुसऱ्या आजीला मात्र घसा दाटून आल्यासारखं वाटलं हे नक्की.

थोड्या वेळानं पहिल्या आजी घाईघाईनं येताना दिसल्या. इकडेतिकडे बघण्याआधी त्यांनी मनापासून देवाला नमस्कार केला आणि मग सकाळच्या आजींना शोधायला सुरुवात केली. दुसऱ्या आजीही त्यांच्यानंतर थोड्याच वेळात तिथून निघून गेल्या होत्या. शिवाय त्यांच्या मुलीचा वॉर्ड नंबर वगैरेही काही माहीत नव्हतं. आजी एकदम हताश झाल्या आणि धपकन बाकावर बसल्या. प्रायव्हेट खोलीतल्या मऊ उशीवर बसण्याची सवय असलेल्या त्यांच्या थकलेल्या शरीरामनाला तो धक्का सोसला नाही आणि त्या एकदम रडायलाच लागल्या.

रुग्णालयामध्ये असं गणपतीच्या समोर बसून रडणाऱ्या व्यक्तीकडे कुणी फारसं लक्ष देत नाही. त्याला ही असंच रडू फुटत असतं आणि आपल्याकडे कुणाचं लक्ष जाणार नाही याचीही त्याला खात्री असते.

पहिल्या आजींच्या डोळ्याला पदर होता. त्यामुळे त्यांना दुसऱ्या आजी शेजारी येऊन बसलेल्या कळलंच नाही. दुसऱ्या आजींनी त्यांच्या खांद्यावर हात ठेवत विचारलं, ''का वं? काय जालं, मावशी?''

पहिल्या आजींनी डोळ्यावरचा पदर एकदम दूर करत दुसऱ्या आजींचा हात घट्ट पकडत म्हटलं, ''तुम्ही दिसला नाहीत ना म्हणून.''

''आवं मी दिसल्ये न्हाई म्हनून आसं रडायचं व्हय? आवो आपन दोगीबी एकाच दुक्कानं गांजलूया तवा हितंच सापडनार येकीमेकीला, न्हाय का?''

''होय. पण मी शोधलाय न उपाय आपल्या दोघींची दु:ख संपवायचा. म्हणून तर तुम्हाला शोधत आले. चला. सांगते वाटेत–''

आणि उठून चालायला लागताना दुसऱ्या आजींचा हात घट्ट धरत त्या सांगू लागल्या,''मी उठून गेले ना ती मुलीला तुमची गोष्ट सांगायला. सुदैवानं डॉक्टरबाईही तिथे होत्या. त्यांनाही माझी कल्पना फार आवडली. आणि मुलगी तर तयारच होती. चला, आता मी तुम्हाला आम ची खोली दाखवते.

तुमच्या बाळाला घेऊन सरळ इथे यायचं. आता माझी मुलगी तुमच्या बाळाची दूधआई होईल आणि त्याला भरपूर दूध मिळेल बघा. आणि तोवर तिचं बाळही चांगलं सुधारेल आणि मग दोन्ही भावंडं एकत्र वाढतील, चालेल ना? आणि इतकी वर्षं तुमचं दूधआईचं कर्जही थोडंफार चुकवल्यासारखं होईल, हो की नाही?''

दोघी भराभर चालत होत्या. त्यांनी एकमेकींचे हात घट्ट धरले होते.

दोघींच्याही डोळ्यातून घळघळा पाणी वाहत होतं आणि ओठांवर हसू.


***भारती पांडे, पुणे.***
*मोबाइल : ९८९०६६६९१५*

❀❀❀

अंक मिळाला नाही का?

'मिळून साऱ्याजणी'चा प्रत्येक अंक दर महिन्याच्या १ तारखेला पोस्टाने रवाना होतो. जर वर्गणीदारांना दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत अंक मिळाला नाही तर त्यांनी सोमवार ते शुक्रवार दुपारी १२ ते ५ या वेळात 'मिळून साऱ्याजणी'च्या ७४४७४४९६६४ या मोबाईल क्रमांकावर आपली तक्रार द्यावी. म्हणजे आम्हाला आपला अंक परत पाठवता येईल. पुण्यातील वर्गणीदारांनी वर्गणीचे धनादेश पाठवले तरी चालतील; पण बाहेरगावाहून धनादेश पाठवताना चेकवर मॅग्नेटिक स्ट्रिप आहे ना हे बघावे. आपण वर्गणी भरल्यानंतर लगेचच आपला पावती क्रमांक, दिनांक, नाव-पत्ता आणि वर्गणीचा कालावधी संगणकावर नोंदवला जातो. एखाद्या महिन्यात अंक आपल्याला पोचला नाही, तर लगेचच आपली तक्रार आपण 'मिळून साऱ्याजणी'च्या कार्यालयात नोंदवावी म्हणजे आमच्याकडून काही चूक राहिली नाही ना, हे तपासता येईल.

**– व्यवस्थापक**



माणसाची आदिम प्रेरणाच मुळी द्वंद्वाची, संघर्षाची, घुसळणीची, वादाचीआहे. चढाओढ, मतमतांतरं, वार–प्रतिवार याशिवाय कुठल्याही सजीवाचं अस्तित्व शक्य नाही. ही चढाओढ पूर्वीही 'असण्यासाठी' होती आणि आजही त्याचसाठी आहे. असण्याचे आणि नसण्याचे निकष आणि प्रतलं मात्र बदलत गेली आणि नवे आयाम आपल्यासोबत घेऊन आली. जिवंत असणं कालातीत शाश्वत सत्य असलं तरी ज्या भवतालात जिवंत असायचंय तो भवताल मात्र काळ, वेळ, स्थिती सापेक्ष असतो आणि असायला हवाच. या सापेक्षतेतूनच नवे द्वंद्व आणि गोंधळाची नवी परिमाणं जन्माला येतात, येत राहतात आणि येत राहतील. परिमाणं आणि निकष बदलले तरी द्वंद्वांचा शेवट अमन–शांतता आणि सामंजस्य हा होता आणि राहीलही. प्रत्येकच काळाला शांततेच्या दिशेने जायचं असलं तरी द्वंद्व आणि संघर्षाची पायरी टाळून उडी टाकता येत नाही. अशी लांब उडी एकतर फसते किंवा ढोपर तरी फुटते.

शांतीपर्यंत जाण्यासाठी प्रेमाचा मार्ग आहे आणि त्या मार्गाला पर्याय नाही असं स्टेटमेंट करताना प्रेम ही टोकाची अमूर्त गोष्टसुद्धा सुटी करणं गरजेचं आहे. ती होईल की नाही हा भाग अलाहिदा! पण ते गाठोडं सोडण्याच्या प्रवासातच कुठेतरी इप्सित हाती लागण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

धार्मिक–जातीय–मूलतत्ववादी–आर्थिक संघर्षाच्या आणि असमतोलाच्या काळातली शांतता काय असू शकते? इथे शांतता म्हणजे शोषित–पिडीत गटाने आवाज न उठवता गप्प राहणं ह्याला शांतता म्हणणं केवढं अवाजवी मूर्खपणाचं ठरेल. पण त्या उठवलेल्या आवाजाला, प्रसंगी त्याला मिळालेल्या हिंसक वळणालासुद्धा सरळसोटपणे हिंसा म्हणून एका चौकोनात बसवणंसुद्धा तितक्याच दर्जाचा खुळेपणा असेल. सत्तेने उभे केलेले चढउतार भेदून पुढे जाण्यासाठी, सोबत पुढे जाण्यासाठी फक्त प्रेम कुठवर पोहचवू शकेल? आणि प्रेम जर दोन समसमान पातळ्यांवर येऊन केली जाणारी गोष्ट असेल तर ह्या विषमतेच्या चिखलात ती समरेषा कशी शोधायची किंवा ओढायची तरी? ह्या सगळ्या कल्लोळात शांतता मिळवणं किंवा त्यासाठीची स्वप्नं पाहणंसुद्धा एक मोठं प्रिव्हिलेज आहे का? आहेच! शांततेचे रंग आपल्या Socio-economic locations वरून ठरतात. शांतता भुकेल्या पोटाला परवडणारी चीज आहे का? मग आधी भूक भागवायची की रिकाम्या पोटाने शांततेचा गर्भ खोदायचा? वरच्या जातीतल्या घरातल्या पंपावरचं पाणी प्यायलं म्हणून एखाद्या कोवळ्या पोराला मारहाण होऊ शकणाऱ्या देशात, दलित आणि बलात्कार झालेल्या बाईचा मृतदेह

# अमन की ओर

## (प्रेमाला पर्याय नाही)

**तरुण वास्तवाचा वेध**



रात्रीतून जाळून पुरावे नष्ट करू शकणाऱ्या देशात, मशिदीत एखाद्या लहानगीवर बलात्कार होऊ शकण्याची शक्यतासुद्धा असणाऱ्या देशात शांततेची मागणी करणं म्हणजे इथे या खोलीत बसून असमानतेच्या मुद्यावर कीबोर्ड बडवण्याइतकंचं सोपं आहे.

मटेरिअलिस्टीक आयुष्य जगणाऱ्या किंवा तसं लेबल तरी लागलेल्या आमच्या पिढीच्या शांततेच्या/प्रेमाच्या संकल्पना काय आहेत? प्रेम म्हणजे नेहमीच समर्पण आणि तेरे लिये जान दे दुँगी असं न म्हणताही जगता आणि अनुभवता येऊ शकण्याचे अनुभव, शारीर प्रेमाच्या चौकटी ओलांडून बरीच सफारी करूनसुद्धा शरीर आणि प्रेम ह्यांना वेगवेगळं ठेवू शकण्याची प्रयोगशीलता असणाऱ्या आमच्या पिढीच्या 'प्रेमाला पर्याय नाही' म्हणतानाचे हॅक्स, Monogamy is a myth हे कोळून Polyamory च्या दिशेने प्रवास करू पाहणारी पिढी आणि राधा–कृष्ण, हीर–रांझा, मीरा–कृष्ण–राम–सीता, लैला–मजनू ही प्रेमाची प्रतिकं नाकारून नवे आदर्श, नव्या गोष्टी रचू पाहण्याचे अनुभव, जात–धर्म–वर्ग–वर्ण–रंग ह्याच्या ठिकऱ्यांमध्ये प्रेम बसवू पाहत असतांना Love is love हे ठणकावून सांगत प्रेमाच्या सतरंगी शेड्स दाखवू पाहणाऱ्या LGBTQI++ कम्युनिटीची गोष्ट हे सगळं ह्या अंकात वाचकांना वाचायला मिळेल. गोष्ट सांगण्याची क्षमता आणि ताकद त्यांनी मिळवली खरी पण त्या ऐकण्यासाठीचा पोक्तपणा आपल्या कानांनी आणि बुद्धीने मिळवलाय का? नसेल मिळवला तर असल्या exclusion च्या बळावर कुठल्या शांततेच्या आणि प्रेमाच्या गोष्टी आपण करतो आहोत चेही संदर्भ या अंकात सापडतील.

शांतता म्हणजे मौन नाही. शांतता म्हणजे ब्र सुद्धा उच्चारता गप्प राहणं नाही. अशा पोकळ शांततेपेक्षा आम्हा तरुणांना सर्जनशील गोंधळ जास्त अर्थपूर्ण वाटतो. असतो. हाच सर्जनशील गोंधळ तुम्हा सगळ्यांपुढे मांडण्याचा प्रयत्न ह्या अंकातून करतोय. हे सगळे गोंधळ प्रतलावर आणून त्यातून शांतिच्या नव्या व्याख्या चोखाळण्याचा हा प्रयत्न तुम्हाला वाचक म्हणून नक्की आवडेल अशी आम्हाला आशा आहे.

तुमच्या प्रतिक्रियांचं स्वागत आहे!

**नितीन जाधव**
**काजल बोरस्ते**



# ऐसे दस्तूर को हम नहीं मानतें!

राही श्रुती गणेश

'जेलची दारं आमच्यामागे बंद झाली. माझं विद्यापीठ, माझं घर, माझे मित्रमैत्रिणी सगळ्यांपासून मी तुटले होते. कानात अजूनही रस्त्यावरच्या माझ्या साथींच्या घोषणा घुमत होत्या. या अंधारकोठडीच्या पुढचा उजेड, माझे डोळे अटकेच्या दिवशीही पाहू शकत होते.' तिहार जेलमधली आपली अटक आठवताना सफूरा झारगरच्या डोळ्यांत नाराजी नाही, राग आहे. आणि तरीही भविष्याविषयी आशा घेऊन ती हसत बोलत राहते.

कोरोनाच्या महामारीचं नाट्य सध्या आपल्या जगण्याला इतकं वेढून बसलं आहे की, त्यापूर्वी, २०१९च्या शेवटाला देशभर पेटून उठलेलं दुसरं एक महानाट्य आपण विसरतो. नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (एनआरसी) या दुहेरी धोरणातून धार्मिक अल्पसंख्याकांना भारतीय नागरिकत्व नाकारलं जाण्याचा मोठा धोका देशभर जाणवू लागला. हिंदू सोडून बाकी सगळ्या अल्पसंख्याकांना भारताचे 'दुय्यम नागरिक' मानलं गेलं पाहिजे, हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पायाभूत विचार आणि भाजपच्या धोरणांमधले बारकावे पाहता या धोक्याला तथ्यांचा भक्कम आधारही होता. धर्मनिरपेक्षता मानणारे सगळ्या धर्मांचे नागरिक, विचारवंत, कवी, लेखक, कलाकार या धोरणांच्या विरोधात रस्त्यांवर उतरले. सीएए आणि एनआरसीवरची चर्चा आणि त्याविरोधातल्या आंदोलनांचं वारं विद्यापीठांमध्येही पोचलं. सामाजिक शास्त्रांचा अभ्यास आणि समकालीन घटनांचं चिकित्सकपणे आकलन करणारे विद्यार्थी आपल्या कायद्याच्या अभ्यासानिशी या आंदोलनात उतरले आणि या आंदोलनाला अधिकच ताकद मिळाली. याच आंदोलनात आपल्या मित्रमैत्रिणींसह जामिया मिलिया विद्यापीठाची २७ वर्षीय विद्यार्थिनी सफूरा झारगरही सामील झाली. भारतीय संविधानाच्या चौकटीला कसलाही धक्का लागता कामा नये, एवढीच या विद्यार्थ्यांची मागणी होती. आंदोलनात सामील झालेल्या काही विद्यार्थ्यांची नावं दिल्ली पोलिसांनी नोंदवून ठेवली होती. एप्रिलमध्ये तिला अटक झाली, तेव्हा अटकेचं कारण ऐकून सफूराला धक्काच बसला. फेब्रुवारीमध्ये झालेल्या दिल्ली दंगलीच्या कटामध्ये सामील झाल्याच्या आरोपाखाली तिच्यावर चक्क दहशतवाद्यांवर वापरल्या जाणाऱ्या युएपीए कायद्याखाली तिला अटक केली होती. ज्या दंगलीच्या जखमा दिल्लीतल्या मुस्लिमांच्या मनावर अजूनही ओल्या होत्या, त्याच दंगलीच्या कटाचा आरोप म्हणजे ज्याने मार खाल्ला त्यालाच मार देण्याची शिक्षा मिळण्याचा, भयंकर प्रकार होता. तिला अटक झाली, तेव्हा सफूरा आणि तिचा नवरा पुन्हा पुन्हा पोलिसांना सांगत होते की, सफूरा गरोदर आहे, पण युएपीएसारख्या गंभीर कायद्याचं आरोपपत्र घेऊन आलेले पोलिस काही ऐकायच्या मनःस्थितीतच नव्हते.

अटकेच्या वेळी तीन महिन्यांची गरोदर असलेली सफूरा कोव्हिडच्या दुसऱ्या लाटेदरम्यान जेलमध्ये गेली होती. लॉकडाऊनच्या नावाखाली पहिले ३८ दिवस सफूराला एकांत कोठडीमध्ये ठेवलं गेलं होतं. तिच्या कोठडीबाहेरची एक महिला हवालदार वगळता सफूरा कोणालाही भेटू शकली नाही. तिचा नवरा, तिचे वकील यांच्याशीही तिचा कोणताच संपर्क होऊ शकला नाही. बाहेर सफूराविषयी, 'नाही नाही' तो प्रचार करण्याचं काम भाजपचा आयटी सेल आक्रमकपणे करत होता. 'दहशतवादी' सफूरा लग्नाशिवायच कशी गरोदर आहे, अशा अश्लाघ्य भाषेत तिचं चारित्र्यहनन करणारे मेसेज सगळीकडे पद्धतशीरपणे पसरवले गेले. संयुक्त राष्ट्रांसह विविध आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून सफूराच्या सुटकेसाठी दबाव पडल्यावर जूनमध्ये अखेर तिच्या आरोग्याचा विचार करून, दिल्ली उच्च न्यायालयाने सुटकेचे आदेश दिले.

बाहेर आल्यावर सफूरा आपल्या बाळाला वेळ देते आहे, पीएचडीचा अभ्यास करते आहे आणि अधिकच आग्रहीपणाने धर्मनिरपेक्ष भारताच्या स्वप्नाविषयी बोलते आहे. शाहीन बागमध्ये जमलेल्या हजारो मुस्लिम, हिंदू, शीख स्त्रियांच्या सुरात सूर मिसळत गाताना सफूराला जाणवतं की, भारताच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळीही आपल्यासारखे शेकडो तरुण 'दहशतवादी' म्हणून तुरुंगात टाकले गेले होते. त्यांनी तुरुंगाच्या भिंती आपल्या देशाच्या भविष्याच्या स्वप्नांनी रंगवल्या होत्या. आज आपल्या हातीही ही जबाबदारी आहे, याची तिला जाणीव आहे.

सफूराप्रमाणेच देशभरातले अनेक

तरुण आज आपल्या बोलण्याची किंमत चुकवूनही तितक्याच आग्रहीपणे बोलत आहेत. कोणाला युएपीएसारख्या निर्दयी कायद्याखाली खोट्या खटल्यांमध्ये गोवलं गेलं आहे, तर कोणावर निर्दय हल्ले झाले आहेत.

पंचविशीतल्या शिव कुमार आणि नोदीप कौर यांना शेतकरी आंदोलनातल्या त्यांच्या सहभागामुळे अटक झाली, तेव्हा पोलिसांच्या हिंसेला जातीयवादी धार होती. ही दोघंही पंजाबमधल्या भूमिहीन दलित शेतमजुरांची मुलं. दोघं कारखान्यांमध्ये काम करतात आणि कामगारांच्या हक्कांसाठीही काम करतात. शिव कुमारने तीन वर्षांपूर्वी 'मजदूर अधिकार संघठन' नावाच्या संघटनेची स्थापना केली आहे. त्यामार्फत तो आणि नोदीपसह त्याचे सहकारी आपल्या कामाचा योग्य मोबदला वेळेवर मिळावा, म्हणून संघटितपणे काम करतात. शेतामध्ये शेतमजूर म्हणून, गावामध्ये दलित म्हणून आणि कारखान्यामध्ये कामगार म्हणून शोषण भोगलेल्या नोदीप आणि शिवकुमारला आंदोलन ही निकड वाटणं, हा त्यांच्या जगण्यासाठीचा श्वास घेण्याइतका सहज भाग आहे. शेतमालासंबंधीच्या तीन 'काळ्या कायद्यां'विरोधात दिल्लीत देशाच्या इतिहासातलं अभूतपूर्व शेतकरी आंदोलन सुरू झालं, तेव्हा हे दोघे अर्थातच त्या आंदोलनात सामील झाले. दरम्यान दिल्लीच्या सिंघू हद्दीबाहेरच्या एका कारखान्यामध्ये कामगारांचा पगार थकवला गेला होता. याबद्दल कळल्यावर मजदूर अधिकार संघटनेने या कारखान्याबाहेर प्रदर्शन सुरू केलं. काहीच वेळात तिथे पोलिस पोचले आणि आंदोलनाच्या ठिकाणहून नोदीपला अटक करण्यात आली. सोनिपत आणि कर्नाल पोलिस स्टेशनमध्ये नोदीपला मारहाण आणि जातीवाचक शिव्यांचा सामना करावा लागला. पोलिसांविरुद्ध तिने लैंगिक हिंसेचीही तक्रार केली आहे.

नोदीपला अटक झाल्यावर काही दिवसांनी शेतकरी आंदोलनाच्या समर्थनासाठी आलेल्या शिव कुमारवर हल्ला झाला. अचानक काही लोकांनी कापडाने त्याचा चेहरा झाकून त्याच्या कमरेला बंदूक लावून त्याला एका कारपाशी नेलं. एका निर्जन ठिकाणी गाडी थांबवून 'चमार है तू! लीडर बनता है?' असं ओरडत हे लोक त्याच्या तोंडावर थुंकत त्याला मारू लागले. तिथून सोनिपत पोलिस स्टेशनला नेऊन त्याच्या अंगावरचे कपडे काढून त्याला गुरासारखी मारहाण झाली. लाथा बुक्क्यांनी त्याच्या अंगावर चढून दिवसातून तीन चार वेळा वारंवार त्याला तुडवलं जाई, उकळत्या पाण्यात पाय बुडवले जात. काही वेळा बुटांनी, दहा दहा किलोच्या लोखंडी रॉडने त्याला ज्या प्रकारची मारहाण केली गेली, त्याचं वर्णनही ऐकवत नाही. पहिले कितीतरी दिवस त्याला रात्री झोपूही देत नव्हते. त्याच्या कुटुंबाशी काही संपर्क करू देत नव्हते. एक-दीड महिन्याच्या अटकेनंतर तुटलेली नखं, हात आणि डोक्यावरच्या जखमा आणि अनेक फ्रॅक्चरसह लंगडत शिव कुमार बाहेर आला तेव्हा काळजीने त्याच्याभोवती जमलेल्या कुटुंब आणि मित्रांकडे पाहून त्याने मूठ उंचावली आणि म्हणाला, 'किसान-मजदूर एकता जिंदाबाद!'

पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डरला भिडताना शिव कुमार तुरुंगातले आपले दिवस आठवून म्हणतो, ''मला मारहाण करणाऱ्या पोलिसांचा मला राग येत नाही. ते तर या व्यवस्थेचा एक भाग आहेत. गरीब आणि श्रीमंतांमध्ये असलेल्या दरीवर टिकणाऱ्या या व्यवस्थेचा मला राग आहे. शोषण आणि हिंसा मूकपणे सहन करायची नाही, असं ठरवलं की, अवघड रस्ता सुरू होतो''.



नोदीप म्हणते, ''कामगारांच्या हक्कांसाठी लढणं म्हणजे तलवारीच्या पात्यावर चालण्यासारखं आहे, याची पूर्ण जाणीव ठेवूनच आम्ही या कामात उतरलो.'' न्यूनतम वेतनापेक्षाही कमी मजुरीवर काम करणाऱ्या नोदीप आणि शिव कुमारच्या क्रांतिप्रिय उत्साहावर तुरुंगाच्या हवेने काहीही परिणाम झालेला नाही. जर शोषण हा इथल्या व्यवस्थेचा नियम असेल, तर आंदोलन आमचा हक्क आहे, या भावनेने हे दोघं प्रत्येक दिवसाला भिडतात.

नव्यासाठीचा उत्साह आणि डोळ्यातली हजार स्वप्नं हे तर तारुण्याचं पहिलं लक्षण. आता स्थितिशील, 'जैसे थे'वादी व्यवस्थेला ही स्वप्नंच टोचतात, त्याला आपण तरी काय करणार! सरकार, धर्म, संस्कृती या व्यवस्था तर आज अतिसंवेदनशील झाल्या आहेत. रस्त्यावरचं आंदोलन काय, यांना तर विनोदही सहन होईनासा झाला आहे. बहुसंख्याकवादी मानसिकतेवर, सरकारच्या धोरणांवर विनोद केल्याबद्दल ज्यांच्यावर हल्ले झाले, अशा कुणाल कामरापासून मुनावर फारुक़ीपर्यंतच्या यादीतलं आणखी एक नाव म्हणजे अग्रिमा जोशुआ. उत्तर प्रदेशातल्या ख्रिश्चन कुटुंबातली ही तरुणी स्टँड अप कॉमेडियन म्हणून मुंबईत पाऊल ठेवतेय, तेवढ्यात तिचं या क्षेत्रातलं भविष्यच संपायची चिन्हं दिसू लागली. योगींच्या काळातला उत्तर प्रदेश, तिथलं ख्रिश्चन लोकांचं जगणं, मोदींच्या नेतृत्वाखाली देशाची कोलमडलेली अर्थव्यवस्था या सगळ्या मुद्द्यांना आपल्या खुसखुशीत विनोदात बांधणारा अग्रिमाचा

(पान ३५ वर)

# माझ्या निवडणुकीची गोष्ट

सत्यजित सीमा संजय

**सत्यजित सीमा संजय या एकवीस वर्षीय तरुणाने लढवलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीची ही गोष्ट आहे. बऱ्याचदा तरुण जिंकून आलेल्या उमेदवारांना लक्षात ठेवले जाते, मात्र ग्रामविकासासाठी झटणाऱ्या, राजकारणात नवे विचार घेऊन येणाऱ्या अशा युवकांकडे दुर्लक्ष होतं. तरुणांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तितकासा चांगला नाहीये असं म्हणत असलेल्या काळात सत्यजितची ही गोष्ट महत्त्वाची आहे.**

वयाच्या एकविसाव्या वर्षी ग्रामपंचायत निवडणूक लढविण्याची खुमखुमी मला चक्क निवडणुकीच्या दहा–बारा दिवसाआधी आली. ना पारंपरिक राजकीय वारसा, ना ग्रामीण राजकारणाचा पुरेसा अभ्यास वा अनुभव किंवा मग गाव पातळीवर राजकीय उमेदवारांचा विजय खेचून आणण्यासाठी महत्त्वाचं मानलं जातं ते 'भावकी'चं जाळं किंवा मग मतदारांना विकत घेण्यासाठी आवश्यक तेवढा पैसा. यातलं काहीच हाताशी व मनाशी असण्याची शक्यता दूरवर नव्हती. होती फक्त उदंड इच्छाशक्ती आणि ग्रामविकासाची तळमळ. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये लढवलेल्या माझ्या ग्राम पंचायत निवडणूक अनुभवाची ही गोष्ट!

२०२१च्या सुरुवातीला म्हणजे जानेवारी महिन्यात संपूर्ण महाराष्ट्रातील जवळपास चौदा हजारांपेक्षा जास्त ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम पार पडला. कोरोनामुळे कार्यकाळ संपूनही निवडणूक न झालेली असंख्य गावं आणि पारंपरिक नेते मंडळी चातकाप्रमाणे गावच्या पारावर अन् चावडीवर बसून निवडणुकीची वाट पाहू लागले होते. यात सत्तेबाहेरचे लिंबूटिंबू अधिकच व्याकूळ. हे चित्र बहुसंख्य गावांमध्ये पाहायला मिळत असतानाच रखडलेल्या गावांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला. निवडणूक यादीतल्या गावांना जिवंतपणा आला. गावातली सार्वजनिक बैठकीची ठिकाणे तरारून जागी झाली. चर्चा अपचर्चांना उधाण आले. निवडणुकीच्या तयारीची लगबग सुरू झाली. ग्रामपंचायत निवडणुकीचा आत्मा म्हणजे गावातील गट–तट. या गटातटाचे म्होरके आपापल्या कार्यकर्त्यांना घेऊन उमेदवार निवडीसाठी, एकगठ्ठा मतांच्या नियोजनासाठी, संभाव्य आरक्षण अन् फोडाफोडीच्या राजकारणाची चर्चा करायला एकत्र जमू लागले. मग सुरू झाली रणधुमाळी. बहुसंख्य वाचकांना हे किंचितही नवं वाटणारं नाही.

गेल्या काही वर्षांपासून सामाजिक क्षेत्राशी जोडून असल्या कारणाने एकूणच सामाजिक जाणिवा थोड्याशा घट्ट झाल्या होत्या. तीन वर्षापूर्वी गोपूज दुष्काळमुक्त करण्याच्या कार्यात बऱ्यापैकी गाव धुंडाळलं होतं. पाण्याइतकेच किंवा त्याहीपेक्षा गहन व ज्वलंत गावातले प्रश्न जवळून पाहिले होते. पाण्याचा दुष्काळ ते शेती, जनावरं आणि माणसांची परवड हे कनेक्शन कमी वयात पाहिलं आणि जगलोही होतो. थोडं समाजभान येऊ लागलेल्या अगतिकतेच्या टप्प्यात राजकीय भूमिकेचे महत्त्वही प्रकर्षाने जाणवले होते. याच जाणिवेने यंदाच्या ग्रामपंचायत निवडणुकीत कार्यक्षम उमेदवारांच्या प्रत्यक्ष सोबत उतरून बळ देण्याचा निर्धार मी आणि माझ्या समविचारी साथीदारांनी केला होता. मात्र, प्रत्यक्ष गावातील राजकीय वातावरणाचा, उमेदवारांचा, गटातटांचा अंदाज घेतल्यानंतर मनात खूपच घालमेल सुरू झाली. निवडणुकीची पद्धती खूपच आलबेल दिसत होती. विश्वासू, अभ्यासू अन् कार्यक्षम नेतृत्व दिसत नव्हते. भावनाविवश होऊन मी, अतुल, सूर्यभान आणि इतर साथीदार सतत यावर बोलत होतो. हे चित्र बदलायला हवं या निष्कर्षापर्यंत येत होतो. आपल्याला बरं–वाईट कळत असताना समोर चुकीचं घडतंय, हे दिसत असताना आपण गप्प कसे बसू शकतो? या प्रश्नाने आम्ही खडबडून जागे झालो. मग ठरलं बदलाची सुरुवात स्वतःपासून. आपण निवडणूक लढवायची, लोकांच्या समोर जायचं, त्यांना सक्षम, अभ्यासू, कार्यक्षम नेतृत्वाची गरज पटवून द्यायची. आणि आमचं ठरलं. निवडणूक स्वाभिमानाने लढवायची, वर्षानुवर्षे चालत आलेली पारंपरिक, भावकी, जात, धर्म, लिंग, देव आणि व्यक्तीकेंद्रित निवडणूक पद्धतीला छेद देत संविधानिक, मूल्याधिष्ठित, विकासानुरूप निवडणूक लढविण्याचा आम्ही निर्धार केला. निवडणुकीचा अर्ज स्वतःच ऑनलाईन पद्धतीने भरला. त्यानंतर मात्र गावात खळबळ सुरू झाली. एकीकडे गावची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी अट्टाहास बाळगून बसलेले पारंपरिक नेते, अर्थातच, त्यामध्ये त्यांचा स्वार्थ

दडलेलाच. तर दुसरीकडे पॅनल उभा करण्यासाठी ज्या उमेदवाराची भावकी अधिक असेल, पैसा खर्च करण्याची तयारी असेल अशा उमेदवारांच्या? शोधात गावभर कसरत करणारे पारंपरिक लिंबू-टिंबू. अशातच आमचा निवडणूक लढवण्याचा निर्णय त्यांना सुखावणारा नव्हता. मग निवडणूक लढवणे शेंबड्या पोरांचं काम नव्हे, एवढे लाख तयार ठेवा, गुमान माघार घ्या, तुमची बघितली तर चार घरं अशा हिणवण्या आणि धमक्या देऊन झाल्या. तरीही पोरं हटत नाहीत म्हटल्यावर एवढे-तेवढे पैसे घ्या, कुणीतरी एकाने आमच्या पॅनलमध्ये या अशा विनवण्याही झाल्या. या परिस्थितीत आमचा स्वतःवरचा विश्वास अधिकच दृढ होत गेला.

जिवलग मित्र अतुल आणि मी दोघांनी निवडणूक अर्ज कायम ठेवला. सामाजिक कार्यकर्ते म्हणून गावात असलेली थोडीफार मान्यता राजकीय नेतृत्वाच्या साच्यात परावर्तित करणे ही एक कसोटीच होती. ते आव्हान आम्ही 'अपक्षपणे' स्वीकारले. 'स्वाभिमानी ग्रामपरिवर्तन' नावाने दोघांचंच पॅनल उभं राहिलं. नारळ न फोडता, नारळाचे रोप लावून प्रचाराचा नारळ जपण्याचा-वाढवण्याचा पर्यावरणवादी कार्यक्रम घेऊन प्रचाराला सुरुवात केली. एकीकडे घरातलेच आठ-दहा सदस्य सोबत घेऊन आमच्या प्रचाराच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली तर दुसरीकडे इतर पॅनलमधील उमेदवार अन् पॅनलवाले शेकडोंची गर्दी जमवून प्रचार आरंभाची रॅली गावभर मिरवून शक्ती प्रदर्शन करत होते. आम्ही ठाम होतो. भलेही आज आठ-दहा लोक सोबत असतील पण माणूस बदलतो, आपण माणूसपणावरचा, विवेकावरचा विश्वास ढळू द्यायचा नाही, ही रोज मनाची समजूत घालत होतो.

मग ग्रामविकासाचा जाहीरनामा मांडला. जलसंधारण, आरोग्य, शेती, शिक्षण हे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी अत्यंत बारकाईने व सखोल योजना आखल्या. गावच्या विकासाचे भविष्य जाहीरनाम्याच्या रूपाने कागदावर उतरवले आणि जनतेच्या मनामनातही. लोकांना आमच्या कार्यक्षमतेचा अंदाज बांधता यावा म्हणून त्यांच्या उमेदवारांचे शिक्षण, सामाजिक आणि चळवळींच्या कार्यातील योगदान, राज्य-राष्ट्रीय स्तरावरील प्रतिनिधित्व आणि अनुभव इत्यादी दाखले गावकऱ्यांसमोर मांडले. तुमच्या उमेदवारांवर व त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास दाखवा, आम्ही तो सार्थ ठरवू अशी भावनिक सादही घातली. जाहीरनामा घेऊन किमान बारा ते पंधरा वेळा वार्डातील मतदारांना भेटलो. वडील मंडप व स्पीकर व्यावसायिक असल्याने अगदी



# अमन की ओर
## (प्रेमाला पर्याय नाही)

लहानपणीच कामानिमित्ताने माईक हातात पडला होता. गावात कुठेही लग्न, बारसे किंवा इतर कोणताही कार्यक्रम असला की संपूर्ण गावाला माईकवर निमंत्रण देण्याचे काम करत आलो होतो. आयुष्यात पहिल्यांदाच स्वतःला जाहीर करायला माईक हाती घेतला. मीच माझा कार्यकर्ता होतो, इतर उमेदवारांसारखी कार्यकर्त्यांची रेलचेल सोबतीला नव्हती. मग प्रचाराच्या गाडीवर बॅनर बांधायचा, प्रचाराची गाडी चालवायची, कोपरा बैठकीसाठी स्पीकर लावायचा आणि त्याच बैठकीत माझा जाहीरनामाही मीच मांडायचा, कार्यक्रम झाला की सगळं गुंडाळायचंही मीच. हा अनुभव मला समृद्ध करणारा होता. माझा मतदारवॉर्ड तसा लांबलचक विस्तारलेला. गावच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत. गावाच्या बहुतेक वाड्यावस्त्या माझ्याच वॉर्डमध्ये असल्याने प्रचारासाठी भरपूर पायपीट करावी लागली. शेताच्या बांधापासून ते घरातल्या चुलीपर्यंत भेटणाऱ्या प्रत्येक गावकऱ्याला जीव तोडून सांगत होतो. अनेकांनी कौतुक केलं, मत देण्याचं आश्वासन दिलं तर काहींनी राजकारणात न उतरण्याचा सल्लाही. प्रचारादरम्यान जुन्या प्रतिनिधींच्या निष्क्रीयतेची पावलोपावली प्रचिती येत होती. कुणाला गॅस हवा होता, कुणाला घरकुल, कुणाला गोठा, कुणाला अडकलेले अनुदान, रस्ता, शुद्ध पाणी, हातपंप, मागासवर्गीय निधी, शेततळे, शेतापर्यंतचा रस्ता, आदी असंख्य प्रश्न समोर आल्यावर अक्षरशः गांगारून गेलो. इतकी वर्षे हे प्रश्न का सुटले नाहीत हाच विचार सतत मनाला छळत होता. गावातील म्होरक्यांच्या धाकाने, संबंध खराब होतील या भीतीने नागरिक

सोबत यायला कचरायचे. या कठीण काळात माझे आई-वडील खंबीरपणे सोबत उभे राहिले. नितीन जाधव, शुभम गुरव, क्षितिजा देशमुख, अक्षता पानकर, अश्विनी पवार, हृषीकेश पवार, अक्षय शिंदे यांसारखे TISS, APU, TDA आदी नामांकित शिक्षणसंस्थांमध्ये शिक्षण घेणारे मित्र-मैत्रिणी मतदारांना शहाणे करण्यासाठी घरोघरी फिरले. या समाजभानी लोकांच्या असण्याने निवडणूक पद्धतीला नैतिक महत्त्व प्राप्त झाले. गावच्या इतिहासात पहिल्यांदाच ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सभेचे आयोजन आम्ही केले. सभेमध्ये पोटतिडकीने जाहीरनामा लोकांसमोर मांडला. जलसंधारणाशिवायचा विकास आराखडा जाहीर केला. ज्यात महिला आरोग्य, स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्ये, शिक्षण, पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त गावकारभार, जलसिंचनाचे महत्त्व व अनुदान, बंधारे दुरुस्ती, विद्यार्थ्यांना फ्री वाय-फाय, घरपोच कागदोपत्री सेवा, वित्त आयोग, आदी कृती आराखडा सांगितला.

विरोधी उमेदवारांची निवडणूक लढविण्याची पध्दती मात्र अनैतिक होती. मताला एक ते पाच हजारांचा (मतदारांची भुरळ क्षमता पाहून) दर, निवडणूक होईपर्यंत ठरलेल्या ढाब्यावर-दारू अड्ड्यावर कार्यकर्ते अन मतदारांचा पाहुणचार, भावकी, जात, धर्म, आळी-गल्ली, आडनाव या अविवेकी मुद्यांच्या आधारे मतदारांना निवडणूक कशी त्यांच्या प्रतिष्ठेची आहे हे रुजवणे, दुबळ्या नागरिकांना धम कावून, देवभोळेपणाचा फायदा घेऊन अमूकतमूक देवांच्या शपथा घालून किंवा गुलाल-भंडारा उचलून पैसे देणे अन् मतदारांना मतं द्यायला भाग पाडणं.

यातून जिंकण्या-हरण्या पलीकडे संविधानिक व नैतिक पद्धतीने ग्राम पंचायत निवडणूक पार पडावी यासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. महिलांसाठी राखीव आरक्षण नावाचा प्रकार जरी अस्तित्वात असला, तरी 'तिच्या' प्रचारासाठी 'तिला' बाहेर न पडू देणारी, तिला नामधारी पदप्रतिष्ठा देऊन नवरा, मुलगा, सासरा यांच्या ढुंगणाला आजवर चिकटलेली खुर्ची तिला आता मिळायला हवी. सोबत निर्णयस्वातंत्र्यही. जातीनिहाय वस्त्यांचे, वंचितांचे प्रश्न मला या निवडणुकीने कान धरून दाखवले.

शेवटी, 'माझ्या' निवडणुकीचा निकाल लागला. मला चक्क १५६ मतं मिळाली होती. याचा अर्थ प्रत्यक्ष सोबत येऊ न शकलेल्या १५६ महिला, वृद्ध, तरुण-तरुणी अन् गावकऱ्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला होता. अवघ्या ३६ मतांनी जरी मला निवडणूक प्रक्रियेत जिंकता आलं नाही, तरीही गावकऱ्यांच्या मनात माझा, माझ्या साथीदारांचा, संविधानिक निवडणूक पद्धतीचा विजय झाला.

यातून एक समजलं गावाकडच्या चुरगळलेल्या माणसांना शाश्वत उभं करायला आता खरोखरच कार्यक्षम अन् अभ्यासू नेतृत्वाची गरज आहे. राजकारण हे घाणेरड्या अन् नालायक लोकांचं क्षेत्र कधीच नव्हतं, नाही आणि नसेल. सूज्ञ नागरिकांच्या, नेतृत्वाच्या अभावाने ते तसं बनलं आहे. गावाकडच्या साध्या-भोळ्या लोकांना आता बदल हवाय. मला या बदलाचा भाग व्हायचंय तुमच्या सोबतीने आमूलाग्र बदल घडू शकतो...

म्हणून लढूयात! आणि जिंकूयात!

***सत्यजित सीमा संजय,***
*मु. पो. गोपूज, ता. खटाव, जि. सातारा*
*मोबाइल : ९५६१६२९२०२*

## अलविदा डिअर जयंत...!



नाटक, समीक्षा, कथासाहित्य आणि पत्रकारिता अशा विविधांगी क्षेत्रात आपल्या विचारसरणीचा आणि चिंतनाचा खोलवर प्रभाव टाकणारा कृतीशील लेखक जयंत पवार आज आपल्यात नाही. सध्याच्या बिकट अशा सामाजिक राजकीय कसोटीच्या परिस्थितीत त्याच्यासारख्या निर्भीड लेखकाचं नसणं ही न भरून येणारी सामाजिक हानी आहे. छोट्याशा कथा बीजातून साकारलेल्या त्याच्या कथांमधून जगण्याच्या विविध अंगांना भिडणारा व्यापक आशय वाचकाच्या मनावर दीर्घकाळ परिणाम करत राहतो. डेंजर वारा सुटलाय, अधांतर, फिनिक्सच्या राखेतून उठला मोर, वरन भात लोन्च्या नि कोन नाय कोन्च्या, लेखकाचा मृत्यु आणि इतर गोष्टी, आदी पुस्तकांची सोबत इथून पुढे आपल्याला राजकिय-सामाजिक भान जागं ठेवत रहायला मार्गदर्शन करत राहील या विश्वासासह अलविदा डिअर जयंत...



# पुरुष उवाच

तरुणाईच्या डोक्याला खुराक...

दिवाळी २०२१

देणगीमूल्य १८० रु.

**विशेष विभाग :**

पाळत कुणाची, कुणावर आणि... का?
आई : माध्यमातली आणि वास्तवातली
माझ्या बायकोचा मित्र
संस्कृती आणि प्रकृतीमध्ये अडकलेला पुरुषार्थ
स्त्रीचा झालेला पुरुष...
घर कुणाचं, घरकाम कुणाचं?
लैंगिकता आणि नैतिकता

**कथा, कविता, वैचारिक व ललित लेख लिहिणारे मानकरी :**

यशवंत मनोहर, प्रवीण दवणे, संजीव खांडेकर, चन्द्रशेखर पुरन्दरे, डॉ. अजित मगदूम, चंद्रशेखर फणसळकर, अनिल किणीकर, परेश जयश्री मनोहर, हेमंत जोगळेकर, सलिल दातार, प्रदीप व श्रीरंजन आवटे आणि तरुण मंडळी

अंक मिळण्याचे ठिकाण

❖ मिळून साऱ्याजणी कार्यालय, फ्लॅट नं १०१, नचिकेत अपार्टमेंटस्, प्रभात रोड, गल्ली नं ४, एरंडवणे, पुणे ४११००४. फोन - ०२०-२५६५३९३८

❖ मुकुंद-गीताली निवास, बी-२, ५०१, कुमार प्राईड पार्क, सेनापती बापट रोड, पुणे ४११०१६. फोन - ०२०-२५६५२३२४, ०९८२२७४६६६३


## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

(पान ३१ वरून)
स्टँड–अप खूप गाजला. तो जसजसा शेयर होत हसू पसरवत गेला, तशी अग्रिमावर ट्रोलधाडच पडली. ज्या ठिकाणी अग्रिमाचा कार्यक्रम झाला होता, त्या जागेची– स्टेज आणि इमारतीची– एका टोळीने तोडफोड केली. अग्रिमाच्या फोनवर बलात्काराच्या धमक्या सुरू झाल्या. शिवाजी महाराजांचा अपमान केल्याच्या तथ्यहीन आरोपाखाली तिच्यावर कारवाईचे आदेश देण्यात आले. हसायलाही विसरलेल्या आक्रमक जमावाला या कलाकारांना त्यांच्या पुढच्या स्क्रिप्टसाठी आपण नवे विनोद पुरवतोय, याचा मुळीच पत्ता नसतो. त्यामुळे बिचारे नाकासमोर धावत राहतात आणि आपल्याच पायात पाय अडकून पडतात. लोक हसत राहतात.

आपल्या बाजूला जे जे अन्याय्य, असुंदर जग आहे, त्याच जगामध्ये नव्या न्याय्य सुंदर जगाच्या बांधकामाचं काम तरुणाई करत असते. जात–धर्माच्या भिंतींना ओलांडून ती प्रेम करते. स्त्री आणि पुरुष असण्याच्या कप्प्यांपलीकडे एलजीबीटीक्युआयए ओळखींच्या प्रवाहांतून हे प्रेम निखळ वाहतं. आज भारतातली बहुसंख्य तरुणाई जरी स्थितिशील विचारांकडे झुकणारी असली, तरी या स्थितिशीलतेला धक्का देणारेही इथं मोठ्या संख्येने हजर आहेत. जात, धर्म, लिंगभाव आणि वर्गांबद्दलच्या आपल्या आधीच्या पिढीच्या समजेपासून ते दोन पावलं पुढे जाऊ पाहत आहेत. विविध विचारधारांमधल्या संवादातून एक नवी दृष्टी विकसित होते आहे. अंधाराकडे नेणारे सम ाजनियम, कायदे कानून हे या तरुणाईला मान्य नाहीत आणि एखादी गोष्ट पटत नाही, हे सांगणं विचारकलहाला न घाबरता मोठ्याने जाहीर करणं गरजेचं असतं हे आता ते शिकले आहेत. प्रकाशाच्या दिशेने जाताना सत्ताकारणाच्या डोळ्यांत पाहून ते निडरपणे असहमती दाखवून देत म्हणतात,

ऐसे दस्तूर को, सुबह बेनूर को
हम नहीं मानतें, हम नहीं जानतें!

***राही श्रु. ग., पुणे.***
*rahee.ananya@gmail.com*

❀❀❀

# करोनामुळे हललेला गावगाडा आणि ग्रामविकासाकडे पाहण्याची दृष्टी

हर्षाली दामोदर घुले

करोनाच्या आपत्तीमुळे जगभरातील सर्वच समाजांवर दृश्य-अदृश्य स्वरूपाचे परिणाम झाले. काही परिणाम अल्पकालीन, तर काही दीर्घकालीन आहेत. करोनानंतर प्रचलित झालेल्या सोशल distancing (जो खरं फिजिकल distancing आहे) या शब्दाने सामाजिक आंतरक्रिया, व्यवहार, आदानप्रदान, यात मोठे बदल घडवून आणले. काही बदल सातत्य ठेवून आहे, तर काही बदलांचे परिणाम समाजाला सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक सर्वच पातळ्यांवर येणाऱ्या काळात भोगावे लागणार आहेत.

देशाच्या ग्रामीण भागाचा विचार करता, टाळेबंदी नंतर शहरातील स्थलांतरित नागरिक, मजूर आणि विद्यार्थी यांनी ग्रामीण भागात केलेलं 'उलट स्थलांतर' बघता शहरात शाश्वती नसल्याने मूळ गावी परतण्याशिवाय पर्याय नसल्याचे अधोरेखित झाले. बघता बघता शहरांना ओहोटी लागली आणि गावांना भरती आली. गावं म ाणसांनी भरून गेली. आजवर वृद्ध आणि वयस्कर माणसे उरलेली, भकास झालेली गावे एकाएकी फ ुलली. त्याचा परिणाम ग्रामीण व्यवहार, सरंचना यावर झालाच पण ग्रामीण भागाकडे बघण्याच्या आजवरच्या दृष्टिकोनावर देखील झाला.

**सामाजिक आणि आर्थिक परिणाम :**

सुरुवातीच्या काळात करोनाच्या भयाचे सावट जास्त असल्याने अनेक गावांनी आक्रमक पवित्रा घेतला, नियमावली तयार केली. अनेक गावांनी वेसबंदी, शिवबंदी, सीमाबंदी केली. रस्त्यांवर काठ्या टाकून शहरातून परत येणाऱ्या लोकांना प्रवेश द्यायला विरोध केला. या घटना करोनाचे भय अधोरेखित करणाऱ्या होत्याच; पण ग्रामीण भागातील सुविधांच्या अभावाची जाणीव असल्याने असुरक्षिततेपोटी घेतलेले सामूहिक निर्णय होते.

पहिली लाट आली, तेव्हा रब्बीचा हंगाम संपून गेला होता. त्यामुळे ग्रामीण भागात फारशी कामे नव्हती. शिवाय हा हंगाम संपल्यानंतरचा काळ म्हणजे लग्न, यात्रा व इतर सामूहिक कार्यक्रमांचा असतो. त्यात लोकांच्या एकत्रित येण्यावर बंदी आली. ग्रामीण भागात 'मोठे लग्न' हा सामाजिक प्रतिष्ठेचा विषय असतो. त्यामुळे अलीकडे महागडे खर्चिक विवाहसोहळे व त्यातून कर्जबाजारी होण्याचे प्रमाण वाढले होते. त्यात या सगळ्या खर्चिक लग्न परंपरेला फाटा देत, कमी लोकांत लग्न उरकून घेण्याची सोय निर्माण झाली. अर्थात, सामान्य लोकांना आर्थिकदृष्ट्या हा पर्याय परवडणारा होता. शिवाय, शाळा बंद झाल्या, महाविद्यालये बंद होती आणि ती अनिश्चित काळासाठी बंद असल्याने मुली घरी ठेवणे अवघड,

असुरक्षित वाटू लागले. त्यामुळे अनेक पालकांनी स्वस्तात लग्न करून देण्याचा सोपा पर्याय निवडला. परिणामी अनेक मुली शिक्षणापासून वंचित झाल्या. महिला व बालकल्याण विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात ५६० बालविवाह पोलीस प्रशासन आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी रोखले. यावरून प्रत्यक्ष झालेले विवाह किती जास्त असतील याचा अंदाज लावता येतो. एका वृत्तपत्राच्या बातमीनुसार तर दहावीच्या मुलींच्या गळ्यात शिक्षकांना मंगळसूत्र दिसली. यामुळे येणाऱ्या काळात त्याची झळ पुढच्या पिढ्यांना बसणार आहे.

टाळेबंदीत अनेक विद्यार्थी घरी असल्याने पालकांना शेतीच्या व इतर कामाला हातभार लागला. त्यात एकूण ग्रामीण अर्थचक्र विस्कळीत झाल्याने रोजगार व आर्थिक उत्पन्न घटले. करोना भीतीमुळे मजूर काम ावर येईनासे झाले. त्यामुळे अनेक शाळकरी बालक मजूर झाले. त्यांच्या शालेय शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. आधीच इंटरनेट आणि मोबाईल यांची उपलब्धता नसल्याने digital divideचा सामना करत होतेच; पण त्यात आणखी भर पडली. येणाऱ्या काळात वर्षभर घरी राहिल्याने व अभ्यासात मागे पडल्याने यातील अनेक मुले शाळेच्या बाहेर फेकली जाण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे.

करोनामुळे कृषी उत्पादने वितरण व विक्री करणारी व्यवस्था ठप्प झाली. आंतरराष्ट्रीय वाहतूक थांबल्याने निर्यात थांबली. याचा खूप मोठा फटका द्राक्ष आणि संत्र या पिकांना बसला. त्यामुळे ग्रामीण भागात आर्थिक उत्पन्न झाले नाहीच; पण उलट पुढच्या हंगामासाठी कर्जबाजारी व्हावे लागले. यातून बिगरसंस्थात्मक कर्ज घेण्याचे, दागिने गहाण ठेवणे आणि वेळ प्रसंगी विकणे दागिने विकण्याचे प्रमाण वाढले. शहरातील हॉटेल, खानावळी बंद पडल्याने भाजीपाल्याची मागणी घटली. ग्रामीण भागात आठवडी बाजार थांबला. त्यामुळे या बाजारात शेतातील पाटीभर रानभाज्या, फळे विक्रीला घेऊन जाणाऱ्या महिलांना वरखर्चाचे जे थोडफार आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झाले होते ते सुद्धा नष्ट झाले. शहरात दुधाची मागणी घटली. परिणामी, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ बनवणाऱ्या समूहांवर

उपासमारीची वेळ आली. केवळ कृषी व कृषिआधारित व्यवसाय यामुळे कोलमडले नाही, तर ग्रामीण व्यवस्थेत असणाऱ्या सगळ्या व्यावसायिक समूहांना आर्थिक फटका बसला. उन्हाळ्यात मागणी असलेले माठ, रांजण बनवणाऱ्या कुंभार समूहाला ऐन उन्हाळ्यात टाळेबंदी झाल्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागले. आठवडी बाजारात बांगड्या भरणाऱ्या कासारणीपासून, न्हावी, टेलर, वाजंत्री, आचारी, गोंधळी यासारख्या अनेक समूहांना पर्यायी उपजीविका शोधाव्या लागल्या. आजही ग्रामीण अर्थचक्र या गाळात रुतून बसलेले आहे.

**न झालेल्या ग्रामसभा आणि गाजलेल्या निवडणुका :**

करोनानंतर जवळपास मागचे दीड दोन वर्ष अनेक गावात ग्रामसभा झालेल्या नाही. गर्दी टाळण्याचे निकष असल्याने अनेक ठिकाणी काही थोड्या लोकांत ग्रामसभा उरकल्या गेल्या. त्यामुळे त्याचा परिणाम गावाच्या विकासावर झालाच; पण खरी लोकशाही म्हणून ग्रामसभेकडे पाहिले जाते तिलाच आव्हान निर्माण झाले. तरीही, यंदा करोनानंतर ग्रामपंचायत निवडणुकीचा माहोल जोरात होता. त्यात अनेक तरुण मंडळी गावी आहेत. अजूनही कामं, शिक्षण, नोकऱ्या पूर्ववत नाही किंवा अनेकांनी गमावल्या तरी आहेत. कदाचित, या वेळेचा उपयोग अनेकांनी गावचं राजकारण समजून घ्यायला केला. ते एका अर्थाने चांगलंच झालं. त्यामुळे संघटन, अनुभव मिळालेच; पण त्यापेक्षाही गावासंबंधी नवीन चर्चा, गावांच्या चावडीवर रंगताना दिसल्या. ज्या तरुण उमेदवारांशी चर्चा झाली, त्यांनी तरी चर्चे ची केंद्रं आणि मुद्दे बदलत आहे, असं निरीक्षण नोंदवलं. अर्थात, तसं सगळीकडे झालं नसलं, तरीही जिथे किमान सुरुवात झाली त्याविषयी कौतुक आहेच. बाकी भावकी, गावकी, जात, वस्त्या आणि वाडे यांचं राजकारण आणि प्रगतीविरुद्ध विकास पॅनल अधिक समृद्धी पॅनल गावात आहेच ते राहणारच. दुसरे म्हणजे एकूण सामाजिक माध्यमामुळे आणि तंत्रज्ञानामुळे प्रचाराच्या पातळीवर निवडणुका खूप vibrant वाटल्या. शिवाय, सगळ्या पक्षांच्या सहभागाने आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या दिवसभर चर्चेने स्थानिक निवडणुकांचे राज्य पातळीवर महत्त्व वाढवलं.

**रोजगार, शेअर मार्केट आणि क्रिकेट :**

जागतिकीकरणानंतर शहरात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्याने गावखेड्यांना ओहोटी लागली, हळूहळू गावे ओसाड व म्हातारी झाली. करोनानंतर जगभरात स्थलांतराचे मार्ग बदलले. शहरात रोजगाराच्या संधींच्या शोधात गेलेले अनेक जण गावी परतले. यात विशेषतः शिक्षित तरुण जास्त होते. करोनानंतर गावे पुन्हा

*With Best Compliments From*

fp
Filtropumps
THE SCREW COMPRESSOR PEOPLE

COMPAIR
SERVICES

Siddhart apts, Near Mehendale Garage,
Erandwane, Pune 411004
Tel/Fax : 020-25437781, 25438423, 25455671
Email : filtropumps@vsnl.com

गजबजली. आईबापाने कष्टाने मोलमजुरी करून गरिबीतही कर्ज काढून शिकवलं, महामारीने रोजगार गमावला, शहरं परवडत नाही, शेतीत उत्पन्न नाही आणि गावात भविष्य दिसत नाही; मग गावाकडच्या पोरांनी करायचं काय?हा प्रश्न पडलेली गावखेड्यातली तरुणाई जगण्याचा हा संघर्ष अनुभवू लागली.

ग्रामीण भागातील तरुणाई एकीकडे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करायला लागली असल्याचे रिपोर्ट माध्यमातून सर्वांनी पाहिले, तर दुसरीकडे वेळ जाण्यासाठी काही विरंगुळा हवा म्हणून गावोगावी क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले. काही गावात शिक्षित तरुणांनी एकत्र येऊन गावातील शालेय विद्यार्थ्यांना शिकवण्याचे उपक्रम हाती घेतले.

गावात परत आलेले शिक्षित तरुण गावात राहून काय करता येईल, याची चाचपणी करायला लागले. माघारी परतलेल्या तरुणांना करोना आपत्तीनंतर उपजीविकेची पर्यायी साधने शोधताना शेती पलीकडे पर्याय का दिसत नाहीत? असे पर्याय का उपलब्ध नाहीत? कारण, महाराष्ट्रातील ग्रामविकासाची चर्चा मागील दहा वर्षात पाणलोट क्षेत्र विकासाच्या पुढे गेली नाही. तथाकथित 'आदर्श' गावांचे प्रारूप सर्वत्र वापरले गेले. परिणामी, ग्रामविकासाचे व्यापक सर्वसमावेशक स्वरूप आजही अस्तित्वात आले नाही. आजही अनेक गावात लाखो रुपये खर्चून नवनवीन मंदिरे बांधली जात आहेत; पण गावातली तरुणाई बेरोजगार, हताश आहे हे आजवरच्या ग्रामविकासाच्या प्रारूपाचे अपयश आहे. मग भविष्य कशात आहे? शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबी खेडी निर्माण करण्यात.

लाखोंची मंदिरे बांधणाऱ्या गावातल्या शाळा बंद पडल्या, परिणामी तालुक्याला किंवा शहरात इंग्रजी माध्यमाच्या महागड्या शाळांच्या व्यवसायाला सुगीचे दिवस आहे. परंतु सामान्य शेतकऱ्याचा मुलांच्या शिक्षणावरील खर्च वाढला. आजवर किती गावांनी गावपातळीवर शहरांच्या शाळेइतकी दर्जेदार शाळा तयार व्हावी यासाठी सार्वजनिकरीत्या प्रयत्न केले? काही अपवादात्मक उदाहरणे सोडल्यास असे फारसे आढळत नाही.

विकासाच्या संकल्पनेत 'शिक्षण' व 'आरोग्य' यांना खूप महत्त्व आहे. गावांनी जर गावपातळीवर शहरांच्या शाळेइतकी दर्जेदार शाळेचा आग्रह ठेवून सार्वजनिक प्रयत्न केले, तर शिक्षणावरील अनाठायी खर्च वाचवता येईल. यासाठी गावाच्या देखरेखीखाली 'गावातली शाळा, गावाची जबाबदारी' सारखे उपक्रम आखायला हवेत. तरच, करोना आपत्तीचा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यावर झालेला परिणाम भरून काढता येईल.

**आपत्ती व्यवस्थापन आणि गावं :**

शहराची वेस ओलांडून करोना गावागावात शिरला, तोपर्यंत आपत्ती व्यवस्थापन ही गावाची जबाबदारी नव्हती. या आपत्तीत अनेक गावात रोज चिता पेटत होत्या. अनेक घरातील कर्ता कारभारी पुरुष गेला. अनेक महिला विधवा झाल्या. पण ग्रामपंचायत आणि नागरिक मात्र निष्क्रिय होते. कारण आजवर आपत्ती व्यवस्थापन ही गावाची जबाबदारी कधी वाटली नाही. करोनाच्या आपत्तीने दोन प्रमुख बाबी अधोरेखित केल्या. त्यातील पहिली म्हणजे आपल्या धोरणातील चुका आणि दुसऱ्या म्हणजे प्रशासन यंत्रणेतील विकेंद्रीकरण. २००५च्या आपत्ती व्यवस्थापन कायद्यात केंद्र, राज्य आणि जिल्हा पातळीवर आपत्ती नियोजनाच्या संदर्भात तरतुदी आहेत. पण यात प्लॅन वरती जास्त फोकस आहे. शिवाय, जिल्हा नियोजनात जो भाग हा आपत्तीप्रवण आहे, तिथे विशेष लक्ष देण्याची सूचनादेखील आहे. पण याचा अर्थ सर्वत्र उद्भवू शकणाऱ्या आपत्तीचा यांच्यात विचार केलेला नाही. नेमकी तीच वेळ आता आली. यापूर्वी एखाद्या तालुक्यात पूर यायचा, एखाद्या गावात भूकंप व्हायचा, एखाद्या ठिकणी दरड कोसळायची. त्यामुळे याचा कधी विचार झालाच नाही. शिवाय, अशा आपत्ती केंद्राच्या व राज्याच्या मदतीने जिल्हा व्यवस्थापन हाताळू शकते हा आपला आत्मविश्वास होता. आज मात्र जो गोंधळ दिसतोय, तो बघता विकेंद्रीकरणाची जास्तीत जास्त गरज भासतेय. त्यात सातत्याने नैसर्गिक आपत्तींना देखील तोंड द्यावे लागत आहे. कधी पूर तर कधी वादळ, कधी उशिरा पाउस, कधी दरड कोसळणे अशा हवामान बदलाच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे आता तालुका किंवा ग्रामपंचायतींना आपत्तीसाठी सक्षम करण्याचा विचार करावा लागेल.

आपल्या ग्रामपंचायती आणि आपत्ती व्यवस्थापन यांचा दुरान्वये संबंध नाही. तेवढ्या सक्षम आपल्या पंचायती नाहीत. कारण फक्त संसाधने हे नाही, तर दृष्टिकोनाचा अभाव आहे. गरज असल्यावर संसाधने उपलब्ध होतात, पण त्यांचा वापर, व्यवस्थापन, वितरण करण्याससुद्धा आपण पंचायतींना सक्षम केलेलं नाही. अर्थात, २००५च्या कायद्यात स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपला प्लॅन जिल्हा नियोजनाच्या गाईडलाईन्स वर बनवावा वगैरे दिलं आहे. पण लोकल authorities हा शब्द आला की, त्यात ग्रामपंचायती सर्वात खाली

येतात. त्यामुळे प्रशिक्षण वगैरे त्यांच्यापर्यंत पोहचेल याची शाश्वती नाही. खरं तर विकेंद्रीकरणाचे अनेक फायदे आपण बघतोय. आशाताई आणि अंगणवाडी सेविका यांच्यावर आरोग्याची जबाबदारी टाकल्यानंतर भरपूर सुधारणा ग्रामीण भागात झाल्या. हे विकेंद्रीकरणाचे उत्तम उदाहरण आहे. आज ग्रामीण भागात गरोदर माता आणि नवजात बालके यांच्या नोंदणीपासून, हिमोग्लोबिन, लसीकरण यात खूप फरक पडला. शिवाय, करोना काळात त्यांनी सर्वात जास्त काम केले.

आज अनेक ठिकाणी गावातल्या गावात निर्णय घेण्याची वेळ आहे. पण ना लोकप्रतिनिधी सक्षम (सरपंच), ना ग्रामसेवक. आरोग्य आणीबाणी हाताळायची तर तालुका आरोग्य अधिकारी, प्रशासन ठरवतील ते असं चित्र आहे. ही एक आपत्ती आहे. यात स्थानिकांचा सहभाग असेल तरच मात करणं सोपं आहे. पण नेमकं तेच होताना दिसत नाहीये. अनेक गावांत मृत्यू होताना हतबल होऊन बघावं लागतंय. जर गावांना आधीच आपत्तीचे भान दिलं असतं, तर गावपातळीवर जास्त गर्दीचे कार्यक्रम टाळता आले असते. पण शेवटी याचं सगळं घोडं पंचायतराज व्यवस्था सक्षमीकरणाजवळ येऊन अडतं. जिथे फक्त निवडणुका जोरात होतात बाकी काहीच नाही, अशा ठिकाणी उपक्रम कसे राबवणार? चार गट, दोन तट तिथं कोणते नियम लावणार? म्हणून तर महाराष्ट्रात काय पण देशात एकाही गावाने स्वतः ग्रामपंचायतीत ठराव पारित करून स्वतः च्या गावात सार्वजनिक गर्दीच्या कार्यक्रमासाठी नियम, बंधनं घातली नाहीत.

**भविष्याविषयी विचार करताना :**
शहरी रोजगारावर परावलंबी गावं कशी स्वयंपूर्ण होतील याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. त्यासाठी गावपातळीवर सहकाराच्या माध्यमातून छोटी छोटी नाविन्यपूर्ण प्रारूपे निर्माण करावी लागतील. शेतीसाठी लागणारे बी-बियाणे असो अथवा खते, शेतीची अवजारे असो व साधनसामग्री या 'संसाधनांचे पूलिंग' (resource pooling) करता येईल अशी व्यवस्था निर्माण करायला हवी. शेतमाल साठवण्यासाठी सार्वजनिक शीतगृह असो, वा प्रक्रियाउद्योग सारं काही गावातच उपलब्ध झालं पाहिजे. किमान चार-पाच खेड्यांचं मिळून एक क्लस्टर जरी तयार झाले तरीही गावातील उत्पन्न वाढू शकेल. त्यासाठी गावागावातील सहकार्य वाढवावे लागेल. एकीकडे सहकारी शेतीची चर्चा होतेच आहे, तर दुसरीकडे गावागावातल्या 'सहकार्यातून ग्रामविकास' साधायला हवा.

आज जगभरातील कृषी संशोधन गाव-खेड्यापर्यंत पोहोचवण्याची क्षमता गावातील तरुणाईत आहे. भविष्यातील वातावरण बदलाच्या परिणामांचा विचार करता शेतीतही आमूलाग्र बदल करावे लागतील. हे परिवर्तन साधायचे असेल तर गावांनी आपले सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक व पर्यावरणीय सर्वेक्षण गावातील तरुणांच्या गटाकडून करवून त्यावर गावाच्या विकासाची सूत्र निर्माण केली तर आपली खेडी अधिक समावेशक, उत्पन्न शाश्वत राहील व जीवनमानाचा दर्जा उंचावू शकेल.

***हर्षाली दामोदर घुले, मुंबई***
*पीएच. डी. रिसर्च स्कॉलर*
*आय. आय. टी. मुंबई*
*ghuleharshali@gmail.com*

❀❀❀

**चांगलं बाप-लेक नातं निर्माण करण्यासाठी...**

बाप-मुलाचं नातं बहुआयामी, बहुपदरी असतं. त्यातला एक-एक पदर उलगडून दाखवणारे अनेक लेख या पुस्तकात आहेत.

एस. एम. जोशी, धनंजय गाडगीळ, व्ही. शांताराम, रा. चिं. ढेरे, रॉय किणीकर, भालचंद्र पेंढारकर आदी मातब्बरांच्या मुलांचे तसेच जयंत नारळीकर, अच्युत गोडबोले, ऐश्वर्य पाटेकर, प्रा. डॉ. नारायण भोसले यांचे आत्मकथन सांगणारे असे एकतीस लेख या पुस्तकात आहेत.

चांगलं बाप-लेक नातं निर्माण करण्यासाठी 'बाप-लेक नात्याचा कॅलिडोस्कोप' हे पुस्तक आपल्याला नक्कीच मदतीचा हात देईल.

**बाप-लेक नात्याचा**
**कॅलिडोस्कोप**
संपादक : गीताली वि. मं.
मूळ किंमत : रुपये ५५०/-
सवलतीत : रुपये ४००/-
गुगल पे : ९९२१२७२५४६

**घरपोच पुस्तकासाठी संपर्क** अमित प्रकाशन, २०७, १२ अ, साफल्य, डिफेन्सकॉलनी, जनवाडी, गोखलेनगर, पुणे ४११०१६



# I don't believe in Soulmates but...

मुक्ता बाम

कथा

**प्रिय सी २०४,**

तू, तुझं नाव सगळंच अंधुकसं आठवतं मला. आठवणीत स्पष्ट दिसते, ती तुझ्या घरावरची पाटी– सी २०४. आमच्या घराच्या पाटीवर नावं होती– मधुरा, दिनकर, संजीवनी आवटे. बिल्डिंगमधे सगळ्याच घरांवर नावं होती. तुमचंच घर वेगळं – कारण त्याला नावाची पाटी नव्हती. आणि खास, कारण ते तुझं होतं.

'तुमच्या घराची पाटी अशी का आहे? विचित्र?' मी एकदा तुला खेळता खेळता विचारलं होतं.

'आम्ही इथे भाडेकरू आहोत ना. हे आमचं घर नाहीये.'

'तुमचं घर कुठे आहे मग?'

तू काहीच बोलला नाहीस. मग मलाच वाईट वाटलं. 'माझं घर आहे नं? आपण तिथे नाव लिहू तुझं, तेच तुझं घर.'

तू खूश झालास. तुझ्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मी अजून खूश झाले.

त्या दिवशी रात्री मी माझ्या दप्तरातून माझी लाडकी पेन्सिल काढली. फळ्यावरचं गणित एकदाही न चुकता सोडवता येणार आहे, ह्याची खात्री असली की मी निवडते ती पेन्सिल. तिला छान टोक केलं. टोक करतानाही तिचा एकही छिलका तुटला नाही. मग मी दाराच्या बाजूला, खाली, तुझं नाव लिहिलं.

आणि हे गुपित पोटात घेऊन झोपी गेले. तेव्हाचं उगाच खुदुखुदू हसू येणं, मला अजून आठवतं.

दुसऱ्या दिवशी सगळे जण खेळायला जमले. माझ्याकडे एक गंमत आहे, मी तुला म्हणलं.

आपण माझ्या घराच्या दारापाशी आलो. इतर मुलंही पळत मागे आलीच!

हे बघ! मी आनंदाने तुला तुझंच नाव दाखवलं.

तू काहीच बोलला नाहीस. आपण काल काय बोललो ते पटकन् तुला आठवलंही नाही.

'ESS हे बघ इथे काय लिहिलंय!' कोणीतरी ओरडलं. सगळे हसायला लागले.

तू आता आवटे झालास! एकाने तुला धक्का दिला.

हॅ, असं काही नाहिये.

पुढे नक्की काय झालं, मला अजूनही आठवत नाही.

मला बसलेला धक्का मात्र जसाच्या तसा लक्षात आहे. आपली साधी, निरपेक्ष कृती लोक कसे बघतात हे कळण्याचा पहिला क्षण.

मला इतकं एकटं वाटलं की, पटकन् रडूही आलं नाही. मी घरात जाऊन धाडकन् दार आतून लावून घेतलं.

माझं काही तुझ्यावर प्रेम नव्हतं. प्रेम काय असतं कळतंही नव्हतं. पण ते दाखवायचं आणि सांगायचं नाही, हे मात्र खोलवर ठसवलं गेलं.

पुढे माझ्याबाबत जे जे झालं त्याला कारणं होती, हीच खूप आतवर झालेली जखम.

म्हणून हे पहिलं पत्र, तुझ्यासाठी.

मला तुझा राग नाही, सगळ्यांना नाही जमत लोकांविरोधात विचार करणं.. मला कुठे जमतं?

त्या दिवसानंतर मी खाली खेळायला जाणं बंद केलं.

दोन महिन्यांनी सी २०४ वर नवीन पाटी दिसली, तेव्हाही मी निर्विकारपणे तिथून पुढे निघून गेले.

माझं दार, माझ्या बाजूने मी इतकी वर्षं लावून घेतलं होतं.

आता ते किलंकिलं करायचं ठरवलं, इतकंच.

**प्रिय चिंचोबा,**

तुझी आणि माझी उंची सारखीच! त्यामुळे माझी लगेच तुझ्याशी मैत्री झाली.

मी रिक्षातून घरी आले की, माझ्या बाटलीतलं उरलं–सुरलं पाणी तुला देऊन मगच मी घरी जायचे.

का गं मधुरा? ह्याला एकट्यालाच का पाणी देतेस? माळीकाका विचारायचे.

आमची उंची सारखी आहे नं, मला जसं बुटकं असल्यासारखं वाटतं तसं ह्यालाही वाटत असेल. मी लवकर लवकर मोठं व्हावं, असं मला वाटत तसंच त्यालाही वाटत असेल.. ना?

माळीकाका हसायचे, मला एक टपली मारून पाठवून द्यायचे.

हळूहळू मी शाळेतून मग स्वीमिंगला जाऊ लागले, कराटेला जाऊ लागले. पाण्याच्या दोन बाटल्या सोबत नेऊन दोन्ही संपवून घरी येऊ लागले.

आपल्या भेटी कमी होत गेल्या.

मग तू पुढाकार घ्यायचं ठरवलं असावंस. तू इतका मोठा झालास की, तुझ्या फांद्या मला खिडकीतून दिसू लागल्या.

एखादा दिवस वाईट गेला, की तुझ्या हिरव्या पानांनी मन उभारी

घ्यायचं. वाऱ्यावर मंद हलणाऱ्या तुझ्या फांद्या मी तासन् तास बघत बसायचे.

ती संथ लय आणि शांतता विलक्षण होती.

पण एवढंच. त्यापलीकडे काही 'सुंदर, मानव–निसर्गाचं नातं' वगैरे आपल्यात होतं अशा बाता मी मारणार नाही.

एक दिवस मी घरी आले. रात्री कधीतरी उशिरा खिडकीतून बाहेर पाहिलं. अंधारात काही दिसेना, पण तुझी ती मंद हालचाल जाणवत नव्हती.

'अगं, वरच्या तारांमधे अडकत होती फांदी, शिवाय कानविंदेंची गाडी ठेवायलाही जागा हवी होती, म्हणून सोसायटीने कापून टाकलं झाड', आई म्हणाली.

आता आपल्याला रडू आलं पाहिजे, खूप दुःख झालं पाहिजे.. माझ्या मनात आलं. पण तसं काहीच झालं नाही. नातं माझ्याबाजूने संपलंच होतं बहुदा.

असं होतं ना कधीकधी. वाटतं की हे नातं असंच राहणार, ह्याला काही अर्थ मिळणार. काही नाही तर सुखी असो – दुःखी असो, एक शेवट मिळणार. नात्यांचा शेवट निर्विकार.. असू शकतो?

मी हादरले.

मी रडले नाही, चिडचिड केली नाही तेव्हा आई बाबाला म्हणाली, 'मोठी झाली मधुरा.'

पण मी तर निर्विकार झाले होते.

**प्रिय ऑथेल्लो,**

आपलं प्रेम माणसा–माणसांत असलं पाहिजे, हे मी आता शिकले होते.

झाडं, फुलं आपल्याला 'आवडतात' त्यांच्यावर 'प्रेम' नसतं.

मग माणसावर प्रेम करायचं तर कसा असावा तो माणूस?

मी माझं माझंच इकडे–तिकडे वाचलेलं, बघितलेलं आठवून ठरवून टाकलं होतं. आणि तू मला भेटलास तेव्हा तू ते सगळे टिकमार्क्स पूर्ण केलेस. सहज.

मग मला तुझ्यावर प्रेम करणं भागच पडलं.

तू एका फटक्यात तुझी ऑथेल्लोची वाक्यं पाठ करून टाकलीस, माझी, 'पोर्शिया'ची वाक्यंही तू लक्षात ठेवलीस.

तुझ्याकडे बघून असं वाटायचं, तुला सगळंच कळलंय. तुला आयुष्यात कसलीच भ्रांत नाहिये, कशाचाच 'शोध' घ्यायचा नाहीये.

ह्या स्थिरवृत्तीचं मला फार कौतुक वाटायचं.

माझं इंग्रजी कधीच फार चांगलं नव्हतं, पण तू फाडफाड इंग्रजी बोलायचास. वेगवेगळ्या बोलीभाषांसकट!

कोणी आपल्याला कळत नसलेल्या भाषेत बोलतंय; पण त्याचा अर्थ आपल्याला ऐकू येतोय असं झालंय कधी तुला?

'धर्मवीर भारतीं'च्या 'कनुप्रिया'मधे एकदा राधा म्हणते, 'तू सांगत राहतोस मला– राजनीती, युद्धनीती आणि तत्त्वज्ञान.. आणि मला ऐकू येतं राधा, राधा आणि राधा...'

शब्दांचा एक अर्थ थोडीच असतो!

एकदा संधी मिळाली, तेव्हा मी तुझ्या शेजारी उभं राहून पाहिलं. असंच, वाटलं म्हणून. तू माझ्याहून थोडासा बुटका होतास.

मला धक्काच बसला.

आता?

छे, आता काही होऊ नाही शकत माझ्या मनात विचार आला. आणि माझी मलाच लाज वाटली. रंग, रूप काही न पाहता प्रेम करायचं हे मला तोपर्यंत सगळ्यांनी सांगितलं होतं. पण असं सांगणाऱ्या गोष्टीतले सगळेच परफेक्टच असायचे!

मोठाच घोळ होऊन बसला होता. मग दोन तीन दिवस मी गप्प गप्प होते. स्वतःला ह्या अवघड प्रश्नातून सोडवायचा सोपा उपाय! त्यावर विचारच नाही करायचा! पण मग तेही जमेना. आणि पहिल्यांदा माझ्या लक्षात आलं, कोणाला काय वाटेल ह्यापेक्षा तुझ्यासोबत असणं माझ्यासाठी महत्त्वाचं आहे. आजवर माझी प्रेमाची



व्याख्या मी लोकांच्या चष्म्यातून पाहत आले होते. ती माझी व्याख्या असायची काहीच गरज नव्हती.

आत एक लख्ख प्रकाश पडला. माझ्यापुरताच.

आपलं आपणच एक पायरी वर चढल्यासारखं मला वाटलं.

आणि त्याच पायरीवरुन गडगडून मी पडलेही.

नाटकाचा प्रयोग सुंदर झाला. आपण सगळे 'ड्रिंक्स' घ्यायला गेलो. एकदा भान सुटलं की, लोक प्रेमाची कबुली देऊन टाकतात असं मी चित्रपटांत पाहत आले होते. त्यामुळे तसं काहीतरी तू मला सांगशील ह्यावर माझा ठाम विश्वास होता. 'असं कुठे असतं का?' हा आगाऊ प्रश्नही आता मनात येईनासा झाला होता.

लोक प्रेम करतात ते सिनेमात दाखवतात की, सिनेमात दाखवतात तसंच प्रेम करायला लोक शिकतात? मोठाच प्रश्न आहे.

त्या रात्री तुझं बेताल वागणं, तुझी मतं आणि तुझा अवतार पाहून मी काय, टिममधले सगळेच हादरून गेले.

मला कळलं की, माणसं टिकमार्क्स लावून नाही मोजता येत. त्या लिस्ट पलीकडेच बऱ्याचदा माणसं असतात.

तू माझ्यापेक्षा उंचीला कमी होतास म्हणून मी नंतर गोष्टी पुढे नेल्या नाहीत, असा लोकांनी ग्रह करून घेतला आणि तुलाही तेच पटलं. बुटकेपणा नाही, तुझं खुजेपण मला खटकलं हे तुझ्या ध्यानीमनीही आलं नाही.

माझ्या लक्षात येऊ लागलं की, तू तुझा तुझा एक ऑथेल्लो होतास. आपल्याच समजुतींनी वेढलेला. त्यावरच ठाम राहणारा. अशी माणसं सुरुवातीला हवीशी होतात; पण नंतर जाणवतं की ह्यांना 'कुठे जाण्याची' गरजच वाटत नाही. आणि ज्यांच्यासोबत स्री होता येत नाही, त्यांच्यासोबत राहताही येत नाही.

ह्या दोन ओळी समजायला मला दोन महिने लागले.

नाटकाचा परत प्रयोग झाला नाही आणि आपणही कधी परत भेटलो नाही.

**प्रिय 'My Love',**

मी समाजकार्य करायला सुरुवात केली आणि भारतभर फिरून शेवटी पुण्यात आले.

HIV बद्दल जागृती करणारा कॅम्प आम्ही बुधवार पेठेत टाकला होता.

'लोकांसाठी काम करणं' हेच माझं प्रेम असं मी सांगत फिरत होते. ते सोयीचं होतं आणि त्या काळापुरतं, खरंही.

कामानिमित्त खूप बायकांशी बोलणं व्हायचं. त्यांचं वागणं, बोलणं आणि एकंदर आयुष्याकडे पाहायचा दृष्टिकोन मला समजून घ्यायला मिळत होता.

ह्या अशा व्यवसायात असणाऱ्या बायकांची काय ध्येयं असतील, त्यांना थोडंसं तरी व्यक्तिगत आयुष्य मिळू शकत असेल का?

कितीतरी प्रश्न मला सतावत असायचे.

एक दिवस मी अशीच काही बायकांशी बोलत बसले होते. धंद्याची वेळ होती. कोणी माणूस आला तर त्या उठून आत जायच्या, काही वेळाने परत बाहेर यायच्या आणि जणू काही घडलंच नाही अशा आविर्भावात परत गप्पा मारू लागायच्या. त्या बायकांमधली एक मुलगी, २८–३० वर्षांची असेल. नेपाळहून इथे येऊन अडकली होती. कुणाशी काही बोलत नव्हती. तिच्या सगळ्याच कृती निर्विकार होत्या. यांत्रिक. आत जायची, बाहेर यायची, कानात हेडफोन्स टाकून गाणी ऐकत बसायची. तिने माझं लक्षं वेधून घेतलं. काय असेल हिची गोष्ट? कुणाशी बोलू शकत असेल का ही?

ती बाहेर येऊन बसली. मी तिच्या नजरेला नजर द्यायचा प्रयत्न करू लागले. पण ती आपल्यातच मग्न.

अचानक तिला कुणाचातरी फोन आला. तिचा चेहरा खुलला, तिला हसताना खळी पडते, मला पहिल्यांदाच दिसलं.

हळूच थोडं पुढे होत, कुतूहलाने, मी फोनवर आलेलं नाव वाचलं– My love.

आणि मला काय बोलावं तेच कळेना. अजूनही कळलं नाहीये.

तू कोण आहेस, कुठे आहेस, अजून 'आहेस' का, मला माहीत नाही. पण My love, त्या दिवशी, त्या एका सेकंदात तू माझ्या आत काहीतरी बदललंस. नेमकेपणाने सांगताही येणार नाही.

त्या क्षणापर्यंत मी तिच्याकडे एका वरच्या नजरेने, कणवेने पाहत होते. माझी परिस्थिती तिच्यापेक्षा कितीतरी चांगली होती, पण त्या एका क्षणी, मला तिचा हेवा वाटला. हो, हेवाच! माझं मलाच आश्चर्य वाटलं.

त्या एका क्षणात तिच्यापाशी जो आनंद होता तो खरा होता.

त्या आनंदाची ओढ ही ठरवून कर्तव्यकठोर केलेल्या माझ्या मनाला लागली.

**प्रिय स्थळ नं ४,**

तुझी प्रोफाईल मला दिसली तेव्हा मला काहीच विशेष वाटलं नाही. तसे माझे फोटो बरे येतात, पगार उत्तम आहे. अचानक ओढ वाटावी असं माझ्यात काही नाही, पण जर हिशोब मांडायचा ठरवला तर माझ्याइतकं चांगलं स्थळंही नाही, हे मला पक्कं माहीत होतं.

ह्या प्रेमकहाण्या पाहताना मला कायम एक प्रश्न पडत आलाय, तुम्हाला कसं कळलं की, 'हीच ती व्यक्ती' असा कोणता क्षण कसा असू शकतो?

तुम्हाला एखाद्या व्यक्तीबद्दल उत्सुकता वाटू शकते, क्षणिक आकर्षण वाटू शकतं. पण तुमचे 'आंखो आंखो में इशारे' होऊन गाणं कसं सुरू होऊ शकतं? की मला माहिती आहे हा हिरो आहे आणि ही हिरॉईन आहे म्हणून

ह्यांचं जुळलं, हे मी स्वीकारायचं? काहीतरी कनेक्शन असेल?

हे असलं काही मला कधीच कोणाबद्दल जाणवलं नाही, आणि उगाच 'प्रेम' काय असावं ह्याच्या फिल्मी किंवा स्वतःच्या कल्पनांमधे अडकायचं नाही, हे मी शिकले होतेच.

जवळच्या कुणाचंही लग्न ठरलं की, मी विचारायचे– 'तुमचं जुळलं कसं?' मला हे घडलं कसं ह्यातच रस असायचा.

आयुष्याला एक सोबती असावा अशी एक आस होतीच. त्यामुळे मग मी 'साथीदार' शोधण्याच्या बाजारात शिरले होते.

माझं आधीच ३ मुलांना भेटून झालं होतं आणि त्यांनी माझी सपशेल निराशा केली होती.

तुला भेटायला येताना काहीच अपेक्षा मनात नव्हत्या.

पण 'कॉफी TTMM ना?' असं तू म्हटलास आणि मी तुझ्यावर बेहद्द खूष झाले.

'हे बघ, मला असं अनोळखी माणसाशी लग्न करायचं नाही. आपण arrange marriage systemने भेटलो, पण त्यातच लग्न केलं पाहिजे असं नाही. आपलं love marriage पण असू शकतं.'

माझी ही भलतीच कल्पना तू उडवून लावली नाहीस, तेव्हा माझा तुझ्यावरचा विश्वास अजून वाढला.

So, we started dating.

तुला सतत इडली खायला आवडायची, तर मी पिझ्झाच्या मागे असायचे. तू तासंतास क्रिकेट पाहत बसायचास, तर मला परत परत breaking news पाहायला आवडायचं. तुला इंग्रजी गाण्यांचं वेड होतं, तर मी हिंदुस्थानी रागदारीत रमायचे. पण आपल्याला एकमेकांविषयी आदर होता. आणि ते सगळ्यात जास्त महत्त्वाचं होतं.

आपण नाटक-सिनेमे पहायचो, फिरायला जायचो आणि तुला ह्या सगळ्यापेक्षा 'सेटल' होण्यात रस आहे, हे मला जाणवत रहायचं. It was your way of giving space.

साधारण महिना झाला. माझी खात्री होती की ह्या आगळ्यावेगळ्या प्रयोगाच्या शेवटी आपण प्रेमात पडणार.

मी मुळातच इतकी चांगली आहे की, मी कुणालाही 'आवडून' घेऊ शकते ह्यावर माझा ठाम विश्वास होता. त्यात तू तर मुळातच कुणालाही आवडावास असा होतास.

**'मिळून साऱ्याजणी'ला**
**दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !**

**श्री. नंदकुमार नवले, श्री. मंदार ठाकुरदेसाई**
**आणि कर्मचारी वर्ग**

UNIQUE OFFSET
End To End Printing Solutions

१५२३, सदाशिव पेठ, आनंदशिल्प, पुणे ४११०३०

मला ना, friennds पाहताना कायम असं वाटायचं की, मुळात rachel ला कळलंच कसं की तिला त्या माणसाशी लग्न करायचं नाहीये?

असं काय असतं प्रेम म्हणजे जे जाणवलंच पाहिजे असं तिला वाटलं? एकमेकांसाठी जीव देणं वगैरे फालतूपणा झाला. मग काय हवं वाटलं तिला, आणि त्याहूनही महत्त्वाचं, काय missing वाटलं?

मला ह्या सगळ्या 'वाटलं' वगैरे गोष्टी लेखकांच्या कन्व्हिनियन्सच्या वाटू लागल्या होत्या. असं काही आपल्याला आतून ऐकू येतं वगैरेवर माझा विश्वासच नव्हता.

काही महिने झाले आणि तू मला रीतसर मागणी घातलीस.

आणि त्याक्षणी, खरं सांगते, मला वाटलं–जाणवलं की, मला 'नाही' म्हणायचं आहे.

कागदावर मांडता येईल असं कोणतंही कारण नसूनही. मला नाही वाटलं. That's it.

मी वेळ मागून घेतला. मी प्रयत्न करत होते. तू मला आवडायचास; पण तसं मला कधी वाटलंच नाही. Something was missing.

ह्या फिल्मी प्रवृत्तीला बळी पडायचं नाही, हा ठाम निश्चय होता माझा.. तरी..

म्हणजे त्या प्रेमकहाण्यांमधे दाखवतात ते सगळंच खोटं नसतं तर.

हे समजून घ्यायला तुझा वेळ जायची गरज नव्हती.

But we messed up.

पुढच्या आठवड्यात तू वेगळ्या मुलीला बघून, लग्न ठरवून टाकलंस.

तुला वाटलं असेल, मी दुःखी झाले; पण खरंतर मला हायसं वाटलं.

दुःख वाटलंच असेल, तर त्या मुलीबद्दल वाटलं.

तुझ्यानंतर स्थळं पाहण्याचा कार्यक्रम मात्र मी बंद करून टाकला.

**प्रिय Swift,**

तुझं नाव टेलर स्विफ्टशी जुळतं म्हणून मला आवडायला लागलं. तू कायम मला साथ दिलीस, गर्दीत, अडचणीच्या वळणांत. तुझ्यासोबत रहदारीतही हरवल्यासारखं वाटायचं नाही आणि अंधारात घरी येतानाही एकटं वाटायचं नाही.

तुला एक आपलेपणाचा वास होता. You were my comfort.

सुनीताबाईंची त्यांच्या गाडीशी असलेली दोस्ती, जवळीक वाचली होती. साहजिकच गाडी घेताना तसाच विचार डोक्यात होता. तुझ्याच रंगाच्या, अंगाच्या दहा गाड्या समोर होत्या. पण का कोण जाणे, मी तुझ्याकडे बोट केलं. आपल्यात काही नातं असेल, असं जाणवलंच मला.

माझा आत्मसन्मान, स्वावलंबन, स्वातंत्र्य... सगळं तू होतीस.

आपण इतकी वर्षं रिक्षा, बसवर अवलंबून राहिलो ह्यावर माझा विश्वासच बसेना, एवढा तू मला लळा लावलास. बेभान स्वातंत्र्याचा प्रत्यय दिलास.

एकदा आपण रात्री २ वाजता घरी येत होतो. रस्त्यावर कोणीच दिसत नव्हतं. आणि अचानक तू बंद पडलीस. माझ्या काळजाचा ठोकाच चुकला.

एक–दोनवेळा मी प्रयत्न केला, पण नुसतीच घरघर ऐकू येऊ लागली. मी एक मोठा श्वास घेतला.

'आता तुला सुरू व्हावंच लागेल, तुला त्याशिवाय पर्यायच नाही', मी पहिल्यांदाच मोठ्याने तुझ्याशी बोलले. त्या स्थितीतही 'चल, धन्नो' स्टाईल विचार करणाऱ्या तद्दन बॉलिवूड मनाचं मला हसू आलं.

मी परत किल्ली फिरवली, आणि काय आश्चर्य! तू सुरू झालीस. आपण सुखरूप घरी आलो!

कितीतरी मोठ्या सहली, धोक्याचे प्रवास आपण मिळून केले.

आई–बाबांना घेऊन आपण गोव्याला गेलो, तो माझा खास आवडता प्रवास!

आता हात–पाय थरथरायला लागले. आता गाडी चालवणंच शक्य नाही, असं डॉक्टरांनी बजावलं, तेव्हा मी तुझ्या व्हिलवरचा हात नाइलाजानं सोडला. पण अजूनही कधी तुझी आठवण आली की, मी बाहेर नजर टाकते.

मी लावलेल्या चिंचेच्या सावलीत तुला पाहून उगाच जुन्या आठवणींचा प्रवास करून आल्यासारखं वाटतं.

ह्या प्रवासाचा शीण येत नाही.

उलट, ताजंतवानं वाटतं.

**प्रिय वाचक,**

गेले सहा दिवस माझ्या फेसबुकवर ही भलतीच पत्रं तुम्ही वाचत आहात. 'हिला म्हातारचळ लागला की काय', हे तुमच्या मनात येऊन गेलं असेलच. तेव्हा हे शेवटचं पत्र तुमच्यासाठी.

हा फेब्रुवारी महिना आला की सगळीकडे वेगवेगळ्या 'डे'जचं पीक उगवतं. मग हा आठवडा आपणही आपल्या पद्धतीने सेलिब्रेट करून पाहावा असा विचार मनात आला.

मला वाटतं, माणसाला जगायला सोबत लागते. ही सोबत तो आपापल्यापरीने शोधतो. इतकी साधी गोष्ट आहे.

तिला संस्कृती–परंपरांची चौकट लागली की, आपला प्रेमाच्या, सोबतीच्या शोधातला प्रवासही उगाचच एकरेषीय होऊन जातो.

हे प्रेम कसं मोजायचं? कसं ठरवायचं? मला कायम सतावणारे प्रश्न.

ह्यांचं उत्तर मला अगदी काल–परवाच मिळालं.

चालायला त्रास होतो, तर काठी वापर, असं माझा डॉक्टर मित्र अश्विननं सांगितलं आणि मी अगदी दुखावले. 'आता माझी मी पुरी पडणार नाही' विचारात मन उदास झालं.

मग जाणवलं, तशी तर आत्तापर्यंत प्रत्येकवेळी कोणी ना कोणी मला

'काठी' होत सोबत केली.

प्रत्येक गोष्ट आपल्या आयुष्यात येण्याला काही एक अर्थ असतो, तो पूर्ण झाला की, ती गोष्ट नाहिशीही होते.

'मी एकटीच आनंदी आहे' हे मी छातीठोकपणे करत असलेलं विधान मग कमी पडतं. मी एकटी कधी नव्हतेच.

मला वाटतं एकाच आयुष्यात आपण छोटी छोटी कितीतरी आयुष्य जगत असतो. माझ्या त्या त्या छोट्या आयुष्यातले हे छोटे सोलमेट्स होतेच की मला.

त्यावेळी त्यांनी जे शिकवलं, माझी प्रेमाबद्दलची व्याख्या घडवली–बदलवली आणि अंतिमतः मला पुढे जायलाच मदत केली. त्या सगळ्यांची एक लहानशी आठवण, म्हणून ही पत्रं.

I don't believe in soulmates, but माझा विश्वास आहे की, दर टप्प्यात त्या त्या गरजेनुसार एक सोबत तुम्हाला मिळते. एक विचार तुम्हाला मिळतो.

आजवरच्या माझ्या ह्या सोबत्यांची ही गोष्ट, अपूर्ण, तुटक.. तरी मला सांगाविशी वाटणारी.

ह्यातल्या प्रत्येकाने माझ्याच प्रेमाबद्दलच्या जाणिवा रुंदावल्या, मला पुढे नेलं. आपल्या जडणघडणीचं मूळ शोधायचं झालं तर असेच काही प्रसंग असतात, आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातले. कोणत्याही रूढ चौकटीत न बसणारे, भलतेच. पण त्या प्रवासाला अर्थ असतो, तो त्यांच्यामुळे. त्या प्रेमाला पर्याय नसतोच.

जेव्हा जेव्हा माझा प्रेमाच्या शोधातला हात एकटा पडला, तेव्हा अलगद कोणीतरी त्याला ओढत पुढे आणलं. वेगवेगळ्या व्यक्तींच्या

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

सोबतीनेच मी आज इथे आले, हे ती काठी हातात आली तेव्हा लख्ख जाणवलं.

आता माझी ही नवी सोबतीण घेऊन माझा पुढचा टप्पा सुरू करते आहे.

मागचं ओझं मी खाली ठेवलं आहे, तुम्हीही तुमचे सोलमेट्स आठवा आणि मनातले कप्पे मोकळे करा.. काय सांगावं, पुढे अजून प्रेमळ सोबत तुमची वाट पाहत असेल!

तुमची,
मधुरा!

***मुक्ता बाम, पुणे.***
*मोबाइल : ७७२००९४८०७*

**पालकनीती** **पालकत्वाला वाहिलेले मासिक**

**पालकनीती ऑक्टोबर – नोव्हेंबर २०२१ जोडअंक** **किंमत ₹ १५०**

कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा लोकांच्या मनःस्वास्थ्यावर गंभीर परिणाम दिसू लागला आहे. त्याचे परिणाम व्यक्तीवर, तिच्या सहवासातल्या इतरांवर आणि पर्यायानं समाजावरही होताना दिसताहेत. ह्या विषयाच्या निरनिराळ्या पैलूंवर बोलण्याची कधी नव्हे एवढी निकड निर्माण झाली आहे. ह्या निमित्तानं मनोआरोग्य म्हणजे काय, त्याचे नात्यांवर होणारे परिणाम, विशेष गरजा असणाऱ्या मुलांचं पालकत्व, ते निभावताना पालकांना करावी लागणारी कसरत, आभासी समाजमाध्यमं आणि तरुणाई, असे विविध विषय उलगडण्याचा पालकनीतीनं प्रयत्न केला आहे.

**विविध विषयांची मांडणी केलीय...**

* डॉ. आशीष देशपांडे * लीना सोहोनी * अपर्णा देशपांडे * डॉ. सुजला वाटवे * डॉ. धरव शहा
* डॉ. कीर्ती मुळीक * मीना सेशू * डॉ. राजश्री देशपांडे * डॉ. चित्रा खरे * डॉ. सुनीता कुलकर्णी
आणि इतर अनेक मान्यवर लेखक

**संपर्कासाठी पत्ता**
पालकनीती परिवार, अमृता क्लिनिक, संभाजीपूल कोपरा,
कर्वे रस्ता, पुणे ४११००४ फोन: ०२०-८०८७०१५७२६
palakneeti@gmail.com www.palakneeti.in

# पॉलिअ‍ॅमरीच्या नावानं चांगभलं!

मयुरी धुमाळ | अभिषेक माळी | हृषीकेश पाळंदे | अस्मिता नेवसे

**टोळ्यांपासून कुटुंबापर्यंतच्या प्रवासात येतांना माणसाने एकपतित्व, एकपत्नीत्व गाठोड्याला बांधलं. विवाहसंस्थेने माणसाला सामाजिक स्थैर्याच्या दिशेने नेलं असलं तरी संख्येनं अनेक पण एकसारख्या चौकोनी कप्प्यांमध्ये बसवलं. तेच तेच तेव्हा तेव्हा आणि तसंच करायचं ह्याचे काही निकष घालून दिले. पण नात्यांच्या त्याच त्याच चाकोरीबद्ध रेषा नाकारून जरा नव्यानं ह्या सगळ्याकडे बघता येईल का ह्याचे प्रयत्न आताची पिढी करतेय. एकाच व्यक्तीची सोबत आयुष्यभर रेटत बसण्यापेक्षा नात्यांच्या अनेक शक्यता चाचपडतेय. पॉलीऍमरीचा हाच धागा घेऊन आम्ही काही तरुण मुलांना त्यांची ह्याबद्दलची मतं लिहायला सांगितली. आणि त्याच मतांचा हा कोलाज आपल्यापुढे मांडतोय. बघूया ह्यातून नात्यांच्या या नवीन मांडणीविषयी काही उलगडतंय का!**

नुकतंच कामानिमित्त एका आदिवासी पाड्यावर जाणं झालं. तिथं एक आजोबा भेटले जे आग्रहानं मला त्यांच्या घरी घेऊन गेले. तिथं त्यांच्या सुनांची त्यांनी ओळख करून दिली. मला वाटलं, दोन मुलं आणि दोन सुना असाव्यात; पण त्यांनी खुलासा केला, तर त्या एकाच मुलाच्या दोन बायका होत्या. मला नवल वाटलं कारण असं प्रत्यक्षात मी पहिल्यांदाच पाहत होते. ऐकलं कित्येकदा होतं. तसं बहुपत्नीत्व आपल्याकडे नवं नाही. राजांना ७–८ राण्या असल्याची कितीक उदाहरणं इतिहासात आहेत. म्हणजे पॉलिगॅमीचं इथं काहीच वावडं नव्हतं.. किंवा खरंतर अजूनही नाही. पण दोन किंवा त्याहून अधिक नवरे असणाऱ्या किती बायकांची उदाहरणं आपण पाहिली आहेत?

एका पुरुषाला अनेक बायका असणं, पुरुषांचे विवाहबाह्य संबंध असणं हे म्हणावं तेवढं वावगं वाटत नाही आपल्याला आणि त्याचं आश्चर्यही बऱ्याचदा नाहीच वाटत इतकं ते सहज आणि 'हे तर चालतंच' या प्रकारात मोडणारं आहे. मात्र, तेच स्त्रियांच्या बाबतीत आश्चर्यकारक, संस्कृतीला धक्का देणारं आणि बाईच्या चारित्र्यावर ना ना तऱ्हेचे ताशेरे ओढणारं किंवा चवीने चर्चा होणारं गॉसिप ठरतं असं का?

पॉलिगॅमी हा प्रकार द्रौपदीनंतर फारसा कुठल्या साहित्यातही आढळत नाही आणि आढळलाच तरी त्याला बरीच आवरणं लपेटली जातात. मुळात पार्टनर कसा असावा यासोबतच किती असावेत हा देखील वैयक्तिक आणि आवडीनिवडीचा भाग असायला हवा मात्र तो तसा नसतो. तर तो दरवेळी मुलीच्या इमेजचा, चारित्र्याचा प्रश्न होऊन बसतो.. कित्येकदा एखादी मुलगी किती मित्र बदलते यावर लोकांचं लक्ष असतं, आणि त्यावरून त्यांना जज केलं जातं. याउलट पुरुषांच्या अनेक मैत्रिणी असणं, गौरवाचं, मर्दानगी दाखवणारं म्हणून पाहिलं जातं. आणि मोनोगॅमस रिलेशनशिप्स स्त्रियांवर लादली जातात. मुळातच अनेक बंधनात अडकवून ठेवत, एखाद्या पुरुषासोबत गाठ बांधली की ती कायमचीच, सात जन्माचा एकच जोडीदार, एखाद्याला समर्पित होणं अशा पितृसत्तेला पोषक गोष्टी, सण, समारंभ, चित्रपट, मालिकांमधून बिंबवल्या जातातच आणि घरोघरी त्याचे संस्कार विनासायास केले जातात. स्त्रियांच्या निष्ठा अशा पक्क्या करून टाकल्या जातात आणि हे आपल्याला जाणवतही नाही.

मोनोगॅमी चांगली की पॉलिगॅमी हा वादाचा मुद्दाच नाही. मुद्दा कुणाला काय अलाऊड असतं याचा आहे. कुणावर काय लादलं जातं याचा आहे.

अलीकडे आमच्या पिढीला लग्न टिकवता येत नाहीत, जुळवून घेता येत नाही अशी ओरड हमखास होताना दिसते. नसलंच प्रेम तरी लग्न झालं की, सगळं जमतं किंवा जमवून घ्यावं लागतं, असा संस्कारही दिला जात असतो.

सिमोन आणि सार्त्रच्या नात्याविषयी वाचलं तेव्हा फार अनाकलनीय होतं ते. अनेक पार्टनर्स असणं, आणि ते एकमेकांना मान्य असणं आपल्या सबकॉन्शन्सला झेपणारंच नाही. आणि हे तर लग्नाच्या बांधिलकीला झुगारणारे नातेसंबंध आहेत ज्यात कुणा एकाच व्यक्तीला आयुष्यभर बांधून घेण्याची

सक्ती नाही आणि त्याच वेळी दुसरं कुणी आवडलं तर तेही एक्सप्लोर करण्याची मुभा आहे, दोघांनाही..! जिथे मानवी भावना, आकर्षण आणि मानसिक गुंतवणूक हे फक्त गरज आणि व्यवहार म्हणून पाहिले जातात.

आयडियल विचार म्हणून नातेसंबंध इतके लवचिक असावेत आणि सहजमान्य असावेत अशी कल्पना करणं आणि ती प्रत्यक्षात यावी अशी इच्छा करणं जेवढं सोपं आहे, तेवढंच प्रत्यक्षात उतरवणं आणि मान्य होणं कठीण.

कारण, आपण एकपतिव्रता संस्कृतीची नेणीव बाळगून सतत या गोष्टींना चुकीचं ठरवत आलो आहोत. नैतिकता आणि व्यभिचाराच्या व्याख्या ठरवून आपण मानवी सहजभावनांना दडपण्याचं आणि चूक ठरवण्याचं काम जाणीवपूर्वक करत आलो आहोत. व्यक्तिस्वातंत्र्य, निवडीचं स्वातंत्र्य या गोष्टी लक्षात घेतल्या तर बदलणारी रुची, नातेसंबंध, बदलांची गरज कदाचित लक्षात येऊ शकेल.

याच संदर्भातलं मानसिक द्वंद्व घेऊन नाशिकमधील महिला समुपदेशक आणि जेंडर समस्या, घरगुती हिंसाचार या विषयावर काम करणाऱ्या अनिता पगारेशी एकदा या विषयावर चर्चा झाली होती. (अनिता आता आपल्यात नाही याची खंत हे लिहिताना परत उचंबळून आली आहे.) तेव्हा तिनं फार विमुक्तपणे सांगितलं होतं की, तिला यावर एक खास मांडणी करावीशी वाटते. तिच्या मते समाजाने एकनिष्ठता निभावण्याची सगळी जबाबदारी बायकांवर दिली आहे, आणि पुरुषांना मात्र ती शिकवण्याची गरज आहे. या उलट बायकांना जरा मोकळं करायला हवं. शारीरिक सुखाचा जितका नवनवा अनुभव पुरुष घेऊ शकतात तितका बायकांना चॉईसच नसतो. एकदा एक नवरा किंवा प्रियकर ठरला की कायम च्या त्या त्याला समर्पित होतात. स्वतःहून होतात कारण त्यांना कधी इतर मुभा आपण दिलेलीच नाही. अर्थात, हे असंच राहिलेलं नाही; पण तरीही एखाद्या पुरुषात गुंतलं की तिला त्याच्या मानसिक, भावनिक गुंत्यातून सुटणं अवघड असतं. त्याचवेळी पुरुषांना मात्र असा प्रश्न येत नाही. एखाद्या नात्यातून बाहेर पडण्याची त्यांची प्रक्रिया तुलनेने सोपी आणि फास्ट असते. तुकडा पाडणं त्यांना जमतं.

म्हणूनच सिमोनसारखं तुकडा पाडून वेगळं होता येणं बायकांना जमायला हवं. म्हणजे बायकांच्या निष्ठा जरा कमी व्हायला हव्यात. अनिताची अजून एक मांडणी होती, अधिकृत सेक्स पार्लर्स असावीत अशी..! कारण तिचं म्हणणं होतं की, माणसाला जशी पोटाची भूक असते तशीच शारीरिक भूक असते. तेव्हा जसं भूक लागल्यावर हॉटेलात जाऊन जेवता येतं तसंच याबाबतीत करता यायला हवं. भूक लागली तरी माणूस आवडनिवड, जागा यांचा विचार करूनच हॉटेल निवडत असतो त्यामुळे जर खरंच आपण संधी दिली तर या सगळ्यातही माणूस आवडनिवड आणि इतर बाबींचा नक्कीच विचार करून निर्णय घेईल. पण आपण या गोष्टींना दाबून ठेवतो, चारचौघात हा विषय बोलतच नाही. त्यामुळेच मग गैरप्रकार जास्त घडतात.

यावरून मोनोगॅमी हे पितृसत्तेला बळकट करणारं एक साधन मला वाटू लागलं. कारण, खरंच यात बहुसंख्य वेळा आवड-निवड, संधी यापेक्षा एका गटाने, बहुतांश वेळा पुरुषांनी स्त्रियांवर संभोग लादलेला असतो आणि त्यातून जर तिला बाहेर पडायचं असेल तर मार्ग सोपा नसतो.

म्हणूनच कुठेतरी पॉलिॲमरी, लग्नसंस्था नाकारणं ही बंधनं तोडणारी

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

स्थिती असू शकेल असं वाटतं. पण आपली नेणीव इतकी गुंतलेली आहे याच विचारात की जरा वेगळं पाऊल टाकायचं झालं तरी थोडंसं कचरायलाच होतं.

इतक्या चर्चा करून, इतकं वाचूनही प्रत्यक्ष जेव्हा ऑनलाईन डेटिंग ॲपवर अनेक मुलांशी एकाचवेळी बोलणं होत असतं तेव्हाही मन स्वतःला खात असतं. कुठंतरी हे चुकतंय का असं वाटत राहतं. पण हेही माहीत असतं की हे कंडिशनिंग आहे. पण आपल्या भावना दुखावल्या जाण्याची, त्या अपेक्षेपेक्षा जास्त गुंतण्याची, किंवा आपल्या ओपन असण्याचा गैरफायदा घेतला जाण्याची भीती छळत राहते. आपल्याला वाटतात तशा आणि तितक्याच या गोष्टी आणि यांची समज समोरच्या व्यक्तीला असणंही महत्त्वाचा निकष ठरतो. मोनोगॅमी बोरिंग वाटत असली तरी बुद्धीचं, मनाचं झालेलं कंडिशनिंग झुगारताना आंतरिक भांडण सुरू असतं आणि ते सोडवणं बरोबर-चूक ठरवण्यापेक्षा जास्त अवघड होऊन बसतं. हे कंडिशनिंग झुगारणं जमलं तर व्यावहारिकतेने नात्यांकडे बघणं सोपं होऊ शकेल.

सोशल मीडिया, ओटीटी, यावरचा नवनवीन कंटेट नातेसंबंधांवर नवनवीन प्रकाश टाकत आहेच मोनोगॅमी किंवा लग्नसंस्था नाकारत ओपन रिलेशनशीप, पॉलिॲमरी स्वीकारायचा प्रयत्न करू पाहणारे अनेक आहेत; पण त्यांच्यासमोर कदाचित भविष्यात भावनिक एकटेपणाचं आव्हान ठाकलेलं असू शकतं. इथे पुन्हा अनिताच मला म्हणाली होती ते आठवतंय... की, अनेक पार्टनर्स अनुभवून झाल्यावर

कदाचित एकाची निवड करणं आणि स्थिर होणं असाही प्रयत्न करता येऊ शकतो.. यातून कदाचित सेक्शुअल प्लेजर आणि भावनिक गरजांचं स्थैर्य साधता येईल, असं तिचं म्हणणं होतं.

हे सगळं कळत असलं तरी पुन्हा तोच मुद्दा मला महत्त्वाचा वाटतो की हे अमलात आणणं स्त्री म्हणून माझ्यासाठी जितकं जाचक आणि अवघड ठरू शकेल तितकं ते माझ्या पार्टनरसाठी अवघड नसणार आहे. कारण कुणाला काय अलाऊड आहे, कुणी काय केलेलं चालतं यातलाच गॅप अजून मोजता आलेला नाहीय. तेव्हा आधी मला माझं कंडिशनिंग मोडताना सामाजिक कंडिशनिंगशी पण झगडायची तयारी करावी लागणार आहे हे खरं..

***मयुरी धुमाळ, नाशिक***

*मोबाइल : ९८९२५०३८६०*

❀❀❀


## जोडीदार एक की अनेक? : नैतिकतेची ऐशतैशी

ज्या समाजामध्ये लैंगिकतेपासून अगदी वैवाहिक जीवनातल्या भावनिक गुंतागुंतीपर्यंत अनेक साध्या पण तितक्याच महत्त्वाच्या विषयांवर बोलायला अघोषित बंदी आहे, त्या समाजात जोडीदार एक की अनेक? हा प्रश्न विचारण्याचं धाडस करणं म्हणजे जणू बंडखोरीच! मात्र बदलत्या समाजजीवनामध्ये ही बंडखोरी आता सार्वत्रिक दिसू लागलीये. बदलती उत्पादन व्यवस्था, त्यानुसार बदललेली शिक्षण व्यवस्था, बदलणारं नोकरी–व्यवसायाचं स्वरूप आणि या बदलत्या व्यवस्थेत बदलणारी नातेसंबंधांची जडणघडण– जुन्या सामाजिक मूल्यव्यवस्थेला आणि त्यावर आधारलेल्या नैतिकतेला मुळापासून गदागदा हलवून सोडत आहे. या संघर्षातून जे नवे प्रश्न समाजमनाला पडतायेत त्यांची उत्तरं हुडकण्याचा प्रयत्न जर केला नाही तर, त्यातून वाट्याला येणारी अस्वस्थता समाजाला एकत्र बांधून ठेवणारी वीण उसवत राहील. असा उसवलेला समाज त्याचं हित साधू शकत नाही. म्हणूनच नैतिकतेची ऐशीतैशी म्हणत जुन्या–नव्या नैतिकतेच्या संकल्पना जोडीदार एक की अनेक ह्या प्रश्नाच्या संदर्भात तपासून घ्यायला हव्यात. एकाचवेळी आजच्या तरुणाईचा एक प्रतिनिधी आणि अकादमीक संशोधन करणारा विद्यार्थी या दोन्ही भूमिकांमधून या विषयावर मी बोलणार आहे. प्रस्थापित समाजशास्त्र–मानसशास्त्र– जैवशास्त्र–कायदा इत्यादि विद्याशाखांच्या काही मुख्य विचारप्रवाहांच्या चष्म्यातून आणि जाणीवपूर्वक बोजड शब्दप्रयोग टाळून या प्रश्नाकडं पाहण्याचा हा एक छोटासा प्रयत्न. यातल्या काही गोष्टी माझ्या वैयक्तिक निरीक्षण आणि अनुभवांतून आलेल्या आहेत, त्यामुळं त्यांचं माझं आकलन मर्यादित असू शकतं. ही शक्यता गृहीत धरूनच या विषयाला सुरुवात करायला हवी. या लेखाची मर्यादा सुरुवातीलाच स्पष्ट करणं मला गरजेचं वाटतं. समलिंगी किंवा इतर लैंगिकता असणाऱ्या जोडप्यांबद्दल सविस्तर बोलणं अवघड आणि किचकट काम आहे, याची जाणीव मला आहे. त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर असल्याने त्यांच्यावर असं घाईगडबडीत बोलणं त्यांना पुरेसा न्याय देणारं ठरणार नाही. त्यामुळं विस्तारभयाने चर्चेसाठी केवळ भिन्नलिंगी जोडप्यांचे संदर्भ वापरतो आहे. तसंच लिंगसूचक शब्दांना पर्यायी शब्द अजूनही रुळले नसल्यानं नाइलाजास्तव लेखाच्या मर्यादेमुळे ते तसेच वापरतो आहे.

भारतीयच नव्हे तर जगभरातल्या कथा पुराणांमध्ये एकेकाळी मुक्तपणे नातेसंबंधांचा स्वीकार करणाऱ्या समाजाचं दिसणारं प्रतिबिंब, वारसाहक्क आणि अपत्यांवरची मालकी प्रस्थापित करणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेतून समाजमान्य झालेलं एकपतित्व, नंतर कायद्यानं लादलेलं एकपत्नीत्व, समान नागरी कायद्याची मागणी, आजही अनेक समूहांमध्ये मान्य असलेलं बहुपत्नीत्व–बहुपतित्व, विवाहपूर्व–बाह्य संबंधांची स्वीकृती, विवाहबाह्य संबंधामध्ये पत्नीला पतीच्या मालमत्तेचा दर्जा देऊन दुसऱ्या पुरुषाला गुन्हेगार ठरवणारं भारतीय दंड विधानातलं सर्वोच्च न्यायालयाने नुकतंच रद्दबातल केलेलं कलम ४९७ अशी एक ना अनेक स्थित्यंतरे आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या चर्चा विषयाला अनुसरून असल्या तरी या लेखाचा हा काही मुख्य अजेंडा नाही. आपल्या आजूबाजूला काय घडतंय आणि प्रत्येकजण त्याच्याकडं एक व्यक्ती म्हणून कसं पाहतो, हे जास्त महत्त्वाचं आहे.

काहींसाठी हे वाचणं भयंकर असेल तर काहींना ही सर्वसामान्य बाब वाटेल. आजच्या तरुणाईला मार्केटनं उपभोगाची इतकी सवय लावली आहे की, बऱ्याच नात्यांमध्ये सहा–आठ महिन्यांची रिलेशनशिप हा जणू पॅटर्नच बनतो आहे. ऑनलाईन होणारं लॉजचं बुकिंग, सार्वजनिक ठिकाणी प्रेम व्यक्त करण्याची चेपत चाललेली भीड, सहज उपलब्ध असलेली गर्भनिरोधक साधनं, विविध माध्यमांमधून विविध परस्परविरोधी मतांचा होणारा मारा, पूर्वापार चालत आलेल्या सामाजिक ओळखींपलीकडे शिक्षणामुळे–नोकरीमुळे–इतर मार्गांनी तयार होणारे नातेसंबंध, टिंडर–ग्राइंडर (समलिंगी लोकांसाठीचं एक डेटिंग ॲप) सारखे प्लॅटफॉर्म्स, फेसबुकसारख्या समाजमाध्यमांधून होणाऱ्या ओळखी वगैरे एका बाजूला सामाजिक

त्यानं प्रेम केलं तिने प्रेम केलं,एकावर केलं किंवा अनेकांवर केलं



मला सांगा तुमचं काय गेलं?

संबंधांचा अवकाश वाढवतायेत, तर दुसऱ्या बाजूला वर्षानुवर्षे विशेषतः दडपलेली लैंगिकता, लाँग-डिस्टन्स रिलेशनशिप्स, हवा असलेला चॉईस, कधी भावनिक तर कधी शारीरिक गरजांची जोडीदाराकडून पूर्तता न होणं, आणि मुख्य म्हणजे सगळ्याच गोष्टी इन्स्टंट-रेडिमेड मिळवण्याची सवय लागलेली, सतत नवं काहीतरी हवं असणं, वाढता बोअरडम आणि तो घालवण्यासाठी काहीही करायला मागेपुढं न बघणं वगैरेमधून निर्माण होणारी गुंतागुंत आपल्या आजूबाजूला, अगदी आपल्या आयुष्यातही सुरू आहे, हे सत्य आपण आधी स्वीकारलं पाहिजे. याला चांगल्या-वाईटाच्या चौकटीत बसवणं कठीण आहे. वरवर पाहता का होईना जीवनाची मूल्ये दिवसेंदिवस व्यक्तिकेंद्रित होत असतांना या बदलांना आजवरच्या नैतिकतेची फूटपट्टी लावून चालणार नाही. या सगळ्याचं प्रतिबिंब साहित्य-चित्रपटांपासून ते पॉर्न किंवा प्रणयकथांच्या वेबसाईटवर उमटताना दिसतंय. लिव्ह-इन रिलेशनशिपसारख्या बाबी मेट्रो शहरं सोडाच अगदी निमशहरी भागातही आता थोड्याबहुत प्रमाणात सामान्य होऊ लागल्यात. ब्रेकअप-पॅचअप-डिव्होर्स या गोष्टी नवख्या राहिल्या नाहीत. म्हणजे हे आधी कधीच नव्हतंच असंही नाही, मात्र ते जितक्या स्पष्टपणे समोर येतंय, त्याचा जो वेग आहे तो अभूतपूर्व आहे.

कायदेशीर बाबी काहीवेळा बाजूला ठेवल्या तर एकाहून अधिक जोडीदार असावेत असं वाटणाऱ्यांच्या मुख्य अडचणी समाज काय म्हणेल आणि हे आपल्या जोडीदारांना पटेल का ह्या आहेत. या अडचणींमागं कोणती गोष्ट योग्य आणि कोणती अयोग्य याचा विचार केल्यानं घडणारं नैतिक द्वंद्व आहे. त्यातही सगळ्यात जास्त अडचण स्त्रियांची आहे, कारण लैंगिक संबंध पुरुषांसाठी त्या क्षणांपुरते एकत्र असले तरीही स्त्रीला तिच्या मुलाबाळांना सांभाळायची काळजी उत्क्रांतीनं नैसर्गिकपणे दिली आहे. मानव प्राण्याची संतती जन्मल्याबरोबर इतर प्राण्यांसारखी लगेचच किंवा कमी कालावधीत स्वावलंबी बनत नसते, त्याला जैविक कारणं तर आहेतच, सोबतच सामाजिक कारणंसुद्धा आहेत. ह्यामुळंच विवाहव्यवस्था महत्त्वाची आहे. मुलं जन्माला घालावीत की नाहीत, हा त्या जोडप्याचा वैयक्तिक निर्णय असला तरीही संभोगाची नैसर्गिक प्रेरणा तीच आहे. त्यातून मिळणारा आनंद आणि त्यामुळं भावनिक जवळीक ही सारी उत्क्रांतीचीच देणगी, यापलीकडे जे काही असेल ती समाजाची बंधनं होय.

समाजाची बंधनं नवीन मूल्यव्यवस्था बहुमताने स्वीकारली की, आपोआप गळून पडत असतात. माझ्या मते ज्यांना समाजाची बंधनं झुगारून ओपन रिलेशनशिपमध्ये राहावं वाटतं त्यांनी काही गोष्टी आधी मान्य करणं गरजेचं आहे. जर एकाहून अधिक जोडीदार हवेसे वाटत असतील तर सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे परस्पर विश्वास आणि सहमती. एकाहून अधिक जोडीदार हवेसे वाटण्याचा अधिकार स्त्री आणि पुरुषांना सारखाच आहे, थोडक्यात आपल्या जोडीदारालाही दुसरी एखादी व्यक्ती आवडू शकते ही शक्यता स्वीकारता आली पाहिजे. प्रत्येकवेळी ही गरज केवळ शारीरिकच असेल असंही नाही किंवा सुरुवातीला असलेली भावनिक जवळीक पुढं जाऊन शारीरिक जवळकीत बदलू शकते किंवा या उलटही घडू शकेल. त्यामुळं त्या नात्याचं स्वरूप एकमेकांना किमान माहिती असावं. निदान त्याविषयी स्पष्टपणे चर्चा करण्याचा समजूतदारपणा असावा. अशा नातेसंबंधांमध्ये त्यातल्या प्रत्येक व्यक्तीच्या वेगवेगळ्या मर्यादा असू शकतात, त्यामुळे एखाद्याला एखादी गोष्ट पटली नाही तर त्यातून बाहेर पडण्याचं स्वातंत्र्य त्या व्यक्तीला असावं. एखाद्या व्यक्तीसोबत लग्न झालं असेल, तरीही एकाला अपेक्षित असणारं नात्यांचं स्वरूप दुसऱ्याला अपेक्षित असणाऱ्या स्वरूपापेक्षा वेगळं असेल तर असं नातं टिकू शकणं अवघड असतं. ही प्रगल्भता नसेल तर अशांसाठी एकच जोडीदार पद्धत कधीही उत्तमच! आता या सगळ्याला कायदेशीर दृष्टीने कसं पाहावं हा प्रश्न जास्त गुंतागुंतीचा आहे. कारण भावना आणि शारीरिक गरजांच्या पलीकडे असणाऱ्या भौतिक गोष्टी त्याच्याशी निगडित आहेत.

थोडक्यात, सांगायचं झालं तर खाजगीत आयुष्यात कोणी काय करावं हे इतरांनी सांगण्याचा जसा त्यांचा अधिकार नाही तसंच आपलं वर्तन इतरांना विशेषतः आपल्या जोडीदारांना किमान वैयक्तिक

कारणांनी त्रासदायक होऊ नये याची काळजी घ्यायला हवी. आपल्या सम ाजात हा प्रगल्भपणा येण्यासाठी यावर आणखीन बरंच पाणी पुलाखालून जावं लागेल.

कवी मंगेश पाडगांवकरांची माफी मागून शेवटी इतकंच म्हणेन,

'त्यानं प्रेम केलं, तिने प्रेम केलं
एकावर केलं किंवा अनेकांवर केलं
मला सांगा तुमचं काय गेलं?'

***अभिषेक शरद माळी,***
***ता. वाळवा, जि. सांगली***
*मोबाइल : ७५८८५८८५३८*
*(लेखक आयआयटी, बॉम्बे इथं सेंटर फॉर पॉलिसी स्टडीजमध्ये पीएचडी करत आहेत. तसेच, उन्नत प्रौद्योगिक रक्षा संस्थान, पुणे येथील पदव्युत्तर पदवीधर आणि राजकीय–सामाजिक–आर्थिक व सामरिक विषयांचे अभ्यासक आहेत.)*

---

**मोनो, पॉलि, अमूकतमूक आणि माणूस**

माणूस हे प्रचंड गुंतागुंतीचं रसायन आहे. माणसानं कितीही विचार करून वागायचं ठरवलं, तसा जीवतोड प्रयत्न केला, तरीही ही रसायनं माणसाला त्यांच्या तालावर यथेच्छ नाचवतात. परिणामी, आपल्या 'साऱ्याजणांना मिळून' अनंत, अनादि असे घोळ घालण्याची सवय लागलेली आहे. त्यामुळे, कुठलीही मानवी व्यवस्था, कन्सेप्ट, टर्मिनोलॉजी, अमूकतमूक समोर आलं की, सर्वात आधी मी माझ्यातल्या 'माणसा'च्या तळात शिरायचा प्रयत्न करतो. या माझ्या एकदम तळात– पाताळातच म्हणा ना– आदिम अशी एक गुहा आहे. ज्यात काही गोष्टी माणूस भटका होता, तेव्हापासूनच्या आहेत. त्या एकदम कोऱ्या करकरीत नैसर्गिक आहेत. त्या गुहेच्या बाहेर आलं की, संस्कृती नावाचं जाळं लागतं. हे जाळं माणसानेच निर्माण केलंय. रक्ताचं कुटुंब–भावकी, समाज, मग राष्ट्र असं वाढत, विस्तारत आणि त्याच वेळी एकमेकात गुंतत गुंतत ते निबीड अरण्यासारखं झालं आहे. सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञानानं ठासून भरलेल्या काळातही मला असं जाणवलं की, माणसाला ही आदिमतेची गुहा मोहवतीये. त्या गुहेनं माणसाला आणि आपल्यातल्या माणसानं त्या गुहेला सोडलेलं नाही. कारण ती अर्थातच, नैसर्गिक प्रेरणांशी जोडलेली आहे. या गुहेतली नैसर्गिक योजना अशी आहे की, 'माणसांनी मुक्तपणे समागम करावा', भरपूर मुलं जन्माला यावी, त्यातली काही डिसऑर्डर होऊन मरावीतही, यातून लोकसंख्येचा बॅलन्स आणि क्वालिटी साधली जावी. या गुहेतल्या काळात मोनो, पॉलि, अमूकतमूक काहीच नव्हतं. आणि अजूनही ह्या गुहेत गेल्यावर तसं काहीच नसतं. ह्या गुहेतली आदिम माणसं रसरशीत अनुभव घेत घेत, उत्कटतेने जगणारी अशी होती. मात्र, सध्याला त्या गुहेत शिरणंच अशक्यप्राय झालं आहे. स्त्रियांना तर भयंकर अवघड. बंदीच आहे म्हणा ना! गुहेच्या बाहेर असलेल्या जाळ्यात जगायचं असेल तर मात्र काहीतरी करणं, देवाचं नावबिव देणं अपरिहार्य असतं. म्हणजे मग गुहा झाकली जाते. माणसानं सुपीक डोकं चालवून ही व्यवस्था अशी चपखल बसवली. मग त्या व्यवस्थेत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला नाव द्यायला सुरुवात झाली. सुरुवातीला ही व्यवस्था–संस्कृती प्राथमिक स्वरूपाची असल्यानं गरजा भागवणारी होती. मग मात्र जशा या व्यवस्था उत्क्रांत होत गेल्या, संस्कृती जाळं विणत मोठी होत गेली, इतकी की, माणूसच त्या जाळ्याच्या गुंतागुंतीनं जखडला गेला. माझी जमीन, हे माझं घर, ही माझी बायको– असं माझं माझं सुरू झालं. हा 'माझं माझं' किंवा 'मोनो मोनो'चा जप गेली अनेक हजार वर्षं हळूहळू पिढ्यान पिढ्या आपल्या प्रत्येकाच्या गुणसूत्रातून झिरपत ताकदवान होत आलेला आहे. म्हणून मग माणसाला करुणा, बंधुत्व, समता ह्या गोष्टी शिकवायला लागतात. पॉलि होण्यासाठी ह्या गोष्टी आपल्या 'आत'मध्ये आहेतच, हे माणसानं ओळखणं अति गरजेचं आहे.

सुरुवातीला माझं घर–जमीन–बायको ह्या मोनोगॅमीनं माणसाला स्थिरावलं. ह्यातून निर्माण झालेल्या संस्कृतीनं माणसाला फुलवलं. तरी ह्या स्थिरतेनं पुढचे प्रश्न निर्माण केले. हळूहळू ही व्यवस्था इतकी बलाढ्य झाली की, संस्कृतीनं प्रकृतीला फाट्यावर मारायला सुरुवात केली. आदिमकाळी भटकणाऱ्या माणसाच्या अगदी मूलभूत गरजा– अन्न, वस्त्र, निवारा आणि सेक्स (यातली सेक्स ही गरज संस्कृतीनं फाट्यावर मारलेली आहे.) भागवून जगणाऱ्या टोळीचं ह्या व्यवस्थेशिवाय पान हलेना. म्हणजे, 'तुझं माझं जमेना, पण तुझ्यावाचून करमेना', अशी काहीशी गत. ह्या अतिरेकी रेट्यामुळे आधुनिक माणसाची चांगलीच गडबड उडालीये. लग्नानं ठरलेली नवरा नि बायको हीच काय ती जोडी पवित्र! लग्नाच्या सुरुवातीच्या गोडगुलाबी महिन्यांनंतर त्या लग्नाला कंटाळून गुहेतला मुक्त समागमही मोहवायला लागतो. आणि मग पवित्र संकल्पनांना हादरे बसायला लागतात. संस्कृतीची प्रतिष्ठा आता इतकी प्रबळ आणि टाईल्सच्या किंवा काचेच्या घरासारखी चकचकीत आहे की, त्यापुढे काही करता येत नाही. त्या फँटसी म्हणून डोक्यात घुमत राहतात. बाहेरच्या जाळ्यात येऊन मनासारखं


तर वागता येणार नसतं. जाळीवर धर्मानंही आचारविचारांची कडक बंधनं घालून ठेवलेली. 'माणसा'तल्या स्त्रियांना वेगळं करून त्यांच्यावर तर आणखीनच बंधनं. मग इच्छा दाबायला लागतात. त्या दाबल्यामुळे शांत होत नाहीतच; पण ज्वालामुखीसारख्या उफाळून येतात.

आत्ताच्या घडीला हे असं सगळं आतबाहेरचं बघितल्यावर मग मला प्रश्न पडतो की, आपलं नक्की काय चाललंय? काय करावं? कसं जगावं? एकच जोडीदार करून आयुष्यभर लग्नाच्या शिक्काखाली राहावं तर, नैसर्गिक प्रेरणा 'दगा' देतात. मन मारत राहण्यानं ताण येतो. जोडीदाराला उघडपणे सांगायला जावं की, मला अमूकतमूक आवडतो किंवा आवडते तर इगो, जेलसी, इनसिक्युरिटी या भावना गुणसूत्रातल्या 'मोनो मोनो'च्या जपानं अजूनच टोकाला जाऊन जाग्या होतात. लपाछपी खेळावी, तर जोडीदाराला फसवण्यानं येणारा ताण. त्याचाही त्रास होतो. कारण समोरची व्यक्ती –अगदी रक्ताच्या नात्यातली का असेना– कुठल्या मूडमध्ये असेल, कसा विचार करेल, आपल्या बोलण्याचा ते काय अर्थ काढतील, हे आपल्या हातात नसतं. ही डोकेदुखी नको म्हणून सिंगल राहून मुक्त असावं का? पण, अगदी मुक्त असं काही राहिलं नाहीये. माणूस कुठे ना कुठे अडकणारा होताच, आणि आता तर अतिरेकी अडकणारा झाला आहे. मी माझ्या आत बघतो तेव्हा मला माझ्यातल्या अस्थिरतेची जाणीव होते. तीच अस्थिर, अस्वस्थता माझ्या समोरच्या व्यक्तीलाही लाभली आहे. हे मी समजून घेऊ शकतो. पण त्याला मर्यादा पडते. एका मर्यादेनंतर खटके उडायला लागतात. कुठलंही नातं जमवायला जबाबदारीपेक्षा दुसऱ्याला समजून घ्यायचे कष्ट घ्यावे लागतात. तो त्रास सहन करणं भाग आहे. सध्या आपल्या सर्वांनाच फायदे तेवढे हवेत. नुसते फायदे कधीच मिळणार नाहीत. किंमत चुकवावी लागणारच. लग्नासारख्या घट्ट 'समजल्या' जाणारं नातंही एकतर्फी होतं. तर बिनलग्नाच्या



नात्यात स्वातंत्र्य मिळतं. पण एकटेपणाही येतोच सावलीसारखा मागे. समजा, अशी माझी चार–पाच नाती असतील, तर किती मोठा गुंता होईल तो.

सध्याच्या काळात इकडूनतिकडून इतकं काही आदळतंय आपल्यावर की, ह्या सगळ्यात हे समजून–उमजून घेणं अवघड झालेलं आहे. लग्नात अपेक्षित असलेली जबाबदारी मी आयुष्यभरासाठी घेऊ शकत नाही. प्रेम भरपूर, तुडुंब करू शकतो. पण शेवटी हातचं राहतंच कायतरी. जबाबदारीची रेशीमगाठ वगैरे म्हणल्यावर मात्र प्रेमातली हवा जाते माझ्या. तरीही सोबत तर कुणी हवं असतं, हेही तितकंच खरं. कुणी सोबत असलं की आपल्यातला माणूस मॅच्युअर होऊन जगेल असं वाटतं. पण प्रत्येकाचं तसं होईलच असं नाही. मग काय करायचं? काय करायचं? तीन–चार 'लिव्ह इन'? किंवा




**मित्रांनो मागे फिरा,पुढे मोनोगॅमी पद्धत आहे !**

दोन–चार ‘लग्नं’? माहीत नाही. मला वाटतं, शेवटी समाधान महत्त्वाचं. म्हणून ‘माणसा’च्या सुपीक डोक्यातून निघालेल्या कुठल्याही अमूकतमूक संकल्पनांच्या नादी न लागता, ज्याला जे झेपेल, जे जमेल ते ते त्यानं त्यानं करावं. कोणा एकाशी शरणागत होऊन आयुष्य घालवायची ज्याला इच्छा आहे, त्यानं तसं करावं. समाजाच्या भीतीने न सांगता चोरूनछपून प्रेम करायची इच्छा असेल तर, तीही पूर्ण करून घ्यावी. प्रत्येक माणसाच्या जगण्याच्या काय काय कल्पना असतात. स्वतःला ओळखून, जे आहे त्याच्याशी प्रामाणिक राहून, गिल्ट न घेता आणि दुसऱ्याला त्रास न देता, दुसऱ्यावर 'monopoly' गाजवत त्याला सजा देऊ नये. ह्या जगात आपण जगणं हे काही कसंतरी उरकून मरायला आलेलो नाहीये. तेव्हा रसायनांनी घातलेला घोळ–गोंधळ आपापला निस्तरणं तर भाग आहे. छोट्याशा आयुष्यातली मजा कायम ठेवत जगणं, एवढंच काय ते आपल्या हातात आहे.

***हृषीकेश पाळंदे, पुणे***
*hrishpalande@gmail.com*

❀❀❀

कुटुंबसंस्था, विवाहसंस्था या मानवी समाजातील सामाजिक व मानसिकदृष्ट्या मूलभूत प्राचीन आणि महत्त्वाच्या संस्था आहेत. तसेच, या दोन्ही संस्था परस्परावलंबी आहेत. भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की, कुटुंब, नातेसंबंध या संकल्पना मुळीच अस्तित्वात नव्हत्या. त्या कालांतराने उदयास येऊन विकसित झाल्या मग त्यामध्ये एकपती–एकपत्नी विवाह; बहुपती–बहुपत्नी विवाह या प्रकारावर आधारित विविध स्वरूपाची कुटुंबं बनत गेली. जसजसा काळ बदलत गेला तसतसे या संकल्पनांवर नैतिक–अनैतिकतेचे प्रश्न उपस्थित होऊ लागले आणि आजच्या घडीलाही प्रश्न थांबलेले नाहीत. आज भारतीय समाजव्यवस्थेत मुस्लिम धर्माचा अपवाद वगळता बहुपतित्व/बहुपत्नीत्व हे कायद्याने तर गुन्हे आहेतच; परंतु सामाजिकदृष्ट्याही याबद्दल फारसं सकारात्मक मत नाही. यापैकी कायद्याचं म्हणायचं झालं तर कायद्याचा प्रमुख उद्देश कोणावरही अन्याय होऊ नये हा असतो तत्कालीन सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांचे भविष्यात नकारात्मक पडसाद उमटू नयेत. व्यक्तीगत–सामाजिक अन्याय होऊ नये या उद्देशाने कायदे बनवले जातात. गेलेत आणि म्हणूनच एकापेक्षा अनेक जोडीदार असल्यास कुणा एकावर त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊन व समानतेचं मूल्य अबाधित राहावं या उद्देशाने बहुपतित्व/बहुपत्नीत्व हे कायद्याला मान्य नाही. सामाजिकरीत्या पाहायचं झालं तर आपल्याकडे वैवाहित संबंधांना एकनिष्ठता प्रामाणिकपणा कर्तव्य, समर्पण, नैतिकता यासारख्या भावनिक मूल्यांच्या चौकटीत अडकवल जातं. त्यामुळे या तथाकथित संकुचित मानसिकतेतून आलेल्या भावनिक चौकटीला छेद देणाऱ्या बहुपत्नीत्व बहुपतित्व या संकल्पनांना समाजमान्यता मिळत नाही. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी विवाहसंस्थेच्या इतिहासावर जे मोठं चिकित्सक संशोधन–लिखाण करून ठेवलेलं आहे– भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास– ते या संदर्भाने खूप महत्त्वाचं आहे. स्त्री–पुरुष समागम संबंध हे अति प्राचीन वैदिक काळात कसे अनिर्बंध, अनियंत्रित होते, कोणत्याही नातेसंबंधाच्या मर्यादा त्यांना नसायच्या यांचे अनेक पुरातन दाखले इतिहासाचार्यांनी दिले आहेत. युथावस्थ आर्य समाजात जो अनियंत्रित स्त्री–पुरुष समागम होता, त्याचे रूपांतर कालांतराने कसे झाले आणि कोणकोणती नियंत्रणे कशा परंपरेने कळत–नकळत निर्माण केली गेली, याबद्दल सखोल विश्लेषणात्मक मांडणी इतिहासाचार्य राजवाडेंनी केलेली आहे. कोणतेही नातेसंबंध ज्ञात नसताना मानव सामायिक गटाने राहत आणि हे सामायिकत्व पुढे कालांतराने नष्ट होऊन बहुपतित्व व बहुपत्नीत्व असे दोन्ही प्रकारचे स्त्री–पुरुष संबंध उदयाला आले. त्याही पुढे जाऊन एकपती–एकपत्नी संबंध प्रचलित होऊन समाजमान्य झाले.

**बहुपत्नीत्व/बहुपतित्व :**

सर्वसाधारणपणे जगातल्या सर्व देशांमध्ये कमी–अधिक प्रमाणात बहुपतित्व किंवा बहुपत्नीत्व अस्तित्वात असल्याचा इतिहास सापडतो पूर्वी राज्यकर्ते राज्यविस्तार अथवा राजकारणाचा भाग म्हणून एकाहून अधिक नातेसंबंध, विवाहसंबंध जोडायचे आणि म्हणून ते समाजमान्यही असायचे. भारतातही ही प्रथा प्रचलित होती. मात्र, भारतीय दंडसंहिता १८६०नुसार ख्रिश्चन धर्मियांकरता बहुपतित्व–बहुपत्नीत्व कायद्याने अवैध केले गेले तद्नंतर हिंदू विवाह कायद्यानुसार १९५६पासून मुस्लिम धर्माचा अपवाद वगळता सर्वांसाठी बहुपतित्व–बहुपत्नीत्व अवैध ठरवले गेले. व्यक्तिगत भावनिक व शारीरिक गरजांची अपूर्तता मालमत्तेत हक्क व वाटपावरून होणारे वाद, अपत्यांवर होणारा प्रतिकूल परिणाम या सर्वांमुळे कुटुंबव्यवस्था विस्कळीत होणं परिणामी, समाजव्यवस्थाही विस्कळीत होणार म्हणून बहुपतित्व–बहुपत्नीत्व हे कायद्याने गुन्हे आहेत. परंतु आजही हे पूर्णपणे थांबलेले

नाही. प्रत्यक्षात अनेक लोक लपून छपून तर काही उघडपणे हे करताना दिसतात.

**लिव्ह इन रिलेशनशिप :** कधी काळी दुर्मीळ अशक्यप्राय वाटणारी ही बाब हल्ली खूप कॉमन झाल्याचे दिसते. आजची तरुणाई सर्रास हा प्रयोग करू पाहते. कारण काळानुसार बदललेल्या भावबंधच्या कसोट्यांवर नाती फुलवणं आणि ती निभावणं फार अवघड झालेलं आहे. मग नवरा-बायकोचं नातंही याला अपवाद कसं असेल! आर्टिफीशियल इंटेलिजन्सच्या जमान्यात भावनेपेक्षा व्यवहाराला जास्त महत्त्व आले आहे. त्यामुळे अनेक प्रियकर प्रेयसी एकमेकांसोबत राहताना भावनिकरीत्या गुंतायला कचरतात. भावनिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही निकषांवर ते आपलं नातं तपासू पाहतात आणि त्यावरूनच त्या नात्याला विवाहबंधनात अडकवाचं की नाही याचा निर्णय घेतात. काही जोडपी यातून पुढे जाऊन लग्न करतात तर काही जण थांबण्याचा निर्णय घेऊन वेगळे होतात. तर, काही 'नवा गडी नवा राज्य'चा अवलंब करतात! याची कारणं व्यक्तिपरत्वे, परिस्थितीपरत्वे नक्कीच वेगळी असतात; पण मूळ मुद्दा हा की, लग्नानंतर नात्यात काही गंभीर अडचणी निर्माण होऊ नये म्हणून आजच्या तरुणाईला हा उत्तम प्रतिबंधात्मक पर्याय वाटतो आणि म्हणूनच एक रिलेशनशिप वर्कआऊट नाही झाली तर, दुसरी नाहीतर, तिसरी... असा प्रयोग तरुणवर्ग करताना आढळतो. लग्नापूर्वीच्या अनेक रिलेशनशिप आणि लग्नानंतर बहुपतित्व-बहुपत्नीत्व अथवा बाह्य संबंध या दोन्ही तिन्ही संकल्पनांमध्ये

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

अडचणीचा किंवा वादात्मक मुद्दा असतो तो म्हणजे लैंगिक संबंधांचा. लैंगिकता या विषयाला धरून आपल्या भारतीय जनमानसात जी पारंपरिक, संकुचित मानसिकता रुजली, रुजवली गेली आहे तिला छेद देणारी गोष्ट या समाजाला सहजासहजी मान्य नाही; स्वीकार तर दूरच! मानवाची लैंगिक गरज ही अत्यंत स्वाभाविक, नैसर्गिक बाब आहे, हेच मुळी बहुतांश समाजाला स्वीकारार्ह नसते आणि म्हणूनच लैंगिक अभिव्यक्ती म्हणजे ठण ठण गोपालच! त्यामुळे विवाहपूर्व लैंगिक संबंधांना समाजाकडून कडाडून विरोध केला जातो, तसेच विवाहोत्तर लैंगिक संबंधांमध्ये काही

(पान ८४ वर)

संवादसेतू
दिवाळी २०२१

अल्पावधित रसिकमान्यता मिळवलेला, सलग ५ वर्षे विविध पुरस्कारप्राप्त, चोखंदळ वाचकांनी नावाजलेला अंक! आजच नोंदणी करा !!




संपादक : डॉ वंदना बोकील-कुलकर्णी    किंमत रु.२५०/-

**प्रतिभावंतांची लेखनयात्रा –** ज्येष्ठ बंगाली लेखिका बाणी बोशु यांची विशेष मुलाखत (सुमती जोशी), स्पॅनिश लघुकथेचा अनुवाद - विद्यासागर महाजन, फ्रेंच लेखिका इरेन फ्राँ : परिचय- देवयानी अभ्यंकर, विख्यात लेखिका झुंपा लाहिरी यांच्याविषयीचा लेख - सानिया भालेराव

**मी आणि आवडती भूमिका –** डॉ. मोहन आगाशे, विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर, ज्योती सुभाष, चंद्रकांत काळे, मधुवंती दांडेकर, कीर्ती शिलेदार, सुहास जोशी, वंदना गुप्ते, वैभव मांगले

**जन्मशताब्दी विशेष –** शिवशाहिरांची ओळख - प्रा. मिलिंद जोशी, शांता शेळके - आरती देवगावकर, हसरत जयपुरी - लीना पाटणकर, वसंत कानेटकर - अरुण कानेटकर

**कथा विभाग –** विलास केळसकर, राजीव तांबे, हृषिकेश गुप्ते, अर्चना अकलूजकर, डॉ. शुभंकर कुलकर्णी, स्टिफन परेरा

**विशेष लेख –** मधुकर धर्मापुरीकर, मिलिंद जोशी, सुनीला गोंधळेकर, रविप्रकाश कुलकर्णी, नीलिमा भावे

**विशेष रंगीत विभाग –** कॅलिग्राफी - कविता भेटते तेव्हा ... - बी. जी. लिमये

**मिलिंद जोशी** यांचे मुखपृष्ठ व मांडणी! आतील चित्रे **चंद्रशेखर बेगमपुरे** यांची!! **बी. जी. लिमये** यांची कॅलिग्राफी

anupam_creations@rediffmail.com

**एस एम एस, ई मेल किंवा फोनवरुन आजच मागणी नोंदवा - ९८२२०३३५६२, ९८८१०९८०४८**

Email: samvadsetupune@gmail.com    महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वितरकांकडे उपलब्ध

# ज्याची त्याची लैंगिकता

हॅशटॅग लैंगिकता

संदेश कुडतरकर

**स्वतःची वेगळी लैंगिकता आजमावून पाहताना प्रत्येकाच्या आयुष्यात येणारे टप्पे हे सर्वसाधारणपणे सारखेच असतात. हेट्रोसेक्शुअल समाज बहुसंख्य म्हणून सुरुवातीला समलैंगिक म्हणून स्वतःला या गटात फिट करू पाहतो. म्हणजे पुरुष आपल्याला स्त्रियांबद्दल आकर्षण आहे, असे भासवतात आणि उलटपक्षी समलैंगिक स्त्रिया आपल्याला पुरुषांबद्दल आकर्षण आहे असं दाखवतात. काही जण धाडसाने लहानपणीच मान्यही करून टाकतात. काही जण या सगळ्या तणावामुळे कोशात जातात. पुढे जेव्हा काही निर्णय घेण्याची वेळ येते, तेव्हा मात्र कस लागतो. काही जण कुटुंबाच्या दबावामुळे लग्न करून मोकळे होतात. हे थांबवण्यासाठी ज्याच्या त्याच्या लैंगिकतेचा स्वीकार करायला हवा.**

आम्हा शाळेतल्या वर्गमित्रांची चार टाळकी जमली आणि चर्चेची गाडी कधी लग्नावर घसरलीच, तर जम लेल्यांपैकी कुणाचं तरी मला उद्देशून एक वाक्य ठरलेल असतं, 'तुझी मजा आहे, सिंगल आहेस.' तर कधी तरी त्यातील एखादा म्हणतो, 'बरं झालं बाबा लग्न केलं नाहीयेस. तेच चांगलं आहे खूप ताप असतो डोक्याला.' दोन्ही विधानं मी हसण्यावारी नेतो. त्याशिवाय पर्याय नसतो म्हणा किंवा यावर कसं रिॲक्ट करायचं ते कळत नसतं म्हणा सिंगल आहे, म्हणून मजा असते असं तर अजिबात नाही, शिवाय मिंगल होण्यासाठी माझे प्रयत्न चालू नसतात असंही नाही. लग्न म्हणजे डोक्याला ताप. हे सरसकटीकरणही मला पटत नाही. आताच्या पिढीला कसलंही गांभीर्य नाही. हे वाक्य आजकाल पूर्वीच्या पिढीतील लोकांकडून सहज ऐकायला मिळते. या तक्रारीच्या सुरात खरंच तथ्य किती! याचा ऊहापोह करणं म्हणूनचं महत्त्वाचं वाटतं.

माझ्यातल्या वेगळेपणाची मला स्वतःला जाणीव होऊ लागली, त्याच्या फार पूर्वीच नातेसंबंधांबद्दल प्रश्न पडायला लागले ते वाचनामुळे. साधारण ज्युनिअर कॉलेजमध्ये असताना मेघना पेठेचं 'नातिचरामि' वाचलं आणि आजवर आपण जे पाहत आलो त्या संबंधातला खरेपणा जोखून पाहण्याची इच्छा झाली. लैंगिकता, लैंगिक कल हा फार पुढचा मुद्दा. मुळात लोक लग्न तरी का करतात, हा प्रश्न मेघना पेठे, गौरी देशपांडे, कविता महाजन यांच्या पुस्तकांमुळे पडू लागला. एकनिष्ठता म्हणजे लग्नाची इतिकर्तव्यता. हे खरंच वाटतं रोमँटिक आणि खरं आहे का, हे जाणून घ्यावंसं वाटू लागलं. या पुस्तकांसोबतच 'लोकसत्ता'च्या चतुरंग पुरवणीत बदललेल्या नातेसंबंधांचा वेध घेणारे, त्यांच्या विविध अंगाची चर्चा करणारे लेख वाचनात येऊ लागले प्री–मॅरेज काऊंसिलिंग, घटस्फोट हे विषय तर होतेच. मात्र, हळूहळू लिव्ह इन रिलेशनशिप, ओपन रिलेशनशिप यांच्याबद्दलही माध्यमातून चर्चा होऊ लागली. हे सगळं स्थित्यंतर होत असतानाच मी स्वतः एका विचित्र तिढ्यातून जात होतो. ज्याची त्याकाळी पुसटशीही चर्चा होत नव्हती. प्रयोग नक्कीच होत होते. चेतन दातार यांच्या 'एक माधवबाम' या नाटकाचं परीक्षण आलं होतं. सचिन कुंडलकरांच्या 'छोट्याशा सुट्टीत' या नाटकाच्या निमित्तानेही चर्चा झाली. मात्र, समलैंगिक आकर्षकणाबाबत, नातेसंबंधात फार बोललं जातं नव्हतं. त्यावेळी ऑर्कुटची नवलाई होती. फेक अकाऊंट काढलं होतं आणि गुप्तपणे नेटवर लोकांशी मैत्री करत होतो. कॉलेजमध्ये आऊट होत नव्हतो. एका फार जवळच्या मित्राला फक्त सांगितलं की, मला मुलांबद्दल आकर्षण वाटतं. त्याने समजून घेतलं. आणखी काही मित्रांना सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी थट्टा केली आणि ते माझ्यापासून दूर राहू लागले. मी अधिकच कोशात गेलो. पुढे सुदैवानं कामाच्या ठिकाणी असा भेदभाव करणारा कोणताही अनुभव आला नाही. फेसबुकवरच्या लिखाणातून कसलीही ओळख नसतानाही माझ्या आऊट होण्याचं, धाडसीपणाचं कौतुक करणारे, नेहमी पाठिंबा देणारे फार छान मित्र मिळाले आणि स्वतःसाठी एक ठाम निर्णय घेऊन आपण कसलीही चूक करत नाही आहोत, या विचाराला बळकटी मिळत गेली. गेल्या काही वर्षांत अनेक तरुण–तरुणी स्वतःच्या वेगळ्या लैंगिकतेबद्दल खुलेपणाने बोलताना दिसत आहेत. केवळ पालक दबाव आणताहेत, म्हणून लग्न करायच्या विचाराला विरोध करताना दिसत आहेत. यात काही अंशी गेल्या काही वर्षांत झालेल्या सामाजिक घडामोडींचाही भाग आहे.

६ सप्टेंबर २०१८ रोजी सर्वोच्च

न्यायालयाने कलम ३७७ मधून सम लैंगिकांना वगळत परस्परांच्या संमतीने ठेवलेले समलैंगिक संबंध हा गुन्हा नाही, असा एक ऐतिहासिक निर्णय दिला. त्याच्याही एक पाऊल पुढे जावं. अलीकडेच मद्रास उच्च न्यायालयाने एका केससंदर्भात निकाल देताना म्हटलं की, समलैंगिकांना बरं करण्यासाठी वापरण्यात येणारे कुठलेही वैद्यकीय उपचार चुकीचे आहेत. ही एलजीबीटीक्यू समुदायाच्या दृष्टीने उचललेली स्वागतार्ह पावले आहेत. मात्र, समाजाविरुद्ध काही बोलण्याचं बळ असं न्यायालयाच्या एका निर्णयाने एका रात्रीत मिळत नसतं. त्यासाठी आधी स्वतःशी झगडावं लागतं. मग कुटुंबाला आपण कसे योग्य वागत आहोत, हे पटवून द्यावं लागतं आणि त्यातूनच हळूहळू आत्मविश्वास वाढत जातो.

माझ्या माहितीतल्या एलजीबीटीक्यू समुदायातल्या मित्रमैत्रिणींपैकी ज्यांनी स्वतःच्या वेगळ्या लैंगिकतेबद्दल पालकांना आणि इतरांना सांगितलं आहे. जे सध्या साथीदाराच्या शोधात आहेत किंवा साथीदारासोबत आहेत त्यांना हे यश सहजासहजी मिळालेलं नाही. मुळात हे सेक्शुअल समाजात ज्याप्रमाणे डोळ्यांसमोर लग्न झालेली जोडपी असतात. त्यामुळे यांचं टिकलंय ना लग्न, मग आपल्यालाही जमेल हा एक सूक्ष्म विचार कुठेतरी मनात असतो. तसा असण्यासाठी एलजीबीटीक्यू समुदायाच्या डोळ्यांसमोर उदाहरणच नाहीत. मी स्वतः जेव्हा कुणासोबत या गोष्टींमुळे येणाऱ्या अडचणी शेअर करू लागतो, तेव्हा पालकांपासून दूर स्वतंत्रपणे राहा, परदेशात जाऊन सेटल हो. असे सल्ले मिळतात. ते मला पटत नाहीत. पालकांनी आपली वेगळी लैंगिकता समजून घेणं ही अपेक्षा रास्त असली तरी, तसं झालं नाही तर निदान कुठलाही टोकाचा निर्णय लगेच घेऊ नये, असं मला वाटतं. जिथे स्वतःचा स्वीकार करायलाच कित्येक वर्षे लागतात, तिथे हे सेक्शुअल जोडप्यांव्यतिरिक्त आजूबाजूला काहीच न पाहिलेल्या आपल्या पालकांच्या पिढीने जादूची कांडी फिरल्यागत सगळं आनंदाने स्वीकारावं, ही अपेक्षा फोल आहे. परदेशात राहून प्रश्न सुटतीलही; पण मग ते इथे राहूनही का सोडवता येऊ नयेत? मग अशा वेळी फार मोजके पर्याय समोर उरतात. आणि त्यातला कुठला निवडायचा हे फार कठीण होऊन बसतं. हे निर्णय व्यक्तिपरत्वे बदलतात माझ्या मित्रमैत्रिणींनी स्वतःच्या लैंगिकतेला अनुसरून काही ठाम निर्णय घेतले आहेत. त्यांच्या निर्णयावर तसं पाहिलं, तर सर्वोच्च न्यायालयाच्या काही वर्षापूर्वीच्या



एक लड़का था दीवाना सा, एक लड़के पे वो मरता था !



निकालाचा प्रभाव नव्हता. तो निकाल तसा नसता, तरीही त्यांनी हाच निर्णय घेतला असता. याउलट काही मित्रांनी स्वतःच्या मर्जीने लग्नाचा निर्णय घेतला आहे. त्यातले काही आपल्या पत्नीशी एकनिष्ठ आहेत, तर काही जण पुरुषासोबत छुपे लैंगिक संबंध ठेवत दुहेरी आयुष्य जगत आहेत. अक्षय बायसेक्शुअल आहे. वर्षभरापूर्वी त्याच्या पत्नीला त्याच्या पुरुषाबद्दलच्या आकर्षणाबाबत कळालं आणि त्यांचं आयुष्य बदलून गेलं. त्याची पत्नी तो रात्री झोपल्यानंतर त्याच्या फोनवरचे मेसेज चेक करू लागली. इतकंच काय तर, तो एखादी एलजीबीटीक्यू विषयावरची फिल्म किंवा सिरीज पाहत असेल तर त्यालाही आक्षेप घेऊ लागली. त्याला वाटतं की हेच संबंध जर एखाद्या स्त्री सोबत असते, तर माझ्या पत्नीची प्रतिक्रिया अशीच टोकाची असती का?

मनोजला स्वतःच्या लैंगिकतेबद्दल कुणाला सांगण्याची संधीच मिळाली नाही. लग्न ठरलं आणि झालं. मात्र, मुळातच त्याचा स्वभाव एखादी जबाबदारी खांद्यावर घेतल्यावर ती पूर्णत्वाकडे नेण्याचा असल्यामुळे त्याने लग्न टिकवण्यासाठी स्वतःहून प्रयत्न केले. त्यात त्याला यशही आलं. आता स्वतःच्या दोन लहान मुलांकडे पाहत त्याला आयुष्य जगावंस वाटतं; पण तरीही एक खंत तो बोलून दाखवतो. 'मला जग फिरायचे होते रे. आता ते शक्य नाही वाटत. लग्न केलं नसतं तर शक्य झालं असतं. माझी पत्नी फार समजूतदार आहे; पण मला आता स्वतः साठी वेळ देता येत नाही. मी स्वतःला खूप मिस करतो.'

स्वतःच्या समलैंगिकतेबद्दल ठाम असलेला अभय शिक्षक आहे. स्वतःला

ज्या गोष्टी माहीत नाहीत, त्या समजून घ्याव्यात. पटलं नाही तर त्यावर चर्चा करावी. मात्र माहीत नसताना वाद घालू नये. या मताचा तो आहे. आईवडलांचा संसार, त्यांनी केलेले कष्ट याची त्याला जाणीव आहे; पण ते म्हणून ते म्हणतील तेच बरोबर हे मात्र त्याला पटत नाही. त्यांच्या वडिलांच्या निधनावर कधी तरी एकदा चर्चेतून आईकडून समलैंगिकतेबद्दल हेयकणीचा सूर निघाला, तेव्हा त्याने आपला मुद्दा आईला नीट सम जावून सांगितला. लग्नाच्या दबावाला बळी पडायचं नाही, हे त्याने पक्के ठरवले आहे.

नीरव घटस्फोटित आहे; मात्र, आपल्या घटस्फोटाच कारण आपली वेगळी लैंगिकता नसून, पत्नीचा विचित्र स्वभाव असल्याचं सांगतो. त्या सोबत तो हेही मान्य करतो की, आपल्या पिढीला असंख्य पर्याय उपलब्ध झाल्याने नातेसंबंध जपण्याचं महत्त्व उमगलेलं नाही. अक्षय, अभय, मनोज, नीरव ही एलजीबीटीक्यू समुदायातील काही उदाहरण आहेत. या नातेसंबंधातले प्रश्न, अडचणी, त्यावरचे उपाय हा विषय त्याहूनही प्रचंड विस्तृत आहे. त्याला कसलंही निश्चित परिमाण नाही. मेट्रोपॉलिटन शहरात या संबंधात बोलताना खुलेपणाने आढळतो. माझा हा सर्वसाधारण समज आहे. मात्र, शहरात असूनही स्वतःची लैंगिकता उघड न केलेले अनेक मित्र आहेत. त्याशिवाय एखाद्या छोट्या खेडेगावातल्या मित्राच्या पालकांनी मात्र त्याच्या लैंगिकतेला कसलाही विरोध न दर्शवता स्वीकारल्याचेही उदाहरणे आहेत. हे झाले वेगळ्या लैंगिकतेबाबत. मात्र, जर मी बहुसंख्य गटाचा भाग असतो, तर लग्न करून मोकळा झाला असतो का? याचंही उत्तर नकारार्थी द्यावं लागेल. आपण जगणं शिकत असतो, ते अनेक गोष्टीतून, आपल्या आधीच्या पिढीकडे पाहून, आपल्या समवयस्कांकडे पाहून आणि आपल्या वाचनातून, अनुभवातून जे येतं त्यावर. या आधीच्या दोन गोष्टींना जोखून माझ्या पिढीतल्या ज्यांनी लग्न केलंय, त्यांचे तीन गट करता येतील. प्रेमविवाह केलेले, पत्रिका पाहून, जुळवून वगैरे लग्न केलेले  यांपैकी केवळ तिसऱ्या अटीतील लोकं खऱ्या अर्थाने आनंदी असल्याचं दिसतं. प्रेमविवाह केलेल्या काही मित्रमैत्रिणींपैकी काही जण स्वतः दुसरीकडे प्रेम शोधत आहेत, तर काहीचे जोडीदार घटस्फोट हा शब्द पूर्वी जितका ऐकू येत नव्हता. तितका वारंवार आताशा कानांवर पडू लागला आहे. अरेंज्ड पद्धतीने लग्न केलेल्यांचे संसार आता आत उडी घेतलीच आहे, तर करूया पार अशा पद्धतीने व्हॉट्सअपवर नवराबायको एकमेकांना त्रास देतात, यावरचे फॉरवर्ड विनोद आणि मिम्स शेअर करत चालू आहेत.

खरं प्रेम तुम्हाला बांधून ठेवत नाही मुक्त करतं. हा विचार जितका समजायला कठीण त्याहूनही आचरणात आणण्यास कठीण. भारतीय विवाहसंस्थेत आपल्या जोडीदाराशी एकनिष्ठ असण्याला नको तेवढं महत्त्व आहे; पण ते देणं खरंच इतकं महत्त्वाचं आहे का? हे तपासून पाहावं लागेल. उदय लग्नानंतर एका वर्षातच पत्नीसह अमेरिकेत न्यूयॉर्कला राहायला गेला. एकदा सहज ब्राउजिंग करताना त्याला तोरांतोमधला स्विंगर क्लब्जबद्दल कळलं. स्विंगिज लाईफस्टाईल नावाची एक गुप्त व्यवस्था असल्याचं कळालं. ज्यात विवाहित जोडपी स्वतःच्या
मर्जीने दुसऱ्या एका कपलसोबत लैंगिक सुखाचा अनुभव घेतात. उदयने त्याच्या पत्नीला याबाबत सांगितलं तीही तयार झाली. तिने या कपलमधल्या स्त्रीसोबतही लैंगिक सुख अनुभवलं. हे मात्र उदयसाठी नवीन होतं. हे तो मान्य करतो. मात्र, अमेरिकेतल्या स्विंगर्स क्लब्जमध्ये भारतीय जोडपी असणार नाहीत हा आपला गोड गैरसमज होता, हेही नमूद करतो.

सुजितला bdsm फँटसीमध्ये रस आहे (bdsm म्हणजे पार्टनरला बांधून ठेवून किंवा अशा इतर प्रकारांनी लैंगिक सुख मिळवणं. ज्यात त्या पार्टनरचीही संमती गृहीत धरलेली आहे.) मात्र, पुढे लग्न करण्याची वेळ येईल, तेव्हा तो कोणत्याही मुलीशी याबाबत बोलू शकेल का, याविषयी साशंकच आहे. उदय किंवा सुजित यांच्या लैंगिक सुखाच्या व्याख्या वेगळ्या आहेत म्हणून त्या चुकीच्या ठरतात का? केवळ लैंगिक संबंधात एकनिष्ठता नाही, त्या जे अपेक्षित असतं त्याबरोबरच वेगळं काहीतरी आजमावून पाहण्याची इच्छा आहे, म्हणून प्रचलित विवाहसंस्थेच्या चौकटीत न बसणारं सगळं बाद ठरवता येतं का? ते तसं ठरवणं योग्य आहे का?

लिव्ह इन रिलेशनशिप, ओपन रिलेशनशिप हे स्वतःची वेगळी लैंगिकता जपत लग्न न करण्याचा किंवा समलिंगी जोडीदार शोधण्याचा निर्णय याबाबत आताच्या तरुण पिढीत निदान चर्चा होत असली, तरी जुन्या पिढीला अजूनही थेरं वाटतात. या गोष्टीवर चर्चा करत, पूर्ण आयुष्य सोबत काढायचं, त्या 'लग्न' या गोष्टीचा इतका ऊहापोह करणं बऱ्याच जणांना खटकतं. 'आमच्या वेळी कुठं होतं असं काही, आमचीही झालीच की लग्न'– ही वाक्यं सर्रास ऐकायला मिळतात. मात्र, ही पिढी साहिरवर प्रेम करणाऱ्या अमृताला आणि अमृतावर प्रेम करणाऱ्या इमरोजला सोईस्करपणे विसरते.

जुन्या पिढीच्या विवाहसंस्थेतलं सगळंच टिकाऊ आहे, असं मी म्हणतच नाही. त्या काळाचे प्रश्न वेगळे होते. आताचे प्रश्न वेगळे आहेत. आपल्या वडीलधाऱ्यांचे ऐकण्यात, आपलं आयुष्य निघून गेलं आणि आता आपली मुलंही आपलं ऐकत नाहीत, ही मागच्या पिढीची खंत आहे. मात्र, आताच्या पिढीचं व्यक्तिस्वातंत्र्य मागच्या पिढीने मान्य करायला हवं. प्रेमाच्या हजार तऱ्हा असू शकतात, हे समजून घ्यायला हवं.

एलजीबीटीक्यू समुदायातील बहुतांश व्यक्ती स्वतःची ओळख लपवत, आपण जसे नाही तसे आहोत, असे भासवत मन

मारत जगत राहतात. ज्यांना या बाबतीत मित्रांकडून, पालकांकडून, ऑफिसमधील सहकाऱ्याकडून आम्ही तुमच्या पाठीशी आहोत हा दिलासा मिळतो, त्या व्यक्ती मात्र स्वतःच्या लैंगिकतेबाबत खुलेपणाने व्यक्त होतात.

अर्थातच, भारतातल्या पितृसत्ताक व्यवस्थेमुळे ही सगळी प्रक्रिया स्त्रियांसाठी पुरुषांच्या तुलनेत अधिक कठीण होऊन बसते. जिथे मुख्यतः हेटरोसेक्शुअल समाजातल्या स्त्रियांचं लैंगिक स्वातंत्र्य मान्य केले जात नाही. तिथे समलैंगिक स्त्रियांची काय कथा? फेसबुकवरच्या समलैंगिकासाठीच्या ग्रुप्समध्ये पुरुषांची संख्या जास्त. शिवाय, त्यांचं व्यक्त होणंही त्या मानाने सोपं जिथे खाजगी समलैंगिक गटांमध्ये समलिंगी मुली किंवा महिला स्वतःची मतं मांडू शकत नाहीत. तिथे त्यांची प्रत्यक्ष जगताना किती घुसमट होत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

पण प्रश्न इथेही संपत नाहीतच. समलैंगिक नातेसंबंधात केवळ शारीरिक किंवा लैंगिक ओढच असते किंवा हे सेक्शुअल संबंधांच्या तुलनेत जास्त तरी असते, असा एक सूर नेहमी ऐकू येतो. ज्यात काही प्रमाणात तथ्य असलं, तरी समलैंगिक संबंध हे तेवढ्यापुरते नसतात. स्त्री–पुरुष नातेसंबंधांवर गर्भधारणा, मुळात स्त्रियांवर बंधनं जास्त आहेत. समलैंगिक नातेसंबंध अजूनही राजरोसपणे ठेवले जात नाहीत. त्याला विवाहाची मान्यता अजूनही नाही. कदाचित, यामुळे या संबंधाकडे पाहण्याचा बऱ्याच जणांचा दृष्टिकोन कॅज्युअल असला, तरीही दीर्घकाळ टिकणाऱ्या समलैंगिक नात्यालाही त्याच कसोट्यामधून जावं लागतं, ज्यातून हेट्रोसेक्शुअल जोडपी जातात. लैंगिक संबंध अजिबात नसलेली तरीही एकमेकांच्या आकंठ प्रेमात बुडालेली जोडपीही इथे आहेत. त्यामुळे एलजीबीटीक्यू समुदायाच्या नातेसंबंधाना या कारणामुळे हिणकस ठरवता येत नाही.

त्या सोबतच आजच्या पिढीने मागच्या पिढीतल्या चांगल्या गोष्टी जपायला हव्यात. टोकाचे निर्णय न घेता वादातून



सामंजस्याने मार्ग काढायला हवा. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करतानाच. प्रेमाचं कुठलंही नातं टिकवून ठेवायचं, तर त्यासाठी स्वतःहून प्रयत्न करावे लागतात. वेळप्रसंगी त्याग करावा लागतो, हे समजून घ्यायला हवं. प्रेम व्यक्त करण्याच्या तऱ्हा बदलतील; पण दिर्घकाळ टिकणाऱ्या नातेसंबंधातील पायाभूत मूल्ये मात्र बदलत नाहीत. हे लक्षात घ्यायला हवं थोडक्यात काय, तर जगाला 'अमन की ओर' नेताना हा मार्ग प्रेमाच्याच वाटेनं जातो आणि त्यात काट्याकुट्यांची वाटही येणार, हे समजलं तर जग सुंदर होणं फार दूर नाही.


***संदेश कुडतरकर, मुंबई***
*मोबाइल : ७७३८३९४०२३*


## आपुलकीचं आवाहन

सस्नेह नमस्कार,

ऑगस्ट २०१९ला साऱ्याजणीनं ३० वर्षं पूर्ण केली. त्यानिमित्तानं आम्ही 'मिळून साऱ्याजणी' ह्या आपल्या मासिकाच्या संदर्भात नवनवीन कल्पना आणि उपक्रम यांच्या योजना आखल्या.

आपल्या भोवतीच्या मुख्य प्रवाहाकडे, त्यातल्या गलबल्याकडे बघताना, आपला स्वर वेगळा आहे हे लक्षात येतंच आणि तो जपण्याचीही गरज भासते. ऐकणं, बघणं, वाचणं, बोलणं यांच्या बहुतेक पातळ्यांवर इतका दिखावा, पोकळपणा, उथळपणा जाणवतो की, तिथे थांबावंसं वाटत नाही. पण असं निरीक्षण फक्त नोंदवून काय होणार? या जाणिवेतूनच 'साऱ्याजणी' आपली भूमिका, आपला ध्यास, घट्टपणे जपण्याचा प्रयत्न करते आहे. त्यासाठी नवनवीन वाटा शोधण्याचा प्रयत्न करते आहे.

वाचकांनी स्वतःशी आणि परस्परांशी संवाद करावा यासाठी नवीन काही करू इच्छिते आहे.

विचार, संवेदनशीलता, सामाजिक न्याय, माणुसकी, समता या साऱ्यांचं अस्तर असणारं, विचार करायला लावणारं आणि तरी वाचनीय असं साहित्य सातत्यानं देता येईल, अशी आमची धडपड आहे. या सगळ्यासाठी साऱ्याजणीविषयी आस्था बाळगणाऱ्या तुमच्यासारख्या सर्वांची साथसोबत अतिशय आवश्यक वाटते. आपल्या परस्परांबद्दलच्या आपलेपणातून, म्हणूनच हे आवाहन करत आहोत की, 'साऱ्याजणी'च्या विकासासाठी, आहे ते सांभाळत, नाविन्याची भर घालण्यासाठी, तुम्ही जमेल तेवढा आर्थिक हातभार लावावा.

तुम्हा–आम्हामधल्या नात्यामुळेच या हातभाराला 'अनुबंध निधी' असं नाव दिलं आहे. आता विद्याताईंच्या निधनानंतर आणि कोरोना महामारीच्या संकटात तर आपल्या भरीव आर्थिक सहकार्याची अधिकच गरज आहे. ऐच्छिक प्रतिसादाची वाट पाहत आहोत.

**धन्यवाद,**
**गीताली वि. मं.**

# भिंती मोडून पडण्यासाठी... : अंजली पाटील

मुलाखतकार : श्वेता, काजल, नितीन । शब्दांकन : शुभम गुरव, संचिता खेबडे

**आपल्याला सगळ्यांनाच वेगवेगळ्या पातळ्यांवर अनेक छोट्यामोठ्या लढाया कराव्या लागतात. लढाया कुणाला चुकणार नाहीत पण** You need to choose your fights precisely. **जगण्यातल्या संघर्षाबद्दल बोलतांना फक्त बाहेरूनच नाही तर आतही डोकावून पाहणारी एक सशक्त विचारशील अभिनेत्री अंजली पाटील! नितीन, श्वेता, काजल आणि शुभम या तरुण मुलांनी अंजलीशी संवाद साधून तिच्या कामाविषयी, कामाकडे बघण्याच्या तिच्या दृष्टिकोनाविषयी, अनुभवांविषयी जाणून घेतलं. अंजलीही भरभरून बोलली, खुलेपणाने तिने तिच्या भूमिका मांडल्या. त्याच चर्चेचा हा सारांश इथे मांडला आहे. तुम्हाला नक्की आवडेल अशी आशा आहे.**

आज ऑगस्टचा सुमित्रा भावे मावशींवरचा विशेष अंक वाचल्यानंतर मला भरून आल्यासारखी भावना आहे मनात. सुमित्रा भावे, इरफान खान अशी लोक जेव्हा जातात, तेव्हा काहीतरी जवळच खूप वैयक्तिक गेल्यासारखी जाणीव होते. हे जे प्रेम आहे मावशींसारख्या लोकांवरचं ते व्यक्त होण्यापलीकडचं शब्दातीत आहे.

**अंजली, साधारणतः आतापर्यंतचा तुझा जो प्रवास राहिलेला आहे विशेषतः सिनेक्षेत्रातील त्याबद्दल काय सांगशील?**

मुख्यतः मी नाशिकमध्ये लहानाची मोठी झाले. माझं बारावीपर्यंतच शिक्षण नाशिकमध्येच झालं. त्यानंतर मी पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रामध्ये शिकले आणि नंतर पदव्युत्तर शिक्षण NSD( national school of drama) मधून झालं. खरेतर पदवीनंतर शिकण्यासाठी परदेशी जाण्याची इच्छा होती २-३ विद्यापीठांना apply पण केलेलं होत. मात्र मध्यमवर्गीय आर्थिक कुवतीमुळे थांबावं लागलं. खरेतर त्या सगळ्या संतापातच NSD ला गेले होते. २०१० मध्ये NSD मधून passout झाले दिगदर्शन, लेखन यामध्ये ज्ञान घेऊन. तेव्हा लगेच Delhi in a day नावाची एक फिल्म केली प्रशांत नायर यांच्या सोबत. २०११ पासून मग फिल्म्समध्ये काम करायला सुरुवात केली. मी जेव्हा camera समोर असते, तेव्हा तीच माझ्यासाठी safe place असते. माझं सर्वांत तरल-नितळ- सहज रूप camera समोरच असतं. पण ज्या पद्धतीने एखाद्या व्यक्तीवर खूप प्रेम केल्यानंतर त्या व्यक्तीला नकळत आपण आपल्याला इजा करण्याची संधीदेखील देत असतो, तसंच काहीसं नात माझं सिनेमा या माध्यमासोबत झालं- अनेक बरेवाईट अनुभव आले. Stereotyping होऊ लागलं, वर्णभेदाला तोंड द्यावं लागलं. या सर्वांतून बाहेर पडायला, सगळ्यांना माफ करायला काही काळ जावा लागला. सुरुवातीला वाटायचं की या क्षेत्रात यशस्वी होण्याकरता फक्त टॅलेंट महत्वाचं आहे आणि ते तर आपल्याकडे आहे की! परंतु टॅलेंट वगळता अनेक अदृश्य निकष कलाकार निवडीमध्ये असतात.

मग मधल्या काळात होणाऱ्या त्रासात तत्वज्ञानाचा अभ्यास सुरू होता-अद्वैत, बुद्धीस्ट. अहंकार गळून पडण्याचा- हळूहळू समर्पित होण्याचा प्रवास आहे हा. आता २०२१ मध्ये स्वतःची एक फिल्म कंपनी 'अनहट films' नावाने सुरू केली आहे. नुकतीच एक मी दिग्दर्शित केलेली documentary येतीये 'Nor a girl neither a woman' तर असा आहे एकंदरीत आजवरचा प्रवास!

**आतापर्यंतच्या तुझ्या कामातील तुला स्वतःला लक्षात राहिलेला रोल-भूमिका, की ज्या** identity **ओळखीमधून बाहेर पडायला तुला वेळ लागला? अशी कोणती भूमिका सांगशील.**

'With you without you' ही film होती, ज्यामध्ये मी एका तमिळ अल्पसंख्याक मुलीची भूमिका करत होते. या चित्रपटाच्या दिग्दर्शकानी अभिनयाच्या पातळीवर अक्षरशः मला सोललं. खूप सोलून-सोलून आतला गर काढला त्यांनी. तशीच हुतात्मा मध्ये सुद्धा खूप involvement होती. हुतात्माचं shoot घडत असल्याच्या काळात मी बाहेरचं जग बघितलेलंच नाही. १२-१२ तास अखंड shoot चालत असायचं. आम्ही त्या १९५०-६० त्या दशकाच्या पटात असू. मग बाहेर train मध्ये जरी बसले तरी मी आजूबाजूला बाहेर बघायचे नाही. विद्युतने असा मनावर खोलवर परिणाम केलेला आहे. पण



ती पण एक धुंद आहे– मजा आहे. सिनेमातील असे role करता येणं एक luxury आहे, दुसरं एक आयुष्य जगता येत. अर्थात, हे सगळं करत असताना सतत आजूबाजूच्या लोकांनी सांभाळून–समजून घेतलं.

**एवढ्या वर्षांच्या सिनेक्षेत्रातील कालावधीत तुला विशेष लक्षात राहिलेला एखादा प्रसंग सांगू शकशील का?**

हुतात्मामध्ये एक प्रसंग आहे, ज्यात विद्युत स्वतःला सुरीने इजा करण्याच्या प्रयत्नात आहे. तिचा संताप, अगतिकता, बापाच्या खुनाचा बदला न घेता आल्याची हतबलता तिच्यामध्ये आहे. तिच्या अंगावर रक्ताची ओकारी आहे अन् ती मनगटावर सूरी मारण्याचा प्रयत्न करतीये. खरेतर स्क्रिप्ट मध्ये २ ओळीचाच प्रसंग होता. पण त्या प्रसंगात मी इतकी विद्युत बनली होते की मी ती सूरी जोरजोरात टेबलवर आपटली. I tripped to the other side. समाजात सभ्य, civilised म्हणून वावरण्याचे मापदंड असतात. आपण एकमेकांच्या सोबत ते शहण्यासारखे वागत–बोलत असतो, पण त्या क्षणामध्ये मी माझं वेडेपण अनुभवलं, आणि केवळ मीच नाही सेटवरच्या इतरही लोकांनी ते अनुभवलं. I was feeling like I was naked, सगळ्यांसमोर कपड्यामध्ये असून मला नागवं असल्यासारखी भावना आली. मी पटकन उंदरासारखी दुसऱ्या एका खोलीत जाऊन लपले. त्यामुळे आजही हुतात्माच्या सेटवरील कुणालाही भेटताना मला तेव्हाच्या आठवणीने शरमल्यासारखं होतं, पण खरेच सर्वांनी मला खूप जपलं त्या काळात.

**तू सुरुवातीला म्हणालीस की थोडं शांत व्हायला, सगळ्यांना माफ करायला तुला वेळ लागला. आपणही आपलं आयुष्य जगताना पुरोगामी मूल्ये घेऊन, स्त्रीवादी भूमिकेतून विचार करून जगण्याचा कसोशीने प्रयत्न करत असतो. पण आपण ज्या context मध्ये जगत असतो त्या जागा तशाच असतात– विषम, पितृसत्ताक, शोषण करणाऱ्या... आपण या दिवाळी अंकातूनही 'अमन की ओर' म्हणतोय खरं, पण मग या विषम, पितृसत्ताक शोषण करणाऱ्या व्यवस्था तशाच असताना शांती कशी लाभणार? हा खरा प्रश्न आहे.**

जेव्हा मी बुद्धीस्ट फिलॉसॉफी शिकत होते तेव्हा माझं मी भयंकर दुःख घेऊन वावरत होते. हवे ते रोल न मिळणे, stereotyping या सगळ्याचं खूप दुःखाचा डोंगर डोक्यावर घेऊन मी चालत होते. मला दुःखाचं कारण शोधायचं होतं, बुद्ध पहिलं attraction होतं. कारण हा माणूस होता, देव नव्हता. याने उत्तर शोधायचा प्रयत्न केला होता– करुणा– दया– दुःख म्हणजे काय? यातून बाहेर पडायचा मार्ग काय असायला हवा. मग मी खूप साऱ्या गोष्टी सोडल्या, भणंगासारखी जगले, दोन वेळचं जेवण, झोपायला छोटी खोली, कमी गरजा हे सगळे experiment करत करत खूप साऱ्या गोष्टी कळल्या, खूप गोष्टी suppress पण केल्या. आता मागच्या काही महिन्यामध्ये समजतंय ambition नको नको म्हणून त्या खूप खोलवर दाबून टाकल्या गेल्या होत्या माझ्याकडून. पण आयुष्यात सगळ्या रसांचा अनुभव घेतल्यानंतरच तुम्हाला शांतता मिळू शकते. ज्या काही भावना आहेत disgust च्या– प्रेमाच्या त्या सगळ्या अनुभवल्याशिवाय पूर्णत शांत नाही होता येत. आणि एवढं सगळं झाल्यानंतर monastery मधली साधना केल्यानंतरही आजही कधी कधी अचानक उन्मळून पडल्यासारखं होतं, पण मी शांत राहायला शिकलीये. मी किती पाण्यासारखी मोठी होऊ शकते, सगळं काही व्यापू शकते.सगळ्याला सामावून घेऊ शकते. इरफान– सुमित्रा मावशी अशा मोठ्या कलाकारांनी एक प्रकारे हेच

केलं. त्यांनी स्वतःला एका अशा क्षितिजावर विस्तारले की ते जेव्हा गेले तेव्हा आपलं सुद्धा काहीतरी सोबत गेल्यासारखं वाटलं.

**तू भूमिका केलेले बहुतांश सिनेमे बघितले तर काहीतरी वेगळं देऊ पाहणारे असतात, वेगळी कथा असणारे असतात. एखादी स्क्रिप्ट वाचताना/ स्वीकारताना तू नेमका काय विचार करतेस?**

मला विशेष ह्या गोष्टीच वाटत की मी कधी ठरवून नाही प्रवाहाविरुद्ध गेले पण जेव्हा मी प्रवाहामध्ये गेले तेव्हा जाणवलं की ही चव माझ्यासाठी नाहीये. आपल्या प्रत्येकाच्या काही तरी आवडी निवडी असतात त्या आपण जपत असतो. मला कधीपण ३ तास फिल्मफेअर सारख्या event ला बसण्याऐवजी कधीपण कावळ्या-चिमण्याचं गाणं ऐकण्यात वेळ घालवायला आवडेल.

मला हे clear होतं की मला काही गोष्टी नाही करायच्या. मला परत जाणवलं की मला हे नाही आवडत, मला ह्याचा त्रास होतो, हे माझे प्राधान्यक्रम खूप कष्टाने, अनुभवातून स्पष्ट झालेले आहेत. हळूहळू समजलं की आपल्या निवडीच वेगळ्या आहेत. मी खुपसा स्वतंत्र सिनेमा केलेला आहे. लोक त्यावरून मजाक करायचे, क्या है तुम्हारी फिल्म release नहीं होती . पण मला छोटाच सिनेमा करायचा आहे माझ्या छोट्याच दुनियमध्ये मी छान आहे. जगणं, काम करताना ते किती quality चं आहे हे important होत गेलं. प्रवाहाविरुद्ध काम करायचं ठरवलं नाही पण ते होत गेलं, उमजत गेलं. आताशा असं होतं की काय करायचं आहे reels असेल किंवा अजून मी try करत असते नवनवीन काही. सुरुवातीला social media ला खूप resist केलं, पण काही काळानंतर हे सगळे पूर्वग्रह गळून पडले. आणि ठरवलं की ह्याला आपण ताकदीमध्ये कसं बदलू शकतो. असा स्वतः सोबत संवाद झाला आणि मग मोकळं मोकळं होत गेलं.

**तू कालामध्ये तुफानी म्हणून काम केलस. ती भूमिका अनेक युवांना भावली लक्षात राहिली. तुझ्या खऱ्या आयुष्यात तुझं व्यक्तिमत्त्व तुफानीच्या जवळपास जाणारं आहे असं वाटतं का?**

तशी मी खूप मितभाषी आहे. कदाचित NSD मध्ये असताना मी तुफानीसारखी असेल. पण films मध्ये काम करताना कळतं की मी खूप मितभाषी आहे. मी खूपदा शांत असते पण जेव्हा कधी जाणवतं की एखाद्या व्यक्तीचं वागणं खूपच hierarchial आहे sexist आहे तेव्हा मात्र मी शांत नाही बसू शकत. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःसाठी उभी नाही राहू शकत तेव्हा त्यांच्यासाठी उभं राहायला माझी कायम तयारी असते.

Systems च्या against मध्ये उभं ठाकणं आपल्यापेक्षा जे आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या दुबळ्या गटातून येतात त्यांच्यासोबत उभं राहणं खूप महत्त्वाचं आहे असं मला वाटतं.

**मेरे प्यारे** prime minister**, न्यूटन, चक्रव्यूह या आणि अनेक सिनेमात तुला सशक्त भूमिका मिळाल्या आहेत पण तशा** movies **मध्ये पण तरी काही काही ठिकाणी** typecasting **होत असल्याच भासत होतं, याबद्दल तू काय सांगशील.**

मला आधी वाटायचं की हे कोणतं दुष्टचक्र आहे की काय, की आपल्याला त्याच त्याच पद्धतीनं रोल मिळत आहेत. पण सोबत ज्या चित्रपटातून मी काम करते तिथे streotyping केलं मला जो काही त्रास व्हायचा तो यामुळेच. खूप वेळ लागला stereotyping ला strength म्हणून पाहायला. ज्या पद्धतीच्या भूमिका माझ्याकडे येतात, अनेक लोक त्या वंचित, शोषित समाजघटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भूमिका माझ्याकडे हक्काने घेऊन येतात ते पाहून अभिमान वाटतो. लोकांना मी त्यांच्यातीलच एक वाटते. हे माझं सतत काम करत राहण्याचं इंधन आहे.

**बॉलीवूड मध्ये तथाकथित जी सौंदर्याची चौकट बनवली आहे यावर तुझा अनुभव कसा आहे आणि यावर तुझं मत काय?**

**सिनेमा असो वा साहित्य, सौंदर्याची जी एक चौकटबद्ध व्याख्या केली गेली आहे, किंवा गोरेपणाशी जे काही** obsession **ह्या सगळ्यांमध्ये दिसतं त्याकडे तू कसं पाहतेस, ह्या संदर्भात तुझा अनुभव आणि मत काय?**

सौंदर्य म्हणजे स्वतः स्वतःला आवडणे. स्वतः स्वतःला आवडून घेण्याचा प्रवास खूप सुंदर असतो. आपण स्वतःला आवडायला लागलो की इतरांना सुद्धा आपण वेगळ्या दृष्टीने बघतो आणि पारंपरिक सौंदर्याच्या भिंती ( हे सुंदर आहे/ ते सुंदर नाहीये वगैरे) गळून पडतात. External validation ची गरज नाहीये. सौंदर्य हा attitude असतो. आपल्या आजूबाजूच्या लोकांचं हे शिक्षण झालेलं नसलं की मग मात्र अवघड होतं. मला एक गोष्ट समजली आहे आपण आपल्या आजूबाजूच्या समाजव्यवस्थेचे, कुटुंबव्यवस्थेचे victims आहोत. आपल्याला वेगळ्या वेगळ्या impressions मध्ये सतत दडपून टाकण्याचा प्रयत्न केला गेला आहे. जसं की मराठी मुलगी आहे तर ती hot- sexy असू शकत नाही, नव्हे तर तिने दिसू पण नये. तर या सगळ्या चौकटी मोडत आपण स्वतःच सौंदर्य आत्मविश्वासातून उभं करू शकू तर ते एक यशस्वी पाऊल ठरेल.

**अजूनही आपल्याकडचा** cinema misogynist **प्रवृत्तीत अडकला**

**आहे. बॉलीवूडच्या सिनेमांमधून स्त्रियांच्या शरीराचं** objectification **वेगळ्या वेगळ्या** item songs **मधून होत असत. एक कलाकार म्हणून तू आता येणाऱ्या** item **सॉँग्ज कडे कसं बघते?**

मला इथं बोलत असताना Buyonce Ketty Perry या US मधल्या pop singers माझ्या डोळ्यासमोर उभ्या राहतात. म्हणजे स्वतःच्या शरीरावरचा आपला अधिकार त्यांनी त्यांच्या गाण्यांमधून, choreography मधून वेगळ्या रीतीने व्यक्त केलाय, माझ्या मते ते आपल्याला ignore करून नाही चालणार. आपल्याकडे स्त्रियांना दोन टोकांमध्ये बघण्याची सवय लागली आहे ज्यामध्ये एका बाजूला तिला देवी, माता, भगिनी या प्रतिमेमध्ये अडकून टाकायची सवय लागलीय, किंवा थेट शारीरिक संभोगाचा साधन म्हणूनच दोन टोकांमध्ये ते बघितलं गेलंय, आपल्या समाजातील hypocricy मुळे. Cinema मधले मोठ्या मोठ्या समजल्या गेलेल्या दिग्दर्शकानी पण एक प्रकारे त्यांच्या अभिनेत्रींना त्याच त्या फ्रेममध्ये अडकवलं होतं. पॉप गायकांनी त्यांनी त्यांची feminity हत्यार म्हणून नाही वापरता express व्हायचं साधन म्हणून बघितलं. ही पण एक बाजू आहे याची हे मला आवर्जून सांगावं वाटतं.

**सिनेमाचे क्षेत्र विशिष्ट जात, जेंडर आणि वर्गाच्याच लोकांची मक्तेदारी बनलेलं आहे. इथे वंचितांचे आवाज खरेखरे चितारले जात नाही. ह्या सिनेमाक्षेत्राबद्दलच्या आरोपाविषयी तुला काय वाटतं? खरंच असं होतं का? होत असेल तर त्याचं विकेंद्रीकरण करण्याचे काही मार्ग दिसताहेत का?**

**सिनेमानिर्मितीच्या कार्यपद्धतीमध्येदेखिल वेगवेगळ्या उतरंडी आहेत-स्पॉट बॉय पासून** light **ते दिगदर्शक-निर्मातिपर्यंत. अर्थात आमचा यासोबत थेट संबंध कधी आलेला नसला तरी वेगवेगळ्या माध्यमातून बातम्यांमधून यावर चर्चा घडत असते. तू या उतरंडीबद्दल काय सांगशील आणि ही उतरंड बदलण्याच्या प्रक्रियेत तुझा काय सहभाग आहे?**

नाहीये, खरंच नाहीये हा खरेतर मोठा प्रश्न आहे. सिनेमा क्षेत्र वंचितांचे आवाज बनू शकलेलं नाही. प्रत्येक काम करणाऱ्याचा स्वतःचं असा comfort zone आहे, इंडस्ट्रीमध्ये त्यातून बाहेर पडून सिनेमे बनवताना कुणी दिसत नाही. OTT हा पण तसा उच्चभ्रू platform आहे. त्यामध्ये काही नवीन प्रयोग घडत आहेत मात्र ही उत्क्रांती हळूहळूच होणार आहे. atleast, माझ्याकडून मी असा प्रयत्न करेन की माझ्याकडून छोट छोटे याकडे घेऊन जाणारे बदल घडवून आणेन, ह्या role मधून भूमिकेतून या समाजघटकांना कसा न्याय मिळेल आपल्या set वर किंवा इतर ठिकाणी hierarchy मोडत जगणं मुक्त करण्याचाच प्रयत्न करते आहे. मग खरं तर याचं उत्तर नाहीये माझ्याकडे. तू एक खूप छान विचार करायला प्रश्न दिलेला आहेस.

मी सेटवर सगळ्यांसोबत बोलते. मी design ची विद्यार्थी असल्याने set decoration, sound, light हे सगळंच माझं आवडीचे विश्व आहे. मी त्यातील बारकावे समजून घेण्याचा प्रयत्न करते. आम्ही जेवणासाठी सगळे जण एकत्र बसतो. ह्या सगळ्या कृतींतून ही अंतर कमी करायचा माझा प्रयत्न निरंतर चालू असतो. मात्र काही hierarchy तुम्ही नाही बदलू शकत, त्यामध्ये खूप ऊर्जा जाईल. कुणीतरी बरोबर म्हणून गेलंय, we have to choose our own battles. थोड्या constructive धडका मारत राहाव्या लागतील, सातत्यपूर्ण प्रयत्न करावे लागतील तेव्हा या भिंती मोडून पडतील.

कालाच्या सेटवर असताना मी अशी यत्र तत्र सर्वत्र या हिशोबाने सगळीकडे बागडत असे.

**दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !**

**बी. के.**
**एन्टरप्रायझेस**

**२७ वर्षं ग्राहकांच्या सेवेत**

टि. सी. न्यूजप्रिंट कागदाचे तसेच व्हाईट,
कलर कागदाचे होलसेल व्यापारी

पत्ता : २३, पुनित अपार्टमेंट, ५२६, नारायण पेठ,
मोदी गणपतीसमोर पुणे - ४११०३०
फोन - २४४५५१९८ । २४४९२९४०

५००– ६०० लोक असणाऱ्या सेटवर मी कुठेतरी टेकडी–शिडीवर चढून यायचे, लोकांना नवल वाटायचं सिनेमाची lead actress अशी कशी फिरतीये सगळीकडे. रजनी सर पण आल्यानंतर विचारायचे कुठे कुठे भटकून आलीस– काय काय पाहिलेस. माझा एक child-like attitude आहे, तो मी जपते. लहान मुलाला काय जात, सशपवशी, वय तमा नसते या गोष्टीची. मग तेही लहान मुलाप्रमाणे आपल्याला समजून घेतात.

म्हणजे माझ्या नवीन documentry चाही विषय हा आहे 'neither a girl nor woman' सामाजिक अटी काय आहेत मुलगी असण्याच्या आणि बाई असण्याच्या. तर उतरंडी मोडण्यासाठी अनेकाविध बाजूकडून आपल्याला असे प्रयत्न करत राहावे लागतील.

**हुतात्माच्या वेळी आम्ही पाहिलं की संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा १९६०च्या दशकात तुम्ही एक विस्तृत पट उभा केला होता. डाव्या–उजव्या विचारसरणीचे या सगळ्या वेगवेगळ्या विचारसरणीच्या वैचारिक आंदोलनातील विद्युतचा प्रवासातून तू स्वतः काय शिकलीस?**

विद्युतचं कोणतंच political inclination कधीच नव्हतं, ती एक प्रकारे happy go lucky type मुलगी होती. बाबा दंगलीमध्ये मरतात, ती सुडाने पेटून उठते. ती डावे–उजवे असं काहीच न बघता, फक्त बदल्याच्या भावनेतून ती काम करत राहते. पण तो स्वातंत्रोत्तर काळ बघितल्यानंतर कळलं की साहित्यिक, तत्त्ववेत्ते विचारवंत अशी लोकं जगली त्या काळात. आणि ती लोकं या लोकांसोबत मांडीला मांडी लावून बसत होती, परखडपणे कुणाचं काय चुकलं हे सांगणारी होती. अभ्यासू logical argument करणारी लोकं होती. निरोगी संवाद व्हायचा उजव्या डाव्या सगळ्या बाजूंकडून, ते बघून मी थक्क झाले.

असं जाणोवलं की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण एक प्रकारे पिछाडलोय. एका वेगळ्या पद्धतीने राजकारणाचा, समाजाचा अभ्यास असणारी ही लोकं होती, वेगळ्याच नैतिक उंचीची ही माणसं होती.

आताच्या काळात कोणी कशाविषयी असं बोलू शकत नाही. Social media मुळे एक तोटा असा झालाय, कोणी अभ्यासचं नाही करत, लगेच कोणत्याही विषयावर प्रतिक्रिया देतात. आपण सगळे एक प्रकारे ट्विटरवादी झालोय. यात eco-chambers च्यामुळे संवाद हरवत गेलेला जाणवतोय.

***मुलाखतकार :***
***श्वेता, काजल, नितीन***
***शब्दांकन: शुभम गुरव,***
***आटपाडी जि. सांगली***
*मोबाइल : ९०९६०१९१६९*
***संचिता खेबडे, मंचर जि. पुणे,***
*मोबाइल : ७२१९१६७००५*

❀❀❀



दिवाळी २०२१
अवघ्या महाराष्ट्राचं पाक्षिक
संपादक : **प्रदीप खेतमर**
**पुणेपोस्ट**

मान्यवर लेखकांच्या दर्जेदार साहित्याचा **नववा दिवाळी अंक!**

- **शोध : जी.ए. आणि नेमाडे : जी.ए. कुलकर्णी** यांच्या कथाविश्वातील स्थळं आणि पात्रांचा शोध घेतलाय **वसंत आबाजी डहाके यांनी**; तर **भालचंद्र नेमाडें**च्या देखणीतलं विचारसौंदर्य शोधलंय **डॉ. अजय देशपांडे** यांनी.
- **अस्वस्थतेचा हुंकार** : अफगाणिस्तानातील अस्वस्थ परिस्थितीचा आढावा घेताहेत **लक्ष्मीकांत देशमुख**; तसेच सध्याची कोरोना परिस्थिती, जगावरील युद्धाचे सावट आणि अस्वस्थ मानवी विश्वाचा हुंकार व्यक्त करताहेत **पी. विठ्ठल,** महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीवर परखड भाष्य केलं आहे **प्रदीप खेतमर** यांनी.
- **दोन मुलाखती** : प्रसिद्ध छायाचित्रकार **सतीश पाकणीकर** यांची **प्रदीप खेतमर** यांनी घेतलेली मुलाखत, तर विदर्भातील व्रतस्थ कवी आणि 'सर्वधारा' नियतकालिकाचे संपादक **डॉ. सुखदेव ढाणके** यांची **प्रा. भगवान फाळके** यांनी घेतलेली मुलाखत.
- **स्फूर्तीकथा** : भारतरत्न **नानाजी देशमुख** यांच्यावर लिहिताहेत **प्रा. दिलीप जोशी**; राजकारणी व समाजसेवक **ना. बच्चू कडू** यांच्यावर लिहिले आहे **अमृता खेतमर** यांनी; तर उद्योजक **प्रमोद बल्लाळ** यांच्यावर लिहिताहेत प्रदीप खेतमर.
- **कथा विभाग : चंद्रकांत भोंजाळ, वसंत वाहोकार, अशोक कोळी, हिम्मत पाटील** आणि **विजय खाडिलकर**
- **मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी** यांचं अर्थपूर्ण पेंटिंग

- मराठीच्या अभिजातभाषा दर्जाच्या अडथळ्यांवर जळजळीत भाष्य केलं आहे **प्रतिक पुरी** यांनी.
- **'जर्मनी झिरो अवर'** या प्रसिद्ध इटालियन सिनेमावरील **नंदू मुलमुले** यांचा रंजक लेख.
- **मान्यवर कविंच्या कविता**

सर्वत्र उपलब्ध किंमत १५०.०० रुपये

- **अंकासाठी संपर्क : ७७२२००५०८१** | PhonePe G Pay **9552340167** Pradeep Khetmar
- Oniline, PhonePe आणि Google Pay द्वारे अंकाची रक्कम भरून आपली मागणी नोंदवा.

## आपण

समस्त मानव इतिहास
विसावा घेऊन घेऊन
थरथरत असतो स्वकर्तृत्वाने
आपल्याच हृदयातून, ओठातून
अन् सांगायच्या राहून गेलेल्या किंवा जाणीवपूर्वक ठेवलेल्या
कथानकातून

किती तरी हत्याकांड सतत चालू असतात
आत आणि बाहेरही
दोन्ही समांतर विश्वामध्ये
इथे कत्तलींचा आणि आत्महत्येचा खरा मानसन्मान आहे
म्हणून हत्याकांड आपल्याला
सर्वसामान्य आणि सहज वाटतात

तुमच्याच यातना, दुःख,
कष्ट आणि सुख
सगळे क्षणात तुमच्यापासुन वेगळे होतात
जेव्हा माणसांच्या श्वासात ऑक्सिजन कमी
अन् धर्म नावाच्या अफूच्या धुराचे लोट विहरत असतात

माझा सतत प्रयत्न असतो
सगळ्यांनी प्रेमाने, आनंदाने राहावं
म्हणून मी दैवत्व नाकारून
कुनबी होत राहतो जन्मोजन्मी
मायेची झाडं लावायला आणि प्रेमाची
फुलं वाटायला

मास्तर–गुरुजी,
अध्यापक–प्राध्यापकांनी



या समाजाला प्रेम करायला शिकवण्याची
आता वेळ आली आहे
कारण समाजामध्ये जाती–धर्माच्या हवाल्याने
फिरणारे काही निर्बुद्ध जीव मोकाट सुटलेत
समतेचं रान उद्ध्वस्त करत
लोकशाहीच्या पिकाची नासाडी करत
त्यामुळे आपल्याला बेसुमार, बेभान होऊन प्रेम केलं पाहिजे
पाहणारे, ऐकणारे आणि ऐकवणारेही हैरान झाले पाहिजेत
की, खरंच इतकं प्रेम ही करता येऊ शकतं?
हा विचार करून

आणि मग वेळ येईल
तोफा, गोळ्या आणि बंदुकांची
या बंदुकांमध्ये दारू नाही
तर भरले जातील अनेक रंग नकळतपणे
जेव्हा डागवले जातील बॉम्ब आणि गोळ्या
तेव्हा नाश होणार नाही
रक्तपात होणार नाही
आकाशात आगेचे लोट उठणार नाहीत
जमीन फाटणार नाही
घरकुल पडणार नाहीत
आणि खूनही होणार नाहीत
तर या बंदुका रंग उडवतील
आणि मग उत्सव होईल रंगाचा
अगदी प्रेमाने

मग माझ्याचसारखा अजून कोणीतरी येईल
या समाजाला प्रेम कसं करायचं हे शिकवायला
पुन्हा नव्या पद्धतीने
नवीन प्रकारे
प्रेम करायला
शिकायला आणि शिकवायला
म्हणून सगळ्याच माणसांनी आणि आपणही
प्रेम पेरत राहू, फुलवत राहू आणि वाटत राहू
ही दुनिया प्रेममय होईपर्यंत
लाल नाही तर गुलाबी होईपर्यंत

***निलेशकुमार, बीड.***
*मोबाइल : ८८५६८५८२७२*

## बापाच्या कान्फाडात आवाज काढून चुरगळतो स्वप्न

बापाच्या कान्फाडात आवाज
काढून चुरगळतो स्वप्न
आकड्यांच्या गिणतीत पैशाची चटक
मुरमुरते तिनसांच्याला तोंड खोलून

छाती फुगवत बोल्तो
माझी सोताची खोलीय
छातीच्या फुग्याला टाचणी मारून
मी ग्यान देतो–
फोदरीच्या बापाची इष्टक तुझं काय
कौतुक
फुकटच्या कर्तृत्वाला लागतो
उभा घोडा त्यानंतर
डोळ्याला डोळा मिळत नाय जरासुद्धा

आयशीला रांड म्हणत अर्धी



लाकडं मसनात पोचली
स्वाभिमानाला कांडी लावत तिनं
मानडोळे जमिनीला लावले
मातीचा मुका घेत
घराच्या कणगी भरल्या

शेणातले किडे शेणात राह्यले नाय
बापानं घर खाऊन घराचे वासे खाल्ले

बापाच्या कान्फाडात आवाज
काढून चुरगळतो स्वप्न

पोट भरता येत नाय साधं आपल्याला

बढाईखोर स्वप्नांच्या वाट्याला डोळे
जायला भितात अक्षरशः

***प्रदीप कोकरे, मुंबई.***
*मोबाइल : ९८१९२४५९७२*

❀❀❀

तुला सगळं कसं रोडटच हवं
तुझं माझं प्रेम
फुफ्फुसात गुणगुणलेली गाणी
सगळी सगळी झाडं
सगळी स्वप्नं
भलीमोठी दुकानं भलेमोठे दगड
त्या दगडावर बसलेला पक्षी

त्यापेक्षा मला सगळं कसं दूर दूर
आडोशाला
माझी कुठलीच वाट येऊ नये कुणाच्या
पायाला
माझं प्रेम इथून इथल्या कुण्या कुठल्या
ओढ्यात पक्षी नुकतं पीस सांडलेला
माझं गाणं घेऊन एक वारा डबडबून
झाडापाशी थांबलेला
माझं कुठलं दुकान? कुठली वस्तू?
तुझे हळवे तळहात तरी किमती गोंजार तू
भल्या मोठ्या दगडावर पक्षी असेलही
तुझ्या असल्या हट्टात माझा एक आवंढा
फसेलही

पण त्यानंतर उगाचच खोटा खोटा पूर येईल
माझं खरंखुरं घर तुझ्यातून वाहून नेईल...

तरीही,
तुला सगळं कसं रोडटच हवं

***विजय बेंद्रे, अंबरनाथ***
*vjbendre46@gmail.com*

❀❀❀



ऐक ना,
प्रेमात असशील तर
अवघडू नकोस
बिंधास्त सांग
'माझं प्रेम आहे'
मला सांगायची हिंमत नसेल तर,
एखाद्या झाडालाच सांग
किंवा मलाच समज बहाव्याचं झाड
सांगून टाक
कारण, सांगणं गरजेचं असतं
गरजेहूनही एक कण जास्त
असणं हेच खूप आहे
खूप असणं हे गरजेचं नाही.
स्वत:ला पूर्ण ओळख
आपल्या भावना व्यक्त कर
त्यांना चंद्राच्या नजरेतून न्याहाळ,
नजरेला दे एक क्षितिज
त्याही पलीकडे आणखी दूर बघ...
सगळ्यात एकटा तो असतो
जो प्रेमात एकटा असतो,
सांगतांना असं सांग
की चांदण्याही त्याला जवळच्या वाटतील.
क्षितिजाच्याही पलीकडे बघतांना जेव्हा पापण्या
फडफडतील
तेव्हा त्यात पसरून दे स्वत:चा एकटेपणा
आणखी एकटा हो



कारण आणखी एकटं होणं चांगलं आहे
निव्वळ एकटं असण्यापेक्षा
मनात ठेवू नकोस
सांगून टाक
'माझं प्रेम आहे'
मला सांगायची हिंमत नसेल तर
एखाद्या झाडालाच सांग
किंवा मलाच समज चिनारचं झाड
झाडांना आपलं गुपीत सांगणं
ही प्रथा आहे
म्हणूनच तर ते असतात इतके शांत
हजारों आवाज पिऊन चिडीचूप
जणू काही ही एक परंपराच आहे
तुझ्या डोळ्यांत मला दिसतेय
हताश पक्ष्यांची परतलेली उदास संध्याकाळ
त्यांच्यासाठी मी बनेन घरटं
तुझ्या कानातले निळे डूल
नद्यांच्या झोपेत थिरकतात
त्यांच्यासाठी मी बनेन तरंग
तू जेव्हा प्रेमात असशील
आणि तुला ते सांगावसं वाटेल
तेव्हा मी बनेन गुलमोहर!

**सुशोभित सक्तावत**
*अनुवाद : इंद्रजित उगले, बीड*
*मोबाइल : ८९८३६४४२३४*

भिंतींना आलिंगन देता येत नाही
फारफार एकांगावर पडून त्यांच्यावर
नजर रोखता येते
खोलीकडं पाठ करून
अंगावर येणारा अवकाश थोपवून
धरता येतो.
डोळ्यांची किनार ओलांडून
उशीवर पडणाऱ्या आसवांच्या थेंबात
स्वातंत्र्याची हौस बुचकळून काढता
येते.
एकटं वाटणं अपरिहार्यच्या यादीत
पुन्हा पहिल्या स्थानावर येतं.
भीती दावणारा प्रत्येक क्षण सोसून
झाल्याचं कोडगेपण
पुन्हा न भरलेल्या जखमेसारखं
बिलबिलीत होतं.
मऊ मऊ शब्दांवर घर पोसणाऱ्या
कवींचं
कौतुक वाटतं अशावेळी.
ताप भरल्यावर लापशी भरवणारं
सतत असतं त्यांच्याजवळ कुणीतरी
नाहीतर
एकांगावर पडून
भिंतीशी बोलत असतो विद्रोही...

***योजना यादव, पुणे***
***मोबाईल : ९५७९७६०१२३***



# मी प्रवासी मुक्त अस्तित्वाची

प्रणाली चिकटे

**गेल्या दहा महिन्यांपासून प्रणाली या एकवीस वर्षीय तरुणीने महाराष्ट्रातील सायकलवरून तीस जिल्हे आणि चौदा हजार किलोमीटर पेक्षा जास्त अंतर धुंडाळून काढलं आहे. हा प्रवास तिचा एकटीचा आहे. सोबत भौतिक सुख ज्याला म्हणतात अशा कोणत्याही गोष्टी सोबत नसताना तिने केलेल्या या प्रवासाची गोष्ट. तरुणाईमध्ये प्रवासाची क्रेझ असते, पण प्रवास म्हणजे भटकंती ही नव्याने व्याख्या प्रणालीने रुजू केली आहे.**

मी प्रवासी मुक्त अस्तित्वाची म्हणत, शेवटी, सर्वांना आश्चर्य वाटेल असा प्रवास सुरू केला. मनाचं स्वातंत्र्य म्हणून आयुष्यात पहिल्यादांच स्वतःचं एक छोटं स्वप्न पूर्ण केलं; जे इतरांसाठी धक्कादायक होतं... ते म्हणजे सुंदर असे माझे लांब केस कापले आणि स्वतः ला मुक्त केलं. १४ ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळालं आणि १५ ऑगस्टला भारत स्वतंत्र झाला असे संपूर्ण जनतेला घोषित करण्यात आले होते. याच विचाराने अनेक दिवसांपासून अस्वस्थता होती, मला कुठल्याही गोष्टीसाठी स्वातंत्र्य नाही आहे असे वाटायचे, आतल्या आत युद्ध सुरू होतं, आपल्या मनाला हवं तसं करता येत नाही; पण आता करणार, स्वतःला आवडते ते जपणार असं मनाशी ठरवत म्हणून मीसुद्धा १४ ऑगस्टला केस कापले आणि १५ ऑगस्टला – माझे केस, माझे शरीर, माझी आवड आणि माझा निर्णय म्हणून स्वतःला मनाचे स्वातंत्र्य देत कुटुंबाला, मित्रमैत्रिणीना घोषित केले. खरं तर हे आपल्याला मजेशीर वाटेल किंवा कोणाला यात काय तथ्य वाटणार नाही.

परंतु इथूनच माझा खरा प्रवास सुरू झाला, प्रत्येकाच्या आयुष्यात बदल घडवणारा कुठला तरी प्रसंग, परिस्थिती असते. बंडखोरपणा असतो. बघायला गेलं तर अपवाद सोडल्यास समाजातील अनेक मुलींना कुटुंबाच्या, समाजाच्या चौकटीत, अनेक गोष्ट करण्यापासून तर केस कापणे इथपर्यंत मर्यादा असतात, कोण काय म्हणतील चार भांडगळी. शेवटी केस निसर्गाने मुलीला दिलेली सौंदर्याची देणगी आहे, तरीही शेवटी आवड आणि व्यक्तिस्वातंत्र्य हे सुद्धा निसर्गाने माणसाला बहाल केले आहे हे विसरून चालणार नाही. नंतर केस कापल्यावर १५ ऑगस्टलाच माझं दुसरं स्वप्न पूर्ण केलं ते आयुष्यात एकदा तरी, खूप अंतर नाही तरीही चंद्रपूरवरून मला माझी नवीन सायकल 'इको फ्रेंड', जिला मी पै पै जमा करून घेतली, तिला गावाला घेऊन जायचं होतं. सकाळीच ५:३० वाजता मी निघाले, त्यादिवशी खूप धो-धो पाऊस होता, भर पावसात मी सायकलने गावाला गेले. घरच्यांना त्यादिवशी धक्काच बसला होता. 'बाप्पा, पोरगी तेव्हड्या दुरून सायकलनी आली आणि तेही केस कापून.' मला शिव्या देत आई-बाबा फक्त हसले. कारण त्यांच्या प्रश्नावर माझे उत्तर म्हणजे, माझे आयुष्य, माझे जंगल (केस) मी काही करेल, चुकीचे काहीच केले नाही मला तेवढे स्वातंत्र्य आहे. मी बंडखोरपणा करत सर्वांचे मन जिंकले. आणि इथून खरा सायकल प्रवास सुरू झाला म्हणायला हरकत नाही...

रोज पाहत होती अनेकांचा लढा अनेकांशी. फॉर्मलिटी जग त्यात, स्पर्धेचे जग, मी स्वतः कॉलेज शिकत असतांनापासून कधीच स्पर्धेत उतरली नाही. मला स्पर्धा कधी आवडलीच नाही. कारण मी कायमच स्पर्धेतून नेतृत्व घडताना पाहिलं जे अपवाद असे नेतृत्व सोडलं तर ते वास्तवात आहे. नाहीतर अनेक नेतृत्व करणाऱ्यामध्ये स्पर्धेतून ईर्षाच पाहिली आहे. स्पर्धा आपण बघतो कसं आणि काय आत्मसात करतो तेही तितकंच महत्त्वाचं वाटायचं. पण मला कायम स्वतःशी स्पर्धा करणे आवडले. या जगाच्या स्पर्धेच्या, उपभोगवादी जगात, मी का अस्वस्थ होती मला माझेच कळे ना...

व्यावसायिक समाजकार्याचं शिक्षण घेतले. शिकत असताना, झोपडपट्टी भागात काम केले. ते करत असताना कायम श्रीमंत-गरीब दरी पाहिली. गरजांचा आवाका पाहात असताना माझ्या नजरेत पर्यावरणाचा ऱ्हास दिसत होता. आणि ही दरी मी स्वतःच्या परिस्थितीशीही रिलेट करत होती. डोक्यात भूत होतं की समाजसेवा वगैरे करावं पण, नंतर-नंतर कळत गेलं हे. खरं तर समाजसेवा शब्द आज घडीला भुरळ पडणारा आहे. त्यातल्या त्यात अपेक्षेनुसार शिकता येत नव्हतं. मी काय शिकत आहे? मी स्वतःला नेहमी प्रश्न विचारायचे. स्वतःकडून कायम कन्फ्युजन होतं. कसलातरी आत त्रास होत होता. पण कळत नव्हतं कसला त्रास होता. बऱ्याच वेळा वाटायचं मी कुठेतरी निघून जावं. मी अंधाराला घाबरणारी पोरगी तरी, मला असं वाटायचं की मी जंगलात निघून जावं, अचानक प्रश्न पडायचा मी निघून गेली तरी रात्रीच जंगलात कसं करणार. कधी हिंमत झाली नाही की कुठे बाहेर निघून जावं. सायकलने बराच



भाग एकटीच कधीकधी फिरत राहायची. आणि कितीतरी वेळ आरशात पाहून नुसता विचार करायची. कृती मात्र शून्य होती. या शून्य कृतीनेच मला विचार करायला भाग पाडले? विचार आणि बोलून काय उपयोग? पुढे काय, मग मनात अस्वस्थता असताना, व्यवसायिक समाजकार्याच्या पदवीची फायनल एक्झाम होऊ दिली आणि तशीच लगेच बाहेर पडले.

कुठलाही विचार न करता नियोजन न करता, मी प्रवासी मुक्त अस्तित्वाची म्हणत स्वतःच्या अनेक प्रश्नांच्या शोधात शेवटी मी सायकलने एकटीच अख्खा महाराष्ट्र भ्रमण करायचं ठरवलं आणि प्रवास थेट सुरू केला. इथे मी चौकटी तोडल्या. मी मुलगा आहे किंवा मुलगी असा विचार न करता, मी माणूस म्हणून स्वतःच्या प्रश्नाचा आणि अस्तित्वाचा विचार केला. मला पुस्तकाच्या पलीकडलं जग शोधायचं, बघायचं आहे, माणसं वाचायची आहे. आणि ठरवलं आपल्या समाजातील प्रत्येक घटकाशी आणि निसर्गाशी बोलत जायचं आहे. माणुसकीचा अनुभव घ्यायचा म्हणून सायकल हे संवादाचं माध्यम असून, पर्यावरण पूरक असं साधन आहे. हे लक्षात घेऊन निघाले.

सुरुवातीला अभ्यास करायचा म्हणून वर्ध्यात गेले. पण मी अस्वस्थ होते, पर्यावरणाच्या ऱ्हासाला आणि भोगवादी जीवनशैलीला घेऊन, एका जागेवर स्थिर राहणे मला असह्य होत होते, मग सायकल घेऊन काही गावात फेरफटका मारत होते. त्यानिमित्ताने लोकांशी बोलणे व्हायचे. नकळत आत्मविश्वास वाढत गेला. एक मुलगी असा प्रवास करते म्हणून माझ्या समोर काही पुन्हा प्रश्न येत– 'तू फिरते एव्हडी एकटी, तुला भीती नाही वाटतं? तुला घरून परवानगी कशी दिली? लोक फार वाईट आहे बरं का जरा सांभाळून प्रवास कर...' मला आतून वाटलं किती भीती आहे अनेकांच्या मनात किती जटीलता. तिथून ठरवले वर्धा जिल्हा भ्रमण करू नंतर नागपूर, विदर्भ फिरू आणि नागपूर वरून ठरवले की, आता महाराष्ट्र फिरायचं...

फिरून काय करायचं हा प्रश्न स्वतःलाच आतून आवाज देत होता– प्रणाली हा प्रवास नुसता फिरण्याचा नाही,

हा प्रवास आहे स्व अस्तित्वाचा
प्रवास आहे, स्वजागृतेचा
प्रवास आहे, स्त्रीमुक्तीचा
प्रवास आहे, स्व–अनुभूतीचा
प्रवास आहे, दिखावं जग समजून घेण्याचा,
प्रवास आहे, दाखवण्यापेक्षा मुक्त जगण्याचा...
प्रवास आहे, भाकरी पलीकडची माणुसकी अनुभवण्याचा...
प्रवास आहे, मायबाबाच्या कष्टाचं मोल शोधण्याचा...
प्रवास आहे, निसर्गाशी संलग्न होऊन प्रेम देत, कर्म करत, स्वतःला समृद्ध करण्याचा...

मला वाटतं आपण आपल्या शोधात कधीतरी बाहेर पडलंच पाहिजे. १० महिन्यापासून फिरत आहे. कुठलंही नियोजन न करता, फारसा विचार न करता. माझ्या प्रवासाला निघाली आहे.

ते म्हणतात ना, 'लोग मिलते गये, और कारवा बनता गया...' असं माझ्या प्रवासाच्या बाबतीत झाले. लोकांना भेटत गेले, बदलती जीवनशैली, विनाशकारी विकास त्यातून होणारा पर्यावरणाचा ऱ्हास आणि यातून होणाऱ्या वेगवेगळ्या समस्या याबाबात लोकांशी बोलत गेले. लोकांना ते पटत होते. लोक सहकार्य

# अमन की ओर
## (प्रेमाला पर्याय नाही)

करू लागले. पुढे अनेक प्रश्न येऊ लागले. मी भित्री मुलगी, कुठून आत्मविश्वास येत होता मला माहिती नाही, पण बेधडक न घाबरता लोकांना उत्तर द्यायला लागले. पोटतिडकीनी सांगायला लागले, आमचे भविष्य कठीण आहे. आमचे भविष्य वाचवायला हवे.

भविष्य वाचवायचे म्हणजे काय, तर बदल भोगवादी जीवनशैली, शाश्वतेकडे वळवणे, वैयक्तिक पातळीवर बदल करणे. अनावश्यक गरजा नको, पाणी वाचवा, झाडे जगवा. झाडे लावण्यासोबत झाडे तोडणार नाही, यासाठी प्रयत्नशील असावे. विजेचा अनावश्यक वापर टाळावा. पाण्याचा अपव्यय नको करायला. रोज पोटात रसायन जातंय, त्यातून नवीन आजाराला सामोरे जातोय, मग आरोग्य हीच संपत्ती म्हणतो आणि भौतिक संपत्तीच्या नादात माणूस जगण्यासाठी लागणारीच संपत्ती भस्म करत चाललाय. हे कुठंतरी थांबायला हवं हे 'कोरोनागुरू' शिकवून जातोय हे लक्षात घेणे काळाची गरज आहे.

सुरुवात स्वतःपासून म्हणत, आपण प्रयत्नशील असायला पाहिजे. वणवा लागला आहे, पळून जाणाऱ्याच्या यादीत आपले नाव नोंदवण्यापेक्षा, चिमणीकडून शिकवण घेत जबाबदारीने तत्पर होऊया.

लोकसहभागाशिवाय कुठलंही काम अशक्यच...

माझा प्रवास अनेक सामान्य मुलींच्या चौकटी तोडू शकतो, असं मला वाटते. शेवटी, पर्यावरण असेल तर आपण असू आणि चौकट तोडता येईल.

***प्रणाली बेबीताई विठ्ठल चिकटे.***
*मु. पो. पुनवट, ता. वणी, जि. यवतमाळ*
*मोबाइल : ७०२०७४०६६०*

# ठसन

## अविनाश उषा वसंत

**अविनाश उषा वसंत या तरुण लेखकाच्या 'ठसन' या आगामी कादंबरीचा अंश**

**पहिला भाग**

''ओ पवार, कदम दहा रुपये द्या. रिझल्ट आलाय तुमच्या पोरांचा'', पोस्टमनने चाळीच्या खालूनच आवाज दिला. बातमी वाऱ्याच्या वेगाने पसरली. नववीच्या वर्षाचे चेमल्या आणि हवाने जेवढा धिंगाणा घातला होता, त्याने चाळीत दोघेही फेल होतील याची पूर्ण गॅरंटी होती. तसेही ते 'ड' वर्गात असल्यामुळे कुणाला काय घंटा फरक पडणार होता, शिक्षणव्यवस्थेत उतरंड ड वर्गातली पोरं लफडी करणार.

रिझल्टची बातमी वेगाने पसरली असताना चेमल्या आणि हवा गच्चीत डबलला बसले होते. म्हणजे ते स्वतः नाही जॉकी बसले होते. हवा आणि त्याच्या बापाचा जॉकी बसला होता. तर चेमल्या पचीचा जॉकी बसला होता. दोघांचा गेम ह्या उन्हाळ्यात कमालीचा सुधारला होता. असा कोणताच दिवस जायचं नाही दोघांनी कोणाला जिंकू दिले नाही. प्रत्येक गेममध्ये दोघांपैकी एक वाटणीला यायचा. म्हणून अशी चर्चा चालू होती की, दोघे चिटिंग करतात. खुणवाखुणवी. एकमेकांपैकी चांगला गेम असेल तर समोरचा गप्प पॅक करतो. जोवर इन येत नाही तोवर समोरचा गेम दाखवत नाही. पण याचे कोडे कोणी सोडवू शकत नाही. सहा जणात रमी चालू होती. तीन गेम झालेले. सगळ्यांचाच स्कोअर ५०च्यावर होता. पहिला पान हवाला मिळणार होते. पानं वाटून झाली. एक जोकर होता. वरून बदाम सत्ता होता. हवाला चांगली गेम होती. एक सिक्वेन्स आणि जोकर होता. तरी हातात चाळीस पॉईंट होते. चेमल्याने हळूच पाय दाबला. एकदम विचारात गुंगून गेला. बाकी लोक ओरडायला लागले. ''भोसडीच्या अरे बुद्धिबळ खेळतो का? आता विश्वनाथन आनंद झाला का तुझा? एवढा का विचार करतो? चल, नाहीतर पॅक हो.'' हवाने गंभीर मुद्रा करून डायलॉग मारला 'गेम आहे रे! पण पॉइंट आहे पॅक करले.'

हवाचा बाप बोलला, ''हांडग्या पॅक करायला खेळायला लावतो का? चांगला गेम असेल तर पॅक करतात का?''

हवा लगेचच बोलला, ''कोणत्या टायमाला कोणता गेम खेळायचा आहे कळत नाही तुम्हाला. नाहीतर पाठीमागच्या टावरमध्ये आपला फ्लॅट असता!'' सगळे हसले. हवाचा बाप एकदम शांत झाला आणि मग बोलला, ''लय शहाणा झालाय तू. पुढचा गेम लागतच नाही तुझा.''

''या महिन्यात ३५० रु. प्लस करून दिलेत. मागच्या महिन्यात चारशे मायनस होता तुम्ही. गप्प बसा. आता खुर्ची सरकवा.''

पुढचे फंटर बोलले, ''ये चेमल्या आता तू गॅरी कॅस्पोरोव्ह हाय का?'' चेमल्या बोलला, ''अरे खाली, काही तरी गोंधळ चालू आहे.''

तिकडं फंटर बोलले, ''तू खेळ रे नाहीतर रमीपुढे आपण नतमस्तक व्हायचं नाहीतर पान फिरतात. मग ढूस व्हायला होतं.''

चेमल्याच्या हातात एक सिक्वेन्स होती. ती पण फोर कार्ड प्युअर होत्या. परफेक्ट खाच्यात बसलेले दहा पान क्लिअर होती. हातात दोन सत्ते होते आणि एक बदामचा छक्का. चेमलेला वरचा बदाम सत्ता लागत होता. बदाम छक्का पॅक करायचा होता.

चेमल्याने बदाम सत्ता घेतला. दहा वेळा पान नुसतं हिकडं तिकडं फिरवली. बाकी फंटर लोकांनी चुळबूळ सुरू केली. चेमल्याने एक पत्ता पॅक केला आणि गेम दाखवला. इस्पिक राजा, राणी, गुलाम दस्सा फोर कार्ड. चौकट सत्ता, पंजा आणि एक्का. किलवर राणी गुटू, फंटूश. बदाम सत्ता, इस्पिक सत्ता, किलवर सत्ता.

चेमल्या ओरडला, ''हँड भावा हँड... चला, मोजा मी पान गोळा करतो. चला, लवकर लवकर मांजा खाली करा.''

तेवढ्यात सुशा गच्चीवर आला. ''अरे, चेमल्या चल घरी तुझी आई लय रडतीय. शेजारची बीबीसी म्हणाली की, पोस्टमन येऊन गेलाय.'' चेमल्या बोलला, ''खपलं वाटतं कुणीतरी.'' तेवढ्यात सुशा बोलला, ''हवा तुला पण आई शोधतेय.'' हवा पॅक होता, म्हणजे २० पॉईंट होते. तो वाचला. दोघांनी मांडवली केली. निम्मी वाटणी केली. त्याने चेमल्याला १० रु. दिले. हवाने सगळे ३५ रु. स्वतः जवळ ठेवले. बापाला दहा रुपये दिले नवा डाव खेळायला. दोघेही गच्चीतून खाली

उतरले.

चेमल्या हवाला बोलला, ''अरे, आमच्या घरी नेहमी गावाला जायच्या पिशव्या भरलेल्या असतात. आईच्या डोळ्याचा पाना कधी थांबतच नाही. मला लई कंटाळा आलाय आता गावाला जायचा. आमचा मोठा सुमडी जीव घेतो. गावाला नुसतं कामाला जुंपतो.''

हवा, ''तू काळजी करू नको. तू नको जाऊस इकडेच थांब. मी तुला जेवणाचं ताट देतो जे असेल ते खावं लागेल. तुझी नाटकं नाही चालणार. तिखट, आंबटशीळ आहे जे असेल ते खावं लागणार.''

''चालेल रे! पण गावाला नको. गावची पोर लय माजुरडी असतात. त्यांना वाटत पोरगं मुंबईतून आलंय म्हणजे मुंबईत लय मजा करतंय. म्हणजे लय पैका असतील. बॅट असंल, बॉल असंल लय लय. मागे दादरच्या ब्रिजमधून शाहरुखचा 'कुछ कुछ होता है'चा गोल गळ्याचा टीशर्ट घालून गेला. टीशर्ट होता ४० रु.चा. गावात मला सगळे शाहरुख बोलाय लागले. त्यांना वाटलं शर्ट लाखाचाय आणि मुंबईचा मी करोडपती. वगळाय लागले मला त्यांच्यातून.''

हवा बोलला, ''तुला गाव तरी आहे, मला तर कुठं हाय? तिथं शेती नाय आमची.''

चेमल्या घरात पोचला होता. आई रडत होती शेजारच्या चार बायका जमा झाल्या होत्या. कोणीच रडत नव्हतं. चेमल्याला काहीच कळत नव्हते. चेमल्याने आईच्या हातात एक खाली पाकिट बघितलं मग वाचून बघितलं. तो हसायला लागला, पण त्याला आई का रडत आहे हे कळलं नाही.

पण तो म्हणाला, ''अगं म्हातारे का रडते? मी पास झालोय. पोस्टमनने जास्तीचे पैसे नेले म्हणून रडतेस का?''

''अरे, किती कष्टाने शिकवलं तुला, तुझ्या सगळ्या उचापती थांबतील तर ना? खाली काय शेरा मारलाय बघ काय मारला?''

''मी नाही वाचला.''

''बघ, बघ.''

''अगं, मला दुसऱ्या वर्गात टाकलंय आता. माझा दुसरा नंबर आलाय. 'ड' वर्गातून मला 'अ' वर्गात टाकलंय म्हणजे दहावीत. आता हुशार वर्गाच्या मुलात असणाराय.''

''काय बोलतो. मला वाटलं तुझ्या कारस्थानांनी तुला दुसऱ्या वर्गातून म्हणजे 'ढ' मुलांच्या वर्गात टाकलं. मला कुठं वाचता येतं. ह्या बायांनी पण नाही वाचलं. त्या बीबीसीनं वाचलेलं ती बोलली फक्त चेमल्याला दुसऱ्या वर्गात टाकलं.''

''अगं, ती तशीच हाय माहितीय ना ! सुशाने मला एवढंच सांगितले तू रडतेस आणि पोस्टमन येऊन गेला. मला वाटलं कुणीतरी खपलं.'' सगळ्या बायका हसायला लागल्या. चेमल्याची आई डोळे पुसत उठली. ''अरे बायांनो, थांबा चहा पिऊन जावा आता.''

''ओ मामी, चहा जाऊ दे. तिकडं मिसरी द्या मिसरी. आता त्याशिवाय मज्जा नाय यायची.'' चेमल्याच्या आईने अख्खा डबा खाली केला.

चेमल्या रिझल्ट घेऊन हवाकडे निघाला. पण नाराजीतच होता. त्याला आता वर्ग बदलावा लागणार होता. वर्ग बदलणं लय अवघड. एकदा त्याने हा अनुभव घेऊन झाला होता. नवीन पोरं, नवीन मित्र त्यांच्याशी बोलणं अवघड असतंय. त्यात हवाचं काय झालं माहिती नाय, तो 'ढ'मध्ये राहिला तर आपली दहावी पूर्ण होणार नाही. असं चेमल्याला वाटून गेलं. तो हवाच्या घराजवळ पोचला; पण घरात गेला नाही. बाहेरूनच आवाज ओळखायचे. दारावरूनच शिट्टी मारायचे. त्या शिट्टीचा आवाज

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

आला की, बाहेर यायची खूण असायची, तीन वेळा शिट्टी मारली आणि बाहेर नाही आला तर दारात जाऊन चेमल्या, नाहीतर हवा अशी हाक मरायची. आतून शिव्या आल्या तर निघून जायचं नायतर एकमेकांचा निरोप घेऊन जायचा. तीन शिट्ट्यांचा रिप्लाय आला नाही. दाराजवळ हवा अशी हाक मारली.

काहीच हालचाल नाही तरी थोड्या वेळाने हवाच्या आईने आवाज दिला. 'हवा गेलाय तुझ्याकडं'. हवा काय आला नव्हता. तसंच तो रिझल्टचा कागद घेऊन गच्चीत आला. वरती तो डबललाच बसला होता. सगळे शांत होते.

चेमल्या हवाला बोलला, ''हवा रिझल्ट लागलाय कोण खपलं नाही.''

हवा बापाचा गेम खेळत होता, ''हो माहितीय, पण आता माझी खपायची पाळी आलीय. पत्ता नाही आला अजून, ओ फंटर का बुद्धिबळ खेळताय. पवार झाला का तुमचा. टाका ना ओ, पत्ता... अरे, 'नो पॅक' आहे. गेम नाय दाखवली की गेम आउट फादर तर ना पण कोणता पण गेम खेळतात. एक गेममध्ये ८० सापडले.''

''हं.''

''हा नको करू. हा आलायासच चपण्या हाताने पत्ता ओढ. बघू, किती घाणय तुझा हात.''

हवाच्या हातात राजाची आणि दशाची ट्रायल होती. आणि एक जोकर होता म्हणजे फुल २ गेम सिक्वेन्स आला की गेम टेकवायचा. चार हात झाले पत्ता काय येत नव्हता. हवा बोलला, ''सुशाने घोळ केला. केवढा पत्ता गरम होता यार लावलीना

नरपढी नाहीतर झिरोवर गेम मारला असता.''

चेमल्या बोलला, ''ये शहाण्या जास्त उडू नको. मी नाहीतर घे मजा करून पण घे तुला लागणारा पत्ता दिलाय.''

चेमल्याने किलवर एक्का खेचला. अगोदर किलवर एक्का टाकून झाला होता. तो येण्याची शक्यता कमीच होती. हवाच्या हातात किलवर दुरी, तिरी होती. बदामाचा सत्ता-पंजा-चौका-दुरी होती. किलवर एक्क्यावर हवाचा फुल २ गेम झाला होता. हवाने गेम फिरवली सगळे बाहेर गेले. फुल ७०चा गेम त्याने मारला. हवाचा बाप पण खुश झाला.

मग हवा बोलला, ''भावा आपला पहिला नंबर आलाय आणि ते जाऊ दे मला 'अ' वर्गात टाकलंय.''

चेमल्या खूश नाखूश एकत्रच झाला. हवा आपल्या सोबत असणार या भावनेने त्याला थंड झालेल्या नसा मोकळ्या झाल्या. मग सेकंदालाच बोलला, ''माझा दुसरा आलाय मी पण 'अ' वर्गात आलोय. आपण दोघेपण''

दोघेही ओरडायला लागले. हवाचा बाप बोलला, 'पची... सगळ्यांना चहा मागव.'

पची बोलला, ''काय रे चिंधीगिरी करतो रे. पोरानों जा मिसळपाव मागव मी देतो पैसे...''

चेमल्या आणि हवा मोठ्यामोठ्याने ओरडत होते, ''आपण दोघे भाऊ-भाऊ चाराण्याचे चणे खाऊ.''

चेमल्याच्या डोक्यात दुसरा नंबर खटकत होता. पण बोलता येत नव्हते खरंच काय हा पहिला आला असेल... किती मार्कने हा पहिला आला असेल असे असंख्य प्रश्न येत होते. पण मधेच आवाज आला, ''हमारा भाई कैसा हो चेमल्या भाई जैसा हो आपण दोघे भाऊ भाऊ चारण्याचे चणे खाऊ!''

**दुसरा भाग**

प्रथम क्र. सई
प्रथम क्र. कोमल
प्रथम क्र. वैभव
प्रथम क्र. भूषण

'बालगोपाल नवरात्र मंडळ नवरात्रोत्सव आयोजित विविध स्पर्धांचे निकाल आणि पुरस्कार उत्सव सोहळ्यातील हे मानकरी. बालगोपाल नवरात्र आजही सामाजिक भान जपत आपल्या भागात सामाजिक कार्य करत, तसेच सम ाजातील मुलांना सामाजिक विषयाची माहिती गोडी निर्माण व्हावी, कलागुण अंगी बाणावेत यासाठी चित्रकला, निबंध, वक्तृत्व, सामान्य ज्ञान यांसारख्या स्पर्धा घेत असतात. तर, लहान मुलांची स्मरणशक्ती स्पर्धा घेण्यात येते. याचबरोबर फॅन्सी ड्रेस, दांडिया, नृत्य स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा ही आयोजित करण्यात येते. यंदा मंडळाचे २४ वे वर्ष असून उत्तरोउत्तर मंडळाची प्रगती होत आहे. आता परत मी स्पर्धांच्या निकालाकडे येतो. आपल्या भागातील कार्यसम्राट समाजसेवक श्री. आप्पा कदम यांच्या हस्ते पुरस्कार सोहळा होणार आहे.'

भाईला माईक मिळाला तर ते दोन तास सहज बोलू शकतील. म्हणजे त्याचा आवाज ऐकायला अनेक लोक येतात. बातम्या द्यायला गेला असता, तर लय फेमस झाला असता; पण मिल कामगार झाला. नटसम्राट तसे तो आजही भारी करतो. लागूपेक्षा भारी काम करतो तो. मिल कामगारांचे डोळे ओले केलेत, तसे त्यांचे डोळे ओले करणे सोपी गोष्ट थोडीय. तो ते सहज साध्य करतो. नेहमीप्रमाणे स्पर्धांचे आकर्षण असतील, त्या स्पर्धांची बक्षिसं ही वैभव, भूषण, कोमल आणि सई यांच्यात वाटली जाणार हे माहीत होतं; पण त्यातली अत्यंत टवाळ असणारी ही वैभव, भूषण पोरं तशी हुशार आणि स्पर्धेत नंबर पण काढतात. याचं बालगोपाळच्या पोरांना नेहमीच कौतुक असायचं त्यांचं. भाई अशा पोरांना पकडून पकडून भाग घ्यायला लावायचा. पोरं भाईच्या आजूबाजूला फिरायची. त्याच्या पुढाकाराने एक वाचनालय सुरू केलं. पोरांना तो मुद्दाम पेपर वाचण्यास प्रोत्साहन द्यायचा. तरी, यातली सर्वात मोठी स्पर्धा असायची ती वक्तृत्व स्पर्धा म्हणजे वक्तृत्व स्पर्धेत बाजी मारणारा भारी समजला जायचा. मग चाळीत वट व्हायची. वैभव आणि भूषण दोनात-तिनात असायचे नेहमी. पण त्यांचा पहिला नंबर कधीच झाला नाही. कारण कुंभारांची मयुरी त्यांना अख्खा खाऊन टाकायची. ती फक्त वक्तृत्वला चाळीच्या खाली उतरायची. पण ती यावर्षी ११वीला गेल्यामुळे वैभव आणि भूषणला चांगली संधी मिळाली होती. १ला व २ रा तेच असणार हे माहीत होतच. पण पहिला कोण हे महत्त्वाचे. भाई त्याच्या आईच्या स्मरणार्थ विशेष पारितोषिक द्यायचा वक्तृत्व स्पर्धेला.

भाई चालू झाला नाही सुटलाच, ''चित्रकला स्पर्धा प्रथम क्र. वैभव. याने मी पाहिलेला अपघात यावर अत्यंत सुंदर चित्र काढले होते. सामान्य ज्ञान स्पर्धा प्रथम क्र. भूषण याने ५० प्रश्नांपैकी ४० प्रश्नांची अचूक उत्तरे दिली. द्वितीय क्र. वैभव याने ३९ प्रश्नांची अचूक उत्तरे दिली होती.

निबंध स्पर्धा प्रथम क्र. सई पेडणेकर हिने माझ्या स्वप्नातील भारत यावर निबंध लिहिला. द्वितीय क्र. भूषण याने आपल्या समोरील पर्यावरण प्रश्न यावर लिहिला. तर तृतीय क्र. वैभव याने 'हम सब है एक' या विषयावर निबंध लिहिला.

आता अत्यंत महत्त्वाच्या स्पर्धे चा निकाल प्रमोद साळवी यांच्या

आईच्या स्मरणार्थ दिला जाणारा वकृत्व
स्पर्धेचे बक्षीस,

तर उत्तेजनार्थ पारितोषिक आहे वैभव यांना. तृतीय क्र. वरील कोमल यांनी 'माझा आवडता नेता– महात्मा गांधी' यावर तर द्वितीय क्र. वरील प्रणिताने व्यसनाचे दुष्परिणाम. प्रथम क्र. मिळाला आहे भूषण यांना. भूषण यांनी 'संगणक शाप की वरदान' यावर आपले भाषण सादर केले. तर उत्तेजनार्थ परितोषिक मिळालेला वैभव याने 'माझा आवडता नेता– बाबासाहेब आंबेडकर' यावर आपले भाषण सादर केले. सर्वांचे धन्यवाद...

कार्यसम्राट समाजसेवक श्री. आप्पा कदम यांचे आभार! त्यांनी वेळात वेळ काढून आपल्या बक्षीस समारंभात उपस्थित झाले. आपल्या कार्यक्रमाची शोभा वाढवली. सर्वांचे पुनश्च आभार... इथे कार्यक्रम संपल्याचे जाहीर करतो.''

भाईने बक्षीस समारंभची सांगता केली. नेहमीप्रमाणे वर्षातून एकदा रडतो. ज्यावेळी वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस देतो. इतर वेळी तो रडवतो. कार्यसम्राटांना पण; पिसं काढतो त्यांची.

वैभव वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस घ्यायला स्टेजवर आला नाही. गायब झाला मध्येच... त्याचे बक्षीस भूषणनेच घेतले. असे का झाले? कोणालाच कळेना. भूषण त्याची सर्व बक्षिसे घेऊन गच्चीत आला. त्याला माहितीय वैभव तिथेच असणार. नवरात्र गच्चीत मोठा डाव असतो. त्यात तीनपत्ती पण खेळल्या जातात. आता उपवास करायचेत बिन चपलाचे धिंडायचे फॅड आले. जुगारी लोक याचे जास्त निष्ठेने पालन करायचे; पण वैभव आणि भूषण पाळतील तर ना! दाबून चिकन खायचे मुद्दाम. कबाब पाव आणि खिमा पाव म ागवायचे.

भूषण गच्चीच्या कोपऱ्यातच बसलेल्या वैभवकडे गेला. ''काय रे भोसडीच्या... हे बघ तुला पण माहितीय माझा नंबर यायला पाहिजे होता पहिला. फार डोक्यावरून पाणी गेलं तर दुसरा.''

''अरे, या परीक्षकानी घोळ केला असणार. तुझं भाषण चांगलं झालेलं.''

''नाही रे मी बाबासाहेबावर भाषण केले म्हणून साल्यानी माझा पत्ता कट केला.''

''भाई, बक्षीस घेऊन जातो तो काय सर्व. काय कौतुक याचे.''

''भाई, कौतुक नाय याचं. पहिल्यांदा स्टेजवर बाबासाहेब सांगितले होते. बालगोपाल नवरात्र महोत्सवमध्ये कसल्या टाळ्या मिळाल्या होत्या. माहितीये ना तुला.''

''हो रे! जोरदार आवाज लागला होता तुझा. भारी बोललेला तू. आपलं ठरल ना. म्हणून मी संगणकावर बोललो ना. नाह्राच बोललेलो मी.''

''मुदामहून वर काढले त्यांनी तुला.''

''असं कसं बोलतो. मी काय केलं? मी काय ह्यांना सांगाय गेलो.''

''नाही बाबा ! विषय बघ पचत नाही यांना तरी बाप बोललेला, तुला नंबर नाही देणार भाईमुळे तरी उत्तेजनार्थ दिला. नाहीतरी कोणत्या स्पर्धेत उत्तेजनार्थ दिलाय फक्त वकृत्व स्पर्धेला. एक दिवस बाबासाहेब तरवणार देशाला.''

''त्याबरोबर गांधी पण महत्त्वाचा.''

''आला का मधेच गांधी. बाप माझा डबल बसतो; पण त्याच्या चेहऱ्यावर जाऊ नको, अख्खा खाऊन त्या भाईला पण. कसली रास लागलीय बग घरात. तो आप्पा कदम हाताखाली होता बापाच्या, बाप पॉईंटशीर गांड मारतो ह्यांची एकदम

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

कायदेशीर तर गेम केला ह्याचा, का तर आम्ही बाबासाहेब' चालेल. हे बघ! मी लय वाचणार हाय बाबसाहेब मग गांधी सारा खोडून काढेन.''

''चालेल, वाचता वाचता सावरकर पण वाच भोसडीच्या. चल, खिमा पाव मागवू. सावरकर म्हणतात, गाय हा उपयुक्त पशू आहे.''

''तूच मागव. वकृत्व तुला मिळाला. जमीरभाईकडे जाऊ. आज किती जमवलेत?''

''पत्ता थंड होता, ३० आहेत. एक खिमा पाव येईल.''

''मी ५ देतो ४ पाव येतील. लावून खाऊ.''

भूषण आणि वैभव जमीरभाईकडे खिमा पाव खायला निघाले. आज जिकडे तिकडे अष्टमी जेवण होते. वातावरणात थोडा वास होता. सगळीकडे धुरकट होतं. वैभवच्या डोक्यात काहीतरी चालू होतं. डोकं धुरकट झालं होतं. डोळे लाल झाले होतं. पण कोणत्या रागाने हे मात्र कळले नाही. भूषण काही विचारणार तर वैभव बोलला, ''तो कार्यसम्राट आप्पा बघितला. आयला, त्याने मला येकपण बक्षीस दिलं नाही. लगेच तो भाईला सांगायला भाई तुम्हीपण द्यावं.''

''एवढं जय त्यात माझं लक्ष नव्हतं.''

''मी बघितले सगळं लक्षात आहे माझ्या. आप्पा बापाच्या मिलात बोललो ना तुला. बाप्पा अपडे लावायला लागला. आप्पा गोट्या चोळायला लागला आमदाराचे. आता नगरसेवक पण होईल.''

''पण असं का?''

(पान ८५ वर)

# स्पर्धा परीक्षा : डोळ्यांना दिसणारं उघडं वास्तव!

अर्जुन नलावडे

स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी हे वेगवेगळ्या शाखेतून आलेले असतात. यामध्ये 'शास्त्र' शाखेचे विद्यार्थी युपीएससी किंवा एमपीएससीसाठी प्रयत्न करताना दिसतात. एमबीबीएस, बीएचएमएस, एमडी, बीई, एमई, एमटेक, बीटेक या शाखांमधील हुशार विद्यार्थी स्पर्धा परीक्षा करण्याच्या फंदात पडतात. यांच्या या शाखीय शिक्षणाचा समाजाला प्रत्यक्ष फायदा होणार असतो; परंतु अधिकारी पदावरून आपल्याला प्रशासकीय व्यवस्थेत जाऊन व्यापक स्वरूपाचं काम करता येईल या निर्बुद्ध आशेनं स्वतःच्या अंगभूत कलाकौशल्याची हत्याच केली जाते. 'वाणिज्य आणि शेतकी' शाखेतील विद्यार्थी हे बँकिंगच्या स्पर्धा परीक्षा देतात. वास्तविक पाहता शेतकी पदवी घेणारा विद्यार्थी शेती क्षेत्रात भरीव योगदान देईल किंवा विविध बदल घडवून आणेल, अशी अपेक्षा असते; परंतु हे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या नादाला लागतात आणि आपल्या आयुष्याची उमेदीची वर्षं यात खर्च करतात. काही महिन्यांपूर्वी पुण्यातील नावाजलेल्या 'सीओईपी' या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'स्वयम्' नावाचा उपग्रह बनवला आणि त्याचं यशस्वी उड्डाणही झालं. देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्यापासून अनेक मान्यवरांपर्यंत त्या विद्यार्थ्यांचं कौतुकही झालं.

एकीकडे ही परिस्थिती, तर दुसरीकडे नव्यानेच पुण्यात दाखल झालेला माझा नवीन मित्र. त्यानं एका ॲकॅडमीमध्ये जवळपास ऐंशी हजार रुपये भरून युपीएससीचा क्लास लावला. तो सांगत होता. लेक्चरचा पहिला दिवस. त्या लेक्चरमध्ये मुलांच्या शैक्षणिक शाखा विचारल्या गेल्या. त्यात अभियांत्रिकी शाखेकडून आलेले नव्वद टक्के विद्यार्थी होते, राहिलेले दहा टक्के इतर शाखेतून आलेले. समजा, विद्यार्थी दशेत असताना सीओईपीच्या विद्यार्थ्यांनी केलेली कर्तबगारी पाहायला मिळते, तर दुसरीकडे त्याच शाखेची मुले पुढे अभियांत्रिकीची पदवी घेऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करू लागली तर त्यांच्या शिक्षणावर पालकांनी आणि शासनाने केलेल्या खर्चाचं काय? याचं कारण फक्त एकच. स्पर्धा परीक्षेचं निर्माण केलं गेलेलं आभासी वातावरण.

महाराष्ट्रातून दरवर्षी सुमारे बारा हजार विद्यार्थी कृषी पदवी घेऊन बाहेर पडतात. त्यातील फक्त दोन हजार विद्यार्थ्यांना नोकरी लागते अन् उरलेल्या दहा हजार विद्यार्थ्यांपैकी बहुतांशी विद्यार्थी हे पुणे, मुंबई आणि दिल्लीसारख्या ठिकाणी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना दिसतात. ही वस्तुस्थिती आहे, ती आम्हाला नाकारता येणार नाही. त्यानंतर 'कला' शाखेतील विद्यार्थ्यांचा विचार केला, तर या स्पर्धा परीक्षा 'तरुणांचं भविष्य नष्ट करण्याच्या उद्देशानंच निर्माण झाल्यात की काय?' अशी साधार भीती वाटते. खरं तर एकाच आखाड्यात बी.ई करणारा हुशार विद्यार्थी आणि त्याच आखाड्यात बी.ए.ची परीक्षा 'एटीकेटी'ने पास होणारा विद्यार्थी यांची बौद्धिक कुस्ती लावली जाते. साहजिकच विजय ठरलेला असतो. कला शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये अंगभूत कला असतात. कोण उत्तम कवी असतो, कोण उत्तम गायक असतो, कोण उत्तम चित्रकार असतो, कोण उत्तम लेखक असतो, कोण उत्तम वक्ता असतो, तर कोण उत्तम खेळाडू असतो. अशा विविधांगी कलांत पारंगत तरुण आपापल्या क्षेत्रात नावारूपाला येऊ शकतात; परंतु स्पर्धा परीक्षेच्या नादाला लागून या तरुणांनी स्वतःच्या कलेची एक प्रकारची हत्याच केलेली असते.

याला पालकदेखील काही प्रमाणात कारणीभूत आहेत. स्पर्धा परीक्षेचा झालेला प्रचार अन् प्रसार यामुळे अंगभूत कलेची हत्या करून प्रत्येक विद्यार्थी (स्पर्धा परीक्षा देणारा) हा माझ्या शेजारचा, माझ्या सोबतचा मुलगा किंवा मुलगी स्पर्धा परीक्षा देते म्हणून मीही देते किंवा देतो, हे चारचौघांत मान्य करायला कोणी तयार नसतं. आणि म्हणून एकाकडे पाहून दुसरा... दुसऱ्याकडे पाहून तिसरा, अन् तिसऱ्याकडे पाहून चौथा स्पर्धा परीक्षा देत सुटतो. याचा परिणाम म्हणून विद्यार्थी 'स्पर्धा परीक्षाग्रस्त' व्हायला लागतात. आणि हा संसर्गजन्य रोग झपाट्याने वाढतच आहे. या रोगावर नियंत्रण मिळवण्यापेक्षा हा रोग वाढेल कसा, या दृष्टीनेच प्रयत्न केले जात आहेत किंवा तशा प्रकारचं अनुकूल वातावरण निर्माण केलं जात आहे.

स्पर्धा परीक्षा करणाऱ्या माझ्या अनेक गरीब मित्रांची आणि त्यांच्या जीवनाची फरफट पाहण्यासारखी नाही. ते सदाशिव पेठेतल्या काही धोकादायक इमारतीत (अगदी एक-दोन रिश्टर स्केलच्या भूकंपातही पडतील अशा) दाटीवाटीनं राहतात. कोण सकाळचं दूध घालण्याचं काम

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

करतो... कोण रात्रपाळीत एटीएमच्या बूथवर पहारेकऱ्याची नोकरी करतो... कोण आपल्या पोटाचा प्रश्न मिटावा म्हणून एखाद्या खानावळीत पार्ट टाईम वेटरची नोकरी करतो... तर कोण पेपर टाकण्याचे काम करतो.

खरं तर, याच मुलांमध्ये मला रघुनाथ माशेलकर, जयंत नारळीकर, विजय भटकर दिसतात. याच मुलांत मला बाबा आमटे, अभय बंग आणि रवींद्र कोल्हे दिसतात. याच मुलांत मला भविष्यातले शेकडो सुवर्ण पदकं मिळवणारे खेळाडू दिसतात आणि याच मुलांमध्ये समाजाच्या व्यथा मांडणारे साहित्यिक दिसतात. पण प्रश्न आहे, मला दिसून उपयोग काय? याची जाणीव केवळ मला होऊन उपयोग काय? हे सर्व स्वतःला बुद्धिवादी, मानवतावादी आणि पुरोगामी म्हणवणाऱ्या लोकांना आणि विचारवंतांना का दिसत नाही? कारण यांना संघटना उभी करणं आणि त्यासाठी तरुणांना हातशी धरणं अन् त्यांना चिथवणं इतकंच माहिती असतं. असो! प्रत्यक्ष राज्यव्यवस्थेची धुरा सांभाळणाऱ्या आणि या होतकरू, हुशार विद्यार्थ्यांच्या कल्याणाची जबाबदारी असणाऱ्या राजकीय व्यवस्थेतील माणसांनी (लोकप्रतिनिधींनी) डोळ्यावर पट्टी बांधली आहे काय? आणि असेल तर... त्यांनी ती पट्टी काढावी आणि राजकीय स्वार्थासाठी चाललेली आपापसांतील दिखाऊ भांडणं मिटवून या मुलांच्या कल्याणाचा विचार करावा.

स्पर्धा परीक्षा करणाऱ्या माझ्या मित्रांना मला इतकंच सांगायचं आहे की, 'स्वप्नं पाहा, स्वप्नं जगा' हे ऐकायला खूप चांगलं वाटतं; पण एकच स्वप्न लाखो जणांनी पाहिलं आणि त्या स्वप्नांची वाटचाल एकाच मार्गावर सुरू झाली तर ती स्वप्नं, स्वप्नंच राहत नाहीत. तर ती एक स्पर्धा होते. खरं तर, ती एक जीवघेणी स्पर्धा होते. त्यात काही जणांचा जिवानिशी बळी जातो, काही जण स्वप्न भंगली असली, तरी त्या स्वप्नातून बाहेर पडत नाहीत. अशा परिस्थितीत ती मुलं स्वप्नंच जगायला लागतात, स्वप्नातच वावरायला लागतात. वास्तव परिस्थितीचं भान न ठेवता एखाद्या संमोहित झालेल्या रुग्णासारखं. अशा स्वप्नांना (खरं तर स्पर्धापरीक्षेच्या वातावरणाला) आहारी गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या काही कमी नाही. त्याचा टक्का आज कमी वाटत असेलसुद्धा; पण भविष्यात तो वाढणार आहे.

काही वर्षांपूर्वी पुणे जिल्ह्यातील दोन विद्यार्थी 'आपण स्पर्धा परीक्षा पास होऊन अधिकारी झालो' असं सांगत आपल्या आप्तस्वकियांची, समाजाची आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे स्वतःची फसवणूक करत राहिले आणि दुसऱ्याचीही. त्यातील पहिला श्रीकांत पवार आणि दुसरा हनुमंत खाडे. त्यांच्या या कृत्यामागे अधिकारी होण्याची स्वप्नं, मिळणारी सामाजिक प्रतिष्ठा, तो मानसन्मान, जागोजागी होणारा सत्कार, व्याख्यानांसाठी येणारी आमंत्रणं आणि समाजात निर्माण होणारा दरारा ही कारणं होती. अशा वेळी अक्षय कुमारच्या 'स्पेशल २६' या चित्रपटाची आठवण होते. कारण, 'चोर होऊन चोऱ्या करणं तसं अवघड काम; पण अधिकारी होऊन चोऱ्या करणं तसं सोपं काम' हे स्पष्ट आहे. असो! दोष या बोगस अधिकाऱ्यांचा, स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या तरुणांचा असेलही; परंतु त्याहूनही जास्त दोष स्पर्धा परीक्षेचं कृत्रिम वातावरण तयार करणाऱ्या खाजगी क्लासेस आणि ॲकॅडमीवाल्यांचाही आहे, हेदेखील नाकारता येणार नाही.

स्पर्धा परीक्षा देणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने ठरावीक वर्षं त्यासाठी दिली पाहिजेत आणि त्या वर्षात आपण यशस्वी झालो नाही तर निराश न होता त्यातून बाहेर पडलं पाहिजे. ज्या कोणत्या शाखेचं तुम्ही शिक्षण घेतलेलं आहे, त्या शिक्षणासंबंधीचा व्यवसाय किंवा नोकरी करावी. स्पर्धा परीक्षेला दुसरा पर्याय असू द्या! तो पर्याय मात्र तुम्हाला जे काही येतंय (कौशल्य किंवा कला), ज्यामध्ये तुम्ही पारंगत आहात, त्यामध्येच सर्वोत्कृष्ट बनण्याचा



**स्पर्धा परीक्षेचा नाद सोडाय पाहिजे लका !**

असावा. असा विचार आत्महत्या केलेल्या डॉ. विकास बोंदर या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याने केला असता, तर कदाचित तो त्याच्या भागातील चांगला डॉक्टर होऊ शकला असता किंवा त्याच्याही पुढे जाऊन डॉ. आमटेंसारखं कार्य करू शकला असता. स्पर्धा परीक्षेकडे न वळता घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करून नोकरी–व्यवसाय करणारे काही कमी नाहीत. वयाच्या विशी–पंचविशीमध्ये कथाकार, कादंबरीकार आणि कवी असणारे, साहित्यिक क्षेत्रात लेखक म्हणून स्वतःचा ठसा उमटवणारे सागर कळसाईत, हणमंत कुराडे, सागर सुरवसे, स्वप्निल कुलकर्णी, व्यंकटेश कल्याणकर यांसारखे लेखकसुद्धा आहेत. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारा प्रत्येक विद्यार्थी हा देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात स्वतःचं कर्तृत्व सिद्ध करण्याच्या पात्रतेचा जरूर आहे. गरज आहे ती त्यांनी स्वतःला ओळखण्याची आणि व्यवस्थेनं त्यांची दखल घेण्याची. फक्त अधिकारी होऊन समाजसेवा करता येते किंवा समाजाचे प्रश्न सोडवता येतात, या भाबड्या स्वप्नातून जागं व्हा!

हल्ली कोणीही उठतं अन् म्हणतं की, भारत हा तरुणांचा देश आहे. त्याच देशातील तरुणांची अवस्था काय आहे? तो तरुण नक्की काय करतोय? कशा अवस्थेत जगतोय? याकडे मात्र सोयीस्करपणे दुर्लक्ष केलं जातं. बहुढंगी व बहुरूपी संघटनाकर्ते तरुणांच्या अल्लडपणाचा फायदा घेऊन स्वतःची विचारसरणी बिंबवण्यात मश्गुल आहेत. कल्याणकारी राज्याची जबाबदारी घेतलेल्या राज्यकर्त्यांनी तर आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी विविध आमिषं दाखवून तरुणांचा वापर करण्याचा सपाटाच लावलाय. त्यात भर म्हणून नव्यानं अधिकारी झालेल्या आणि असलेल्या अधिकाऱ्यांनी स्वतःची प्रसिद्धी करत प्रचंड क्रयशक्ती असणाऱ्या तरुणांना चार भिंतीच्या चौकटीत (अभ्यासिकेत) स्पर्धा परीक्षेचा जुगार खेळण्यास अप्रत्यक्षपणे भाग पाडलंय. त्यातून स्पर्धा परीक्षांचा अड्डा (क्लासेस–ॲकॅडमी) चालवणारे गब्बर बनत चाललेत, हे धडधडीत वास्तव आहे.

या सर्वांच्या मुळाशी एकच कारण आहे, ते म्हणजे बेरोजगारी! माजी केंद्रीय मंत्री राजीव प्रताप रेडी यांनी अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थी टंचाई हा मुद्दा अधोरेखित केला होता. केवळ याच शाखेत हा प्रश्न आहे का? तर नाही. अध्यापक शाखेतसुद्धा अशीच परिस्थिती निर्माण झाल्यामुळे खासगी आणि सरकारी अध्यापक महाविद्यालयं ओस पडत चालली आहेत. अशीच परिस्थिती फार्मसी व शेतकी शाखेची होण्याच्या मार्गावर आहे. इतकंच काय, शासनाच्या जिल्हा परिषदेच्या शाळासुद्धा विद्यार्थी टंचाईमुळेच बंद पडत आहेत. याचं एक मुख्य कारण आहे, राज्यकर्त्यांमधून निर्माण झालेले शिक्षणसम्राट! हे राजकीय नेते शिक्षणाचा धंदा करण्यात आघाडीवर आहेत. दरवर्षी १९ लाख अभियांत्रिकीचे विद्यार्थी रोजगाराच्या बाजारात उतरत असतील, तर इतर शाखेचे किती विद्यार्थी 'जास्तीच्या पुरवठ्या'मध्ये सामील होत असतील, याची कल्पनाच केलेली बरी! अलीकडच्या काही वर्षांत देशात दिल्ली आणि महाराष्ट्रात पुणे ही शहरं स्पर्धा परीक्षांसाठी नावारूपाला आली आहेत. स्पर्धा परीक्षांच्या मैदानात बहुतांशी विद्यार्थी हे अभियांत्रिकीचे शाखेचे दिसतात. कारण लोकसेवा आयोगाचा सी–सॅटसारखा अवघड पेपर हा अभियांत्रिकीची पार्श्वभूमी असणाऱ्यांना सोपा जातो. शेतकी शाखेचे विद्यार्थी बँकिंगच्या स्पर्धा परीक्षेकडे वळतात, कारण शेतकी शाखेचा अभ्यासक्रम बँकिंगसाठी जास्त गुण देणारा ठरतो! पदव्युत्तर विद्यार्थ्यांना थेट स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून, नेट–सेटचा अभ्यास करून प्राध्यापक होता येतं, भले विद्यार्थ्यांना शिकवण्याचं कसब नसलं तरी. प्रत्यक्ष कार्यानुभवाची अनिवार्यता त्यांच्याकडे असतेच असं नाही.

वरील सर्व शाखेचे विद्यार्थी पालकांच्या आणि शासनाच्या पैशावर शिक्षण घेत असतात. आणि हे शिक्षण घेऊन करतात काय? तर... शिक्षणाची तयारी! मग हे शिक्षण अधिकारी होण्याकरताच घेतलं होतं का, असा प्रश्न निर्माण होतो. अधिकारी होणं चांगली गोष्ट आहे; पण सरसकट सर्वच तरुणांनी अधिकारी होणं, ही गोष्ट बुद्धीला पटण्यासारखी नाही. आपण जे शिक्षण घेतलं त्याचा देशाच्या विकासासाठी कितपत उपयोग होणार आहे, हा प्रश्न या तरुणांनी स्वतःला विचारायला हवा.

अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालेल्या यंत्रयुगात किमान मनुष्यबळाचा वापर करून यंत्राच्या आधारे कमाल नफा मिळवणं, हा येथील खासगी उद्योगांचा उद्देश आहे. हेच कारण बेरोजगारीच्या मुळाशी आहे, ही बाब स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लक्षात येत नाही का? की येऊनही ते त्याच्याकडे दुर्लक्ष करतात?

दुसरीकडे कौशल्य शिक्षण प्राप्त विद्यार्थी लाखोंच्या संख्येनं बाजारात दाखल होत आहेत. याचा फायदा प्रभावी जाहिरात करून क्लासेस–ॲकॅडमी यांनी घेतला. या जाहिरातीला भुलून विद्यार्थ्यांचा आशावाद आणखी वाढला. म्हणजे बेकार झालेल्या विद्यार्थ्यांची लाट स्पर्धा परीक्षेच्या भिंतीवर आदळली. यातून जन्म झाला तो 'स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या मोर्चां'चा. त्यांच्या मोर्च्यांचा प्राथमिक उद्देश हा आपल्या मागण्या शांततेच्या मार्गानं निवेदनाद्वारे शासनाकडे

मांडायच्या; पण तसं अजिबात झालं नाही. कारण या मोर्चांमध्ये वर्तमानपत्रात छापून आलेल्या मुख्यमंत्र्यांच्या फोटोला आपल्या पेनमधील शाई फासणं, 'जय भवानी जय शिवाजी', 'शासनाचे खाली मुंडकं वर पाय', 'लडेंगे भाई लडेंगे', 'भारत माता की...' या सारख्या असंबद्ध घोषणा देणं असेच प्रकार होत होता. 'आता शांततेत आलोय, याची दखल शासनाने घेतली नाहीतर पुढच्या वेळी हिंसा केल्याशिवाय राहणार नाही', अशा प्रकारच्या चर्चा मोर्चांमध्ये होत होत्या. भविष्यात अधिकारी होण्याची स्वप्नं पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची चळवळ अशा प्रकारची असेल, तर हे विद्यार्थी सक्षम अधिकारी होण्यास लायक आहेत का? खरं तर, अगोदरच आपल्या आयुष्यातील उमेदीची पाच-दहा वर्षं स्पर्धा परीक्षेच्या तयारीत गेलेली असतात. त्यामुळे हे विद्यार्थी 'स्पर्धा परीक्षाग्रस्त' झालेले असतात. त्यामुळे ते तणावपूर्ण मन:स्थितीतच वावरतात.

सरकारी नोकरभरतीचा निर्णय घेण्यापेक्षा स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या उमेदवारांचं वय वाढवून देणं, हे अधिक सोपं म्हणून शासनानं जो 'वयवाढी'चा निर्णय घेतला तो चुकीचा ठरतोय. कारण संपूर्ण वयोमर्यादा संपेपर्यंत उमेदवार तयारीच करत राहतो. परिणामी, अनिश्चित ध्येयासाठी तारुण्यातील उमेदीची वर्षं खर्च होत राहतात. दुसरा निर्णय आहे तो माध्यमिक शाळांमध्ये 'स्पर्धा परीक्षा केंद्र' उभी करण्याचा. हा तर शासनाच्या निर्बुद्धतेचा कळसच आहे. अगोदरच खासगी क्लासेसवाल्यांनी कहर केलाय. त्यात ही भर! या विद्यार्थ्यांच्या आंदोलनापाठीमागे क्लासेसवाले, काही राजकीय पक्ष आणि संघटना कार्यकर्ते (जे स्पर्धा परीक्षा कमी आणि संघटनेचं काम जास्त करतात!) असताना दिसतात. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये तरुणांची मतं आकर्षित करण्यासाठी स्थानिक नेत्यांनी आपल्या वार्डमध्ये मोफत वायफाय सुविधा, अभ्यासिका आणि स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांची ग्रंथालयं उभारण्याचा प्रयत्न चालवलाय.

आपला पाल्य हा अधिकारी होऊन करणार काय? हा प्रश्न ग्रामीण भागातील पालकांना विचारला तर म्हणतात की, 'एकदा का आपलं पोरगं सायब झालं तर खोऱ्यानं पैसा वढंल आन हुंडाबी चांगला मिळंल'. एकीकडे ही पालकांची मानसिकता, तर दुसरीकडे समाजात मानसन्मान, प्रतिष्ठा आणि शासनाच्या सुविधा मिळतील, ही विद्यार्थ्यांची मानसिकता आहे. परंतु यावर उघड चर्चा होताना दिसत नाही. चर्चा या गोष्टीवर होते की, समाज विकासासाठी सक्षम अधिकाऱ्यांची गरज आहे. हे काही प्रमाणात खरे असेलही; पण केवळ स्पर्धा परीक्षेतून अधिकारी होणं हे आजच्या तरुणांचं एकमेव ध्येय असू शकत नाही, हेदेखील तितकंच खरं आहे.

अशा वेळी सोयीस्करपणे तरुणांची बेकारी अन् त्यांची उदासीनता यावर म त्र 'हाताची घडी, तोंडावर बोट' अशी भूमिका घेतली जाते. याला जबाबदार कोण? तर शासनव्यवस्था आहेच; परंतु स्पर्धा परीक्षेचं अनाठायी महत्त्व वाढवणाऱ्या अधिकाऱ्यांची भाषणं, स्वप्नं विकत देणारे आणि विद्यार्थ्यांच्या पैशांवर कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणारे खासगी क्लासेस-ॲकॅडमीवालेसुद्धा जबाबदार आहेत. यामध्ये राजकीय हस्तक्षेपसुद्धा वाढत चाललेला दिसतोय. या निर्माण केलेल्या कृत्रिम वातावरणाचे परिणाम आता दिसायला सुरुवात झालेली आहे.

उदाहरणार्थ, दिल्लीमध्ये युपीएससीची तयारी करणाऱ्या डॉ. विकास बोंदरची आत्महत्या, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बालाजी मुंढेने केलेली आत्महत्या, श्रीकांत पवार व हनुमंत खाडे यांसारख्या बोगस अधिकाऱ्यांचा राजरोस वावर आणि आता शासनाच्या विरोधात स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांचे निघणारे मोर्चे... ही सर्व परिस्थिती पाहता आजचा तरुण अनिश्चित ध्येयाच्या व अस्थिरतेच्या खड्ड्यात ढकलला जातोय, हे वास्तव आता नाकारून चालणार नाही. सुवर्ण पदकांची अपेक्षा करणाऱ्या व्यवस्थेला राही सरनोबत आणि ललिता बाबर यांनी सरळ प्रश्न केला की, आम्हा खेळाडूंना तुम्ही अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिलीत का? शेतकी शाखेतील विद्यार्थ्यांनी शेती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याची गरज आहे, ती त्यांनी केली का? ९०-९५ नंतर साहित्यामध्ये एकाही भारतीयाला साहित्याचं नोबेल मिळू नये, ही खंत का व्यक्त करावी लागते? डॉ. विकास बोंदर यांच्यासारख्यांनी आत्महत्या केली तर भविष्यात डॉ. आमटे, बंग, कोल्हे कसे तयार होतील? दहावी-बारावीला नव्वद टक्क्यांहून अधिक मार्क्स पाडणारे विद्यार्थी केवळ आयएएस आणि आयपीएस होण्याचीच स्वप्नं पाहत असतील, तर देश फक्त त्यांच्या जीवावर महासत्ता होणार आहे का? अभियांत्रिकीचं शिक्षण चालू असतानाच अनेक उपग्रह अवकाशात सोडणारे विद्यार्थी भविष्यात स्पर्धा परीक्षेच्या मैदानात उतरणार असतील, तर जागतिक पातळीवर इतर बलाढ्य देशांशी काय स्पर्धा करणार?

***अर्जुन नलावडे, कोल्हापूर.***
*मोबाइल : ७३८५६११३५३*

❀❀❀

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

# एक दिन दुनिया में बंदुकों से ज्यादा प्रेमपत्र होंगे

प्रशांत सागर | मुलाखतकार : सुशील संगीता प्रकाश

**'कविता लिहिणाऱ्यापेक्षा वाचणाऱ्याची जास्त असते म्हणून कवितेवर हक्क सांगणं मला पटत नाही. लोकांनी आपली कविता स्वतःच्या नावाने एकमेकांना पाठवली तर मला तो कवितेचा सन्मान वाटतो, चोरी नाही' असा साहित्य चोरीबद्दलचा खूप वेगळा विचार मांडणारा एक नवकवी प्रशांत सागर. 'फफुंद' हा कवितासंग्रह प्रशांतने लिहिला आहे आणि सोशल मीडिया, विशेषतः इंस्टाग्रामवर 'किताबगंज' हे पेज हल्ली अनेकांच्या स्टोरीज आणि पोस्ट्समध्ये दिसू लागलंय. तरुण मुलं वाचत नाही, त्यांना साहित्याची आवड उरली नाही अशी सदासर्वकाळ आवई उठण्याच्या काळात प्रशांत तरुणांना कवितेचं वेड लावतोय. 'एक दिन दुनिया में बंदूकों से ज्यादा प्रेमपत्र होंगे, राजनेताओं से ज्यादा कवी होंगे। तब युद्ध के सारे ऐलान चुंबनों के आवाजों के तले दम तोड देंगे।' असं लिहिणारा हा तरुण कवी पेशाने ऑफिसर आहे. आणि ह्या व्यवस्थेत राहून अनुभवत असलेलं द्वंद्वसुद्धा तो खूप ताकदीने मांडतो.**

**हे कवितेचं पेज सुरू कसं झालं? किताबगंज नावच्या मागची गोष्ट काय?**


मी काही वर्षांपूर्वी यूपीएससीची तयारी करण्यासाठी दिल्लीत होतो. तेव्हा दररोज नेमाने काहीतरी लिहायचो. त्याच काळात जे.एन.यु. दिल्ली युनिव्हर्सिटीच्या मित्र-मैत्रिणींनी मिळून पुस्तकांवर चर्चा करण्यासाठी म्हणून पुस्तक क्लब सुरू केला. आणि त्याचंच रूपांतर पुढे सोशल मीडियावरील कवितेच्या पेजमध्ये झालं. आणि नावच्या मागची गोष्ट म्हणजे दिल्लीत अनेक गंज आहेत जसं पहाडगंज, किसानगंज, शाहगंज तसंच किताबगंज!

**तुमच्या कवितेची प्रेरणा काय?**

कविता माझ्यासाठी मेडीटेशन आहे. कलात्मक मेडिटेशन. कसंही असलं तरी लिहिल्यानंतर मला आनंद मिळतो, छान वाटतं. आणि ह्याच आनंदासाठी मी लिहायला सुरू केलं. मग नेमाने दररोज लिहायलाच हवं हे ठरवलं. युपीएससीच्या अभ्यासादरम्यान अनेक नवीन कल्पना येतात, विचार सुचतात. लिहिण्यामुळे ते सगळं कागदावर उतरवायला मिळायचं, भावनांना दिशा देता यायची आणि अभ्यासातूनसुद्धा ब्रेक मिळायचा. लोक म्हणतात फार लिहायला नको, कविता पाडायला नको. पण मला वाटतं कवितेला कुठल्याच पूर्वग्रहातून बघायला नको, जज करायला नको. दोन भावनांची तुलना करायला नको. एकाचा अश्रू दुस-यापेक्षा जास्त पवित्र आहे, एखाद्याचं हसणं इतर कुणाच्या हसण्यापेक्षा जास्त सुंदर आहे जसं म्हणता येणार नाही तसंच दोन कवितांमध्ये तुलना करता येणं शक्य नाही. कदाचित एखादी कविता तुम्हाला अजिबात आवडणार नाही पण तुमच्या मित्राला खूप आवडेल. कवी आणि तुमचा मित्र ह्यांनी कदाचित ती भावना सारख्याच तीव्रतेने अनुभवली असेल पण तुम्ही कदाचित तिथवर पोहचला नसाल. कविता एकच असली तरी तिचे दोन किंवा अनेक पडसाद असू शकतात. म्हणून मला वाटतं लोकांनी लिहायला हवं, सगळ्यांनीच लिहायला हवं. लिहिण्याने नुकसान कुणाचंच होत नाही हे मी ठामपणे सांगू शकतो.

**एकूणच तुमची कवितांच्या मालकी हक्काविषयीची भूमिका किंवा फफुंद या तुमच्या कवितासंग्रहाच्या सुरुवातीलाच तुम्ही म्हणतात की 'मेरा हरदम ये मानना रहा है कि कविता पर पहला हक उसी का है जिसको उस वक्त उसकी सबसे ज्यादा जरुरत है'. साहित्याकडे बघण्याचा हा दृष्टीकोण खूपच नवा आहे. याविषयी आणखी सांगू शकाल?**

किताबगंज सुरू झालं तेव्हा लोक तिथल्या कविता स्वतःच्या नावाने इंटरनेटवर फिरवत. बर्याचदा तर कविता फिरून दुसर्याच कुणाच्या तरी नावाने माझ्यापर्यंतही पोहचायची. तेव्हा चोरी हाच मुद्दा प्रकाशात याचा पण मला असंही वाटायचं की हा व्यक्ति आपल्या कवितेची चोरी करतो ह्याचा अर्थ माझ्या कवितेतून मी मांडलेल्या भावनेशी तो इतका स्वतःला जोडून घेतो की कविता चोरण्याचा आणि स्वतःच्या नावाने पुढे पाठवण्याचा मोह त्याला आवरत नाही आणि आपल्या भावनेशी वाचकाची असणारी इतकी समरूपता मला जास्त महत्वाची वाटली. तेव्हा समजलं की कविता लिहिल्यानंतर ती आपली रहात नाही तर समजाची होते. 'भाषा ही मानवी संस्कृतीच्या विकासाच्या



एक व्यक्ति को
क्रांति का इंतेज़ार है।

एक व्यक्ति रुका है
उसके मज़हब में
वादा किये गए
किसी मसीहा के लिए।

मैं तुम्हारी राह ताक रहा हूँ।

हम तीनों एक ही दुनिया बचाना
चाहते हैं-
अलग-अलग ढंग से।।

प्रक्रियेचा परिपाक/निष्पत्ती आहे आणि तिचा उगम तिथूनच होतो. कविता सुद्धा त्याच भाषेला वापरते आणि म्हणून ती सगळ्यांची होते/होऊ शकते.' ह्याबद्दल लोकांची अनेक मतं आहेत. कवितेवर कवीचा अधिकार असतो तर अर्थात तो असतोच आणि असायला हवा पण जर कुणी आपल्या प्रियकर/प्रेयसीला पाठवण्याच्या किंवा प्रिय माणसांपर्यंत भावना पोहचवण्याच्या निरागस भावनेने 'कवितेची' चोरी करत असेल तर ते कवितेइतकंच सुंदर आहे. म्हणून मला ह्या कवितेच्या चोरीविषयी वाईट वाटत नाही तर अभिमान वाटतो. एखाद्या कविची कवीता कुणीतरी वाचून तिला तकिया कलम बनवत असेल तर त्याइतकी सुंदर गोष्ट आणि कवितेचा सन्मान आणखी काय असेल!?

आणि खरं म्हणजे आपलं स्वतःचं आणि फक्त आपणच म्हटलेलं असं काही नसतंचं खरं. हेच–असंच याआधी कुणीतरी–कुठेतरी म्हटलंय, लिहून ठेवलंय. त्यामुळे कुठल्या साहित्यावर कुणी अधिकार गाजवायचा हा खूपच मोठा अनुत्तरीत प्रश्न आहे. आपले विचार एका सामुहिक consciousness मधूनच येतात. जर आपण ह्या सामाजिक संदर्भात जन्माला आलो नसतो–हे वातावरण मिळालं नसतं तर कदाचित हा विचार आलाच नसता. तुम्ही विचार करू शकता ह्याचं कारणच तुम्हाला तुमच्या सामाजिक–आर्थिक–राजकीय वातावरणातून मिळालेलं संचित आहे. आणि बरंचसं साहित्य हे प्रेरित साहित्य आहे. जुनी पुस्तकं–जुनं साहित्य वाचून आलेल्या नव्या कल्पनांचं रीसायकलिंग म्हणजेच आपलं लिहिणं. त्यावर काय अधिकार सांगायचा!?

**'प्रेम' आणि 'युद्ध' ही तुमच्या कवितेची दोन महत्त्वाची अंग राहिली आहेत. पण सध्याच्या भवतालात जिथे खूपच हिंसा – युद्ध आणि अशांतता आजूबाजूला आहे. त्यात हे सगळं खूप आदर्शवादी वाटत नाही? हे खरंच शक्य आहे का? कसं शक्य आहे?**

Electrics मध्ये आयडियल सर्किट नावाची एक संकल्पना असते. खूपच कमी रेझीस्टन्स असतो, ज्यात उर्जा कधीच संपणार नाही–कमी होणार नाही. पण प्रत्यक्षात असं कुठलं सर्किट अस्तित्वात नसतं. प्रत्यक्षात डिझाईन करतांना सगळे सर्किट्स मात्र आयडियलच्या जवळपास जातील ह्या अपेक्षेने डिझाईन केलेले असतात. पण म्हणून आयडियल सर्किट काहीतरी अवास्तव संकल्पना आहे असं म्हणता येणार नाही. कारण आयडियल सर्किट् इतर सर्किट्सना आयडियल होण्याच्या प्रयत्नात मदत करतं. तसंच कवितेचंही आहे.

राजकीय संदर्भात सुद्धा अशीच खिडकीची संकल्पना आहे. ज्यात टोकाचे उजवे किंवा टोकाचे डावे असतात. तुम्ही जर एखादा खूपच डावा आणि आदर्शवादी वाटणारा विचार मांडलात तर त्या आकृतीत हा कदाचित स्वप्नवत वाटणारा विचार ठरू शकतो पण त्याने लोकांची खिडकी किंचित डावीकडे झुकायला मदत होते. अशाच पद्धतीने कविता सुद्धा काम करते.

लिहितांना हयातून आपण फार काहीतरी मोठा बदल घडवून आणू ह्या भ्रमातही राहायला नको. लोकांची आपापली पक्की मतं असतात, पूर्वग्रह असतात. ते कवितेने संपूर्ण तुटणार नाहीच. आपण ज्यांच्यात थोडीफार बदलण्याची क्षमता आहे त्याच्यासाठी लिहायला हवं. ह्या सगळ्याच्या पल्याड स्वतःच्या अस्तित्वाची नोंद म्हणूनतरी लिहायलाच हवं. कुणीतरी कुठल्यातरी काळात कुठेतरी बसून असा विचार करत होतं ह्याची काळाच्या पटलावर नोंद व्हावी म्हणूनतरी प्रत्येकाने लिहायलाच हवं. हे लिहिण्या–वाचण्याच्या प्रवासात कुणीतरी प्राचीन काळातला देव ही संकल्पना नाकारणारा लेखक अचानक त्याच्या लिखाणातून भेटेल. त्याने तेव्हा तोच प्रवाहाविरुद्ध जाण्याचा मार्ग निवडला जो तुम्ही आज निवडत आहात हे कळल्यानंतर एक समभावनेची अनुभूती तयार होते आणि हीच अनुभूती तुम्हाला ताकद देते. निषे–निहीलीस्त मानत होते की लेखकांनी लिहायला हवं, आदर्शवादी वाटलं तरीसुद्धा. त्यातच लोकांना बदलण्याची क्षमता असते. लेखकांनी आपल्या लिखाणातून किंवा कलाकारांनी आपल्या कलेतून हे वेगळे विचार–तत्व–मूल्य लोकांना सवयीचे करायला हवेत–रोजचे करायला हवेत जेणेकरून पुरोगामी मतं नवीन वाटणार नाही. मळक्या वाटाच आणखी मळवत बसण्यापेक्षा नव्या वाटा चोखाळायला हव्यात, त्या लेखकांनीच!

**सोशल मिडिया आणि पुस्तक अशी दोन्ही प्रकारे लोकांपर्यंत साहित्य पोहचवण्याची माध्यमं तुम्ही वापरता. दोघांचा अनुभव कसा आहे?**

सोशल मिडीया अर्थात खूप प्रभावी ठरतं. पुस्तक हे मर्यादित

(पान ९४ वर)

# तरुण इकरस, हतबल डेडालस आणि ‘नवी उमेद’

प्रथमेश पाटील

‘द फ्युचर इज यंग’, ‘डेमोग्राफिक डिव्हीडंड’, ‘तरुणांचा देश’, ‘जगातली सर्वात मोठी रोजगार शक्ती...’ २०१०–२०२० हे दशक या शक्यतांच्या शब्दांचं होतं. हवेत आर्थिक, औद्योगिक तेजीच्या गप्पा होत्या. १९६०–७० च्या दशकांमध्ये जन्म घेतलेल्या, काहीशा विद्रोही, पण बऱ्याच प्रमाणात पारंपरिक समजुती–रूढी–परंपरात रमणाऱ्या, समाजवादी, नियंत्रित अर्थव्यवस्थेची सरलता अनुभवलेल्या पालकांची उपज असलेली ८०–९०च्या दशकात जन्मलेली ही कार्टी नुकतीच वयात येऊन ‘ॲस्पिरेशनल इंडिया’ निर्माण करणार होती. पण या पिढ्यांचा इकरस झाला, त्याची कहाणी.

ही मिथककथा प्राचीन ग्रीसमधली. इकरस हा डेडालस या महान संशोधकाचा मुलगा. या संशोधकाने एका राजाला एका हिंस्र प्राण्याला कैद करण्यासाठी एक भुलभुलैया बाग रचून दिली, ज्यात तो हिंस्र प्राणी हरवून गेला. मात्र सनदी राजानं काहीतरी निमित्त काढून डेडालसला त्याचा मुलगा इकरससोबत त्याच बागेत कैद करून टाकलं. मोठा काळ गेला, या रचनेतून निसटायचं कसा असा विचार करत डेडालसनं ते दोघं पाठीला लावून उडू शकतील असे पंख बनवायचं ठरवलं.

१९९१ साली भारतानं जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसमोर हात पसरले. सोविएत संघाचा पाडाव झाला होता आणि जगभरात समाजवाद ही पराभूत अर्थनीती घोषित करण्यात आली. जुन्या, जुनाट, टाकाऊ अशा विशेषणांनी समाजवादी रचनेच्या सुरक्षित मात्र संथ स्वभावाला शिंकरून टाकलं. आता वेळ होती भांडवली प्रगतीची, खुल्या अर्थव्यवस्थेची, नव्या रंगांची, सौंदर्यशास्त्राचा, काचेच्या इमारतींची आणि पॅकेज्ड अन्नाची. नवी स्वप्नं येणाऱ्या पिढ्यांना कुठल्या उंचीवर घेऊन जाणार, याच्या रंजक कथा सगळीकडून ऐकू येतं. झालंही तसंच.

इंजिनियरिंग–डॉक्टरीच्या पलीकडे फक्त वकिली आणि प्रशासकीय सेवा माहीत असलेले पालक आपल्या मुलांना जाहिरातीत सांगितलं, कानावर पडलं, तसं बीबीए, बीसीए, एमबीए, एमसीए, एमटेक, मायक्रोबायोलॉजीला टाकू लागले. नवी पिढी गावांमधून छोट्या शहरात, छोट्या शहरातून मोठ्या शहरात जाऊ लागली. नव्या जगाच्या नव्या परिभाषा समजू लागली. ईमेल अकाउंट उघडून, कधी एमएसएन वर तर कधी ऑर्कुटवर चॅटिंग करू लागली, नेटवर्किंग करू लागली. एका अख्ख्या पिढीचा तिच्या आधीच्या पिढीच्या कल्पनेपलीकडचा प्रवास सुरू होता, ज्यात एकाच वेळी दिवाळीचा उत्साह होता आणि ९/११ला दूर अमेरिकेत झालेल्या वर्ल्ड ट्रेड सेंटर हल्ल्यांचा थरार होता. एकाच वेळी हृतिक रोशनवरचा क्रश होता आणि त्याचवेळी ॲवरील, एकॉन, ब्रिटनी आणि बॅकस्ट्रीट बॉईजच्या संगीताचा बोलबाला होता.

डेडालसनं पंख निर्माण करण्यासाठी समान आकाराच्या काठ्यांना मेणाचा लेप दिला. अनेक क्लृप्त्या करून अखेर त्यानं त्यांना पक्ष्यांची जमा केलेली पिसं जोडायला सुरुवात केली. हळूहळू पंख भरत गेले, जुळत गेले. एका अख्ख्या माणसाचा भार पेलू शकतील, इतके मोठे पंख झाले. डेडालसला स्वतःवर विश्वास होता. त्यानं आता सर्व तयारी झाली असल्याचं लक्षात आल्यावर लवकरच उड्डाण करण्याचा दिवस ठरवला. त्यानं इकरसला व्यवस्थित प्रशिक्षण दिलं. पंख वापरून उडण्याचं, किमान त्याला तसं वाटत तरी होतं. त्यानं उड्डाणाच्या दिवशी इकरसला जवळ घेतलं आणि त्याला म्हणाला, ‘आपले पंख मेणाचे आणि पिसांचे आहेत. आपण एका विशिष्ट उंचीवरून उडू. जास्त उंच उडालो, तर सूर्यामुळे मेण वितळेल, जास्त खालून उडालो, तर समुद्राचं बाष्प आणि धुळीमुळे पंख जड होऊन निकामी होतील.’ आणि त्यांनी हवेत झेप घेतली.

नव्यानं भौतिक सुखांचा लाभ घेणारी पिढी आकाशाला कवेत घेत होती. नवे जॉब्स, लाखांचे मासिक पॅकेजेस, वाढलेली क्रयशक्ती, क्रय करण्यासाठी शेकडो पर्याय, नुसती मोबाईल नेटवर्क १०–१२, टिव्ही चॅनेल्स २५० हून जास्त, वय–लिंग–हेतू–घटनेनुसार पर्याय, एक नोकरी सोडली तर काय, दुसरी दिमतीला. नव्या वर्कप्लेसमध्ये नवे लोक, वेगवेगळ्या जातींचे, वेगवेगळ्या धर्मांचे. सर्वांना पुरेपूर प्रगती असल्यावर कोण कुलकर्णी आणि कोण कांबळे, कोण झहीर आणि कोण विकास, काय फरक पडायचा? विकास, प्रगती आणि सगळ्यात महत्त्वाचं, फक्त पुढं पाहायचं, फक्त काचेतून पाहायचं, गाडीच्या, ऑफिसच्या, फ्लॅटच्या, फ्लाईटच्या... काचेवरचे डाग, दुर्लक्ष करायचे, बदनसिब गरीब साले...

इकरसनं डेडालसच्या मागोमाग आपली गती तशीच ठेवली. जमीन लवकरच मागं सुटली. इकरस आणि त्याचा बाप हवेत मुक्त उडत होते आणि त्यांच्यासमोर अथांग समुद्र होता. बापानं शिकवल्याप्रमाणं इकरस अजिबात

आपली दिशा आणि उंची चुकवत नव्हता. ना सूर्याकडे, ना समुद्राकडे... ठीक मधोमध. पण काही वेळानं इकरसला त्याच त्याच समुद्राच्या दृश्याचा कंटाळा येऊ लागला. तोंडाला समुद्री हवेचा खारटपणा नकोसा झाला. त्वचाही क्षाराने कोरडी पडू लागली. त्याला मळमळू लागलं होतं. बाप त्याच्या बराच पुढं होता. इकरसला हळूहळू थोडं वेगळं काही करून पाहण्याची इच्छा होऊ लागली. बघू तरी, किती उंची गाठता येतीये, वडिलांना काय कळणार आहे, मी मागच्या मागं काय करतोय, असं म्हणत इकरसनं झेप घेतली.

२००८ ला जगाचे बाजार कोसळले, तेव्हा भारतीय बाजार आधीच्या ठेवीदारांच्या जुनाट, बुरसट साठवणुकांवर तरला. खाजगी क्षेत्राची वाढती उत्पादकता कधीच ग्राहकांपासून वंचित राहिली नाही. मात्र हवेत हलकीशी चिंता होती. हळूहळू जगभर आर्थिक मंदीचे वारे वाहू लागले. युरोपात सार्वजनिक खर्चावर सरकारांनी चाप लावायला सुरुवात केली आणि आर्थिक साहाय्याच्या योजना कमी केल्या. निम्न मध्यमवर्गीय कष्टकरी वर्ग असहायतेकडे ढकलला जाऊ लागला. अमेरिकेत शेअर मार्केट आणि हाऊसिंग मार्केट पडल्यावर हातावर पोट असलेले हेच वर्किंग क्लास लोक आधीच नसलेल्या सार्वजनिक सुरक्षेच्याही पलीकडं फेकले गेले. किचकट आकडेमोड, सबप्राइम क्रायसिस, हेजिंग, स्टॉकी शॉर्ट करणं, कोणाला कळणार होतं हे सगळं? मग दोष कोणाचा? नव्यानंच लॅटिन अमेरिकेतून निर्वासित होऊन आलेल्या मिगेलचा कदाचित, किंवा भारतातून आलेल्या 'पाकी' धर्मेंद्रचा. नक्कीच यांचाच दोष असणार. अचानक आजवर जागतिकीकरणाचे गोडवे गाणारे देश– अमेरिका फर्स्ट, युरोप फॉर युरोपियन्स, ब्रेक्झिटच्या गोष्टी करू लागले. जगभर उजव्या कट्टरतावादी, वर्चस्ववादी वंशभेदी शक्ती डोकं वर काढू लागल्या.

एकामागून एक संस्थात्मक प्रतिकांवर हल्ला होऊ लागला. आधुनिकतेनं दिलेली फळं नासू लागली होती, मग त्या आधुनिकतेनं दिलेली मूल्यं काय वेगळी. पुरोगामित्व, विज्ञानवाद, सर्वसमावेशकता, सेक्युलॅरिझम, या सगळ्यांचा दोष होता माझी नोकरी जाण्यात. माझी नोकरी जाऊच कशी शकते, घराचे




## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

हप्ते भरायचेत, नुकतीच घेतलेली गाडी विकावी लागेल, लग्नाला ५ मुलींनी नोकरी नसल्यानं नकार दिलाय, घरचे दिवाळीत लग्न उरकायचं म्हणतायत. त्यांना काय माहीत काय दिवाळी चालूये माझी. हा सगळा या आरक्षणवाल्यांचा प्रताप आहे. यांना घेतलं नसतं, तर आज माझी नोकरी जाण्याऐवजी प्रमोशन झालं असतं. शिक्षणासाठी घेतलेलं कर्ज कसं फेडू आता, साले आरक्षणवाले १ रुपया न भरता डिग्री घेऊन रिकामे झाले... त्यात हा झहीर, याच्या घरातसुद्धा तो टिव्हीवाला सांगतोय तसा बॉम्ब बनत नसेल याची काय खात्री? यांच्यावर कसला आलाय विश्वास? खिशात पुरेसं नसलं की, माणूस जगण्याला स्पर्धा समजू लागतो आणि दुसऱ्या माणसाला स्पर्धक.

इकरसनं सूर्याकडं झेप घेतली. तो उंच उडू लागला, उंचच उंच, आणखी उंच... जशी उंची वाढेल, तशी त्याची झिंग वाढत होती. डेडालसनं सहज मागं वळून बघितलं, तर इकरस त्याला दिसेना. त्याची नजर त्याला शोधता शोधता वर, सूर्याच्या दिशेनं गेली. इकरस सूर्याच्या अगदी जवळ पोहोचला होता. इकरसनं त्या उंचीवरून दिसणाऱ्या दृश्याला डोळ्यात साठवून डोळे बंद केले आणि हवेत तरंगण्याची नशा करू लागला. त्याच्या पंखांचं मेण वितळू लागलं होतं. हळूहळू एकएक पीस सुटं होत चाललेलं.

शास्त्रज्ञांचा अंदाज आहे, २०५० पर्यंत पृथ्वीचं तापमान सरासरी ४ डिग्री सेल्सियसनं वाढणार आहे. ४ डिग्री सेल्सियस सरासरी. जगात जिथं पाणी कमी आहे, तिथं दुष्काळ आणि तापमानात सगळं सुकं पडेल, ध्रुवांवरचा बर्फ वितळेल, समुद्राची सरासरी उंची वाढेल,

ओले दुष्काळ पडतील, पावसाचा मारा होईल, पूर येतील, दरडी कोसळतील, जमीन धसेल,
ढगफुटी होईल. शेती पुरेसं अन्न उत्पादित करू शकणार नाही, जागतिक सप्लाय चेन बंद पडतील, इंटरनेट लाईन्स तुटतील. अब्जाधीश म्हणे जमिनीखाली १०० फूट बंकरमध्ये बायकापोरं घेऊन निघून गेलेत, काही म्हणे उंच ठिकाणी सशस्त्र सुरक्षेत राहतायेत. कोट्यवधी लोक स्थलांतर करत वणवण भटकतील, पिण्याच्या पाण्यावरून संघर्ष पेटेल, भाकरीच्या तुकड्यासाठी दंगली होतील... आईबाबांचा फोन आलेला सकाळी, त्यांना म्हणे नातू हवाय, गोरापान... त्यांना काय दिसत नाही का हे सगळं? आम्ही पोरं काढून त्यांना या जगात ढकलू? त्यांच्यासमोर काय आहे हे दिसत असताना?

इकरस हळूहळू पडू लागला होता, पण त्याचे डोळे बंदच होते. त्याला कळत होतं की नाही, माहीत नाही. पण त्याला त्या क्षणाचं सुख गमवायचं नव्हतं. काय अनुभव होता तो, त्यानं सूर्य पाहिला होता... शक्य असतं तर त्यानं सूर्यच काबीज केला असता. डेडालस हतबल होऊन मागं पाहू लागला. इकरस प्रचंड वेगानं खाली पडत होता. डेडालसला वळायला वेळ लागला. तो वेगानं त्याच्या पोटच्या गोळ्याला वाचवायला झेपावला. पण इकरस डोळे उघडत नव्हता. त्याचा बाप त्याला आवाज देत होता, 'इकरस! डोळे उघड! इकडं बघ! पंख हलव!'

नुकत्याच झालेल्या डेलोइट या कंपनीच्या जागतिक मिलेनियल अँड जेन झी सर्व्हेच्या आकडेवारीनुसार, भारतातील अर्ध्याहून अधिक तरुणांना पर्यावरणबदल चिंताजनक वाटतोय. त्यांना त्याच्यातून भविष्याबाबत चिंता वाटू लागली आहे. ४९ टक्के तरुणांना आर्थिक आणि सामाजिक असुरक्षितता वाटू लागलीये. त्यांच्या चिंतांचा एक मोठा भाग रोजगार नसणं, वेतन पुरेसं न मिळणं, परिवाराच्या गरजा भागवता न येणं, या भोवती फिरतायत. या सर्व गोष्टींचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. ५० टक्क्यांहून अधिक तरुणांना आपल्यासोबत भेदभाव घडल्याचा अनुभव आला आहे, किंवा तशी त्यांची भावना आहे. मात्र, जागतिक तरुणाईच्या विपरित, भारतीय तरुणांचं अजूनही मत आहे की, उद्योगांना चालना दिली तर अनेक प्रश्न सुटतील. जगातली तरुणाई मात्र स्वतःला डिस्टोपियन सोशालिस्ट (निराशावादी समाजवादी) म्हणवून घेऊ लागलीये.

मात्र, या सर्व्हेमधला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अर्ध्याहून अधिक तरुणांना कोरोनाची जागतिक महामारी म्हणजे एक रिसेट बटण वाटत आहे. त्यांच्या मते या बसलेल्या धक्क्यातून आपल्याला जगाचा पुनर्विचार करण्याची संधी मिळाली आहे. आपण वेगळं जगू शकतो का, आपण वेगळा विचार करू शकतो का, जगाची दिशा बदलू शकतो का, याची ही संधी आहे, असं त्यांचं मत आहे. अनेक तत्त्वज्ञांचं देखील हेच म्हणणं आहे. कोरोनापूर्व काळात मानवी समूह म्हणून केलेल्या चुका सुधारण्यासाठी कोरोनाच्या धक्क्यानं एक संधी देऊ केली आहे. आपण उपभोगाच्या प्रक्रियांना प्रचंड गती दिली आहे, आपण इंधन जाळलं, श्रम वापरले, अन्न उगवलं, पचवलं, नासवलं; पण हे सगळं शाश्वत नाही, ते भौतिकशास्त्राच्या चौकटीतच शक्य नाही. हे बदलावं लागेल, बदलावंच लागेल, आणि हे बदलण्याची तयारी असेल, तरच येत्या काळात कुठलीही 'नवी उमेद' असण्याच्या चर्चेला हात घालता येईल...


***प्रथमेश पाटील, पुणे***

*मोबाइल : ७३०४२२८२५२*


## वसंत रात्री

वसंत रात्री उनाड वारा सुटल्यावर,
परसातली रातराणी मला
खेचून तिजपाशी आणते,
तो गंध तुझा असतो का?

परसदारी आलं की डोळे
आकाश न्याहाळू लागतात.
आकाशात पाहिलं की
तुझीच आठवण येते डोळ्यांत!

मग चांदणं खुलतं साथीला
अन् चंद्र येतो भेटीला!



अशा वेळी चंद्रापाशी धाडते
मी माझे सांगावे.
तो चंद्र निरोप धाडतो का?

तसा तर तुझा-माझा चंद्रही तोच,
चांदणं, पाणी, आकाशही तेच,
मग या भिंती कुणी बांधल्या?


***प्रज्ञा जयश्री संजय, सातारा***

*मोबाइल : ७२७६०१०६८२/*
*९५११७३०८६८*

# माणसाचेच गाणे गावे माणसाने

प्रियांका तुपे

अमन की ओर असं म्हणताना नेमकी कशा–कशापासून आपल्याला शांतता हवी आहे, नेमके कोणते गोंधळ आपल्या आसपास आहेत, सगळ्या गुंत्यांचा नेमका काय अन्वयार्थ लावायचा, सध्या आपल्या भवताली असलेला केऑस आणि त्याचा जेंडर म्हणजेच लिंगभावाशी नेमका काय संबंध आहे

या प्रश्नांचा विचार केल्यावर मला सगळ्यात आधी आठवण आली ती माझ्या जेंडर डिप्रेशनची. जेंडर डिप्रेशन अशी संज्ञा वापरतात की नाही, मला ठाऊक नाही, पण माझ्यापुरती आता मी ही संज्ञा वापरते आहे.

त्याचं झालं असं की दोनेक वर्षांपूर्वी मला लिंगभावाच्या अंगाने विचार करताना भरपूर नैराश्य आलं होतं. आता ते कशाकशामुळे... तर मी माझ्या अस्तित्वाच्या संदर्भाने अनेक गोष्टींचा सतत विचार करत होते. म्हंटलं तर हे सगळे मुद्दे अतिशय पर्सनल तरी खूप त्रास देणारे होते, आणि पर्सनल इज पॉलिटिकल असं आपण म्हणतोच की, शिवाय मोठं काही नैरेटिव मांडण्याकरता तसं गृहीतक, त्याबाबतचं काही तरी संशोधन हाती असावं लागतं, ते सध्या तसं माझ्यापाशी नसल्याने मी स्वत:लाच एक सामाजिक एकक म्हणून समोर ठेऊन त्या अनुषंगाने मला लिंगभावाबाबत आलेले अनुभव, वाटणारे गुंते आणि त्यापासून शांततेकडे जाण्याचा प्रयत्न याबद्दल लिहायचं ठरवलं. माझ्या अनुभवांशी निगडीत अनेक मुद्दे वरकरणी जेंडरशी संबंधित आहेत की नाही, असं वाटू शकतं खरं पण ते मी वाचकांवर सोपवते.

तर दोनेक वर्षांपूर्वी मी विचार करत होते, तो पहिला मुद्दा – आपण छान दिसतो का?, बरं आपल्यालेखी दिसतो, तर लोकांना– पुरुषांना आपण का बरं आवडत नाही?, आजवर आपल्याला एकाही मुलाने रोमँटिकली का प्रपोज केलं नसेल?...रुप नको गुण पाहा, व्यक्तीच्या बाह्यरुपापेक्षा कर्तृत्व आणि बुद्धीमत्ता या गोष्टी महत्वाच्या आहेत – हे नुसतं एक पुस्तकी सुभाषितच आहे का?...शेवटी पुरुषांना एखादी स्त्री आवडते ती तिच्या सौंदर्यामुळेच ना..असे अनेक विचार मनात सतत यायचे. मग आजूबाजूच्या पुरुषांनी मला आवडून घ्यावं, यासाठी मी आटापिटा करायचे. एक मन म्हणायचं...हे सगळं करायची काही गरज नाही कारण आपण रुपाने नसलो तरी माणूस म्हणून खूप श्रीमंत, समृद्ध आहोत, कर्तबगारीने आसपासच्या कितीतरी जणांपेक्षा बरे आहोत. आणि दुसरं मन म्हणायचं...हे सगळं जगाला कधी कळतं, तर जेव्हा तुम्ही त्यांच्याशी किंवा ते तुमच्याशी संवाद साधतील, सखोल संवाद होईल...तेव्हा.

पण मुळात आपल्याशी सखोल संवाद किंवा जुजबी संवाद करायलाच लोक कसे बरं येतील? आपण सुंदर (भांडवली आणि पुरुषी जगाच्या व्याख्येनुसार) दिसत नसू तर...आणि खरोखरीच असे बरेच कटू अनुभव मला आले होते. शाळा, कॉलेजात हुशार, एक्टीव असूनही सतत एकाकी पडल्याचे अनुभव होते. लोक मला टाळत असत, असं का...हे शोधण्याचा मी पुरेपूर प्रयत्न केला, म्हणजे लोकांशी सतत संवाद करून त्यांना विचारणं... स्वत:च तासंतास आपल्यात काय कमी आहे, ते शोधत बसणं इ.इ. तरीही त्याची समाधानकारक उत्तरे मिळेनात. मग माझं स्त्रीवादी मन म्हणे...जाऊ दे सगळं जग गेलं खड्ड्यात. आपल्याला काय वाटतं ते जास्त महत्वाचं. तरीही हे फार काळ टिकायचं नाही, अविचारी मन त्यावर कुरघोडी करतच असायचं. या सगळ्याचा खूप ताण येत होता, नैराश्यात भर पडतच होती. मग मला आणखी प्रश्न पडू लागले. आपण असं का दिसतो...तर आपल्या वर्गामुळे. आपण वर्किंग क्लासमध्ये येतो. मूलभूत गरजांव्यतिरिक्त आपल्याकडे साधं आरोग्याच्या कारणासाठीही पैसे उरत नाहीत, तर स्वतकडे लक्ष देण्यासाठी, 'मेंटेन' ठेवण्यासाठी पैसे मिळणं तर दूरचीच गोष्ट. चांगले कपडे, एक्सेसरीज, फुटवेअर, मेकअप आणि आणखी बऱ्याच गोष्टी आपल्याला परवडू शकत नाहीत, आणि खरं तर नाकीडोळी आपल्यापेक्षाही गये–गुजरे दिसणाऱ्या अनेकींना मात्र त्यांच्याकडे भरपूर पैसा असल्याने चांगलं राहता येतंय. त्यांना चार–चौघींत भाव मिळतोय. मुलं– आपले मित्र त्यांच्यासोबत आऊटिंगला जातायत, त्यांच्यासोबत फोटो काढून सोशल मीडियावर अपलोड करतायत. थोडक्यात आपल्याला जे हवं ते सगळं या मुलींना मिळतंय, आपल्याला मात्र त्यातल्या एकेका गोष्टीसाठी झगडावं लागतंय. साधी गोष्ट आहे की आपल्याला जसं आपल्या वडिलांच्या माघारी आपलं कुटूंब सांभाळावं लागतंय, तशी कोणतीही जबाबदारी त्यांच्यावर नाही, त्यामुळे त्यांना कसली चिंताच नाही. त्यांचे चेहरे सदानकदा फ्रेश, टवटवीत. आपल्या डोळ्याखाली मात्र कुटूंबाच्या आणि कसल्या कसल्या, स्वत:ला आयुष्यात उभं कसं

करायचं अशा अनेक चिंतांनी अकालीच काळ्या वर्तुळांनी घर केलेलं.

या सगळ्यात मला जी चिंता वाटायची ती कधीच केवळ वैयक्तिक नव्हती. प्रेम, स्पर्श सगळ्यांना मिळण्याबाबतची विषमता मला पोखरून टाकायची. आता कुणी म्हणेल, की ठीक आहे, प्रत्येकाचा चॉईस वेगवेगळा असतो. इतरांच्या चॉईसमध्ये तू बसत नसशील, इतकं सोपं आहे, हे. पण मला हे वरवरचं आणि पळवाट काढणारं उत्तर वाटतं. पण 'चॉईस मुळात तयार कसा होतो?' या अत्यंत सामाजिक, समाजशास्त्रीय आणि लिंगभावी धारणांशी घट्टपणे जोडलेल्या प्रश्नाचा विचारच आपण, अतिव्यक्तिवादी (इंडिविजुलिस्टिक) मतांमध्ये मारून टाकतो. त्यामुळे आपल्याला 'चॉईस' या मुद्द्यावर समाजशास्त्रीय, लिंगभावी, मानसशास्त्रीयदृष्ट्या विचार करण्याची गरज वाटत नाही.

मी स्त्रीवादी असले, तरी मला वर सांगितलेल्या दिसण्या-असण्याच्या मुद्द्यांनी खूप फरक पडत होता. २०१५ पासून माझं स्त्रीवादी डिस्कोर्सबद्दलचं व्यवस्थित वाचन, विविध व्यक्तींशी संवाद सुरू होता. जेंडरवरची एक फेलोशिपही मला मिळाली होती, ती संपल्यावरही अनेक गोष्टी शिकूनसुद्धा हे सारे विचार मला त्रास देत असत. हे सारंच स्त्रीद्वेष्टं, भांडवली, ब्राम्हणी पितृसत्तेतून आलेलं आहे, हेही मला कळत होतं पण वळत नव्हतं. माझ्या आत सतत एक द्वंद्व सुरू होतं. भांडवली आणि ब्राम्हणी पितृसत्ताक असलेल्या अनेक गोष्टींना माझा तात्विक, वैचारिक विरोध होता, तरीही त्या मला स्वत:पुरत्या हव्याही होत्या. म्हणजे स्त्री ही काही पुरुषांनी मिरवण्याची वस्तू नाही, त्याकरता तिनं जीवाचा आटापिटा करायची गरज नाही, 'ते मला तत्वतः मान्य असलं तरी इतर सुंदर स्त्रियांना सोशल मीडियापासून ते प्रत्यक्ष आयुष्यात मिळणारा भाव बघून मलाही आपण छान (भांडवली कल्पनांच्या दृष्टीने) रहावं आणि आपल्याला अस्तित्वाला पुरुषांची अधिमान्यता मिळावी असं वाटायचं. आतल्या आत असं द्वंद्व अनेकींच्या मनात सुरू असणार. हा महत्वाचा मुद्दा वाटत नसला तरी तो आहे खरा, तो अनेकींच्या आत्मशोधाशी, आत्मविश्वासाशी थेटपणे जोडलेला आहे. 'सेल्फ डाऊट', 'लो सेल्फ एस्टीम', खूप माणसात राहूनही एकाकी वाटणं अशा अनेक मानसिक अवस्थांचा त्रास शेकडो लोकांना होत असणार. मानसिक आरोग्याबाबतच्या अशा प्रकारच्या समस्या या निर्वात पोकळीत जन्मत नाहीत, वा त्या केवळ वैयक्तिक नसतात. समाजातल्या रुजलेल्या लिंगभावी धारणांशीही त्यांचा खोल संबंध असतो. त्यामुळे सध्याचा बाहेर असलेला कोलाहल आणि लिंगभावी धारणा यांच्या संबंधात माझ्यासह अनेक व्यक्तींचा दोन पातळ्यांवर संघर्ष, घुसमट, वाद चालत असणार असं मला वाटतं. एक संघर्ष वैयक्तिक पातळीवर आपण जी मूल्यं, तत्व, विचार, विचारसरणी मानतो, ते पूर्णपणे अंगीकारण्याचा स्वत:शीच सुरू असलेला संघर्ष आणि दुसरा बाहेरच्या जगात असलेल्या विषम व्यवस्थांशी लढा.

माझ्या लिंगभाव नैराश्यात जसा एक वैयक्तिक त्रासाचा भाग होता, तसाच दुसरा भाग आजूबाजूला जे घडतंय, त्यानं अस्वस्थ होण्याचा होता. अगदी अलीकडे मी करोनाकाळातल्या एकल स्त्रियांच्या अवस्थेवर वार्तांकन केलं होतं, त्यातल्या एका केसनं अनेक दिवस माझा पिच्छा पुरवला. अनेक रात्री दुस्वप्नं पडायची. घरकाम करणाऱ्या एका मुलीला मजबुरी म्हणून मालकांच्या घरी राहावं लागलं होतं आणि त्यानं अनेक दिवस तिचा लैंगिक छळ केला होता, तरीही त्या मुलीलाच नोकरी गमवावी लागली आणि मालकाविरोधात पोलिसांत तक्रारही करता आली नाही कारण मग मालकानेच तिच्यावर चोरीची उलटी केस केली तर...अशी भीती तिला घातली गेली होती. अशा कित्येक केसेस. अशा कित्येक घटना देशभरात, जगभरात घडल्या असतील. बलात्कार, लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, जन्मापूर्वीच स्त्रीगर्भ नाहीसा करणं, हुंड्यासाठी छळ, बालविवाह हे सारं तर दररोज चोहीकडून इतकं येऊन आदळतं, घटना इतक्या वेगाने घडून आपल्यापर्यंत पोहोचतात की बऱ्याचदा अशा घटनांवर व्यक्त काय व्हायचं हेच कळत नाही, कधीकधी संवेदना इतक्या बोथट होऊन जातात, की आता यात काय नवं? असंही वाटून जातं. आणि या सगळ्या भयंकर वास्तवाचं आपण काहीही करू शकत नाही, आपण काय केलं म्हणजे हे सगळं थांबेल? असा तिसरा नैतिक गचांडी धरणारा, अपराधगंडात टाकणारा प्रश्न.

या साऱ्या कोलाहलाला सामोरं जाताना आपल्यापैकी बहुतेक सगळेच समाजमाध्यमांचा अवकाश वापरतात. तसा तो मीही वापरते. तिथं लिहिल्याने फार काही साध्य होत नसलं किंवा त्या माध्यमाच्या काही मर्यादा असल्या तरी मनातली घालमेल, अस्वस्थता काहीशी कमी होते, असा माझा अनुभव आहे, पण दुसऱ्या बाजूला हाच ट्रॅपही वाटतो. लिहायचं, अस्वस्थता घालवायची, मोकळं व्हायचं? मग कृतीशीलतेची, व्यापक लढ्याची, तत्वचिंतनात्मक प्रश्नांची योग्य वासलात लावायची गरज उरत नाही. शिवाय व्यापक लढ्यासाठी एकजुटीची गरज असते, ती कशी होणार? आपण विविध जाती, धर्म, पंथांनी विभागलेल्या देशात राहत असतो, विविधता, मतभिन्नता असली तरीही अनेक मुद्द्यांवरून हल्ली प्रागतिक विचारांच्या लोकांमध्येही फूट पडू लागली आहे, किंबहुना काही विशिष्ट हेतू डोळ्यासमोर ठेवलेले

लोक हे आवर्जून करतात. स्त्रीवादावर चालणारे वाद–वितंडवाद हे याचं मोठं उदाहरण. सर्व जात– धर्म– वर्गातील स्त्रियांचे, इतर दुर्बल घटकांचे प्रश्न एकसारखे नसणारच, हे गृहीत आहे. त्यातल्या भिन्नतेबाबत आणि त्यावरच्या उपाययोजनांबाबत किमान संवेदनशील लोकांमध्ये तरी एकमत असतं, तरीदेखील या बायका वर्से स त्या बायका, शहरी एलिट स्त्रीवादी बायका विरुद्ध ग्रामीण, दलित बायका असं भांडण नेहमीच लावण्याचा प्रयत्न केला जातो. हे करणारे बहुसंख्य लोक पुरुष असतात, आणि त्या आपापल्या जात–समूहातल्या काही बायकांचा – आपलंच नॅरेटिव पुढे रेटण्यासाठी, बायनरीयुक्त मांडणीसाठी, प्यादी म्हणून वापर करतात, हा निव्वळ योगायोग मला तरी वाटत नाही. आणि असे वितंडवाद कोणत्याही संरचनात्मक टीकेकडे, मूलभूत बदलाच्या दिशेने न जाता, असलेला कोलाहल, गोंधळ उलट आणखी वाढवतात. आणि अर्थात व्यक्तींबरोबरच त्याचा आणखी एक मोठा लाभार्थी आहे ती म्हणजे ब्राम्हणी पितृसत्ता. असे वितंडवाद – वेगवेगळ्या समूहांच्या एकत्र येण्याच्या शक्यताच पुसून टाकतात. इतकंच नाही, तर विविध गटा–तटांमध्ये एकमेकांप्रती वैरभाव, द्वेष, विखार निर्माण करतात. मतभेदांसकटही एकमेकांशी शांतपणे संवाद करण्याच्या शक्यता पुसून टाकतात. त्यामुळे पूर्वग्रहांवर आधारलेले वितंडवाद हाही मला सध्याच्या काळातला एक मोठाच अडथळा वाटतो. यावर मात करण्यासाठी खूप धैर्य, चिकाटी, प्रेम, शांततेची गरज आहे.

दुसऱ्या बाजूला विशेषाधिकार असलेल्या समूहानं – आपल्यापेक्षा शोषित समूहातून आलेल्या व्यक्तींचं जगणं नीट समजून घेण्याची गरज आहे. त्यांच्या क्षोभामागे असलेली सामाजिक–राजकीय कारणं समजून घेण्याची गरज आहे. तर शोषित समूहांतील– आताच्या घडीला किमान विद्यापीठांपर्यंत, वैचारिक व्यासपीठांपर्यंत पोहोचलेल्या व्यक्तींनी आपला क्षोभ व्यक्तीपेक्षा जास्त व्यवस्थेवर आहे ना, याचंही भान ठेवायला हवं. मी स्वत: बहुजन समाजातून, कष्टकरी वर्गातून आले. मला मिळणाऱ्या संधींच्या आणि इतर स्वविकासाच्या अवकाशाबाबत असलेली विषमता मला दिसत– कळत होती, त्याबद्दल मनात चीड उत्पन्न व्हायची. आक्रोश, संताप, चीड यातून मीही माझ्या आजूबाजूच्या प्रिविलेज्ड व्यक्तींवर वैयक्तिक हल्ले केले होते. पण त्यातून आणखी निराशाच पदरी पडत गेली. मग मी गियर बदलून गाडी संवादाच्या, सहअस्तित्वाच्या (व्यवस्थेवरील टीकेची धार कमी न करता) वळणावर घेतली आणि तेव्हा मला अतिशय चांगला, समृद्ध करणारा अनुभव येऊ लागला. वेगवेगळ्या व्यक्ती, संस्थांशी माझा मतभेदांसकटही चांगला संवाद होऊ लागला आणि तो अनेक गोष्टींकरता उपकारक ठरला. विशेषत: आताच्या फॅसिस्ट काळात तर या हेल्दी संवादाचा फार मोठा आधार वाटतो.

हल्ली एक ओरड सतत केली जाते. फॅसिझमची भीती घालून तुम्ही 'प्रिविलेज्ड लोक' – 'आम्हाला' एकत्र यायला सांगता, एकत्र आल्यावर आमचे बारीकसारीक मुद्दे, प्रश्न तुमच्या एकीखाली झाकोळले जातात. 'आमचे प्रश्न एवढे मोठे आहेत की तुमची ही एकी आणि 'फॅसिझम...फॅसिझम'चा पुकारा आम्हाला परवडणारा नाही.' मला वाटतं, याकडे गंभीरपणे पाहिलं पाहिजेच. परंतु फॅसिझमशी लढण्याकरता अपरिहार्यतेतून सर्व प्रागतिक प्रवाहांनी एकत्र येणं ही खूप तात्कालिक गोष्ट असू शकते. विविध प्रवाहांच्या एकोप्याची अपेक्षा मुळात इतकी तात्कालिक आणि अपरिहार्यतेतून का करायची? दुसरा मुद्दा असा की एका मोठ्या प्रश्नाविरोधात एकत्र लढताना इतर काही प्रश्नांकडे कदाचित काही काळ दुर्लक्ष होऊ शकतं. (रणनीती म्हणून असं करू नयेच पण आपण फार आदर्श जगात नाही तर एका डिस्टोपियन जगात आणि युगात राहतो.) इतर प्रश्नांकडे झालेल्या दुर्लक्षाचे तोटेही मोठे गंभीर असतात, म्हणून त्याकरताही काही विचार केला पाहिजे, तरीदेखील जेव्हा जेव्हा कोणत्याही लोकशाही, कल्याणकारी राज्यात  फॅसिझमचा प्रवेश होतो, तेव्हा पहिला वरवंटा शोषित, वंचित, अल्पसंख्यांकावर फिरवला जातो. त्या अर्थाने आपल्याकडचं पहिलं लक्ष्य दलित, मुस्लीम, स्त्रिया, बालकं हेच आहेत. म्हणून पहिली लढाई या साऱ्यांच्या अस्तित्वाची. अस्तित्व राहिलं तरच पुढे त्याच्याशी निगडीत प्रश्नांना हात घालता येईल. फॅसिझमची झळ पहिल्याप्रथम शोषित समूहांना बसते, इतिहास याला साक्षी आहे. आणि जेव्हा जेव्हा अशा राजवटी आल्यात तेव्हा तेव्हा लोकशाही मूल्यं, स्त्री–स्वातंत्र्य, बालकांना वाढीसाठी मिळणारा पूरक अवकाश याचा नुसता संकोचच नाही झाला तर ते नष्ट करण्याचाच प्रयत्न झाला. एक स्त्रीवादी प्रवाह उदाहरण म्हणून घेतला तरी त्यातल्या विविध प्रवाहांनी, व्यक्तींनी, संस्थांनी एकत्र येणं का गरजेचं, त्यांच्यात सलोखा असणं का गरजेचं? तर फॅसिझम असो की युद्धापासून, जागतिक तापमानवाढीपर्यंत आलेलं कोणतंही मानवनिर्मित संकट – ते आलं की पहिला घाला स्त्रियांवर बसतो.

दुसरं असं की आजच्या जगाचे प्रश्न आपल्या समोरच्या विषम व्यवस्था आता बदलत आणि अधिक गुंतागुंतीच्या बनत चाललेल्या आहेत. ब्राम्हणी

पितृसत्ता हा केवळ एकच एक शत्रू समोर नाही. पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास, वाढतं कर्बउत्सर्जन, जागतिक तापमानवाढ, जगभरात वितळणारे ग्लेशियर्स, कापली जाणारी जंगलं या सगळ्याचे परिणाम केवळ पर्यावरणावर, निसर्गावर होत नाहीत. त्याचे परिणाम सामाजिक, आर्थिक, राजकीय असतात. पुन्हा त्यात सगळ्यात आधी भरडल्या जातात, त्या स्त्रिया. नवनवीन तंत्रज्ञान आपल्याकडे येऊ घातलं असलं, त्यामुळे ज्ञानार्जनाच्या क्षेत्रातल्या प्रगतीपासून भौतिक भरभराट होत असली तरी 'डिजीटल डिवाईड' (तंत्रसंसाधनांची विषमता) वाढतेच आहे. त्याचाही फटका स्त्रिया, बालकं, लैंगिक अल्पसंख्यांकांना आधी बसतो. करोना आणि पाठोपाठ लॉकडाऊनमुळे जगातल्या बहुसंख्य गरीब विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाचा मोठा प्रश्न उभा राहिला. ऑनलाईन शिक्षणाकरता संसाधनांचा अभाव निर्माण झाला की अर्थातच उपलब्ध संसाधनं मुलांना दिली गेली. मी स्वतःच केलेल्या एका वार्तांकनात मी एक प्रसंग लिहिला आहे. जुन्नरच्या एका आदिवासी कुटुंबात शिकणारी मुलं तीन होती, आणि मोबाईल एकच. मग तो मोबाईल शिक्षणाकरता मुलाला दिला गेला आणि मुलगी शेतात मजुरी करू लागली. त्या मुलीच्या मनातली खळबळ, चिडचिड, संताप, दुःख विसरता येत नाही.

शांतताप्रिय समाजाचा, सलोख्याचा विचार आपण करतो तेव्हा शिक्षण, नोकरी, अन्न-वस्त्र, निवारा यांसारख्या मूलभूत गोष्टी तरी मूठभरांची मक्तेदारी-विशेषाधिकार होऊ नयेत, संसाधनांचं समान वाटप व्हावं. ही त्याची पूर्वअट ठरते. समाजातले तरुण बेरोजगार होतात, शेतकऱ्याला हमीभाव मिळत नाही, कर्ज होऊन आत्महत्या करायची वेळ येते, बस-पासला पैसे नाहीत, म्हणून लातूरमधल्या शीतल वायाळ या शाळकरी मुलीवर आत्महत्येची वेळ येते, तेव्हा नुसत्या शांततेच्या गप्पा, पोकळ - अर्थहीन वाटतात. फुलनदेवीला इतक्या लोकांचा खून करायची हौस नव्हती, (इथे कायद्याचा मुद्दा जरा बाजूला ठेवू) पण तिच्यावर केलेल्या अनन्वित अत्याचारांनी क्रौर्याची परिसीमा गाठली होती. असं जेव्हा घडतं तेव्हा कायद्याच्या कक्षेत ती दोषी ठरते, पण अशी वेळ का आली? विषम समाजरचनेमुळे. हाताला काम नाही, म्हणून उद्या सुशिक्षित बेरोजगारांनी पोट भरण्याकरता चोरी केली, तर तो दोष कुणाचा? त्या मुलांचा की कल्याणकारी राज्यातल्या फसलेल्या धोरणांचा, राज्यकर्त्यांचा?

त्यामुळे आपण समूहासमूहांतल्या अमनची किंवा समाजातल्या शांततेची, न्यायप्रियतेची भाषा, अपेक्षा करत असू तर आपली पहिली जबाबदारी विषम समाजरचनांना सुरुंग लावण्याची, अन्यायी व्यवस्था उलथून टाकण्याची आहे. त्याकरता ध्येय-धोरणांवर काम, संसाधनांचं न्याय्य वाटप आणि विविध समूहांतला एकोपा, परस्परांवर विश्वास आवश्यक आहे. त्याकरिता माणसा-माणसांत प्रेम असणं आवश्यक आहे. प्रेमाने जगातले बरेचसे प्रश्न सुटू शकतात, यावर माझा अगाध विश्वास आहे.

नामदेव ढसाळांच्या कवितेतला एक तुकडा इथे उद्धृत करण्याचा मोह आवरत नाही. 'अमन की ओर' जाण्याची आस असलेल्या प्रत्येकासाठी ही कविता दीपस्तंभारखी आहे.

'हे सारे विश्वव्यापी गळूप्रमाणे फुगू द्यावे
अनाम वेळी फुटू द्यावे ,रिचू द्यावे.
नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये
काळा गोरा म्हणू नये.
तू ब्राह्मण, तू क्षत्रिय, तू वैश्य, तू शुद्र असे हिणवू नये
अभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी माणून
त्यांच्या कुशीत गुण्यागोविंदाने राहावे
चंद्र सुर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा
माणसावरच सुक्त रचावे
माणसाचेच गाणे गावे माणसाने.

***प्रियांका तुपे, पुणे***
*tupriya2911@gmail.com*

❀❀❀

---

(पान ५३ वरून)
अडचणी असल्यास मौन बाळगले जाते. परिणामी, व्यक्तीच्या मानसिक, लैंगिक गरजा एका ठिकाणी/ नात्यात पूर्ण होऊ न शकल्याने ती इतर माणसाकडून/ नात्याकडून त्या गरजा पूर्ण करण्याचा पर्याय शोधू लागते. विवाहबाह्य संबंध किंवा बहुपत्नीत्व-बहुपतित्व हे ते पर्याय होत. यातही बहुपत्नित्वाचे प्रमाण प्रामुख्याने दिसून येते; कारण समाजामध्ये स्त्रियांना असणारं दुय्यम स्थान. एखादा पुरुष त्याच्या मर्जीने एकापेक्षा अनेक पत्नी जितक्या सहज करू शकतो, तितक्या सहज एखादी स्त्री एकापेक्षा जास्त पती करू शकत नाही. कारण, स्त्री-पुरुष असमानता सामाजिक मानसिकतेत खूप खोलवर रुजली आहे. आज स्त्री-पुरुष समानता आहे. मानवी मूल्य या साऱ्याच्या मुळाशी समजून घेणे फार महत्त्वाचं आहे. कारण विवाहपूर्व अथवा विवाहोत्तर नातेसंबंधामध्ये कोणाही एका जोडीदाराला काहीही अडचण असल्यास दुसऱ्या जोडीदाराने ती समजून घेऊन कोणत्याही बंधनाचा दबाव न बाळगता एकत्रितपणे सामंजस्याने त्यावर मार्ग काढला पाहिजे.

सर्वसाधारणपणे अशा परिस्थितीत कोणताही सुलभ मार्ग निघत असेल

तर सामाजिक बंधनाचा ताण घेऊन ते नातं टिकवण्याकडे भर दिला जातो. मग त्या नात्यात काहीही तथ्य नसले तरीही कर्तव्य, एकनिष्ठता, प्रामाणिकपणा, नैतिकता, सहनशीलता या भावनिक दबाव तंत्राचा वापर करून निरर्थक नाती या जोडप्यावर लादली जातात. ज्याचे त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर देखील अतिशय प्रतिकूल परिणाम होतात काही जण जीवही गमावतात. नैतिकतेच्या परिप्रेक्ष्यातून या साऱ्या गोष्टी आपण जोवर पाहत राहू, तोवर आपण यातील खरा गर्भितार्थ समजू शकणार नाही. नैतिकता ही खरं तरी काळानुरूप बदलत असते. काही काळापूर्वी ज्या गोष्टी चालीरीती नैतिक समजल्या जायच्या, त्या आजच्या काळात अनैतिक वाटतात. तशाच, आजच्या रीती नैतिक समजल्या जात आहे, त्याच काही काळाने भविष्यात अनैतिक म्हणून गणल्या जाणाची शक्यता नाकारता येत नाही. हे समजून घेण्यासाठी इतिहासाचार्य राजवाडेनीं भारतीय विवाहसंस्थेच्या इतिहासंबंधी केलेल्या मांडणीचे उदाहरण येथे नक्कीच उपयोगी पडते. कोणतेही नातेसंबंध अस्तित्वात नसताना प्राचीन काळी कुणाही सोबत केला जाणारा स्त्री-पुरुष समागम एकीकडे जी त्या काळी नैतिक बाब होती. जसजसा काळ पुढे गेला नातेसंबंध उदयास आले मानवी समाज विकसित होत गेला आणि आज या विकसित अवस्थेत आपण विवाहपूर्व अथवा विवाहोत्तर अनेक संबंध बाळगणे म्हणजे अनैतिक बाब म्हणवतो म्हणजेच काळानुसार मानवी समाज जीवन ज्ञानी, विकसित झालं ही सुधारणात्मक बाब असली तरीही आज त्यास समाजमान्य स्त्री-पुरुष नात्यात अडचण आल्यास संकुचित सामाजिक व भावनिक बंधनाचा दबाव टाकून मुकाटपणे ते नातं निभावण्याचा सहन करत रेटण्याचा सल्ला कुटुंबीय व समाज त्या जोडप्यांवर लादतो. कारण, आजच्या मानवी समाजाच्या दृष्टीने ते नैतिक आहे. कोणतेही नातं निरर्थकपणे ताणण्यात सामाजिक दबावाने टिकवून ठेवण्यात आजच्या समाजाला नैतिकता वाटत असली, तरी भविष्यात हीच गोष्ट अनैतिक वाटण्याची असूच शकते म्हणूनच नैतिक-अनैतिकतेचे दृष्टिकोन हे कधीही स्थायी नसतात, हे आपण जितक्या लवकर लक्षात घेऊ तेवढे आपण नैसर्गिक प्रगल्भतेच्या आणखी जवळ जाऊन स्त्री-पुरुष समानता, एकमेकांच्या मतांचा आदर, प्रेम, आपुलकी, सामंजस्यपणा, अभिव्यक्ती, स्वातंत्र्य, निरोगी संवाद या मूल्यांवर आधारित नातेसंबंधाबद्दल सकारात्मक आग्रही आणि स्वागतार्हही असायला पाहिजे.

***अस्मिता ए. एस. नेवसे,***
***वाई जि. सातारा***
*मोबाइल : ९१३०९१४३१८*

(पान ७१ वरून)

''तुला नाय कळत. कळेल तुला पण. तुला नाय कळणार. कळेल तुला पण.''

''मग सांग की.''

''सांगतो नंतर, जमीरभाई एक खिमा पाव. चार पाव दे दो. थोडा कांदा चटणी जादा टाक. कांदा चटणी जादा दे दो.''

''काय रे वैभव? आला ते पन अष्टमीच्या होमाला दोन खिमा पाव देतो. मजबूत खावा. शिल्लक आहे आज'', जमीर बोलला.

''भावा मी काय बोलतो'', भूषण बोलला

''बोल न भावा.''

''आपण अवकाळी मोठे झालो का रे!''

''गरिबाला व्हावं लागतं रे! अवकाळी मोठं.''

''अवघड कधीपासून बोलायला लागला.''

''जमीरभाई, आप बताओ सबसे बडा क्या होता है? कोन होता है?''

''बेटा प्यार से बडा कोन है और उपरवाला प्यार बाटता है'', जमीरभाई बोलला. भूषण आणि वैभवने स्मितहास्य केले. खिमा पाव संपवून चालाय लागले. वैभव भूषणला बोलला, ''भावा, बाबासाहेबांची जयंती नेहमी १४ एप्रिलला येते.''

''फुत्तड मग का नंतर येते का? तेव्हाच असणार १४ एप्रिलला.''

''पण शाळा बंद असते ना दरवर्षी तेव्हा. मला वाटायचं एकतरी शाळेच्या माईकवरून बाबासाहेबांवर भाषण करायचे. पण एक पण चान्स भेटला नाही. पहिल्यांदा बोललो बघ बाबासाहेबावर पहिल्यांदा. माईकवरून पहिल्यांदा. १४ एप्रिलला सुट्टी नव्हती पाहिजे. मला बाबासाहेबावर भाषण करायचे होते.''

काहीतरी वेगळं होत आज. रात्री १२ वाजून गेलेले सगळ शांत होतं. वातावरण धूसर होत. नंतर दोघे काहीच बोलले नाहीत वैभवच्या स्लीपरचा नेमका अंगठा तुटलेला घसरवून चालावायचा कंटाळा आला त्याला. चप्पल त्याने हातात घेतली आणि चालाय लागला. दोघांना आणखी खूप चालायचे होते; पण हे कळायला अवकाश होता. एका चपलीचा अंगठा आधीच व्यवस्थेने तोडलेला होता.

***अविनाश उषा वसंत, मुंबई.***
***मोबाइल : ८८१०४५३६०४***

**प्रिय गुलप्रीत,**

सत् श्री अकाल! आज शेतकरी आंदोलनाचा ३९७वा दिवस! गेले कित्येक दिवस, कित्येक महिने मी माझ्या शेतकरी मित्रांसोबत दिल्लीमध्ये आहे. माझे दाद्दा-दाद्दी नेहमी मला सांगायचे, आम्ही खूप उन्हाळे-पावसाळे बघितलेत; पण या आधी आपल्या घरापासून इतका काळ लांब कुणीच राहिलं नव्हतं. स्वतःच्या घरापासून इतका काळ लांब राहायची माझी ही पहिलीच वेळ.

दिल्लीतली थंडी, इथला उन्हाळा वेगळाच आहे बघ. इथे पंजाबपेक्षा थोडी कमी थंडी असली तरी इकडे तू नाहीस, माझी माणसं नाहीत, आपली उबदार रजई नाही, आपल्या घराबाहेर पेटवलेली शेकोटीही नाही. खरं सांगू? इकडची सगळीच माणसं कंटाळली आहेत, दमली आहेत, आपल्या गावाची, आपल्या घराची मजा कुठेच नाही हे बाकी खरं!

आता या आंदोलनाबद्दल बहुतेक लोक विसरूनही गेले असतील. आपल्या घरापासून दूर, कोणीतरी आपल्या हक्कांसाठी शांतपणे आंदोलन करतंय हे बहुधा विस्मरणात गेलेलं असावं. मीडियावालेही फारशी दखल घेत नाहीत आता. २६ जानेवारीचा गलथानपणा सोडला, तर आमचं आंदोलन अगदी शांततेत आणि शिस्तीत चालू आहे. आमच्या आंदोलनात आम्ही बाह्य घटकांना प्रवेश दिला हेच आम्हाला भोवलं, तेवढी एक चूक नसती झाली, तर या शेतकरी आंदोलनाला हिंसेचं गालबोट कधीच लागलं नसतं.

इथे आम्ही सगळेच बेवारस लोकांसारखं राहतोय, आम्हाला आमचीही काही काळजी नाही; पण इथे बरीच वयस्कर मंडळी आहेत. गेले कित्येक दिवस इथे उघड्यावर राहतोय, पावसाळा गेला, हिवाळा गेला, उन्हाळाही गेला! इथे आमच्यापुरतं आम्ही काही गोष्टी उभ्या केल्या आहेत; पण सगळ्याच सोईसुविधा नाही ना आणता येणार इकडे! वयस्कर माणसांचे हाल होऊ नयेत, याची आम्ही सगळेच काळजी घेतोय, दिल्ली-हरियाणातून काही माणसं येऊन मदतीचा हात पुढे करताहेत. इतकं करूनही वयस्कर माणसांना वेगवेगळे आजार होत आहेत. आधी परिस्थिती जरा बरी होती; पण कोरोनाचा प्रादुर्भाव जसा वाढत गेला तशी आमची चिंता वाढली. आपल्या दाद्दा-दाद्दीच्या वयाच्या माणसांचे हे हाल बघवत नाहीयेत मला आता, इथे काहीच ठीक नाहीये गं..

खरं सांगू? आंदोलनातल्या कुणालाच आता परत 'खलिस्तान'कडे नाही जायचंय. मुघलांनी आपल्या गुरूंची हत्या करेपर्यंत आपण त्यांच्याशी एकनिष्ठच होतो, ब्रिटिशांशीही आपण एकनिष्ठ राहिलो. ते सगळे तर परके होते. तरीही, आपण त्यांना साथ दिली. पण हा देश, ही मिट्टी आपली आहे, हा मुल्क आपला आहे.. देशातल्या प्रत्येक माणसाला जितका हा देश आपलासा वाटतो तितकाच आम्हालाही वाटतो. आपल्याच देशाविरुद्ध जायचा विचार तरी आम्ही कसा करू शकतो?

काही वर्षांपूर्वी आपल्या भाऊबंदांच्या एका चुकीमुळे आपल्याला एक पंतप्रधान गमवावा लागल्या. आता पुन्हा हिंसेकडे जायचं नाहीये आम्हाला. इथे आंदोलनात अनेक तरुण सहभागी झाले आहेत, सरकार सहकार्य करत नाही, आपल्या मागण्या पूर्ण करत नाही, मागण्यांचा साधा विचारही करत नाही म्हणून त्यांच्या मनात लगेच भडका उडतो, लगेच पेटून उठतात ते.. पण आम्ही त्यांना समजावतो, हा देश गांधींचा आहे.. इथे हिंसा हा पर्याय नाही. सगळं काही प्रेमाने जिंकता येऊच शकतं की! हिंसेमुळे आपण बरंच काही गमावून बसतो आणि हाती मात्र काहीच लागत नाही. तसंही आम्ही सगळे गुरू गोविंद सिंहांचा शस्त्रांचा लढाऊ वारसा पुढे चालवूच शकतो; पण आमचा लोकशाहीवर विश्वास आहे, या देशावर विश्वास आहे! गुरू गोविंद सिंह म्हणतात, 'न डरौं अरि सौं जब जाय लड़ौं, निश्चय कर अपनी जीत करौं!' हे वाक्य आम्ही मनावर कोरून ठेवलंय, घाबरून न जाता, निर्भयपणे आम्ही ही लढाई लढू. ही लढाई आपण जिंकूच पण संयमाने आणि प्रेमाने!

मागची गुरू गोविंद सिंहांची जयंतीही आम्ही इथेच दिल्लीत साजरी केली. दिल्ली आणि हरियाणामधले आपले शीख बांधव आवर्जून आले होते, ते सगळे आपापल्या परीने आम्हाला मदत पुरवताहेत. दरवर्षीप्रमाणे या आंदोलनातही पालखी निघाली, खालसा दलाने कसरतीही केल्या. पण गुरुद्वाराची प्रार्थना ऐकून जमाना झालाय आता. घराची, शेताचीही फार ओढ लागलेय. आजपर्यंत दर बैसाखीला मी आपल्या कुटुंबासोबत असायचो, प्रत्येक बैसाखी आपण सगळे जण एकत्र आणि आनंदात साजरी करायचो पण या वर्षीची बैसाखी काही वेगळीच होती, सगळ्यांच्यात उत्साह असला तरी प्रत्येकाच्या मनात घराची आणि आपल्या माणसांची आठवण होती. आम्ही गेले कित्येक दिवस इकडे लढतोय, आपल्या हक्कांसाठी, आपल्या माणसांसाठी. हे आंदोलन प्रेमानेच जिंकायचं यावर आम्ही सगळेच ठाम आहोत.

बाकी तू कशी आहेस? स्वतःची काळजी घेतेयस ना? स्वतःबरोबर आपल्या शेताची, पिकांचीही काळजी घे बरं.. आम्ही इकडे आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी झालो असलो, तरी तुम्हीही यात आम्हाला साथ देताय! तुम्ही तिकडे आपलं घरदार सांभाळताय म्हणूनच आम्ही इकडे निश्चिंत आहोत.. आम्हाला सगळ्यांनाच लवकर घरी यावंसं वाटतंय गं, आपलं घर आणि ती गव्हा-मक्याच्या पिकांनी भरलेली सळसळती शेतं नजरेसमोरून हटत नाहीयेत. हे सगळं कधी निवळेल, आपल्या मागण्या कधी पूर्ण होतील, हे काही ठाऊक नाही मला; पण पुढच्या

बैसाखीला मी तुझ्यासोबत असेन हे मात्र नक्की!

तुझा अमरजित

***ऋचा दिनकर, मुंबई***
***मोबाइल : ७७३३८४२५८१०***

**प्रिय,**
**तुझ्यातला तू**

आज तुला खास पत्र लिहावंस वाटतंय. सुरूवातीला 'तुझ्यातला तू' असलं काही हे वाचताना चुकल्यासारखं वाटतंय का? पण आता तुला या चुकल्यासारखं वाटणाऱ्या साऱ्या गोष्टींची सवय करून घ्यायला हवी बरं... तुझ्यातल्या तुला आता समजून घ्यायला हवं.

मातीशी नाळ जोडणाऱ्या, आयुष्यात खरं जगणं शिकवणाऱ्या टुमदार गाव राहिलेला... गायी- म्हशीची धार काढतं सकाळ स्वच्छंदी करणारा... लहान थोरांच्या बाजूला बसून सकाळी वर्तमानपत्रातल्या बातम्या जोरजोरात वाचणारा... शिक्षण-पुस्तकासाठी, समाज सुधारणेसाठी कायम धडपडणारा अवलिया आहेस रे. तुला समाजाचे प्रश्न सतावतात. यावर दिवसरात्र विचार करत बसतोस. साधं एखाद्या 'सो कॉल्ड' नेत्यांचं किंवा समाजसुधारक म्हणून मानणाऱ्या कोणाचेही अवास्तव स्टेटमेंट ऐकल्यावर किती रागवतोस रे...अजूनही खूपदा सांगावं लागतं की संयमाने सारं जमतं. पटकन विचार मांडू नकोस... आता तू लय मोठा माणूस झालास बघ. कसली भरभर पुस्तके वाचतोस, वैचारिक मंथन करून लेख- कविता करतोस, त्या विचारमंचावर किती आत्मविश्वासाने बोलतोस हे सारं बघताना खूप भारी वाटतं. पण तुझ्यातल्या तुला कायम जीवंत ठेव. तुला समाज बोलेल की, काय गावातली बोलीभाषा बोलतो. शहरात राहणं तसंच वागणं जमायला हवं. पण या गावात मूळ समस्या असतात हे लोकांना काय समजणार ना? त्यांना गावातील पोरगा शहरात जातो तेव्हा कौतुक वाटतं. पण गावातला मुलगा गावासाठी झटताना चार बोलणी ऐकायला लागतात. कारण हेच आहे माणूस अजूनही एका विशिष्ट चौकटीत विचार करतो. ही चौकट बुरसटलेल्या आणि असमानतेने सजलेली आहे. खरंतर हा त्यांचा दोष नाही तर समाजाने व व्यवस्थेने ही परिस्थिती तयार केली आहे. या लोकांपेक्षा तुला काय वाटतं? हे महत्त्वाचे आहे. यापलिकडे तुला सांगितले जाईल की, आता मोठा झाला आहेस. चार पैसे कमव, चांगली नोकरी- व्यवसाय कर, बायका-पोरांसाठी पैसा जमव. जमलं तर तालुक्याच्या ठिकाणी एखादा फ्लॅट घे. मित्रमंडळी देखील बोलतील की, कॉलेजला नवीन टी-शर्ट-जीन्स / शर्ट - पॅन्ट घालून टकाटक यायचं.मग काय कॉलेजची दुनिया... दारू, सिगरेट हे पण अनुभवून बघ. कुठे समाज सुधारणा करणाऱ्याचं, अभ्यासाचं खुळ घेऊन बसलास... अशी मजा-मस्ती आता नाही तर कधी करायचं वगैरे वगैरे.... कधी ते बायल्या, एकलकोंडा म्हणून चिडवतील. कुठे शेतामधल्या गोष्टी करतोस म्हणून टोचतील. झगमगीत आणि कृत्रिम असणाऱ्या पण चंदेरी वाटणाऱ्या या जगात सहज तुला देखील ओढले जाईल.

पण तू खऱ्या शेतकऱ्यांचा मातीतला सच्चा माणूस आहेस हे कधीच विसरू नकोस. तुला शेतात झुणका-भाकरी खायला, टपरीवर कटिंग प्यायला मजा येते हे विसरू नकोस. कदाचित तुला 'ममाज् बॉय' म्हणून चिडवतील. पण तुझ्यातली पुरुष हृदय बाई जागी कर. तुझ्यात लहानपणापासून तुला बिंबवलं असेल विशिष्ट रंगाच्या चौकटीत, मर्दांगीमध्ये... मग आता तुलाच समाज दोषी ठरवत आहे.तू कवी मनाचा आहेस, साहित्यात रमतोस म्हणून तुझ्या वयाची पोरं मागून एकदा तरी हसली असतील. पण तू ते अजिबात मनावर घेऊ नकोस. समाज सुधारकांचे बीज पेरणारी आणि माणूसकीची शिकवण रूजवणारी माणसं कधीच विचारांनी मरत नसतात. परिस्थितीमधून किती अविवेकी विचारांचा मारा आणि विरोध झाला तरी तू तुझ्या मतावर ठाम रहा. अरे, आता हीच वेळ आहे तुला समाजाला कृतीतून, विचारांतून उत्तर देण्याची... तुला काय वाटतंय ते तू कर... तुला हवं तसं स्वयंपाकघरात बिनधास्त मन रमवं, भरपूर साहित्याचा आस्वाद घे, तुला नसेल गर्लफ्रेंड करायची, व्यसन नसेल करायचं तर लगेच नकार कळवं. नकार देता आणि नकार पचवता आला पाहिजे. पण एखादी मुलगी आवडली किंवा समलिंगी भावना वाटली तरी समोरच्यावर मनापासून प्रेम कर. स्वतः

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

*With Best Compliments From !*

**POONA PAPER**
**TRADING COMPANY**

Ph. : 020-24460401 / Mob. : 9822091645

सोबत मैत्री करताना इतरांबरोबर पण मित्रत्वाने रहा. किती दिवस जग करतं म्हणून तू देखील तेच करशील. एका 'पुरूषी' या लेबल खाली अडकून राहशील. मातीला या निसर्गाच्या कुशीत बिलगून घ्यावंसं वाटतं ना. मग कोणी नसलं तरी एकटा मस्त सारं काही न्याहाळून ये.

तुला आपल्या माणसांवर प्रेम करणं खूप आवडतं. हेच किती भारी आहे. आनंद हा आपला स्वभाव व्हायला हवा. सौंदर्य जसं पाहणाऱ्यांच्या दृष्टीत असतं, तसा आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत असतो. आपण मोठे होतो आणि छोट्या छोट्या आनंदाला पारखे होते. तुला पण कधी तरी वाटतं असेल की सेक्स करून बघावा किंवा मुलीला जवळ घ्यावं. यात वाईट काही नाही पण स्वतः हे करण्याआधी एकदा हे बोलून बघ की, हे माझे शरीर आहे आणि या शरीराच्या आधाराने मी जगतो आहे. मी एक राक्षस नाही तर माणूस आहे. ही भावना सतत जागी असली पाहिजे. मग आपण आपल्या प्रत्येक हालचालीत बारीकसारीक विचार करू शकतो.प्रत्येकाला आपल्या अस्तित्वाचे भान असणे आवश्यकच आहे. कित्येक राक्षसीवृत्तीचे पुरूष बलात्कार, अत्याचार, कौमार्य चाचणी इ. मध्ये सडके मेंदू बनून कृती करतात.पण तू त्यातला नाही आहेस.तू माणुसकीच्या, प्रकाशाच्या आणि समतेच्या वाटेने जाणारा माणूस आहेस.तुला तुझी ओळख एक पुरुष म्हणून नाही तर 'माणूस' म्हणून जगाला करून द्यायची आहे. असा माणूस जो माणसाला माणूस म्हणून बघेल.तुला मासिकपाळी, गरोदरपणाची अवस्था, पालकत्व इ.बाबी समजून घ्यायच्या आहे.नाहीतर तुला देखील समाज बोलले की, सगळे पुरुष सारखे, त्यांना काही भावना वगैरे नसतात.

या प्रवासात तुझ्या सोबत कोणी नसलं तरी मी तुझ्यासोबत कायम असेन. आपल्याला तर हीच बुरसटलेली चौकट मोडून काढायची आहे ना रे. तुझी तू स्पेस कायम घे आणि तुझ्यातल्या तुला जीवंत ठेव.हे खूप वैचारिक लेक्चर वगैरे वाटलं असेल ना. पण तरी तुला आता ही बंधने आणि अपेक्षांचे ओझे बाजूला सारून जगायला शिकायला हवं. हे सर्व करत असताना प्रेम करायला विसरु नको. अरे माझ्यावर नाही रे.... तू तुझ्यावर प्रेम कर. तुझ्यातील कलेवर, लेखणीवर, भाषेवर, मनावर आणि अस्तित्वावर प्रेम कर. कारण प्रेमाला दुसरा पर्याय नाही रे. यात आपले मैत्रीपूर्ण नाते बहरत राहील.तुझ्यापासून तू दूर जात आहेस असं जरा तरी जाणवलं ना. तर माझी आठवण काढ हा... मी तुझ्यात मिळेल कदाचित सहवास जाणवेल.तुला वारंवार आठवण करुन देत राहीन. तुझ्यातल्या तुझी.... तू ऐकशील ना? एकदा तरी आठवण काढशील ना? एकदा तुझ्यातला तुला ऐक... हेच खूप आहे.

खूप प्रेम रे खऱ्या माणसा...

तुझीच,<br>
माझ्यातली मी.

***प्रज्वली नाईक, नवीन पनवेल.***<br>
*prajwalin6@gmail.com*

---

**प्रिय सखी,**

कशी आहेस हे विचारण्याचं धाडस होत नाहीये; पण तू ठीक असावंस असं मनापासून वाटतंय. तू म्हणशील काय उपयोग अशा वरवरच्या मलम पट्टीचा. खरंय की ग. पण शब्दांशिवाय काय आहे माझ्याकडे. काय देऊ शकेल तुला मी? म्हणून हे शब्दच घे बये.

तुला आठवतं तू मागे एका पत्रात म्हणाली होतीस, 'प्रिय मैत्रिणी, काल रात्रभर आम्ही काही युवा रस्त्यावर ठाण मांडून बसलो होतो. मुक्तीची गाणी गात होतो. मला खात्री आहे, लवकरच आम चा देश शांत आणि सुजलाम देश म्हणून ओळखला जाईल. आमच्या मुक्तीची पहाट जवळ आलीये.' तुझ्या प्रत्येक शब्दात मुक्तीची आस होती, जिंकण्याचा – स्वतंत्र होण्याचा उत्साह होता. काश, तू म्हणालीस तसे झाले असते. काश तुझ्या मुक्तीच्या गाण्यांनी तुझ्या देशाचे आभाळ रंगीन झाले असते. काश...

पण ह्या काशच्या पलीकडे काय? धर्मांध आणि सत्तेच्या भुकेल्या पुरुषांनी तुझ्या देशाचे केलेले हाल मला बघवत नाहीयेत. मी माझा मोबाइल बंद करून ठेवलाय. नको त्या अफगाणच्या बातम्या. मला सवय आहे ग, तालिबानच्या संदर्भातले फोटोज स्क्रोल करण्याची. मोबाइल बंद करण्याची. बातम्यांचे चॅनल न बघण्याची.
वर्तमानपत्रे कचऱ्यात फेकण्याची. पण तुझं काय? तुझा चेहरा समोर आला की गलबलून येतं... तुझा चेहरा... हजारो तालिबानी स्त्रियांचा चेहरा. माझी चिडचिड होतेय. का म्हणून तू हे सगळं भोगायचं? धर्मांध तालिबान्यांमध्ये एकही स्त्री नाही. सगळा सत्तेचा खेळ पुरुषांचा. आणि त्यांच्या क्रूरतेच्या पहिल्या बळी मात्र ठरणार स्त्रिया नि लहान मुलं.

हे सगळं भयंकर आहे. विचित्र आहे. मी हे सगळं ऐकतेय, बघतेय. तू मात्र भोगतेयस. आणि तरीही मी तुला पत्र लिहण्याचं धाडस करतेय. तुझ्या आयुष्यातील रंग हिरावून घेण्याचा अधिकार त्यांना कुणी दिला? तुझी पुस्तकं, तुझ्या कविता, तुझं पेन, ह्या सगळ्याचं भविष्य काय असेल ग? तुला उजेडाची आस आहे, पण तुझ्या घराच्या खिडक्या तर बंद केल्या गेल्यात. तुझ्या चालण्यावर बंधनं आलीयेत. कदाचित तुझ्या घरच्या बागेतील फुले आता फुलणार नाहीत. तिथे सुरुंग सापडतील. कदाचित तुझी पुस्तकं, पत्रं जाळून टाकली जातील. असही ऐकलं की, तू एकटी बाहेर पडूच शकत नाहीस. तुझ्या सावलीसोबत अजून एका पुरुषाची सावली तुला सोबत लागणार आहे. तुझ्या गावाच्या जमिनी नापीक

होतील, तुझ्या स्वप्नांकडे जाणारे रस्ते तुझ्याकडून हिरावून घेतले जातील. तुझ्या कवितांचे शब्द तुझ्या घशातच अडकून राहणार असतील तर मी तरी कसं लिहू शकेन? हे पत्र तरी तुला पोहचेल का? तुला आठवते आपण स्वप्न बघायचो की, सगळ्या देशांच्या मुलींनी एकत्र येऊन नाचावं, गावं, कविता म्हणाव्यात. सगळ्या मुलींनी हे देश चालवावेत. म्हणजे हे जग अधिक सुंदर होईल. पण स्वप्न ते स्वप्न राहीलं. इथल्या पुरुषीसत्तेने धर्माच्या नावाखाली तुला कोठडीत बंद करून टाकलं ग.

मला माहितीये ह्या कोठडीची दारं मजबूत आहेत. भिंती उंच आहेत. पण हे तुरुंग फोडण्यासाठी तू लढायचं ठरवलं असशील याची मला खात्री आहे. हे लढणं सोपं नसेल. पण लक्षात असू दे, जगातल्या तमाम स्त्रियांची तू प्रतिनिधी आहेस. पुरुषी, धर्मांध आणि जातीय सत्तेच्या बळी ठरलेल्या, ह्या सत्तांनी गुलाम म्हणून वागवलेल्या, आणि तरीही ह्या सत्तांच्या विरोधात हिमतीने उभ्या राहणाऱ्या, शोषकांच्या बेड्यांना धडका देणाऱ्या अशा तमाम कष्टकरी, श्रमिक, लढाऊ स्वतंत्र महिलांची तू प्रतिनिधी आहेस. तुझी लढाई कोण्या एकट्या तालिबानविरोधात नाही. तर इथल्या प्रत्येक जुलमी राजवटी विरुद्ध आहे, जी स्त्रियांना गुलाम करू इच्छिते. तुझी लढाई शाश्वत न्यायासाठी आहे. आणि म्हणूनच ही लढाई फक्त तुझी न उरता अख्ख्या मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. मी तुला विश्वास देते की, माझ्यासारख्या लाखो मैत्रिणी तुझ्यासोबत आहे. आपण एकत्रितपणे ह्या जुलमी सत्तांशी संघर्ष करू. आपल्या स्वप्नातील प्रेम, न्याय, आणि समता असलेला समाज आपण निर्माण करू.

हा प्रवास कठीण आहे, असेल. घाबरू नकोस. सगळीकडे काळोख असला तरी, आपल्या निर्भय प्रेमाच्या गाण्यांच्या सोबतीने आपण उजेडाकडे जात राहू. तुझ्या अंगणात पुन्हा रंगीबेरंगी फुले फुलावीत, पक्षांच्या सुरावटीने तुला जाग यावी, तू तुझ्या मित्रमैत्रिणींना पत्रं धाडावीस, तुझी संध्याकाळ कवितांच्या मैफली रंगवत जावी, प्रत्येक नवीन पुस्तक घेतल्यानंतर त्याचा वास तुला मनात भरून घेता यावा, तुला तुझ्या आवडीच्या रंगांचे सुंदर ड्रेस घालता यावेत, कॉलेजातल्या वर्गात मैत्रिणींसोबत बसून तुला मनमोकळेपणाने खिदळता यावं, घरी येताना रस्त्यावरच्या गाड्यावर उभं राहून तुला बिनधासपणे एकटीने पाणीपुरी खाता यावी. छोट्या वाटणाऱ्या ह्या सगळ्या सगळ्या गोष्टी तुला करता याव्यात यासाठी आपण लढू. तुझं विखरलेलं कुटुंब, मित्रमैत्रिणी तुला नक्की भेटतील. रक्ताच्या चिळकांड्यांनी रंगलेली घरं आपण तुला हव्या- तशा तुझ्या आवडत्या रंगांत रंगवू. तुला मोठ्यानी गाणी म्हणता यावीत यासाठी आता मुठी वळवून मोठयानं घोषणांचा जागर करायची गरज आहे. तुझ्या आयुष्यातून हिरावला गेलेला प्रकाश

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

आपण ओढून आपल्याकडे आणू. तो आपल्या हक्काचा प्रकाश आहे. तो पुन्हा मिळवण्यापासून आपल्याला जगातील कोणतीच जुलमी व्यवस्था रोखू शकत नाही. हे घनदाट भीतीचे, शंकांचे, आणि दहशतीचे मळभ सारून टाक बाजूला. आणि पुढे ये... आम्ही आहोतच तुला साथ द्यायला.

आपण उजेडाचे वारस होतो, आहोत. लढू आणि जिंकू.

तुला खूप खूप प्रेम आणि सोबत...

ह्या पत्राचे उत्तर नाही धाडू शकलीस, तरी माझ म्हणणं तुझ्यापर्यंत पोहचले असं मी समजेन. काळजी घे.

तुझीच मैत्रीण,
श्वेता

***श्वेता सीमा विनोद, पुणे.***
*shwetaseema123@gmail.com*

## आम्ही एकत्र, आमची एकजूट

**सामाजिक परिवर्तनासाठी या साऱ्यांची भूमिका एकच आहे.**
**म्हणून आम्ही एकत्र आहोत हातात हात घालून**

**अक्षरस्पर्श ग्रंथालय :** ०२०-२५४२४९१५,
**नारी समता मंच :** ०२०-२४४७३११६,
**साथ-साथ विवाह अभ्यास मंडळ :** ९४२२०८९१२१,
**सखी साऱ्याजणी** (सखी मंडळाचं नवं नाव) : ०२०-२४५३८७६३,
आणि **मिळून साऱ्याजणी :** ७४४७४४९६६४
अशा आमच्या पाच संस्था/संघटना म्हणजे एका मनगटातून उगवलेली पाच बोटं. आणि त्याला फुटलेलं सहावं बोट म्हणजे,
**पुरुष उवाच** - ०२०-२५६५२३२४.

**अमेरिकेत मराठी स्त्रियांसाठी हेल्पलाईन - मैत्रिण**
अमेरिकेत कुणी मराठी स्त्री अडचणीत असेल तर ती मदत मागू शकते.
तेथील संपर्क :
सुनीता धुमाळे २०३ ६९५ ९९५१ (हा नंबर टोल फ्री नाही)

# आशा सेविकांना मानाचा मुजरा!

हृषीकेश आंधळकर

**'द कॉस्मोपॉलिटीन' या मासिकाच्या भारतीय आवृत्तीत आशा सेविकांचं सैन्य- ज्यांनी ग्रामीण भारतातील कोविड-१९ च्या लढ्यात खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.** (The ASHa Worker's Army. The Women Leading The War against COVID-19 in rural India. ) **या शब्दात केलेला गौरव हा नक्कीच स्तुत्य होता. समाजातील प्रत्येक घटकाला आशेचा किरण दाखवणाऱ्या या आशाताईंच्या भविष्यात मात्र आशेचा किरण कुठे दिसत नाही. भारताची महत्त्वपूर्ण ताकद म्हणजे आजची युवा पिढी. मला वाटतं, आपण सर्व युवकांनी आशासेविकांच्या कामाबद्दल बारकाईने समजून घेतल पाहिजे. त्याच बरोबर या एवढ्या महत्त्वपूर्ण घटकाच्या शाश्वत विकासासाठी, आशा सेविकांना आणखीन सक्षम करण्यासाठी काही विचार केला पाहिजे. माणूस कोणत्याही पद-पातळीवर असो, प्रत्येकाला सन्मानाने जगायला आवडतं. आशासेविकांचा, ते करत असलेल्या महत्त्वपूर्ण कामाचा योग्य सन्मान व्हायला हवा. यासाठी तरुण पिढी म्हणून प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखत सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.**

माणूस आणि त्याच्या भावना या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. विविध भावनांच्या छटा समजून घेताना मानवी संबंधांमधील प्रेम या भावनेचं महत्त्व अधिक आहे. जुन्या आख्यायिका, कथा-कादंबरी, पुराकथा, ताजमहालसारखी वास्तू, विविध सिनेमे, गाणी, नाटक या गोष्टी पाहत, ऐकत जडण-घडण होत मोठं होताना, प्रेम ही भावना फक्त नर-मादी याच्यातील प्रेम याच परिप्रेक्ष्यातून बघायला कळत-नकळत भाग पाडते. परंतु, आईचं मुलांवरील प्रेम, बापाचं न दिसणारं आपल्या कुटुंबावरील प्रेम, याच सोबत तुम्ही ज्या क्षेत्रात आहात त्या क्षेत्रातील तुमच्या सहकाऱ्यांमधील आपापसातील प्रेम, बंधुता, अशा किती तरी व्याख्या प्रेमाच्या करता येतील. या नातेसंबंधांमध्ये प्रेम या शब्दाची व्याख्या नात्यानुरूप कमी-अधिक जरी वाटत असली तरी, प्रेम ही भावना मात्र कायमच तशीच राहते. या सर्वांमध्ये केवळ नात्याच्या साच्यामध्येच आपण प्रेमाची व्याख्या अडकून ठेवतो. परंतु याही पुढे जाऊन आपण वावरत असलेल्या समाजात आपल्याला नकळत कितीतरी अशा व्यक्ती आहेत, ज्या भले आपल्यावर प्रत्यक्ष प्रेम ना करोत, पण आपल्या कामावर भरभरून प्रेम करत असतात आणि सचोटीने ते करत असलेल्या कामातून नकळत आपल्या सोबत अप्रत्यक्ष एक प्रेमाचा-आपुलकीचा बंध तयार करत असतात. सहज वर-वर विचार करता या गोष्टी आपल्या लक्षात येत नाहीत. परंतु, ते करत असलेल्या त्यांच्या कामाचा अप्रत्यक्ष उपयोग आपल्या भल्यासाठीच होत असतो. जरा आपल्या स्वार्थी स्वभावातून बाहेर येत एक नजर आपल्या दैनंदिन जीवनावर टाका. सकाळी कचरा वेचायला येणारे कर्मचारी, नाले-गटारे साफ करणारे सफाई कामगार, सार्वजनिक स्वच्छता सेवक, आरोग्य सेवक अशी ही यादी खूप मोठी होइल. तर सांगायचा प्रयत्न एवढाच आहे की, जर या लोकांनी आपल्या कामावर मनापासून प्रेम नाही केलं तर? फक्त विचार करून बघा. यावर मी पुढे काही जास्त मांडत नाही, आपल्या तरच उत्तर आपल्या समोर जे चित्र दाखवेल ते नक्कीच भयावह असेल.

असो, तसा पेशाने मीही सेवकच आहे. वैद्यकीय सेवक. गेली दीड वर्ष आपण सर्व अनुभवत असलेलं करोना संकट जरा माझ्या पेशामुळे जरा जवळून अनुभवायला मिळालं. प्रत्यक्ष समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचत आरोग्य संशोधनाचं काम करण्याची जबाबदारी मिळाली होती. अगदी लॉकडाऊन असताना देखील आम्ही प्रत्यक्ष समाजातील सर्व घटकापर्यंत पोहचत, संशोधनासाठी लागणारे नमुने, माहिती संकलनाचं काम चालू होतं. या सर्व कामात एकच महत्त्वपूर्ण घटक आम्हाला शाश्वत आधार देत होता, तो म्हणजे आपल्या प्रत्येक भागात काम करणाऱ्या 'आशा ताई.'

वाड्या-वस्त्या, तांडे-पाडे, गाव-खेडे किंवा शहरे अशा समाजातील प्रत्येक भागत तळागाळात आरोग्य सेवा पुरवणे व त्याच बरोबर

आरोग्यविषयी विविध सर्वे, माहिती संकलन करून यंत्रणेला प्रभावी अंमलबजावणीसाठी दिशा देण्याचं महत्त्वपूर्ण काम हे आशासेविकांमुळे शक्य आहे, याची जाण पावलो-पावली मला या कामातून आली.

'द कॉस्मोपॉलिटीन'सारख्या मासिकाने आशा सेविकांची घेतलेली दखल ही खरच महत्त्वपूर्ण बाब वाटते. कारण, 'द कॉस्मोपॉलिटीन' चा इतिहास जर आपण पाहिला तर लक्षात येईल. 'द कॉस्मोपॉलिटीन' हे साधारणत: १८८६ पासून अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरात प्रसिद्ध होणारं फार जुनं मासिक आहे. सुरुवातीला 'कौटुंबिक मासिक' अशी ओळख असणारे हे मासिक पुढे 'साहित्यिक' झाले, आणि १९६५ दशकापासून मुख्यत: स्त्रिया किंवा महिला हा वाचक वर्ग समोर ठेवून ते प्रसिद्ध व्हायला लागलं. तेव्हापासून 'महिलांच्या विविध प्रश्नांवर बोलणारं' एक जगप्रसिद्ध मासिक ही ओळख आजपर्यंत कायम आहे. याच मासिकाची भारतीय आवृत्ती हा भारतातील प्रसिद्ध इंडिया टुडे हा समूह छापतो.

काही दिवसांपूर्वी हे मासिक एका विशेष कारणाने चर्चेत आलं, ते म्हणजे याआधी सांगितलेली गोष्ट. त्याचं मुखपृष्ठ - ज्यामध्ये त्यांनी, ग्रामीण शासकीय आरोग्य यंत्रणेचा कणा असणाऱ्या आशा सेविका यांना केंद्रबिंदू (feature) ठेवले आहे.

'आशा सेविकांचे सैन्य. जे ग्रामीण भारतातील कोविड-१९च्या लढयात खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.'- अशा शब्दांत त्यांचा गौरव केला होता.

कोविड-१९ काळात संस्थात्मक विलगीकरण करताना, लोकांपर्यंत सर्वात प्रथम पोहचणारा घटक म्हणजे आशा सेविका. करोना काळात सर्वात जास्त लोकांचा रोष कोणी ओढावून घेतला असेल, तर तो म्हणजे आशा सेविकांनीच. याबद्दल स्वानुभव सांगायचा झाला तर, एका गावातील लोकांचा आम्ही करत असलेल्या कोविड-१९च्या सर्वेक्षणासाठी फार विरोध होता. संशोधन महत्त्वाचं होतं. संशोधनावर आधारित भारताचे काही धोरणात्मक निर्णय होणार होते. परंतु, लोकांच्या मनात, कोविड-१९ तपासणी, रिपोर्ट पॉझिटीव्ह आला तर १४ दिवस सरकारी विलगीकरण, त्यात होणारे हाल, याची फार धास्ती होती. मुळात कोविड-१९ची तपासणी, विलगीकरण हा आमच्या संशोधन कामाचा भागच नव्हता; परंतु, लोक चुकीचा समज ठेवून संशोधन कामात सहकार्य करत नव्हते. आम्हाला वेळेचं बंधन होतं आणि पुढे कामाचा व्यापही होता. मला या संदर्भात फील्डहून माझ्या सर्वे कर्मचाऱ्याचा फोन आला आणि त्याने तेथील परिस्थिती सांगितली. परिस्थितीचं गांभीर्य ओळखत मी शक्य तेवढा लवकर त्या गावात पोचलो. सर्वे कर्मचारी सोबत, आशा सेविकेला घेऊन मी गावातील एका घरासमोर गेलो. आम्ही येत असतानाच सर्व कुटुंब घरात गेलं आणि दार लावून घेतलं. आम्ही घरासमोर आलो याची चाहूल लागताच, आशा सेविकेला उद्देशून घरातून एकदम रागात आवाज आला, 'जर आमच्या घरात येशील, तर तुझे पाय तोडून हातात देईन.' या एक प्रसंगाचा मी साक्षीदार होतो. असे किती तरी प्रसंग यांच्यावर आले असतील. आणि ही जीवघेणी भाषा ऐकून अंदाज येतो की, कसल्या वातावरणात यांना काम करावं लागत असेल. नंतर गावातील प्रतिष्ठित व्यक्तींना व पोलीस प्रशासनाला सोबत घेऊन लोकांच्या सर्व शंकांचं निरसन करत आमचं काम पूर्ण केलं.

करोनाच्या कामा सोबतच,

## अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

मागील दीड वर्षात क्षयरोगाविषयी एका महत्त्वपूर्ण संशोधनाची जबाबदारी मिळाली होती. या कामी साधारण १०-१२ दिवस संशोधासाठी निवडलेल्या गावात, शहरात प्रत्यक्ष राहून जवळ जवळ ६००-८०० लोकांची क्षयरोगासाठी तपासणी करावी लागत होती. संशोधनाचं काम होतं, आम्हाला नेमून दिलेल्या ठरावीक भागातील १५ वयोगटावरील लोकांची सरसकट तपासणी करावी लागत असे. नवीन भागात जाऊन ३००-४०० कुटुंबांना प्रत्यक्ष भेटून त्या कुटुंबातील लोकांना संशोधन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी तयार करणं हे खूपच कठीण काम आम्हाला करावं लागत होतं. याच सोबत सर्वे क्षण तपासणी झाल्यानंतर एखादी व्यक्ती क्षयरोगाचे लक्षण दाखवत असेल, तर त्यांच्या थुंकीचा नमुना आम्हाला तपासणीसाठी घ्यावा लागत असे, करोनाचा हा काळ आणि त्यात थुंकीचा नमुना म्हटलं की, लोक खूप घाबरत. त्यांना वाटे की, आम्ही क्षयरोगाचं नाव सांगून करोना तपासणी करत आहोत आणि त्यांना आम्ही सरकारी दवाखान्यात पाठवू. आमचं काम आणि संशोधनाचं महत्त्व समजावता समजावता आम्हाला आमची खूप शक्ती खर्च करावी लागत असे. या प्रकारे खूप मोठ-मोठे आव्हान समाजात तळागाळात काम करताना आम्हाला येत होते, असे प्रसंग सोडवताना आमच्या सोबत त्या-त्या भागातील घरांची, कुटुंबातील व्यक्तीची खडा न् खडा माहिती व प्रत्यक्ष त्या भागातील लोकांसोबत चंगले नातेसंबंध जोपासणाऱ्या आशा सेविकांची साथ भक्कम होती आणि केवळ यामुळेच

आमचं काम शक्य झालं. फक्त हेच नव्हे तर दिल्ली ते गल्लीपर्यंत (केंद्र शासन ते ग्रामपंचायत) कोणतीही आरोग्य विषयक योजना ही आशा सेविकांच्या सहकार्याशिवाय शक्य नाही.

आरोग्य विषयक योजना अंम लबजावणीत 'आशा' हा धागा खूप महत्त्वपूर्ण आहे. अचानक करोना आला तेव्हा, प्रत्यक्ष समाजात काम करण्यासाठी 'आशा'ताईंच सैन्य हे आघाडीवर होतं. आपल्या जिवावर उदार होऊन काम करणाऱ्या या आशा सेविका यांना ठरावीक मासिक वेतन दिलं जात नाही, आरोग्य खात्यातील विविध योजना राबवताना त्या-त्या वेळेतील कामाचा मोबदला म्हणून अतिशय तुटपुंजी रक्कम मानधनाच्या स्वरूपात दिली जाते. आणि हो सरकारी कारभाराच्या अलिखित नियमानुसार ती खूप अनियमित असते हे वेगळं सांगायला नको. या आरोग्य आणीबाणीत आशा सेविकांसाठी खूप आश्वासनांचा वर्षाव झाला, परंतु त्या पूर्ण झाल्या नाहीत, याचीच झलक आपल्या हक्कांसाठी महाराष्ट्रात जून महिन्यात आशा सेविकांना कराव्या लागलेल्या आंदोलनातून दिसते. हीच अवस्था भारतातील इतर राज्यातही आहे. हरियाणा राज्यातील मानसिक तज्ज्ञ डॉ. हावोवी हैदराबादवाला यांनी आशा सेविकांवरील कामाचा ताण आणि त्यांना मिळत असलेली वागणूक यामुळे त्यांच्यावर येणारा मानासिक ताण आणि त्याचे परिणाम याबाबत चिंता व्यक्त केली होती. ही खूप गंभीर बाब आहे. राजधानी दिल्लीत आशा सेविकांनाही त्यांच्या हक्कांसाठी मोठी लढाई लागत आहे. हीच परिस्थिती इतर राज्यात सारखीच आहे.

तर, या एक ना अनेक अडचणींचा सामाना करून या आशाताई आपल काम करत असतात. सरकारी कोणतीही आरोग्य विषयक योजना-यंत्रणा ही आशा सेविकांच्याच भरवशावर चालते. तुटपुंज्या म ानधनावर विविध लढाया लढणाऱ्या या रणरागिण्यांना कायमच सलाम आहे!

'तूच माता, तूच भगिनी,
तूच असे सहचारिणी
तुझीच असती गौरवगाणी
इतिहासाच्या पानोपानी'

सर्व आशा सेविकांना मानाचा मुजरा...!

*ह्षीकेश आंधळकर, राशिन,*
*ता. कर्जत, जि. अहमदनगर*
*मोबाइल : ९४२३७८८५४१*

❀❀❀

---

(पान २५ वरून)
जुमानता त्या धैर्याने लढताहेत. जेव्हा जेव्हा मानवतेवर शांती, सौख्य, सद्भाव आणि बंधुत्वावर संकट येते, त्या प्रत्येक वेळी ती अशीच निर्धाराने उभे राहते. तिच्या या खंबीरपणातच दडली आहे, उद्याच्या सुख-शांतीची, समृद्धीची आशा! म्हणूनच सत्त्व आणि स्वत्व वाचवण्यासाठी दहशत झुगारून पुढे आल्या.

नवनव्या तालिबानी बंधनांनी अधिकच करकचून बांधलेली अफगाणी स्त्री, ही सध्या कोणत्या मानसिकतेत असेल याची केवळ कल्पनाच अंतर्बाह्य थरारून टाकते. तिला अंगभर बुरख्याने अस्तित्वहीन ओळखीन केले जात आहे. अंधारलेल्या काळोखात आज या साऱ्याजणी एकाकी वाटचाल करीत आहेत. सध्या अभिव्यक्त होण्याच्या अधिकारावर ही तालिबानी भुवया उंचावतात. तालिबानने अफगाणिस्तान काबीज करण्यापूर्वी तिथल्या अनेक प्रकरणांमध्ये वाढ झाली होती.
यात स्त्रियांना दोषी ठरविले जाते. अफगाणिस्तानातल्या अनेक भागात स्त्रीने स्वतःचे नाव सांगणे तुच्छ किंवा कुटुंबाचा अनादर करणारे मानले जाते. आमची आई, बहीण, मुलगी किंवा बायको हीच इथल्या स्त्रिया यांची ओळख राजकारण, शिक्षण, कला-संस्कृती, माध्यमे अशा अनेक क्षेत्रात स्त्रियांच्या अस्तित्वाची किंमत शून्य; पण १९२६च्या काळात आमीर अमानुल्ला खान यांच्या खुल्या विचाराने आधुनिकतेची पहाट उघडली होती. साधारण १९६६ ते ७१ या काळात १४ अफगाणी स्त्रिया न्यायाधीशाच्या पदापर्यंत पोहोचल्याचे ॲमनेस्टी इंटरनॅशनलचा अभ्यास सांगतो. १९६५ नंतर जीवनाच्या विविध क्षेत्रात स्त्रियांचा समावेश झाला. धर्माशी निगडित प्रथापरंपरांचा पगडा मोठ्या प्रमाणात दिसतो, असतो. त्याच्या विरोधात कोणी जाण्याचा प्रयत्न केला, तर तिला खुलेआम सर्वांसमोर हिंसेला सामोरे जावे लागते. आधुनिकतेकडून पुन्हा प्रथा परंपरांकडे वाटचाल होत आहे. पूर्वीच्या राजवटीत शरीयत नियम मोडणाऱ्या स्त्रियांना गर्दीत, सार्वजनिक स्थळी चाबकाचे फटके आणि दगडाने ठार मारण्याची शिक्षा दिली जायची. याचा प्रतिवाद कसा करायचा हा केवळ येथील नागरिकांचा आज प्रश्न नाही, तर जगभरातील संवेदनशील नागरिक या प्रश्नाने हवालदिल झाले आहेत. जगभरातील स्त्रीवाद्यांनी एक होण्याची गरज आहे. भारतातील स्त्रीवादी यासाठी पुढाकार घेऊ शकतील का? भारतातील आणि इतर देशातील दमनकारी सरंजामी ब्राह्मणी संस्कृतीला विरोध करतील काय हाच खरा प्रश्न आहे.

***समीना पठाण***
***संजयकुमार कांबळे***
***स्त्री आणि लिंगभाव अभ्यास केंद्र,***
***सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.***

❀❀❀

# आपल्याला काय त्याचं

सुव्रत जोशी

श्वेता सीमा विनोद या मुलीची पहिली कादंबरी– 'आपल्याला काय त्याचं?' ही काही दिवसांपूर्वी वाचनात आली. या कादंबरीचा नायक नायिकेला एका प्रसंगात विचारतो, 'तुझं सगळ्यात मोठं स्वप्न कोणतं?' यावर नायिका म्हणते, 'एकटीने रस्त्यावर फिरता यावं कोणत्याही भीतीविना...'

मला गेल्या काही वर्षांत तरुण लोकांकडून मराठीत निर्माण झालेल्या कुठल्याही गोष्टीतील हा सगळ्यात महत्त्वाचा संवाद वाटतो.

खरंतर अगदी अल्पशा अशा फोनवरील संभाषणात या मुलीने मला तिच्या कादंबरीचा विषय सांगितला होता आणि तो ऐकूनच मी पटकन याच्या प्रकाशन सोहळ्याला उपस्थित राहायचे कबूलही करून टाकले होते. माझ्या व्यवसायामुळे एका प्रचंड मोठ्या तरुण वर्गाला मला भिडता येते आणि तरीही आपले सूर जुळतील असे फार कमी लोक या गर्दीत भेटतात.

माझ्यासाठी 'तरुण' या शब्दाची व्याख्या विचाराल तर, ती वयाशी जोडलेली नाहीच. आपल्या आसपासचे जग अधिक सुंदर, न्याय्य आणि समान व्हावे यासाठी एकत्रितपणे आत्मबदल आणि समाजबदल घडवू पाहणारा गट म्हणजे 'तरुण' होय. एरवी जुन्या, प्रतिगामी धारणांच्या विझत आलेल्या मशाली पुन्हा फुंकून या समाजातील भांडणे अधिक पेटवून राखरांगोळी करणारे माझ्या दृष्टीने तरुण नव्हेतच, मग वयाने ते विशी-पंचविशीतले का असेनात. माझ्यासाठी ते वर्षानुवर्ष पिळवणूक करत आलेल्या वर्गातील ढुढ्ढाचार्यांचीच पिलावळ आहेत. दुसऱ्या बाजूला केवळ ऐहिक सुखाची स्वप्ने पाहणारी सगळ्यापासून




राजगृह प्रकाशन, कोल्हापूर
किंमत : १४० रुपये

स्वतःची कातडी वाचवून आपापली यशस्वी करियरे घडवणारा मोठा वर्गही आहेच. पण कुणीतरी दुसऱ्याने निर्माण केलेल्या शर्यतीत या असल्या स्वार्थी हेतूंनी ऊर फाटेपर्यंत पळणाऱ्या उंदरांना तरी तरुण कसे म्हणणार?

हे सगळे इथे नमूद करायचे कारण म्हणजे वर केलेल्या तरुण पणाच्या व्याख्येत बसणारी श्वेता, या कादंबरीच्या निमित्ताने मला भेटली. तिच्या कादंबरीत असे मूलभूत विचारबदल घडवण्याचे प्रयत्न तिने फार समर्पकपणे केले आहेत. सतत मजा करत असलेला, ती मजा करताना गोत्यात येऊन मग युक्ती लढवून त्यातून बाहेर पडणारा, किंवा फक्त नात्यांच्या, व्यसनांच्या प्रश्नात अडकलेला अशी तरुण वर्गाची अत्यंत ढोबळ आणि उथळ प्रतिमा गेल्या काही वर्षात तरुण कलाकारांनीच विविध माध्यमातून तयार केली आहे. पण त्या पलीकडे छोट्या गावातून, छोट्या शहरातून आलेले, स्वतः ला घडवू पाहणारे, स्वतःच्या मूल्यांना प्रश्न विचारणारे, स्वतःच्या न्यूनगंडातून बाहेर पडू पाहणारे आणि स्वतःच्या स्वप्नांना गवसणी घालणारे, त्यासाठी कुठलीही किंमत द्यायची तयारी असणारे तरुणदेखील आहेत. या तरुण वर्गाची गोष्ट सांगणारी, त्यांना आवाज मिळवून देणारी ही कादंबरी म्हणून माझ्यासाठी महत्त्वाची आहे.

आपल्या समाजात जातपात, शहरी आणि ग्रामीण या अशा भेदामुळे भयानक उतरंड आहे. आणि त्यात सगळ्यात खालच्या पायरीवर आपण बाईला ढकलले आहे. गावातून शहरात येणारा पुरुष हा शहरी उन्मत व्यवस्थेमुळे एका बाजूला शोषला जातो आणि दुसऱ्या बाजूला त्याच्या पुरुषसत्ताक मनोवृत्तीमुळे तो बाईचे शोषण करत राहतो. एकाच वेळी तो शोषक आणि पीडित असे दोन्ही असतो. या कादंबरीचा नायक हा असाच आहे आणि याच्यामध्ये सांप्रत महाराष्ट्रातील खूप मोठा वर्ग आपले प्रतिबिंब पाहू शकेल. याच्या मनोबदलाची तरल प्रक्रिया श्वेता फार संवेदशीलतेने या कादंबरीत मांडते.

एका बाजूला आपण भाषिक अस्मितेचे ढोल बडवून राजकारण करत आहोत; पण दुसऱ्या बाजूला हे असले भावना भडकलेले स्वतःच्या भाषिक दारिद्र्याकडे सोयीस्कर कानाडोळा करतात. एका भाषेत सलग, अर्थपूर्ण वाक्यही बहुतेक लोकांना आज बोलता येत नाही. अशा दुर्दैवी परिस्थितीत पुण्या मुंबई बाहेरच्या, ऐन पंचविशीतल्या मुलीने एक अस्सल लघुकादंबरी लिहिणं ही बाब फार उत्साह वाढवणारी आहे. श्वेता कडून अशाच उत्तम साहित्याची भविष्यातही अपेक्षा आहे. बाकी माझा स्नेह तिच्या सदैव पाठीशी आहेच.

*सुव्रत जोशी*

(पान ७७ वरून)

लोकांपर्यंत पोहचतं हे मान्य पण पुस्तक छापण्यामागे माझा उद्देश फक्त स्वतःसाठी संग्रह करणे हाच होता. लोकांच्या वाचण्याच्या सवयी सुद्धा बऱ्याच बदलल्या आहेत. सोशल मिडीयाच्या प्रभावामुळे लोक वाचत नाही वगैरे म्हणतात पण ते पूर्ण खरं नाही. लोक वाचतात, आजही वाचतात. कदाचित त्यांच्या वाचनाची चव आणि माध्यमं बदलली असतील पण लोक वाचतात हेच मी मला सोशल मीडियावर मिळणार्या प्रतिसादातून सांगू शकतो. मला कधीच अस वाटलं नाही की माझ्या कवितांचे फार वाचक असावेत. पेज सुरु करतांनासुद्धा कसलीच अपेक्षा नव्हती. मला नेहमी हेच वाटत आलंय की माझे पुरेसे वाचक आहेत आपल्याला लेखक म्हणून किंवा कवी म्हणून ज्या वाचकांपर्यंत पोहचायचं असतं त्यांच्यापर्यंत आपण पोहचतोच असा माझा विश्वास आहे. तुम्ही चांगलं लिहित असाल तर लोकांपर्यंत पोहचण्यासाठी वेगळे कष्ट घ्यावे लागत नाहीत. आणि कष्ट घेऊन आपण पोहचू शकू, त्यांना बदलू शकू असं वाटणं खूप आभासी आहे. पूर्वी पुस्तकंसुद्धा किती प्रमाणात विकली जायची? १००० प्रती विकल्या जाणं म्हणजे फार मोठी गोष्ट. त्यातले वाचतात किती हा प्रश्न निराळाच! पण सोशल मिडियामुळे साहित्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी खूप मदत होते. सोशल मिडीयाने लेखकाला आणि वाचकाला जवळ आणलंय.

**सोशल मिडियाच्या जागेला आता खूपच राजकीय स्वरूप आलंय. एखाद्या लेखकाने राजकीय भूमिका घ्यायला हवी की नाही? apolitical राहणं शक्य तरी आहे का?**

अलीकडेच मी काहीतरी लिहिलं त्यावर प्रतिक्रिया आली की, तुम्ही कविता करा, कवितेला राजकीय वळण देऊ नका. पण खरंच अशी विभागणी शक्य तरी आहे का? धर्म आणि राज्य ह्यांची विभागणी कदाचित होऊ शकेल पण कविता आणि राजकारण या दोन गोष्टी वेगळ्या करताच येणार नाही. विशेषत: जेव्हा तुमची कविता प्रेमाबद्दल बोलत असेल. तुम्ही आंतरजातीय प्रेमाबद्दल बोलत असाल तर त्यात राजकारण आहे, LGBT कम्युनिटीविषयी बोलत असाल तर त्यातही राजकारण आहे. प्रत्येक कवी आपल्या कवितेतून राजकीय भूमिका घेतच असतो, त्याच्या कळत किंवा नकळतपणे. "Poetry can't be separated from politics. It will always have an agenda!' कुठल्याही विषयावर–कुठल्याही भूमिकेतून लिहिलं तरी त्यात भावना गुंतलेल्या आहेतच, काहीतरी अजेंडा आहे. भूमिका घेणं ही वाईट गोष्ट नाही. काहीतरी अनुभवणं हेच मुळात खूप पोलिटिकल आहे. एखाद्या हिंदू व्यक्तिला मनापासून वाटलेली गोष्ट कदाचित तितक्याच तीव्रतेने मुस्लिम व्यक्तिला जाणवणार नाही किंवा ह्याच्या उलट होईल. ह्यातही पोलिटिक्स आहे. भावनेकडे करड्या चष्म्यातून पाहता येणार नाहीच. प्रेमकविता लिहिणारी लोकं apolitical असतात हा सर्वात मोठा गैरसमज आहे. त्यांनीच स्वतःला apolitical घोषित केलेलं असतं. पण खरी गोष्ट तर ही आहे की सर्वात जास्त पोलिटिकल तर हीच माणसं असतात. राजकीय लिखाणाचा शेवटचा उद्देश जर प्रेम असेल तर ते राजकारण नाही ते प्रेम आहे. साहित्याचा मुख्य उद्देश खरंतर समाजाला पुढे घेऊन जाणं हाच असायला हवा. तो प्रयत्न आपण सगळ्यांनीच करायला हवा. एखाद्याने कुठल्याशा राजकीय पक्षाला दिलेली शिवीसुद्धा जर समाजाला पुढे नेण्याच्या उद्देशाने असेल तर ती शिवीसुद्धा एक कविताच आहे असं मला वाटतं.

**आजच्या काळातल्या कवी–लेखकांनी काय लिहायला हवं? काय उद्देशाने लिहायला हवं असं तुम्हाला वाटतं?**

सगळ्यात महत्त्वाचं तर आपण सगळ्यांनी लिहायला हवं. कित्येक वर्षांपासून कितीतरी कम्युनिटीजला, माणसांना, जातींना, लिंगांना लिहिण्या–वाचण्याचा अधिकारसुद्धा नव्हता, अजूनही नाही. त्या सगळ्यांच्या वतीने आणि त्यांच्या वाट्याचं आपण वाचायला हवं–लिहायला हवं. सखोल वाचनाशिवाय अर्थपूर्ण लिखाण घडणार नाहीच. जर एखादा पुरुष बाईविषयी लिहित असेल तर तो प्रेमाच्या भावनेतून लिहील, कुठल्यातरी नात्याच्या जाणीवेतून लिहील. पण त्या पुरुषाने स्त्रीवाद वाचलेला असेल तर त्याच्या लिखाणात तो संघर्ष–ती धग उतरू शकेल आणि त्यानेच कवितेला खोली येईल, अर्थगर्भता येईल. ते येण्यासाठी प्रत्येक लेखकाने वाचायला हवं, खूप वाचायला हवं. फक्त वाचणच नाही तर इतर कलाप्रकारांमध्ये सुद्धा लेखकाने–कविने रमायला हवं. भरपूर सिनेमे–नाटकं पहावीत, पुस्तकं वाचावीत–माणसं वाचावी! चांगलं वाईट कसंही असो प्रत्येकाने लिहायला हवं. लोक खूप लिहितात आजकाल असा आरोप आहे पण त्यात वाईट काय हे मला कळत नाही. लोक लिहिताहेत, व्यक्त होताहेत ह्यात नुकसानकारक असं काहीच नाही. जोपर्यंत ती कविता काहीच नुकसान करत नाही तोपर्यंत तिला विरोध करण्याचं काहीच कारण नाही. त्याला विरोध करत बसण्यापेक्षा आयुष्यात–समाजात यापेक्षा आणखी मोठे विषय आहेत. ज्यासाठी सगळ्यांनी काम करायला हवं. लिहिणाऱ्या माणसाला लिहू द्यावं!

**_प्रशांत सागर, पटना_**
*मोबाइल : ९९५३२०५९३८*
**_मुलाखतकार :_**
**_सुशील संगीता प्रकाश, नाशिक_**
*मोबाइल : ८६९२९०१५५३*

## मिम्सच्या चष्म्यातून वास्तवाकडे बघताना...

**रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो तुमची आयबहीण**




**आजही विटंबली जाते हाटाहाटातून**

**कोरभर भाकरी पसाभर पाणी यांचा अट्टाहास केलाच तर**




**आजही फीरवला जातो नांगर घरादारावरून**

**चिंदकातले हात सळसळलेच तर**



**छाटले जातात आजही नगरानगरातून**

**ती पहा रे ती पहा, मातीची अस्मिता आभाळभर झालीय**



**माझ्याही आत्म्याने झिंदाबादची गर्जना केलीय**

**किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी?**



**मरेपर्यंत राहायचे का असेच युद्धकैदी?**

***सुदर्शन जगताप, ता. मंगळवेढा जि. सोलापूर***
*मोबाइल : ९४०३४५७८६*

# कलाकार आणि माणूस : भूमिकेचे पडसाद

## 'मिळून साऱ्याजणी'चा बत्तीसावा वाढदिवस

**कलाकारांची पडद्यावरील भूमिका आणि त्यांनी प्रत्यक्षात घेतलेल्या सामाजिक-राजकीय भूमिका या दोन्हीबद्दल चर्चा होत असली तरी त्यांची सामाजिक-राजकीय भूमिका हा निदान आपल्याकडे तरी संवेदनशील विषय ठरतो. मिळून साऱ्याजणी'च्या ३२ व्या वाढदिवसानिमित्त २१ ऑगस्ट २०२१ रोजी याच विषयाला धरून एका विशेष (ऑनलाइन) परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं. परिसंवादात नाट्यदिग्दर्शक, अभिनेत्री रसिका आगाशे, चित्रपट दिग्दर्शक सुजय डहाके, अभिनेत्री हेमांगी कवी, लेखक-संपादक उत्पल व. बा. सहभागी झाले होते. प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक सुनील सुकथनकर परिसंवादाचे सूत्रधार होते तर ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते. या परिसंवादाचा हा वृत्तांत.**


'कलाकार आणि सामाजिक - राजकीय भूमिकेचा तिढा' या परिसंवादाचा प्रारंभ 'मिळून साऱ्याजणी'च्या संपादक गीताली वि. मं. यांच्या प्रास्ताविकाने झाला. त्यांनी 'विद्या बाळ अध्यासन प्रकल्पा'ची माहिती दिली आणि 'मिळून साऱ्याजणी'च्या नवीन समाजाभिमुख उपक्रमांचीही ओळख करून दिली. परिसंवाद सुरु होण्याआधी 'मिळून साऱ्याजणी'च्या सुमित्रा भावे विशेषांकाचं (ऑगस्ट २०२१) औपचारिक प्रकाशन झालं.

सुनील सुकथनकर यांनी सूत्रं हातात घेत परिसंवादाची सुरुवात केली. कलाकार म्हणून भूमिका घेण्याआधी माणूस म्हणून प्रत्येकाची सामाजिक-राजकीय भूमिका असतेच असं सांगत रसिका आगाशे यांनी कलाकारांच्या व्यक्त होण्याचे आणि स्पष्ट भूमिका घेण्याचे काही आयाम स्पष्ट केले. कलाकार प्रेक्षकांचं मनोरंजन करत असले तरी मनोरंजन हे 'बुद्धीला उद्दीपित करणारं'देखील असतं आणि आम्ही संवेदनशील विषयांवर आमचा दृष्टीकोन मांडतो किंवा आमच्या कामामधून त्याबाबत बोलतो तेव्हा आम्ही मनोरंजनच करत असतो असं त्या म्हणाल्या.

मनोरंजनाच्या क्षेत्रात, विशेषतः टीव्ही मालिकांमध्ये विशिष्ट जातीतील कलाकार जास्त दिसतात असं निरीक्षण सुजय डहाके यांनी काही वर्षांपूर्वी एका चर्चेत नोंदवलं होतं. त्यावरून बराच गदारोळ झाला, उलटसुलट चर्चा झाली. परिसंवादात सुजय डहाके यांनी त्या घटनेच्या अनुषंगाने आपलं म्हणणं मांडलं. वैविध्यपूर्ण पार्श्वभूमी असलेली पात्रं मालिकांमधून समोर येत असली तरी भूमिका साकारणारे चेहरे मात्र ठराविकच असतात. स्थानिक पातळीवर कलाकार फारसे शोधले जात नाहीत असं माझं मत फक्त मी मांडलं आणि त्यावरून वादंग उभं राहिलं; म्हणजे कलाकार म्हणून मला बोलायची परवानगीच नाही का? असा प्रश्न त्यांनी उपसत केला. बोलणं म्हणजे उग्रवाद समजला जातो, पण प्रत्यक्षात ते माझं केवळ एक म्हणणं आहे हे लक्षातच घेतलं जात नाही असं ते म्हणाले.

अभिनेत्री हेमांगी कवी यांच्या 'बाई, बूब्ज आणि ब्रा' या अलीकडील फेसबुक पोस्टमुळे समाजमाध्यमांवर बरीच चर्चा झडली होती. त्यांना ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं पण त्यांच्या पोस्टला सकारात्मक प्रतिसादही मिळाला. त्या म्हणाल्या की लोकांच्या मनात कलाकारांची एक प्रतिमा तयार झालेली असते आणि त्या इमेजला तडा गेला की मग ट्रोलिंग सुरु होतं. कलाकारांनी फक्त कला सादर करावी अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. कलाकारांनी जर फक्त कलाच सादर करायची असेल आणि माणूस, नागरिक म्हणून त्यांनी व्यक्त व्हायचं नसेल तर मग सरकारने त्यांना सगळे टॅक्स माफ करून टाकावेत! मनोरंजन हे आमचं काम आहेच, पण माणूस म्हणून मला जे बोलावंसं वाटतं ते मी कायम बोलत राहीनच.

लेखक-संपादक उत्पल व. बा. म्हणाले की समाजमाध्यमांच्या उदयानंतर आपलं समाजस्वास्थ्य बिघडलं आहे हे मान्य करायला हवं. वृत्तपत्रं-मासिकं यांच्या माध्यमातून होणाऱ्या चर्चा आणि समाजमाध्यमांवरून होणाऱ्या चर्चा यात गुणात्मक फरक आहे कारण समाजमाध्यमांचं डिझाइन माणसातल्या विकारांना पूरक ठरेल असं आहे. समाज




रसिका आगाशे


मोहन आगाशे


हेमांगी कवी


सुजय डहाके

म्हणून आपली 'क्रिटिकल थिंकिंग'ची पातळी खूप खालावली आहे हा चिंतेचा मुद्दा आहे. एकूण सगळ्या कोलाहलाच्या पार्श्वभूमीवर संवाद तुटू न देण्यासाठी प्रयत्न करणं, वैचारिक मतभेद असताना समन्वयासाठी प्रयत्न करणं हेच फक्त आपल्या हातात आहे. समाजमाध्यमांवर हे करणं फार अवघड आहे, पण तो मार्ग घेतल्याशिवाय पर्यायही नाही अशी त्यांची मांडणी होती.

सुनील सुकथनकर यांनी कलाकारांची अभिव्यक्ती, समाजमाध्यमं, ट्रोलिंग आणि त्यातही स्त्री–पुरुषांबाबत होत असलेला फरक याविषयी आपलं निरीक्षण मांडलं. कलाकारांकडे कलेचं एवढं प्रभावी माध्यम असताना त्यांनी स्वतंत्रपणे समाजमाध्यमांवरून किंवा इतरत्र व्यक्त होण्याची काय गरज या प्रश्नाचा परामर्श घेताना ते म्हणाले की कलाकार रोज उठून कलानिर्मिती करू शकत नाही. शिवाय अनेक कलाकृती तर आर्थिक–तांत्रिक वा अन्य कारणांमुळे निर्माणच होऊ शकत नाहीत. अशा वेळी कलाकार समाजमाध्यमांकडे वळतात. मात्र समाजमाध्यमांच्या मार्फत सामाजिक–राजकीय–धार्मिक ध्रुवीकरण वाढायला मदत झाली आहे हे त्यांनी नमूद केलं.

अध्यक्षीय समारोप करताना ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांनी 'घाशीराम कोतवाल', 'सखाराम बाइंडर' या नाटकांमुळे उठलेल्या वादंगाच्या काही आठवणी सांगितल्या. या वादंगात नाटकापेक्षाही 'विजय तेंडुलकर' हे मुख्य लक्ष्य होते असं ते म्हणाले. कलाकार व्यक्त झाले की त्याविरुद्ध वाद होणं याला कारण वैचारिक विकासाच्या आड भावनिक गोष्टी येणं हे आहे असं त्यांचं प्रतिपादन होतं. अभिव्यक्ती वैचारिक असली तरी प्रतिक्रिया भावनिक असते आणि ती अडचणीची गोष्ट आहे. प्रतिक्रिया देण्यामागे अनेकदा प्रसिद्धी हाही एक हेतू असतो. शिवाय समाजमाध्यमांच्या जगात अभिव्यक्तीचं प्रमाण प्रचंड असल्याने कलाकार नक्की कुणाला म्हणायचं याचे काही मापदंडच नाहीत हा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला.

सहभागी कलाकारांच्या मांडणीनंतर या विषयाच्या अनुषंगाने खुली चर्चा झाली. प्रेक्षकांच्या प्रश्नांना सहभागी कलाकारांनी उत्तरंही दिली. आजचं सामाजिक वातावरण पूरक असलं किंवा नसलं तरी कलाकार म्हणून आणि त्याआधी माणूस म्हणून आपण म्हणणं मांडत राहिलं पाहिजे, शांतीपूर्क पद्धतीने संवाद सुरु ठेवला पाहिजे या आग्रही मांडणीने परिसंवादाचा शेवट झाला. परिसंवादाचा व्हिडीओ मिळून साऱ्याजणीच्या यूट्यूब चॅनलवर उपलब्ध आहे. अवश्य पाहावा आणि चॅनलला सबस्क्राइबही करावं.

***प्रतिनिधी***

## मदतीचं आवाहन


नर्मदा बचाओ आंदोलनावर केलेल्या 'लकीर के इस तरफ' या फिल्मनंतर माझा पुढचा माहितीपट असेल 'भारतीय स्त्री' बद्दल! 'भारतीय स्त्री' म्हणताच एकीकडे डोळ्यांसमोर असमानता, अत्याचार उभे राहतात तर दुसरीकडे स्त्रीला देवत्व देणारा कुटुंबांतला, समाजातला दांभिक गौरवही. पण यापलीकडे माणूस म्हणून आजच्या स्त्रीच्या आकांक्षा काय आहेत, तिची बलस्थाने कोणती आहेत आणि तिच्यासमोरील आव्हाने कोणती आहेत याचा शोध घेणारा माहितीपट तयार करण्याचा माझा मानस आहे.

'लकीर के इस तरफ' हा मित्रमंडळींच्या आर्थिक पाठिंब्यावर उभा राहिला. या नव्या माहितीपटासाठी मात्र बरीच जास्त आर्थिक तरतूद करावी लागेल. त्यामुळे तुम्हां सगळ्यांनाच आर्थिक मदतीचं आवाहन करत आहे. येत्या २ वर्षात साधारण १० ते १२ राज्यांत प्रवास, राहण्याची व्यवस्था आणि इतर तांत्रिक सुविधा यावर अत्यंत काटकसरीत खर्च केला तरी खर्चाचं अंदाजपत्रक सुमारे दहा लाख रुपयापर्यंत जात आहे.

माहितीपटासाठी जे आर्थिक सहकार्य करू इच्छितात ते 'जन सहयोग ट्रस्ट'च्या खात्यात रक्कम जमा करू शकतील, जी माझ्यापर्यंत पोचेल.

अधिक माहितीसाठी कृपया संपर्क करावा – **शिल्पा बल्लाळ**
फोन : ९८३३८८७२१२, इमेल: shilpballal@gmail.com

## आळ



आपल्या माणसांत जावं शेवटी असं ठरवून निघालो
भेटल्यावर भाबडेपणाचं रडू आवरलं नाही
तर हसू झालं गोतावळ्यात
तळतळ दाबून धरली आवंढ्यात
पापण्या लवल्यासारखी सताड दारंखिडक्यांची
उघडझाप झाली
सचोटीचं आयुष्य उतरून ठेवावं आपलेपणानं
तर देवळ्या आधीच खचाखच भरलेल्या
कोवळ्या चित्रांच्या भिंती उरल्यासुरल्या रंगांनी
बरबटलेल्या

ज्याला वळसा घालून ओढीनं आलो होतो
ती गावं नव्हती
वाट नव्हती
झाडं नव्हती
डोंगर नव्हते
आयुष्ये होती चिखल–माती–चिखल या क्रमातनं पुढं
सरकलेली
मतलबांच्या चढाओढीत लपूनछपून फसवत होतो
एकमेकांना
मनातलं उतरलेली मनं फटकत गेली दिशा धरून
धुसर धुसर झाले खुनशी तोंडवळे
खेटायला गेल्यावर किती गोष्टींचा दर्प आला
मोडलेल्या चुलीवरचं कालवण सांडलं अपशकुनी
बर्फ वितळून सुटलेले हिमखंड वाहत राहावेत स्वतः
च्या प्रवाहात
तसं फिरलं नाही कुणी माघारी

मायेनं बोलायच्या जागा खुटल्या
आशा खुटल्या
परत परत जाऊन धडका मारणं खुटलं
घरात मांजर टिकत नाही म्हणून
खंडोबाला सोन्याचं मांजर वाहायची
ऐपत आणण्यात गुंतलो
चारीधाम करून पवित्र झालो
चमकती गडद निळी छाती
फुलवलेल्या सरड्याच्या
अभ्यासात रमलो


अनोळखी हातात बिनदिक्कत हात दिले
मन रमवायच्या जागा हुडकल्या
जागतिक विषयांवर बोलताना चष्मे पुसत जवळचे
तोंडवळे मागं सारले
आमटीचा फुरका मारताना ठसका लागला
तर नात्यागोत्यांच्या आठवणींऐवजी तिखटावर आळ
घेतला


***कल्पना दुधाळ***
*मु. पो. बोरीभडक, ता. दौंड जि. पुणे.*
*मोबाइल : ९९२३६२७२१८*



### गात्रांच्या उंबरठ्यावर..

गात्रांच्या उंबरठ्यावर
लावीन रोज मी पणती
दारावर बांधून तोरण
सजवीन मृण्मयी नाती

मी गाईन त्यांच्यासाठी
साजिरी गोजिरी गाणी
लागता स्वरांच्या दिवल्या
उजळेल आतली ग्लानी



## अंगात आलेली बाई



गावातल्या जत्रेत अंगात आलेली बाई
लहानपणी पाहताना मजा वाटायची
हे पाहण्यासाठी खास पालखीजवळ
मित्रांसोबत हजेरी लावायचो
वय वाढत गेलं, तसं हे विशेष 'मजा' वाटणं बंद झालं
पण 'देवी' अंगात आलेली बाई पाहताना
मनोरंजन मात्र व्हायचंच...


खूप वर्षं जत्रेत जाण्याचा खंड पडल्यानंतर
नुकतीच पुन्हा पाहिली अंगात आलेली बाई
आता मात्र काहीतरी नवीनच अंगावर आदळलं
गंमत वाटली नाही की मनोरंजन झालं नाही.
काहीतरी वेगळाच बोध होत गेला
जन्मापासून नियमांत अडकलेली
दुसऱ्यासाठी त्यागत आलेली
इतरांच्या मर्जीशिवाय पानही न हलवू शकणारी बाई
मुक्तपणे पालखीसमोर डोळे झाकून
आजूबाजूचा कल्लोळ विसरून फक्त देवीशी
एकरूप होऊ पाहत होती
इतरवेळी दुसऱ्याच्या तालावर नाचत आलेली बाई
पालखीसमोर देवी बनून काही वेळासाठी
फक्त स्वतःसाठी जगू पाहत होती...

***राहुल शिंदे, पुणे.***
*मोबाईल : ९७६३०२६६८३*

गात्रातील रात्र सरावी
जगण्याचा उत्सव व्हावा
शिव सुंदर जे जे त्याचा
जीवास वेध लागावा..

हा देह कुणी ना परका
सोबती जन्मजन्मीचा
'मी'रूप रहाया येते
शोधीत आसरा त्याचा

***आसावरी काकडे, पुणे.***
*मोबाइल : ९७६२२०९०२८*



कविता

# अर्वाचीन आरण : पीडितांच्या प्रतिकाराचे शब्दरूप


भगवान फाळके

**प्रज्ञा दया पवार या मराठीतील प्रसिद्ध कवी आणि लेखक आहेत. आजवर त्यांचे पाच कवितासंग्रह, एक कथासंग्रह, एक नाटक आणि इतर महत्त्वपूर्ण लेखन प्रकाशित आहे. वैशिष्ट्यपूर्ण भूमिका घेऊन सर्जनशील लेखन करण्यासाठी त्या ओळखल्या जातात. अलीकडे त्यांचे 'अर्वाचीन आरण' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्यामधून प्रखर असे सांस्कृतिक, राजकीय भान व्यक्त होते.**

ललित साहित्याचे पुस्तक हे विशिष्ट साहित्य प्रकारकेंद्री असते किंवा असावे, या रूढ संकेताला अनुसरून या पुस्तकाकडे बघता येत नाही. कारण यामध्ये विविध साहित्यप्रकारांमधील लेखन समाविष्ट आहे. त्यामुळे वाचकाला ते सहज स्वीकारण्यासाठी काहीसे अवघड वाटू शकते. मात्र एकदा पुस्तक वाचायला सुरुवात केल्यानंतर पुस्तकातील प्रकारवैविध्याचे महत्त्व लक्षात येण्यास फारसा वेळ लागत नाही. पुस्तकात एकूण चार भाग आहेत. पहिल्या भागात सहा कविता असून दुसऱ्या भागात विविध साहित्य संमेलनांच्या निमित्ताने त्यांनी दिलेली चार भाषणे आहेत. तिसऱ्या भागात दै. दिव्य मराठीच्या 'रसिक' पुरवणीमधील 'अर्वाचीन आरण' या पाक्षिक सदरासाठी २०१८ या वर्षात लिहिलेले चोवीस लेख आहेत. तर चौथ्या भागात ६८ फेसबुक नोंदी आहेत.

प्रज्ञा पवार यांनी आजवर आपल्या ललित लेखनातून वैचारिक भूमिकांची प्रभावी अभिव्यक्ती केली आहे. या पुस्तकात मात्र कविता वगळता अन्य भागांमध्ये लालित्यापेक्षा त्यांनी भूमिका कथनाला विशेष महत्त्व दिल्याचे दिसून येते. त्यामुळेच पुस्तकातील आशय हा थेट, स्पष्ट आणि सडेतोड स्वरूपाचा आहे. कुठल्याही

## पुस्तकांच्या मनात




रचनाबंधात न अडकता आपले म्हणणे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न यात दिसून येतो. अशा प्रकारचे लेखन हे समकालीन भारतातील सांस्कृतिक दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर स्वाभाविकच ठरते.

दैनंदिन जीवनात युद्धजन्य परिस्थितीचा अनुभव घेणाऱ्या नागरिकांच्या बाजूने निर्णायक लढ्यासाठी पवित्रा घेतलेल्या साहित्यिकाची ही मांडणी आहे, या दृष्टीने पुस्तकाकडे बघावे लागते. तरच लेखनाविषयीच्या प्रचलित धारणांच्या पलीकडे जाऊन पुस्तकाला समजून घेता येऊ शकते. अन्यथा केवळ राजकीय अभिव्यक्ती म्हणून त्याकडे दुर्लक्ष करण्याची शक्यता बळावू शकते. म्हणून पूर्वग्रह न बाळगता वाचकाला या पुस्तकातील चारही विभागातील अनुबंध समजून घेणे आवश्यक ठरते.

२०१४ पासून भारतात मोठ्या प्रमाणात राजकीय बदल घडून आलेत. त्यातून भीषण युद्धजन्य परिस्थिती आकार घेत गेली. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी व नागरी हक्कांची पायमल्ली वाढली. जमातवादी हिंसाचारांनी आणि जातीय अत्याचारांनी उग्र रूप धारण केले. स्त्रिया आणि विद्यार्थ्यांवरील हिंसेचा आलेख वाढला आहे. बुद्धिजीवी आणि कलावंतांवरील हल्ले या काळात वाढले. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक यांसारख्या जीवनव्यवहाराच्या विविध क्षेत्रात राजकीय सत्तेचा अनिर्बंध हस्तक्षेप वाढला. या सर्वांतून एक प्रकारच्या सर्व्हेलन्सचा भयंकर अनुभव नागरिकांच्या वाट्याला येऊ लागला. जनतेशी द्रोह करणाऱ्या राजसत्तेच्या भीषण क्रौर्याच्या भयंकर उन्मादाने हा काळ ग्रासला गेला. या क्रौर्याचा सामना करण्यासाठी समाजातील विविध क्षेत्रात वावरणाऱ्या कलावंत, बुद्धिजीवींनी पुढे येणे आणि

निर्णायक लढ्यासाठी सिद्ध होणे ऐतिहासिकदृष्ट्या क्रमप्राप्तच ठरते. त्या दृष्टीने गेल्या काही वर्षात साहित्याच्या क्षेत्रात घडणाऱ्या घडामोडी आणि साहित्यिकांनी त्यास दिलेल्या प्रतिक्रिया बघण्यासारख्या आहेत. सत्तेच्या दमनयंत्रणेला प्रतिकात्मक आणि चेहराविहीन विरोध दर्शविण्याचे अनेक प्रकार निश्चितच घडले. सत्तेच्या दमनशाहीप्रमाणेच परिवर्तनवादी प्रवाहांमध्येही विषमतापूर्वक व्यवहार घडतो. मात्र त्याविषयी न बोलण्याचा प्रघात असतो. त्याचाही एक प्रकारे दबाव अभिव्यक्तीवर असतो. त्यांबाबत बोलणे टाळले जाते. अशा दोन्ही प्रकारच्या दडपणांना प्रत्यक्ष भिडण्याचे प्रयत्न मात्र साहित्यविश्वात कमी दिसून येतात. म्हणून ही युद्धजन्य परिस्थिती केवळ बाहेर नाही, तर ती आतसुद्धा आहे. याची प्रचीती देणारे 'अर्वाचीन आरण' म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

पुस्तकातील सहा कवितांमधून समष्टीचा जीवनानुभव व्यक्त होतो. 'मी वाचवू पाहिलं सत्य', 'रोज दररोज', 'आझाद मैदानात', 'एपिसोडिक...', 'अशांत' आणि 'काळोखाचे डोळे' ही या कवितांची शीर्षके आहेत. त्यातून कवितांमधील आशयाचे सूचन मिळते. एक प्रकारची युद्धजन्य परिस्थिती अनुभवणारी व्यक्ती या कवितांमधून आपणास भेटते. ही व्यक्ती दुसरी तिसरी कुणी नसून ती आपणच आहोत. याची जाणीव वाचकाला हळूहळू होत जाते. नागव्या तलवारी, छर्रे दार बंदुका आणि लाठ्याकाठ्यांच्या पर्यावरणात दुखऱ्या घायाळ शब्दांसह जगावे लागण्याची वेदना या कवितांमधून व्यक्त होते. मोताद होण्याची अवस्था येण्यामागे कधी गौरी लंकेश यांचा, तर कधी रोहित वेमुलाचा बोचरा संदर्भ आहे. अशा दहशतपूर्ण आणि अनिश्चिततेने ग्रासलेल्या पर्यावरणात जगताना 'नैसर्गिक/ निष्पाप, कोमल वगैरे/ कविताही/ जगणंही' कवी बघू शकत नाही. या कवितांमधून व्यक्त होणारी असंबद्धता आणि निरर्थकतेची जाणीव नैसर्गिक नाही. तर ती इथल्या अर्थ-राजकीय व्यवस्थेतून निर्माण झाली आहे. त्यामुळेच 'डोळे उघडले की / बघावं लागण्याची शिक्षा/ आजन्म भोगावी लागणारी/ सतत/ अविरत/ कारावास' असे कवयित्रीला तीव्रतेने जाणवते. नवउदारमतवादी काळात व्यक्ती आणि समूहाच्या पातळीवर होत जाणाऱ्या अवस्थांतराचे काही पैलू या कवितांमधून व्यक्त होतात. त्यामुळेच डोळे काळोखाचे आहेत/ की भक्क पांढऱ्या उजेडाचे/ काय फरक पडणारेय?' असा प्रश्न कवीला पडला आहे. एकप्रकारे सातत्याने घडणाऱ्या भीषण घटनांमुळे एक प्रकारची बधिरता येणाऱ्या या काळात आपले मानवी संवेदन जपून उत्कटतेने व्यक्त होण्याची प्रक्रिया या कवितांमधून जाणवते.

कवितांमधून व्यक्त होणाऱ्या जाणिवांची विविध विस्तारित रूपे पुस्तकातील इतर तीन भागांमधील गद्यलेखनातून व्यक्त होतात. पुस्तकाच्या दुसऱ्या भागात वेगवेगळ्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दिलेली चार भाषणे आहेत. साहजिकच ती केवळ साहित्यकेंद्री न राहता त्या पलीकडे जाणारी आहेत. 'सांस्कृतिक दहशतवादाचं आव्हान' हे भाषण दि. ८ व ९ ऑक्टोबर २०१६ रोजी पाटण, जि. सातारा येथे महाराष्ट्र साहित्य परिषद व बाळासाहेब देसाई महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय मराठी साहित्य संमेलनात दिलेले अध्यक्षीय भाषण आहे. तर 'कज्ञा मोठा घोरंधर!' हे भाषण दि. १४ व १५ जानेवारी २०१७ रोजी लातूर येथे झालेल्या ३४ व्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषण आहे. तर 'सामाजिक न्यायाचा समकालीन संदर्भ' हे भाषण दि. २५ जून २०१७ रोजी नांदेड येथे दै. उद्याचा मराठवाडा, मौर्य प्रतिष्ठान आणि प्रगतिशील लेखक संघद्वारा आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संमेलनात दिलेले आहे. 'लिहित्या हातांची जबाबदारी' हे भाषण दि.२४ सप्टेंबर २०१७ रोजी ठाणे येथे 'जिल्हा कोकण मराठी साहित्य संमेलनात दिलेले अध्यक्षीय भाषण आहे.

या चारही भाषणांमध्ये समकालीन घडामोडींचा चिकित्सक वेध घेण्यात आला आहे. त्यानिमित्ताने पुरोगामी भूमिकांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा प्रयत्नही त्यात अंतर्भूत आहे. त्यांमध्ये लोकशाही मूल्यांशी नाते सांगणाऱ्यांसोबत व्यावहारिक पातळीवर असणाऱ्या असहमतींचा केवळ निर्देश नाही, तर सहमतीचे दुवे शोधण्यावरही भर आहे. सांस्कृतिक राष्ट्रवादातून आणि जमातवादी राजकारणातून निर्माण झालेल्या हिंस्त्र घटनांची मालिका लेखकाने दर्शविली आहे. अशा घटनांमागे हिंदूराष्ट्रवादाच्या वर्चस्वाचे आणि उच्चजातवर्गीयांच्या पितृसत्ताक हितसंबंधाचे आंतरिक सूत्र असल्याचे चारही भाषणांमधून सूचित होते. सांस्कृतिक दहशतवादाची रूपे मांडताना लेखिकेने आप-पर भाव बाळगलेला नाही. शिवाय, त्याला असणाऱ्या धर्म आणि जातीय संदर्भांची चिकित्सा करताना भांडवली बदलांची प्रक्रिया दुर्लक्षिली नाही, हे विशेष होय. त्यामुळेच ही भाषणे तशी साहित्य संमेलनांमधील असली तरी ती मुक्तिदायी राजकारणाच्या आशयाने भरलेली

आहेत.
साहित्यमूल्य आणि लिहिणाऱ्यांची जबाबदारी याविषयी लेखिकेने मांडलेली मते साहित्यिकांच्या जबाबदारीची चर्चा करणारी आहेत. दलित साहित्य आणि स्त्रीवादाबाबत लेखिकेने मांडलेले विचारदेखील परखड आहेत. जातीय अत्याचार, आरक्षण आणि सामाजिक न्याय यांच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या विधानांना समकालीन संदर्भांमध्ये नीटपणे समजून घेण्याची गरज आहे. या भाषणांमध्ये विषमतवादी शक्तींशी संघर्षाची भूमिका आहे. तर दुसरीकडे परिवर्तनवादी चळवळी आणि साहित्य यांमध्ये व्यावहारिक पातळीवर असणाऱ्या अंतर्विरोधांची चर्चा आहे.

दै. दिव्य मराठीच्या 'रसिक' पुरवणीत २०१८ या वर्षात 'अर्वाचीन आरण' या पाक्षिक सदरात लिहिलेले चोवीस लेख पुस्तकाच्या तिसऱ्या भागात आहेत. या लेखांचे विषय व्यक्ती आणि समाज जीवनातील गुंतागुंतीवर भाष्य करणारे आहेत. यातील काही लेख ललित निबंधांच्या क्षमतेचे आहेत. त्यातील अनुभव आणि निरीक्षणे अस्वस्थ करून सोडणारी आहेत. यामधील काही लेख साध्यासरळ अनुभवांनी, घटनाप्रसंगांनी सुरू होतात आणि अखेरीस मनात उलथापालथ घडवतात. काही लेख तर धक्कादायक मांडणी करणारे आहेत.

यातील काही लेख सत्ताधाऱ्यांच्या राजकीय मुस्कटदाबीच्या प्रयत्नामागील कारणव्यवस्थेचा शोध घेतात. सोबतच अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठीच्या प्रतिकाराची विविध रूपे दर्शवितात. काही लेखांम ध्ये धार्मिक राष्ट्रवादाच्या हिंस्त्रतेची चिकित्सा आहे. तर काही लेखांमध्ये जागतिक पातळीवरील वाढत्या मूलतत्त्ववादाच्या भीषणतेबाबतची प्रासंगिक चर्चा आहे. मानवी अधिकार, लोकशाही आणि समता यांची होणारी पायमल्ली ही एकप्रकारे मानवतावादावर हुकूमशाही प्रवृत्तीने लादलेले युद्धच आहे, याची जाणीव काही लेखांमधून होते. चोवीस लेखांमध्ये विषय वैविध्य आहे. अनेक वेगवेगळ्या विषयावरील गंभीर भाष्य त्यात आहेत. उदा. 'दलित' हा शब्द आणि त्यातील अत्यंत सशक्त राजकीय सामर्थ्य यावर मांडलेले विचार महत्त्वपूर्ण आहेत. या शब्दाच्या वापराबाबत घेतल्या जाणाऱ्या भूमिकांचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता त्यातून व्यक्त होते.

स्त्रीवादी राजकीय जाणिवांमधून लिहिले गेलेले काही लेखदेखील या भागात आहेत. त्यातून दलित स्त्रीवादी विचार समजून घेण्यासाठी मदत होते. त्या दृष्टीने चार भाषणांमध्ये काही महत्त्वपूर्ण चर्चा आलेली आहे. १९९०नंतरच्या काळात दलित स्त्रीवादाच्या निमित्ताने गोपाळ गुरू आणि शर्मिला रेगे यांनी मांडणी केली. शर्मिला रेगे यांनी दलित स्त्रीवादाच्या निमित्ताने 'भूमिदृष्टी सिद्धान्ता'ची चर्चा केली आहे. या सिद्धान्ताचा आणि दलित स्त्रीवादावरील आजवरच्या चर्चाविश्वाचा परिचय असल्याशिवाय प्रज्ञा दया पवार यांनी स्त्रीप्रश्न आणि स्त्रीवाद यासंदर्भातील केलेली मांडणी समजून घेता येत नाही. म्हणून या चर्चाविश्वाचा परिचय करून घेणे आवश्यक ठरते. अन्यथा पितृसत्ताक धारणांच्या प्रभावात आणि स्त्रीवादी चर्चाविश्वाच्या आकलनाच्या अभावात ही मांडणी अतिरंजित व व्यक्तिवादी अश्रद्ध स्वरूपाची वाटण्याची शक्यता आहे. त्यांच्या मांडणीला अनुभवजन्य ज्ञानाचा संदर्भ आहे. त्यात केवळ एका स्त्रीचा अनुभव नसून अनेक स्त्रियांच्या अनुभवांचा भाग अंतर्भूत आहे. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातदेखील अनुभवजन्य ज्ञानाला महत्त्व राहिलेले आहे. त्या दृष्टीने भारताच्या विशिष्ट अशा सामाजिक परिस्थितीत जातीय उतरंडीनुसार स्त्रियांना 'स्त्री' म्हणून येणाऱ्या अनुभवांची विशिष्टता समजून घेणे आवश्यक ठरते. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री–पुरुष तुलना' या पुस्तकातील मांडणीवर तत्कालीन काळात काही पुरोगामी कार्यकर्त्यांनी टीका केली, त्याचा प्रातिनिधिक समाचार महात्मा फुले यांनी 'सत्सार अंक– २' मध्ये घेतला आहे. प्रज्ञा पवार यांची स्त्री प्रश्नासंदर्भातील परखड मांडणी समजून घेण्यासाठी या पूर्व परंपरेचे स्मरण ठेवणे आवश्यक वाटते.

शोषणाविरुद्ध लढताना समाजात अस्तित्वात असणाऱ्या शोषणशासनाच्या विविध व्यवस्थांचे व्यापक भान बाळगणे आवश्यक ठरते. शोषणाच्या विविध सामाजिक रचनांमधील आंतरिक संबंध समजून घेणे आवश्यक ठरते. असे केल्यानेच शोषणाविरुद्धचा लढा अधिक व्यापक व प्रभावी होऊ शकतो. त्यादृष्टीने आवश्यक असणारा व्यवहार करावा लागतो. मात्र शोषणशासनाच्या कोणत्याही एकाच व्यवस्थेला प्रमाण मानून त्याविरुद्ध लढा देणारेही शोषणशासनाच्या अन्य व्यवस्थांना पूरक व्यवहार करतात. त्यामुळे स्वाभाविकच शोषणमुक्तीचा व्यापक लढा उभा राहण्याला आणि अपेक्षित परिवर्तन होण्याला मर्यादा पडतात. म्हणून जातिव्यवस्थेविरुद्ध लढताना पितृसत्ताक व्यवस्थेकडे दुर्लक्ष करणे, त्याबद्दल मौन बाळगणे हे अनुचित ठरते. शिवाय, बदलत्या वर्गीय जाणिवांनादेखील टाळणे योग्य ठरत नाही. हीच बाब पितृसत्तेविरुद्धच्या लढ्याला आणि वर्गलढ्याला लागू आहे. एककल्ली लढे हे

अभिनिवेशी बनतात. त्यामध्ये आत्म चिकित्सेसाठी अवकाश राहत नाही. काही प्रसंगी तर परखड सत्याला स्वीकारण्यापेक्षा ते मांडणाऱ्यांना दोषी मानण्याची शक्यतासुद्धा त्यातून वाढीस लागते. या पार्श्वभूमीवर प्रज्ञा पवार यांनी काही लेखांमधून केलेली स्त्रीप्रश्नांची मांडणी अप्रिय वाटली तरी ती पथ्यकर आहे, हे नाकारता येत नाही.

साहित्याच्या क्षेत्रातील पितृसत्ताक मानसिकता आणि त्यामुळे स्त्रियांना येणारे वाईट अनुभव यांना धाडसाने मांडण्याचे काम लेखिकेने केले आहे. 'मी टू'ची चळवळ ही केवळ बॉलिवूडपुरती मर्यादित न राहता ती विविध क्षेत्रांमध्ये विशेषत: साहित्याच्या क्षेत्रात सुरू झाल्यास अनेक धक्कादायक अनुभव पुढे येऊ शकतात, असे काही लेखांमधून जाणवते. यासंदर्भात लेखिकेने मांडलेला स्वानुभव हादरवून सोडणारा आहे.

पुस्तकाच्या चौथ्या भागात ६८ फेसबुक नोंदी आहेत. त्यांचे स्वरूप प्रतिक्रियात्मक असले तरी त्यात चिंतनशीलता आहे. विविध प्रसंगी संवेदनशील मनाने दिलेल्या उत्कट प्रतिक्रिया म्हणूनही त्यातील काही नोंदींकडे आपण बघू शकतो. तर काही नोंदींमध्ये विशिष्ट संदर्भांत केलेली मार्मिक भाष्ये आहेत. यातील बऱ्याच पोस्टी काव्यात्मक विधानांनी भरलेल्या असल्यामुळे त्या अधिक सटीक वाटतात. भारतातील विद्यमान सामाजिक-राजकीय परिस्थितीवर या नोंदींमधून केलेले भाष्य विलक्षण प्रभावी आहे. नागरी समाजातील सजग भान त्यातून व्यक्त होते.

एकूणच प्रज्ञा दया पवार यांचे 'अर्वाचीन आरण' हे पुस्तक भारतातील राजकीय स्थित्यंतराचा, त्यामधून आलेल्या अघोषित आणीबाणीचा, सांस्कृतिक दहशतवादाचा आणि बाजारकेंद्री जीवनजाणिवांचा वेध घेते. अकादमिक आणि विचारधारांशी नाते सांगणाऱ्या जगातील पितृसत्ताक धारणांची चिकित्सा करते. परिवर्तनासाठी विविध मार्गांनी संघर्ष करणाऱ्यांमध्ये मुक्तिदायी राजकारणाचे व्यापक भान जागृत करून हुकूमशाही विरोधातील निर्णायक लढ्याची सिद्धता करू बघते. अशा अनेक संदर्भांनी हे पुस्तक अधिक वाचनीय ठरते.

पुस्तकात प्रामुख्याने वेगवेगळ्या घटनाप्रसंगांच्या निमित्ताने निर्माण झालेल्या अस्वस्थेतून आलेले विचार आहेत. लेखन ही राजकीय कृती असते, याचे तीव्रतम भान त्यामध्ये आहे. यातील भाषा रचनाप्रकारानुसार असली तरी ती थेट संवाद साधणारी आहे. त्यामुळे साहित्याच्या नियमित वाचकांच्या मर्यादित कक्षेपलीकडे जाऊन समाजातील खूप मोठ्या वर्गापर्यंत पोहचण्याचे सामर्थ्य त्यात आहे. भाषा ही स्पष्ट आणि थेट असली तरी त्यातील क्रांतिकारक आशय पचवण्यासाठीची पूर्वतयारी वाचकाकडे आवश्यक ठरते.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी मांडणीची पुनरावृत्ती होताना दिसते. पुस्तकातील लेखन एका विशिष्ट कालखंडात विविध निमित्तांनी झालेले आहे. त्यामुळे स्वाभाविकच अशी पुनरावृत्ती संभवते. मात्र, लेखन पुस्तकरूपात आणताना ही पुनरावृत्ती टाळणे आवश्यक होते, असे वाटते. पुस्तकातील काही मांडणी वृत्तकथनात्मक स्वरूपाची आहे. मात्र, त्या निमिताने काही प्रसंगी येणाऱ्या निरीक्षणात्मक व निष्कर्षात्मक विधानांमुळे असे वृत्तकथन हरकतीचे वाटत नाही. यातील मांडणी ही सामाजिक व अर्थ-राजकीय आहे. अनुभवांमधून सिद्धान्त आणि संकल्पना उभे करता येऊ शकण्याचे सामर्थ्य या लेखनात आहे. प्रज्ञा दया पवार यांनी मराठीतील निर्भीड अभिव्यक्तीच्या परंपरेशी नाळ जपली आहे. प्रस्तुत पुस्तकातील मांडणी त्यादृष्टीने म हत्त्वपूर्ण आहे.


पुस्तकातील मांडणी ही २०१४ ते २०१८ या कालखंडाच्या निमित्ताने आली आहे. असे असले तरी या मांडणीला आधुनिक भारतातील राष्ट्रवादी आणि जमातवादी राजकारणातून निर्माण झालेल्या गुंतागुंतीचा संदर्भ आहे. आधुनिक भारतातील समाजवास्तव ज्या जात-वर्गीय संदर्भांनी आकारली आहे आणि त्यावर जो पितृसत्ताक धारणांचा प्रभाव राहिला आहे; त्यांचाही विचार पुस्तकातील आशयाच्या निमित्ताने आवश्यक ठरतो. या सर्व संदर्भांमधून समकालीन भारतात जी गुंतागुंत निर्माण झाली आहे. त्यातूनच हे आजचे 'आरण' उद्‌भवले आहे. म्हणूनच या पुस्तकाचे शीर्षक 'अर्वाचीन आरण' हे अधिक समर्पक जाणवते. अभय कांता यांनी केलेले पुस्तकाचे मुखपृष्ठदेखील पुस्तकातील आशयाला परिणामकारकतेने व्यक्त करते. पुस्तकाला हरिश्चंद्र थोरात यांनी लिहिलेली प्रस्तावना महत्त्वपूर्ण आहे. त्यामध्ये संहिता आणि लेखक यांच्या निमित्ताने आलेली विधाने मार्मिक आहेत. साहित्याचे वाचक व अभ्यासक यांसह विद्यापीठ पातळीवरील विविध विषयांमधील अभ्यासक, संशोधकांसह विविध चळवळींमधील कार्यकर्त्यांसाठी हे पुस्तक उपयुक्त ठरू शकते.

*भगवान फाळके, अमरावती.*
*मोबाइल : ९६५७४४९५६५*

# गंगा आये कहा से...

नीलिमा बोरवणकर

**कथा**



''बिच.. फक.. शिट यार...'' कुशन फेकल्या, पुस्तकं टाकली. बॉटल फेकताना लक्षात आलं, कितीही शिव्या दिल्या, वस्तूंची फेकाफेकी केली. त्यानं काय भडास निघतेय होय? उलट, आता ही मेस आवरायचं काम येऊन आदळलं. ''सकर,'' जोरात ओरडत फोन कट केला तरी शब्द बोचत होतेच.

''तू एकदा नक्की ठरव, स्वतःला कोण मानतेस तू? लहानपणच्या घरातल्या संस्कारांनी आणि जन्मानं भारतीय आहेस की, तरुणपणापासून वास्तव्यानं? शिवाय आता परत भारतात जायचं नाही, असं ठरवत असशील तर अमेरिकन? एकदा तुझाच तुला निर्णय घ्यावा लागेल मग गोंधळ राहणार नाहीत तुझे.'' ताई किती शांतपणे बोलत होती. तिचं बोलणं पटलं, नेहमी असं होतं. शी इज ऑलवेज राईट. मग अजूनच राग येतो. तिला आरामात जमतं त्याचा, मला बिलकुलच जमत नाही त्याचा, आणि ती जे जे सांगते, तसं आपल्याला वागता येत नसलं तरी पटतं, याचा पण. 'शिट.. शिट.. शिट..' फोन वाजत राहिला आणि रियाच्या शिव्यांचा ओघही.

संध्याकाळ रात्रीत बदलायला घडयाळात नऊ वाजून गेले. स्वतःच केलेल्या पसाऱ्याच्या ढिगाऱ्यांत भकास नजरेनं ती तशीच बसून होती. याकुमिनी प्लाटज् अजून गजबजलेला होता, ट्रॅमचे सायरन वाजत होते, जीवघेण्या विंटर नंतर आलेल्या समरची मजा घ्यायला बहुसंख्य लोक रस्त्यावर, कॅफेमध्ये, पबमध्ये, मॉलमध्ये फिरत होते, उरलेले घरी बार्बेक्यू समोर बियरच्या बाटल्या उघडून बसले होते. उघड्या खिडकीतून अंधार भसकन आत घुसला. पोटात भूक जाणवायला लागल्यावर तिनं ब्राऊहाऊसचा टिन उघडला. पुन्हा योसेफची आठवण आली. मागच्या महिन्यात हॅलस्टॅटला गेले असताना त्यानं खास टेस्ट करायला लावली होती. 'ट्राय तर कर. ही बियर फक्त इथे मिळते. सारखी काय हॅनिकन पितेस? बघ किती वेगळी चव आहे.' ईचन व्हॅली ग्लेशियर गार्डनच्या रस्त्यावर एका झाडाखाली बसलो. तेव्हा त्यानं पटकन त्याच्या सॅकमधून टीन बाहेर काढून दिला. सोबत आपल्या टिपिकल भारतीय सवयीनुसार चिप्स.

हिरव्यागार निसर्गात कितीही चाललं तरी हा योसेफ अजून थोडं, अजून थोडं म्हणत पुढे जातच राहतो. खरं तर कुठेही जा, कितीही फिरा दृश्य तेच. हिरवं गार मैलोनमैल पसरलेलं गवत, उंच उंच झाडं. सुबक पायवाटा, कडेनं जाणारा गुळगुळीत मोटररोड. अध्येमध्ये वाहणारे झरे. अख्खं ऑस्ट्रियाच तसं, निसर्गरम्य. त्यात हॅलस्टॅटचं सौंदर्य केवळ लाजवाब. डोंगर रांगांमधला समुद्र वाटावा इतका मोठा लेक. निळंशार पाणी, जगात जणू कुठल्या चिंता, दुःख, अस्थैर्य नाहीच, असं वाटावं इतकी शांतता. वाऱ्याच्या मंद लाटांवर डुलणारी बदकं, स्वान.

'एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख...' आजी झोपवताना म्हणायची हे गाणं. सुरेल, गोड आवाजात. हळुवार थोपटत, केसातून हात फिरवत. कामानं


खरखरीत झालेल्या हातातून माया पोचायची आतपर्यंत, आणि डोळ्यावर ताबडतोब गुंगी. पण, 'त्याचेच त्या कळाले, तो राजहंस एक', ही शेवटची ओळ संपेपर्यंत अट्टाहानं डोळे उघडे ठेवायचे मी. राजहंस कुठला, बदकंसुद्धा फारशी बघितली नव्हती कधी. घरा बाहेर कुठे मजेसाठी पिकनिकला वगैरे जाणं, माहितीही नव्हतं. सुट्टीला जाणं म्हणजे आजोळी, गावाला. तिथेसुद्धा खूप मजा येईल असं काही नव्हतं. ना शेतीवाडी, ना समुद्र किनारा, ना ऐतिहासिक गड, किल्ले, ना मामे-मावस भावंडांचा गोतावळा. मावशी नाही, एकच मामा अमेरिकेत राहणारा, क्वचित कधी येणारा. त्याची मुलं आपल्याहून किती लहान, तरी ती असली की तेवढीच गंमत. नाहीतर घरी पण ताईशी खेळायचं आणि आजीआजोबांकडेही. ताई बरोबर खेळणं म्हणजे तिचे सल्ले ऐकून घेणं. असं वागू नये आणि तशी उलट उत्तरं देऊ नयेत. बुलशीट! पण घरच्या आई बाबांच्या भांडणापेक्षा तिथं बरं वाटायचं. तेसुद्धा आजोबा असेपर्यंत. मी चौथीत असताना आजोबा गेले आणि मामा तिथल्या आजीला न्यू जर्सीला घेऊन गेला. मग तेही संपलं.

बाबाची आई, तिला पण आजीच म्हणायचो आपण. ती जास्त जवळची, रोजची. आईनं इकडे बोलावलं ते सहन नाही झालं तिला. बिचारी होऊन गेली अगदी.

आजी गं, माझं नाव काढत गेलीस, असं बाबांनी सांगितलं नंतर. आधी पण त्यांनी कितीदा सांगितलं आजीला, ''बरं नाही, थकलीय, तुझी आठवण काढते बेटा. येऊन जा एकदा.'' मॉम म्हणाली, ''हो का? मग तिकीट पाठवायला सांग तुझ्या बाबाला. भरपूर प्रॉपर्टी आहे त्याच्या आईची. माझ्याकडे नाहीत पैसे आता.'' बाबांना सांगितलं तर म्हणाले, ''पाठवतो की. कधीचं पाठवू सांग.'' यावर मॉम चं म्हणणं, ''हे बरंय आपलं पुणेरी आमंत्रण. कधीही या म्हणायचं, पण नेमकी वेळ नाही सांगणार. असं कोण कुणाकडे जाईल?''

फकर.. घरात होतात तेव्हा भांडून पोट भरलं नाही का तुम्हा दोघांचं? मॉम यू.एस. आणि बाबा इंडियात असूनसुद्धा कसं असं सदोदित भांडू शकता? इनफ नाऊ. आपण सगळे एकत्र राहात असताना तुम्ही दोघं असे भांडायला लागलात की, आजी म्हणायची, ''नका रे शब्दानं शब्द वाढवू. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ म्हणतात, पण आईबापांच्या भांडणात पोरांचा घात होतो रे.''

ताईचा नाही झाला घात. छान झालं की सगळं. कायम



उत्तम मार्क्स मिळवत गेली, व्यवस्थित शिक्षण पूर्ण केलं. बारा-पंधरा लाखांचं पॅकेज मिळवते. मॉमकडे यू.एस.ला आली ती; पण स्वत:च्या बळावर. प्रोजेक्टवर आली असताना. कुणीतरी स्टेडी बॉयफ्रेंड पण आहे तिचा. पण तो दिल्लीला, ही बंगलोरला. दोघांना एका शहरात जॉब मिळाला की, लग्न करणार आहेत म्हणे.

आईनं मुलांच्या वाढीकडे नीट लक्ष दिलं पाहिजे... वगैरे चर्चा सुरू असल्या की, ते जणू काही तिलाच टोमणे मारतात असं वाटून घेऊन मॉम लगेच ताई आणि माझं उदाहरण देणार. की बघा, एकाच आईबापाच्या, एकाच घरात वाढलेल्या, एकाच वातावरणात राहिलेल्या पण किती वेगळ्या.

थेट नाही बोलली तरी अर्थ तोच की, ती किती गुणी आणि ही बघा कशी नालायक.

ताईला सहज जमलं त्या पैकी एकही गोष्ट नाही झेपली मला.

सायन्स, मॅथ्स, एक नंबरचे शत्रू. ताई त्यात मास्टर. त्यामुळे भरपूर मार्क्स. म्हणजे हुशार, हुशार म्हणजे इंजिनीयरिंग. ते पण केलं तिनं, सहज. त्यातून आली नोकरी. मला मुळात मार्क्स मिळवायलाच नाही जमलं. कारण, आवडायचं हिस्ट्री आणि भाषा, त्यातही मराठी फारच. आजी कविता पाठ करून घ्यायची.

'हूंका चूं, चुंका हूं, हे दोघे सख्खे भाऊ. चेंफा फूं, फुंका चें, हे दोघे त्यांचे भाचे.

चार चिनी.. केव्हा तरी जेवून गेले माझ्या घरी. चार पराती वाढला भात, एकेक काडी, चार हात.

नंतर त्यांनी ढेकर दिली, ती चीनला ऐकू गेली,'

तेव्हा पासून काय झाले, नाही झुरळ घरात आले. सायन्स मधली इक्वेशन्स ना कळली, ना लक्षात राहिली. पण कविता आठवतात अजून.

'कोंबडीच्या अंड्यामधून, बाहेर आले पिल्लू,

अगदी होते छोटे आणि उंचीलाही टिल्लू..'

बाबा म्हणायचे, 'अगं, हिला आपण मराठी माध्यमात घालायला हवं होतं, अजून बदलू.' 'बापरे! मग सगळ्या पाढ्यांची उजळणी. मराठी शिकून कोणते दिवे लावायचेत? तुमच्या सारखी मराठीची शिक्षक नको बनायला. मुलींनी भरपूर शिकायला हवं, पुष्कळ पैसे मिळवायला हवं, जग फिरायला हवं. शेवट नेहमी माझा भाऊ बघा किती हुशार, अमेरिकेत केवढा बंगला आहे त्याचा.' ही बडबड सुरू झाली की, बाबा दार आपटून बाहेर जाणार, आजी देवाच्या समोर जपमाळ घेऊन बसणार. ताई तर सतत खोलीत अभ्यासाच्या पुस्तकात डोकं खुपसून बसलेली. म्हणजे या बोलण्याचा भडीमार कुणावर? माझ्यावर. आठवतंय तेव्हापासून हेच घरातलं चित्र.

''छान काढतेस चित्र, पण खूप भडक रंग का वापरतेस नेहमी?'' आशय म्हणाला एकदा अचानक. रझिया मॅडम कधी विषय देऊन चित्र काढायला सांगायच्या नाहीत. शाळेतल्या ठकार टीचर नेहमी जॅस्मिन काढा, गणपती विसर्जनाची प्रोसेशन काढा, स्टिल लाईफ काढा, असलं शिकवायच्या. चित्रकला नसून तोही एक डिझाईन, मेमरी, नेचर, फ्री हॅण्ड, ज्यॉमेट्री असे विषय असलेला अभ्यास होऊन जाई. कंटाळवाणा. चित्र काढायला तर खूप आवडायचं. मग बाबांना कुणीतरी रझिया मॅडम बद्दल सांगितलं. घरापासून दूर होता त्यांचा बंगला. मोठी खोली आणि बाहेर व्हरांडा. कुठेही बसा, त्यांच्याकडच्या कपाटातली पुस्तकं जपून बघा, आणि पाहिजे ते चित्र काढा. त्यांच्याकडे दुपारी १ ते ५ कुणीही यायचं, जागा मिळेल तिथे बसून काहीपण करायचं. मोठी माणसं, बायका यायच्या आणि आमच्यासारखी मुलं पण. ते एक काका नेहमी बाहेर बसून आकाशाचे रंग वॉटर कलरमध्ये रंगवायचे. एक मुलगा गाड्या. भन्नाट आकाराच्या. मॅडमनी त्याला सुचवलं, 'आशय, तू नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ डिझाईनची एंट्रन्स दे. त्याच्या नावीन्यपूर्ण कार्सची फक्त चित्र बघून मॅडमनं त्याची पॅशन ओळखली. सतत आपल्या तंद्रीत असणाऱ्या मुलानं माझी चित्रं एवढ्या बारकाईनं पाहिली. आश्चर्यच वाटलं होतं. आपल्याकडे कुणीतरी बघतंय या कल्पनेनं छान पण. तरी मी कशीही रंगवेन, भडक हवी असतील मला. तुला का उत्तर देऊ? असा ॲटिट्यूड दाखवलाच आपण. पण मग विचार केला की खरंच सगळं गडद लाल, जांभळं, करडं का दिसतं मला? मॅडमनं एकदा जवळ येऊन म्हटलं, 'निसर्गातल्या कोवळ्या पोपटी, मंद पिवळ्या, आकाशी रंगाकडे बघ. मन बघ किती प्रसन्न होऊन जातं.'

आई तेव्हा मामाकडे गेली होती. तिथली आजी आजारी होती तिला सांभाळायला. स्वत:च्या लेकरांना सोडून कुणी आई पाच पाच महिने अशी अमेरिकेत जाते का? कुणी कुणी कुजकटपणे मुद्दाम आम्हाला ऐकू यावं असं बोलायचं. ताई म्हणे, 'त्यांना बोलू दे हवं ते. आपण नाही लक्ष द्यायचं.' आजी म्हणे, 'सोनू अगं मामा, मामी नोकरीला गेले की एवढ्या मोठ्या बंगल्यात आजी एकटी कशी राहील? आणि इथे मी आहे, बाबा आहेत. आजीला बरं वाटलं की येईल हो आई.' आई आली; पण पुन्हा परत गेली. परत न येण्यासाठी. बाबा, आजी, ताई आणि मला सोडून.

''मंदार आणि त्याची बायको फार बिझी असतात. त्यांच्या नोकऱ्या, घरकाम, मुलांना शाळेत सोडा–आणा, एवढं सगळं करून वर आईचं करावं लागतं. तिकडे कामाला माणूस मिळत नाही. तर मंदार मला तिकडे कायमचं बोलावतोय. तो स्पॉन्सर करतोय मला.'' आईनं येताना दोन बॅगा भरून आमच्यासाठी केवढं काय काय आणलं होतं. केशर, बदाम, चॉकलेट्स, बाबांना टी शर्ट, आम्हाला दोघींना फ्रॉक, कलर पेन्सिल्स, आजीला चांदीच्या देवांना चकचकीत करायचं पॉलिश. त्या वस्तू बघून ती एवढे महिने आपल्याला सोडून गेल्याचा राग कुठच्या कुठे पळून गेला. शिवाय परत आल्यापासून थोडी मवाळ वाटत होती. बाबांशी सारखे वाद घालत नव्हती. आजीला तिकडच्या गोष्टी सांगायची. विशेषत: तिथली मोठी घरं, बाहेरची हिरवाई, आयत्या चिरलेल्या भाज्या कशा, राजमा–छोले, मक्याचे टिन्स कसे मिळतात. एकूण अमेरिकेच्या पूर्ण प्रेमात पडून आलेली स्पष्ट कळत होतं.

मधूनच बाबांना म्हणे, ‘तुम्ही पण तिकडे ट्राय करू शकता. तिथल्या मराठी माणसांना त्यांच्या मुलांना म राठीच्या ट्यूशन लावायच्या असतात. नुसते वीकएंड क्लास घेतलेत तरी इथे मिळणाऱ्या पगारापेक्षा चांगले पैसे मिळतील.’

मधले ३–४ महिने खरंच फार भारी गेले. भांडणांशिवाय घर असतं, हे जणू नव्यानं कळत होतं. आईनं आमच्या दोघींसाठी नाईट गाऊन्स शिवले, आमची कपाटं आवरून, वेगळी करून दिली. तिच्या जुन्या साड्या देऊन रजया शिवून घेतल्या. जरीच्या साड्यांची कुशन कव्हर्स, मॅगेझीन होल्डर्स असं काय काय बनवून घेतलं. दिवसभर ती कामात असायची. घरातल्या शांततेमुळे सगळं घर मजेत होतं, आई नेमकं काय करते याकडे कुणीच लक्ष दिलं नाही.

ती मोठ्या वादळापूर्वीची शांतता होती, हे तिनं जायचा निर्णय घेतल्याचं सांगितल्यावरच कळलं. अमेरिकेचा नागरिक असलेलं कुणीही आपल्या सख्ख्या बहीण, भावाला स्पॉन्सर करू शकतो, ग्रीन कार्ड असलेल्या त्या भावंडांनाही काही वर्षांनी नागरिकत्व मिळू शकतं या तिथल्या कायद्या आधारे आईनं जायचं ठरवलं होतं. मी पुढे जाते. मंदार मला काम मिळवून देईल. मग मी तुम्हा दोघींना बोलावून घेईन. १८ वर्षाच्या आतल्या मुलांना नेता येतं. असे हजारो गुजराथी लोक अमेरिकेत राहतात. तिथली कित्येक मॉटेल्स गुजराथींची आहेत की, त्याला पोटेल्स असंच नाव पडलंय म्हणजे बघा. आपण काहीसुद्धा कायदा मोडून करणार नाही, तुमच्या बाबांनासुद्धा नेता येईल मला. फक्त हे सगळं जमून यायला थोडा वेळ लागेल. आता मी याच तयारीसाठी इतके महिने राहिले. तुम्ही थोडी कळ काढा मग आपण मजेत अमेरिकेत राहू. आईनं आम्हा दोघींना जवळ घेऊन म्हटलं.

कसला अलार्म वाजतोय? ओ माय गॉड, फायर अलार्म? हॉट प्लेटवर काही सांडून धूर आला का? बास्टर्ड. बसा, आता त्या सेक्युरिटीच्या लोकांना उत्तरं देत, त्यात एवढी बियर, वाईन अँड व्हॉट नॉट, दिसेल ते पोटात ढकललंय...

नो, नो गॅजेट्स आर ऑन. मग कसला आवाज? ओह.. खालून डोअर बेल. कोण आलं आत्ता यावेळी?

योसेफ?

‘‘प्लीज ओपन. कॉलिंग सीन्स लाँग.’’

तो असा बिल्डिंगच्या खाली आला म्हटल्यावर दार उघडावंच लागलं.

‘‘संध्याकाळ पासून फोन करतोय, उचलला का नाहीस? किती काळजी वाटली तुझी, शेवटी व्हिएन्नाहून शेवटची बस पकडून आलो. आर यू ऑलराइट?’’

पै न् पैचा हिशोब करणारा हा मुलगा १२ युरोचं तिकीट काढून, ९० मैलाचा प्रवास करून इतक्या रात्रीचा केवळ आपल्या काळजीनं येतो?

तो आला, त्यानं हात पसरले आणि गेला आठवडाभर मनाला समजावण्याचे सगळे प्रयत्न त्याच्या दणकट मिठीत वाहून गेले.

‘‘पास्ट इज पास्ट, विल टॉक अबाऊट आवर फ्यूचर’’, आशयनं सगळं ऐकल्यावर म्हटलं होतं. दोन वर्षांपूर्वी बाबांना भेटायला गेले असताना तो मधल्या इतक्या वर्षांच्या गॅपनंतर भेटला. रझिया मॅडमला भेटायला गेल्यावेळी मुद्दाम त्याची चौकशी केली. तो पुण्यातच असतो कळलं, त्यांनी त्याचा फोन नंबर पण दिला.

मी १४ आणि तो १६ असतानाची आमची ओळख, जाणवत असलेला हळुवार कोपरा. नेमकं आपण सर्वात जास्त डिस्टर्बड असतानाचा आणि म्हणून जास्तीत जास्त वेळ रझिया मॅडमकडे चित्र काढत घालवत असणाऱ्या काळातला एकमेव मित्र. क्लास नंतर रस्त्यावर उभं राहून कधी चिडचिड, कधी रडरड केली तरी शांतपणे ऐकून घेणारा. कधीच कुठलं आक्रस्ताळं मत न देणारा. तुझे आईबाबा छान एकत्र राहतात, तू हुशार आहेस, तुला सल्ले देणारी मोठी ताई नाही, एकूण तू किती नशीबवान आणि मी जगातली सर्वात दुःखी मुलगी, अशा आविर्भावात उच्चारलेल्या वाक्यावर कुठलीच प्रतिक्रिया न देणारा. नुसता फ्रेंड. बॉयफ्रेंड नव्हे. खरंतर त्या दीड वर्षात तो प्रवास व्हावा अशी मनापासून इच्छा असून त्यानं कधीच पुढाकार घेतला नाही आणि प्रेम व्यक्त करायचं ते मुलानं, अशी तेव्हाची टिपीकल मनोवृत्ती. कदाचित नकाराची भीती प्रबळ ठरली असेल, पण तेव्हा काहीच पुढे गेलं नव्हतं हे निश्चित.

फोन केल्याबरोबर त्याच्या आवाजातला आनंद क्षणात कळला. अमेरिकेत दुसऱ्या बऱ्याच गोष्टी सोप्या गेल्या नसल्या, तरी मुलांबाबतचं प्रगती पुस्तक कोरं नव्हतं. नातं निर्माण करायचं नाही, अशी तर अधूनमधून भेटायचीच; पण जुळून तुटलेली पण दोन होती. थोडक्यात, मुलांबद्दल अनुभव समृद्ध अशी मी जुन्या मित्राला भेटायला निघाले होते.

‘‘हाय.. ती रडकी, चिडकी मुलगी कसली स्मार्ट होऊन गेलीय. नाईस टू सी यू.’’ त्यानं एकदम हसत कॉम्प्लीमेंट दिली. वरवर पाहता मी खरंच स्मार्ट, हॉट दिसते एवढं कळतं मला.

आशय बदलला असेल, एन.आय. डी. नंतर दिल्ली वगैरेनं तोही स्मार्ट झाला असेल वाटलं होतं, पण ना त्याची उंची वाढली होती, ना स्टाईल. दाढी सोडली तर तो तसाच, जराही अ‍ॅट्रॅक्टिव्ह नाही, फक्त बोलत होता

मोकळेपणानं, जे मी किती वर्ष मिस करत होते.

एन.आय.डी.मधून त्यानं प्रॉडक्ट डिझाईनिंग केलं. मग काही वर्ष दिल्लीत मारुतीमध्ये होता, आता पुण्यात टाटा मोटर्सच्या डिझाईन स्टुडिओत काम करतो. ''मॅडमनी सुचवलं म्हणून, आम्हाला माहितीही नव्हतं गं, एन.आय.डी. बद्दल. इट चेंजड माय लाईफ. व्हेन युअर पॅशन बिकम्स युअर प्रोफेशन यू एन्जॉय लाईफ.'' माझी भडक चित्र बघून मॅडमनं मला का नाही दिला मी पुढे काय करावं याचा सल्ला? आजपर्यंत मी अडखळतेच आहे अजून, नेमकं कळलेलं नाहीय मी काय करतेय, काय करायला हवंय?

''सो, हाऊज् लाईफ?'' या त्याच्या प्रश्नावर इतक्या वर्षांनी पुन्हा त्याच्या समोर अगदी यातून रडायला आलं. वाटलं याच्या मिठीत शिरून हमसून हमसून रडावं..

''व्हॉटस रॉंग डिअर?''

कोण बोललं हे वाक्य? कोण आहे आपल्या सोबत? योसेफ..

याचा हा अराउज करणारा स्पर्श ओळखीचा आहे. त्यानं नुसते ओठ टेकवले तरी अख्खं शरीर क्षणात पेटतं. वॉन्ट यू, वॉन्ट यू म्हणत त्याला सामावून घेतं.. पण असा आपल्या काळजीनं भिजलेला आवाज.. हा योसेफ की आशय?

आशय स्पर्श नाही करत, व्हिडिओ कॉलमधून त्याचे डोळेच भिडतात, आपलं सगळं वाचतात, आत काही राहातच नाही. जणू तो ओळखतो आपल्या इच्छा, आपली अतृप्ती, आपली असोशी, आपल्या चुका, चुकांमागची कारणं, आपलं एकाकीपण..

''हे... व्हेर आर यू? मिसिंग सम वन? वॉन्ट टू गो बॅक?'' आजपर्यंत आपण ज्या हॉट, स्टड योसेफला ओळखत होतो, फक्त सेक्स पुरती मैत्री होती ती? त्याच्या आणि आपल्याही आधीच्या ब्रेक अप नंतर नको ती स्टेडी मैत्री, नकोत कुठल्या अपेक्षा, फक, एन्जॉय अँड फरगेट म्हणून जवळ आलेले आपण.

यू.एस.मध्ये बोरिस बरोबर बरेच महिने एकत्र राहिलो, तेव्हा थोडं जर्मन यायला लागलं, म्हणून इथे योसेफशी ओळख झाली पटकन.

'मूव्हीला जायचं? पब? शॉपिंग?' यापैकी कुठल्याही प्रश्नावर बोरिसची उत्तरं ठरलेली, 'आता नको, प्रोजेक्ट कम्प्लीट करायचाय, असाईनमेंट व्हायचीय.' सो बोअरिंग. या पैकी मला काहीच करायचं नसायचं आणि ८ तास काम करून ठरलेले डॉलर्स खिशात असले की, टाईमपास कोणता? बोरिस बाकी चांगला होता. पी.एच.डी. फंडिंग मिळत होतं, घर स्वच्छ ठेवायची टिपिकल जर्मन सवय होती. पण अभ्यास, रीडिंग्ज, रीडिंग, क्लीनिंग आणि रनिंग बास. 'आय नीड स्पेस', सारखं हेच वाक्य. सेक्स किती वेळ करणार? मग चल बाहेर म्हटलं की नकार. शेवटी चिडून म्हटलं, एखादी गीक मुलगी शोधायचीस ना. व्हाय मी? ही सेड, ओ के. विल ट्राय.

शिट यार. रिलेशनशिप तुटायचं, हे कारण असू शकतं? एनफ नाऊ. नो मोअर रिलेशनशिप्स.

तशीही कुठली चांगली नाती मिळालीत आतापर्यंत? आईनं लग्न करताना बाबांची शहरातली नोकरी बघितली, तिला गावातून मोठ्या शहरात यायचं होतं, तेव्हा नवऱ्याचं मराठी शिकवणं तिला खटकलं नाही. पाठोपाठ आपण दोघी मुलींचे जन्म. जेव्हा मामा अमेरिकेत गेला, तिथल्या जगण्याची वर्णनं करू लागला तशी हिला जीवनशैली उंचावण्याची स्वप्नं पडू लागली. स्वप्नं बघण्यात चूक नाही; पण त्याचा ताण जोडीदाराला देण्याची चूक मात्र तिनं केली आणि ती आपल्याला भोगायला लागली. आजी म्हणाली होती, 'कुंतीनं कर्णाला नदीत सोडलं, हिच्या आईनं हिला अमेरिकेच्या अफाट प्रवाहात सोडून दिलं. आई सोबत असली तरी पोरीच्या नशीबी फरफट आलीच.'

तिनं वर्णन केलेल्या स्वप्नांना बाबा नाही भुलले, ताई नाही भुलली. ते तिथेच राहिले. माझ्याकडेही होता तो पर्याय; पण मी आले आई पाठोपाठ, ऐन नववीत. आजी, बाबांना मागे सोडून. खरंतर ताईच्या दहावी, बारावीच्या उत्तुंग यशाला घाबरून. तिच्यासारखे मार्क्स नाही मिळवता येणार आणि मग सतत तुलना होणार, त्या पेक्षा यू.एस.ला जाऊ. म्हणजे ताईच्या यशाच्या आनंदात सहभागी होता नाही आलं मला. सो मीन.

यू.एस. मध्ये तर सगळं फारच अवघड होतं. आईला मॉम म्हणायला लागले. इतर मुलांसारखी, कमी, लांडे कपडे घालायला लागले, बॉय फ्रेंड मिळावा म्हणून त्यांच्या फिजिकल व्हायच्या इच्छेला होकार द्यायला लागले. बास. तिथे जन्मलेल्या, वाढलेल्या मुलांमध्ये आणि माझ्यामध्ये फरक राहिला तो राहिलाच. अगदी मामाच्या मुलांशी सुद्धा नीट जुळवून नाही घेता आलं. या मायलेकी आल्या आपल्यावर बोजा म्हणून असं मामीला वाटतंय असंच वाटत राहिलं कायम. मॉमला छोटेमोठे जॉब मिळाले, तरी आपलं लहान घर, साधी, जुनी कार, सेल मधले कपडे, आणि मामाचं सगळं वेगळं आहे ही भावना कधीच नाही गेली आणि त्यामुळे आलेला कॉम्प्लेक्स पण. इंफिरिऑरिटी झाकायला चढवलेला बेदरकारीचा मेकअप काढायची संधीच मिळत नाहीय.

इकडे आल्यावर आजी, बाबांपासून लपवाछपवीचा खेळ सुरू झाला, आमचं किती झकास चाललंय ते दाखवायचा. प्रत्येक नात्यात गुंता.

आशयचं बोलणं किती ट्रांसपरंट, त्याच्या आयुष्यात मुली आल्याच नाहीत म्हणतो. असं होऊ शकतं? वयाच्या तिशीला आला तरी? ओके, ही इज नॉट हॅण्डसम, स्टड, स्टिल..? पण तो खोटं बोलत असेल असं नाही वाटत. आणि आपल्या समोर कशाला? इतक्या मुलांशी मी रिलेशन ठेवले हे सांगितल्यावर तर त्यानं नक्की सांगितलं असतं. इथल्या पोरांना अशी एकही पोरगी पटवता आली नाही तर गे समजतील त्याला.

तो म्हणतो, 'तू पटकन कनेक्ट झालीस. आपल्यात काहीतरी स्पेशल आहे. तू काय करायचं याबद्दल गोंधळलेली असलीस तरी खरी आहेस. तुझ्या आयुष्याविषयी तू मला सांगितलं नसतंस तर कळलं ही नसतं मला. म्हणजे तुझा विश्वास आहे माझ्यावर. नात्यात सर्वात महत्त्वाचा विश्वास. आपल्याला तो एकमेकांबद्दल वाटतो. बट आय डोन्ट बीलिव्ह इन शॉर्ट टर्म रिलेशनशिप्स. शिवाय आय लव्ह माय जॉब. तेव्हा मी भारतातच राहणार. तुझ्याशी लग्न करायला मला आवडेल, अँड पास्ट इज पास्ट. तुला मी आवडत असेन, लग्न करायची तयारी असेल तर तुला इथे परत यावं लागेल. चॉइस इज युअर्स. इतकंच सांगतो, तुझा निर्णय होईपर्यंत मी तुझी वाट बघेन.'

गेले वर्षभर तो किती वेगवेगळ्या विषयांवर माझ्याशी गप्पा मारतो. अगदी मॉम वर रागावू नकोस, तिची बाजू समजून घे पासून ते त्याच्या कारचं इंटिरिअर डिझाईन करताना कुठल्या सेफ्टी मेजर्सचा विचार केला जातो, इथपर्यंत काहीही. ऐन तरुणपणापासून तुझे बाबा एकटे राहताहेत, समाजाच्या किती प्रश्नांना तोंड द्यावं लागत असेल, तरी चिडचिड करतात का? आपल्या मनाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टींना सामोरं जाता आलं पाहिजे, संयम महत्त्वाचा... किती समजूतदार, कन्व्हिंसिंग. व्हिडिओ कॉल मधून त्याच्या गळ्यात पडावं वाटतं. त्याच्या लग्नाच्या प्रस्तावाला होकार द्यावा.

'आर यू मॅड? लहानपणचा क्लास मधला मित्र, भारतात गेल्यावेळी दोन–चारदा भेटून लग्नाचं प्रपोज करतो? किती ओळखता तुम्ही एकमेकांना? आणि तो इथे येणार असता तरी ठीक, पण तू परत तिकडे जाणार? मित्र म्हणून चांगला असेल, पण त्याचा नवरा झाला की कशावरून तो बदलणार नाही? तिकडचे नवरे टिपीकल असतात, बायकोकडून वेगवेगळ्या अपेक्षा करणारे. स्वयंपाक, घरकाम, मुलांना वाढवणं ही बायकांची कामं असं मानतात. इथले पुरुष पटापट वॉशिंग, व्हॅक्यूम करतात, तुझ्या बाबांनी एकदा तरी घराचा केर काढलेला आठवतो तुला? आणि तिथल्या मुलींना याची सवय असते गं, तुला आहे? मला गरम पोळी करून वाढ म्हटलं तर जमणार आहे तुला? यू आर अ फ्री बर्ड हिअर. यू स्मोक, यू ड्रिंक.. डू व्हॉटएव्हर यू वॉन्ट.' खूपदा मॉम बोलते ते बिलकुल पटत नाही, पण हे सगळे मुद्दे पटले.

तिनं न मांडलेला अजून एक महत्त्वाचा मुद्दा होता. गेल्या ६–७ वर्षात मला वेगवेगळ्या मित्रांचा जवळून अनुभव आला. कंपॅटिबिलिटी वाटली तर पुढे भेटलो, नाहीतर एका रात्रीत गुडबाय केलं. लिव्ह इनमध्ये राहताना जास्त जबाबदारी असली तरी सोडण्याचा पर्याय पण असतो, आशयशी लग्न करायचं म्हणजे परत भारतात जायचं, कमिटमेंटची सवयच नाहीय मला, आता इतकी वर्ष स्वतंत्र राहिल्यानंतर पुन्हा भारतात राहणं जमेल?

नो वे. लग्न करायचं, मग मॉम सारखं नवरा किंवा ते आयुष्य बोअर झालं की नवरा सोडून द्यायचा? तिला भाऊ होता सपोर्ट करायला, मला ताई करेल? मुळात मला कमीपणा घेऊन तिची मदत मागायला आवडेल का? आय नीड टाईम टू एक्सप्लोर मायसेल्फ. एकाच माणसाशी कमिटेड राहता येतं का, स्वत:च्या अर्जवर कंट्रोल आहे का, बघायला हवं.

बोरिसशी झालेला ब्रेक अप ॲक्सेप्ट करणं अवघड होतं. आयुष्य थोडं सेटल होतंय वाटत असताना फालतू कारणानं झालेला, बट दॅट शोड इट वॉज जस्ट सुपरफिशिअल. त्यातून बाहेर यायला इंडिया ट्रीप, तर तिथे ताईचं सेटल्ड लाईफ बघून अजूनच कॉम्प्लेक्स आला. लाइक, यू बास्टर्ड, गुड फॉर नथिंग. तेवढ्यात आशय भेटला.. आपला भूतकाळ विसरायला तयार असणारा. जरा कुठे क्लाऊड नाईन वर तरंगायला लागले तर धाडकन मॉमनं वास्तवाची जाणीव करून दिली. ऑन सेकंड थॉट तिचं पटायला लागलं. आशयसारख्या साध्या मुलाशी लग्न करून इंडियात जाणं जमणार नाही वाटायला लागलं.

रझिया मॅडमचा व्हॉट्स ॲप मेसेज– 'व्हिएन्ना मधल्या एका स्टुडिओत हेल्पर्स हवेत. स्केल, स्केच, फिलिंग सगळ्यासाठी. तू सध्या किती टचमध्ये आहेस माहीत नाही, पण हे काम तुला आवडेल. मूळ चित्रांच्या विक्रीसाठी प्रती काढण्याचा हा मोठा स्टुडिओ, खरंतर कारखाना म्हणायला हवं. तुझ्या पात्रतेनुसार तुला काम मिळेल. सुरुवातीला नुसतं स्केल कर, मग हळूहळू स्केच कर.. वर्षभरात मास्टर स्ट्रोक मारायचं स्वप्न बघतेय मी तुझ्याकडून.' ओ माय गॉड! आयुष्यात पहिल्यांदा असं काही घडतंय. मला स्वत:ला शोधायची संधी. मॉमच्या यू.एस. मधून दूर, आपल्या आवडीच्या चित्रात रमून जायचं. नवीन जगात. कुणाची ओळख नाही, मुलांपासून लांब राहता येतं का बघू तरी. वॉव!

(पान १११ वर)

# हमीदा बेगम

निशा संजय डांगे–नायगांवकर

## कथा

''चलो लड़कियों जल्दी जल्दी हात चलाओ। आज दस सलवार, कमीज़ की ऑर्डर है। तुमचं झालं की नाही अजून?''

''इस बार मैं तुम दोनों को मेरे हाथ से सलवार कमीज सिलाकर दूँगी। झालं की नाही तुमचं अजून?''

हमीदा बेगम त्यांच्या हाताखाली काशिदगारी काम करणाऱ्या मुलींशी बोलत होत्या. गेली वीस वर्षांपासून त्या हा व्यवसाय करीत होत्या. हातशिलाई ते काशीदगारी करत करत, आज त्यांनी स्वतःचे छोटेसे बुटीक सुरू केले होते. सर्व काम आपल्या चार भिंतीच्या आतच. दहा बाय दहाच्या तीन खोल्यांमध्ये त्यांनी मागच्या दोन खोल्यात वास्तव्य व समोरच्या खोलीत तीन शिलाई मशीनसह आपले बुटीक थाटले होते. अनेक मराठी भाषिक महिला ग्राहकांच्या संपर्कात येऊन त्या मराठी शिकल्या होत्या. नुरी आणि जन्नत ह्या बाजूला राहत असणाऱ्या गरीब घरातील मुलींना त्यांनी म दतीसाठी ठेवले होते. त्यांच्या कामाचा योग्य तो मोबदला त्या देत होत्या. त्या दोघीही मन लावून काम करीत होत्या. गेली अठरा वर्षे हे काम त्यांनी एकटीने केले होते. अलीकडे कामाचा खूप व्याप वाढला होता. तशात त्यांच्या पाठीचे दुखणे वाढले होते. नजरही कमजोर झाली होती. त्यामुळे जास्त बैठकीचे काम त्यांना होत नव्हते. नुरी आणि जन्नतने या दोन वर्षात त्यांच्या व्यवसायाला नवीन पद्धतीने पुन्हा उभारले होते.

हमीदा बेगम सकाळी सकाळी आपल्या कामात इतक्या गढून गेल्या होत्या की, त्यांच्या मागे कोणीतरी उभं आहे हे देखील त्यांना समजले नाही.

''बेटा, काम मे बहुत मशगूल हो आजकल।''

आवाज ओळखीचाच होता. त्यांनी चटकन मागे वळून म्हटले, ''हाँ अब्बू, फरहान की पढ़ाई के लिए करना ही पड़ेगा ना। बस फरहान एक बार अपने पैरों पे खड़ा हो जाए तो छोड़ दूँगी सबकुछ अब मुझसेभी ज्यादा काम नहीं होता।''

''तुम अभीसे काम छोड़ दो बेटी अब तुम्हें मेहनत करनेकी जरूरत नहीं।''

हमीदा बेगम कुतूहलाने आपल्या अब्बूकडे पाहत होती. अब्बू असे का म्हणत असावे ह्याचा त्यांना अंदाज येत नव्हता. काम नाही केलं, तर फरहानचं शिक्षण कसं पूर्ण होणार हा प्रश्न त्यांना पडला होता.

''ज्यादा सोच मत बेटी, अब तुम्हारी सारी मुश्कीले दूर हो जायेगी।''

''हे तुम्ही काय बोलताय अब्बू?''

''मी योग्य तेच बोलतोय. बघ जरा कोण आलंय ते?'' अब्बू ताट्यांच्या फाटकाकडे बोट दाखवत म्हणाले.

हमीदा बेगम फाटकातून आत येणाऱ्या व्यक्तीकडे पाहतच राहिल्या. वीस वर्षानंतरही त्यांनी त्या माणसाला पाहताच क्षणी ओळखले होते. त्या व्यक्तीला पाहताच त्यांचा राग अनावर झाला. सर्वांग थरथरू लागले. डोळे जणू काही आग ओतत होते.

''अब्बू आताच्या आता या माणसाला आल्या पावली परत घेऊन जा. मला या माणसाचे तोंडही पाहायचे नाही.''

''ऐसा नहीं कहते बेटा, सलीम को अंदर तो आने दो।''

हमीदाला काय करावे काहीच सुचत नव्हते. त्या एखाद्या पुतळ्यागत स्तब्ध झाल्या होत्या. अब्बू आत गेले त्यांनी नुरी व जन्नतला कामावरून सुट्टी दिली. सलीमही त्यांच्यापाठोपाठ आत गेला. हमीदा बेगम अजूनही तिथे उभ्या होत्या. वीस वर्षांपूर्वीचा भूतकाळ त्यांच्या डोळ्यांसमोर चलचित्रपटाप्रमाणे धावू लागला. वीस वर्षांपासून सलीम त्यांना  तलाक देऊन दुसऱ्या स्त्रीसोबत मुंबईला काम करण्यासाठी निघून गेला होता. त्याने मागे कधीही वळून पाहिले नाही. हमीदा बेगमने एकटीनेच शिलाई काम करून फरहानला सांभाळले होते. आज इतक्या वर्षांनी सलीम पुन्हा परतला. आता त्यांच्या आयुष्यात सलीमला कुठेच जागा नव्हती. अब्बूनी बाहेर येऊन हमीदाला हात धरून आत नेले.

''बेटी सून तो लो सलीम क्या कहता हैं। आखिर कबतक अकेले जियोगी? तुमने दूसरे निक़ाह का नाम भी लेने नहीं दिया, इसका मतलब तुम आजभी सलीम का इंतज़ार करती हो। तुम दोनों आपस मे बातें करो मैं बाद में आता हूँ।'' असे म्हणून अब्बू दारातून बाहेर निघाले.

''अब्बू, रुकीए...''

अब्बू त्या दोघांना एकटे सोडून निघून गेले. हमीदा बेगम वरकरणी शांत दिसत होत्या; परंतु त्यांच्या आत एक ज्वालामुखी खदखदत होता. तोंडातून अपशब्द पडू नयेत म्हणून

त्यांनी मौन धारण केले होते. सलीम खिडकीजवळ उभा होता. वाऱ्याच्या झोताने खिडकीच्या पटांची उघडझाप तेवढी ऐकू येत होती. शेवटी सलीमने संभाषणास सुरुवात केली.

''मैं हमेशा के लिए वापिस आ गया हूँ हमीदा। अब दुबारा तुम्हें छोड़कर कभी नहीं जाऊँगा। मेरा भरोसा करो। भूल जाओ सबकुछ। हम दुबारा...''

''भूल जाऊँ? तलाक, तलाक के तीन शब्द मेरे मूँह पे मारकर निकल गए तुम, तुम्हारे इन तीन अल्फ़ाज़ो ने मेरी जिंदगी तबाह कर दी और तुम कहते हो भूल जाऊँ? तब कहाँ थे तुम जब मुझे और फरहान को तुम्हारी जरूरत थी? पूरी रात फरहान तुझ्या आठवणीत रडत होता. तुला त्या लेकरचीही आठवण आली नाही? किस हालात में हमने दिन काटे हैं वो सिर्फ हम जानते हैं।''

हमीदा बेगमच्या रागाने लाल झालेल्या डोळ्यातूनही अश्रू ओघळू लागले. भूतकाळातील आठवणी त्यांच्या सभोवताली गर्दी करू लागल्या.

''अब मैं आ गया हूँ ना...!''

''सलीम, तुझा माझा आता काहीच संबंध नाही. तू आला तसाच निघून जा. चालता हो इथून.''

''हम दोनों फिरसे साथ रह सकते हैं।''

''क्या मतलब?'' हमीदा बेग़मने त्याच्याकडे पाहत विचारले.

''मैंने मौलवी साहब से बात कर ली हैं। तुम बस हलाला निक़ाह के लिए मान जाओ।''

हलाला निकाह....

सलीमच्या तोंडून हे शब्द ऐकताच हमीदा बेगम कोसळून पडल्या. त्यांच्या पायाखालची जमीन सरकली नि डोक्यावर जणू आभाळ कोसळले. त्या जवळजवळ कोसळतच खाली बसल्या. त्यांचा विलाप शांत वातावरणाला भेदून जात होता.



''या अल्ला यह कैसा दिन आज तुमने दिखाया? इस उमर में यह सब सुनने के लिए तुमने मुझे जिंदा रखा क्या?''

क्षणात त्या उठल्या, लगबगीने स्वतःला सावरले. त्यांनी सलीमकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला. त्यांना सलीमची किळस वाटली. मग त्या एकदम त्वेषाने उठल्या. त्यांच्या अंगात जणूकाही दहा हत्तींचे बळ संचारले होते. त्यांनी सलीमला धक्के देऊन घराबाहेर काढले. सोबतच त्यांच्या तोंडाचा पट्टा सुरूच होता.

''जा निकल जा, बेशरम यहाँ से। अब तुम्हारा यहाँ कोई नहीं। दोबारा कभी मेरी तरफ और फरहान की तरफ नजर उठाके भी मत देखना। सारी लाज शरम बेचके खा गए क्या?''

हमीदा बेगमने सलीमला धक्के मारून फाटकाबाहेर काढून दिले. आता मात्र त्यांचे सारे अवसान गळून पडले होते. त्यांचे हातपाय थरथरू लागले. अंगणातील सावरच्या झाडाचा त्यांनी आधार घेतला. बुंध्याला टेकून त्या स्वतःच्या नशिबाला कोसू लागल्या.

***निशा संजय डांगे-नायगांवकर, पुसद***
*मोबाइल : ८३२९०६५७९७*

(पान १०९ वरून)

''रिलॅक्स.. यू वॉंट सम वॉटर?'' पाठीवर हात फिरवत योसेफ गदगदून रडणाऱ्या रियाला शांत करत होता. 'स्टुडिओत काही झालं का? कुणाची आठवण येतेय का? प्रेग्नन्ट आहेस का?' त्याच्या कुठल्याही प्रश्नांना तिच्याकडे उत्तर नव्हतं. तिच्या भोवतीचा एकाकीपणाचा मिट्ट काळोख ती कुणाला दाखवू शकत नव्हती. आई-वडील, थोरली बहीण, चांगला जॉब सगळं असून एकटेपणाच्या भीषण लाटा तिला गुदमरवून टाकत होत्या.

मनाला शांत वाटायला हवं होतं, कुणीतरी आपलं आहे हा विश्वास हवा होता. योसेफ सोबत शांत वाटतं, पण तो जेवढा वेळ भेटतो तेवढाच. त्याचा ना काल माहिती, ना उद्या. त्यालाही माझं काही माहिती नाही, ना माहिती करून घ्यायची इच्छा. आपल्या शरीराची हाक ऐकून क्षणभरासाठीचा सोबती आहे तो, याची पूर्ण कल्पना आहे. याचा भयानक त्रास होतोय. कितीही बियर प्यायली तरी गाढ झोप नाही लागत. आईसबर्गला धडकून टायटॅनिक बुडाली असेल, तेव्हा त्यातल्या पॅसेंजर्सना कसं वाटलं असेल तसं वाटत राहतं सतत. त्याला घाबरून कुणाची ना कुणाची सोबत शोधायची, पण तीही संपली की पुन्हा तीच भावना. भर समुद्रात एकटी तरंगत असल्याची.

आय वॉंट टू एंड धिस.. हाऊ? आय डोन्ट नो. हेल्प... हेल्प.

***नीलिमा बोरवणकर, पुणे.***
*मोबाइल : ९८२२५५६२५१*

## अमिबा–पुराण

मित्रा, तू अमिबा, मीही अमिबा, आपण सारे एकपेशीय अमिबा
ना कुणाची कुणावर कुरघोडी, सत्ता, ना हक्क, ना ताबा

अमिबांच्या जगात कोणीच नाही मादी, ना कोणी नर
'जगा, जगवा, जगू द्या' आणि 'हे विश्वची माझे घर..!'

लिंगहीन अस्तित्वामुळे आपसूकच बहरलेली ही समता
जन्मजात समानतेमुळे लहरलेली 'एकपोशाखी' बंधुता

वंशसातत्यासाठी सतत विघटित होत राहणे आपले आपण
जरी नसे ना का त्यात उत्कट समागमाचे स्वर्गीय संमोहन

कदाचित स्वत:ला स्वत:तून तोडतानाची ती विलक्षण समाधी
ती गोड तुटकी वेदनाच बहुदा 'ऑरगॅझम'सदृश परमावधी..!

जितके म्हणून तोडत राहतो आपण स्वत:मधले वाढीव सत्त्व
तितकेच भरत राहतो आपण आपल्यातले असोशीचे तत्त्व

स्वत:ला तोडत राहणे, हाच आपला अमरत्वाचा धर्म
तीच अभ्युदयाची आशा, तेच 'एकोडहं बहु स्याम'चे वर्म

नर–मादी भानगड नाही, सगळे एकाच साच्यातले जीव
ना कुणावर बलात्कार, एकतर्फी वासना, उपेक्षा, ना कीव

नसेल तिथे केसाळ उन्मादी मर्दानगी, ना स्वामित्वभावना
ना योनीशुचिता, वा पातिव्रत्याच्या बेगडी रूढी–कल्पना

किती बरे झाले आपण झालो नाही माणूस म्हणून उत्क्रांत
अन्यथा महिला अत्याचाराची आली असती काळी संक्रांत

नशीब, अमिबा नसतात स्व–भक्षी, खात नाहीत ते अन्य
'अमिबियां'ना!
नाहीतर माशांसारखे मोठ्या अमिबाने छोट्या अमिबाला खाल्ले
असते ना!

ऐकून घेतलंस मित्रा, तू 'अमिबा–पुराण' नि कवटाळलंस मला
उत्कटतेने
तेव्हा भिन्नलिंगी आकर्षणापाशी पालटली सगळी समीकरणे

समतावादी आणि साम्यवादी अमिबांना मग फुटल्या अतोनात पेशी
मनू–मानुषी, ॲडम–इव्हमध्ये डवरल्या स्त्री–पुरुष संप्रेरकांच्या राशी

फटफटलं नि विरलं स्वप्न! वास्तवाच्या कोंबड्यानं केली
कलकल–
"All are equal, but some are more equal'

***आश्लेषा महाजन, पुणे.***
*मोबाइल : ९८६०३८७१२३*

## ईडीची धाड

अचानक ईडीने धाड घातली
आणि लपवलेल्या धनाचा शोध सुरू
केला
तसे मी पुष्कळच जमवलेय म्हणा
एकात एक एकात एक
आतल्या कप्प्यात लपवून ठेवलेयं

सत्कार चिन्हांची वैभवी आरास
यामागे किती चाहते वाचक योजक
सन्मानाने अंगावर चढवलेल्या शाली
काही नुसत्या दिखाऊ काही प्रेमळ
उबदार
जपलेल्या सुंदर स्मृतींच्या साक्षीदर

ही खोली उघडाल तर दीपून जाल
अलीबाबाच्या गुहेत हरवून बसाल
ही तर माझी पुंजी एकेक करून
जमवलेली
माझे उभे आयुष्य ऐश्वर्यसंपन्न केलेली
इथे कपाटभर पुस्तकांच्या रांगाचरांगा
किती वैभवशाली धन हवे ते सांगा
रत्ने माणके सोने पानापानात
दिवसरात्र करत राहा मोजदाद

सोन्याच्या तारांचा हा भरजरी शेला
प्रेमाच्या रेशमी धाग्यांनी हळुवार विणला
वस्त्र जीर्ण जर्जर झाले
प्राणांच्या तिजोरीत अजून जपले
घेऊन जा हवे तर तेही
त्या स्मृतींचा मोह आता उरला नाही.

एक चोर कप्पा आहे
कड्या कुलुपात बंदिस्त
सापडणार नाहो ईडीला
जरी केली किती शिकस्त
शब्दांनी नित्य मारले झोडले
त्याचे अभंगत्व नि:संग राहिले
आयुष्यभर घडवते आहे हा लखलखीत
तारा
अस्मितेच्या कोंदणातला माझ्या
मीपणाचा हिरा

***अश्विनी धोंगडे, पुणे***
*ashwinid2012@gmail.com*

# सामाजिक पालकत्वाची चळवळ बनावी

आनंद नाडकर्णी

**दिनांक २६ जुलै २०२१ रोजी डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या ऑनलाईन मुलाखतीने 'मिळून साऱ्याजणी'चं सामाजिक पालकत्वची सुरुवात झाली. उत्तमकुमार इंदोरे आणि मुक्ता शिंगटे या दोघांनी ही मुलाखत झूमद्वारे घेतली आणि त्याचवेळी मिसा फेसबुक पेज, प्रोफाईल इथे ती लाईव्ह दाखविण्यात आली. सदर झूम मीटिंग नारी समता मंचच्या सहकार्याने आयोजली होती. सदर मुलाखतीचा व्हिडियो मिसा यूट्यूब चॅनेलवर आहे. या मुलाखतीमध्ये डॉ. आनंद नाडकर्णी यांनी जे विचार मांडले ते इथे देत आहोत...**

शब्दांकन : अनुजा बेंडखळे

उत्क्रांतीच्या प्रवाहामध्ये 'सामाजिक पालकत्व' हे पहिल्यांदा आलं आणि 'वैयक्तिक पालकत्व' नंतर आलं. सामाजिक पालकत्व या संकल्पनेकडे आपल्याला दोन पद्धतीने पाहता येईल. एक म्हणजे एका मुलाच्या संगोपनामध्ये संपूर्ण समाजाचा सहभाग. आणि दुसरं म्हणजे या मुलांनाही सामाजिकतेचं भान देणारं पालकत्व.

आपली पिढी सक्षम व्हावी, आपलं अस्तित्व टिकवून ठेवतानाच ते वाढवावं हा माणसाच्या जीवशास्त्रीय अस्तित्ववादी इच्छांचाच भाग आहे. सामाजिक पालकत्व हे या प्रेरणेतूनच निर्माण झालं. म्हणून आजसुद्धा आपण जसे वैयक्तिक पालक आहोत, तसेच सामाजिक पालकही आहोत. पालकत्व हे मुलाला सामाजिकतेचं भान देणारं असावं, असं आता वाटू लागलंय. कारण आता आपण पाहतो, विशीतल्या मुलांना 'स्वभान' लवकर येतंय. आत्मकेंद्रितपणाकडे जाण्याचा प्रवास या मुलांच्यामध्ये आधीच्या पिढीपेक्षा जास्त प्रकर्षाने होऊ शकतो. म्हणून आपल्याला या मंडळींना आपल्या स्वार्थाबरोबरच परमार्थ साधण्याची सांगड घालण्याचं शिक्षण दिलं पाहिजे. आपण आपल्या मुलाला त्याच्या शिक्षणासाठी, त्याच्या व्यक्तिगत विकासासाठी अनेक गोष्टींच्या सुखसोयी देत असतो. याबरोबरच या मुलाला समाज पाहण्याची, समाजातील वेगवेगळ्या स्तरातील व्यक्तींबरोबर संवाद करण्याची, त्यांच्याबरोबर जोडून घेण्याची, जागतिक समाजाबरोबर जोडून घेण्याची संधी दिली पाहिजे. तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या संस्कृती, सामाजिकता या सगळ्यांचं स्थान काय आहे ते पाहणं आणि या सगळ्यामधून अतिआत्मकेंद्रित विचार करण्यापासून त्या व्यक्तीला समकेंद्रित विचाराकडे आणणं हे आपण केलं पाहिजे. सम केंद्रित म्हणजे ज्यामध्ये परस्परावलंबन आहे, ज्यामध्ये कुटुंब आणि समाज एकच होऊन जातात, अशा तऱ्हेची त्या व्यक्तीची घडण होईल, हे आपण पाहिले पाहिजे. कोणत्याही वयोगटातल्या मुलाला अशा तऱ्हेचं सामाजिकतेचं भान यायला हवं.

## उपक्रम

यात सर्वात महत्त्वाचं आहे ते विचारांचं ध्रुवीकरण टाळणं. कधीकधी मुलं अगदी छोटी असल्यापासून ध्रुवीकरणाला पोषक असे विचार ऐकत राहतात. कधी असे विचार राजकीय असतात, तर कधी सामाजिक. समाजशास्त्रज्ञांचं म्हणणं असं आहे की, असे विचार post pandemic येतात. या post pandemic काळामध्ये समाजाचं ध्रुवीकरण वाढतं. मुलाचा विकास असा झाला पाहिजे की, अशा ध्रुवीकरणापासून त्याला समतोल राखता आला पाहिजे.

मुलांमध्ये वाढत असलेल्या आत्मकेंद्रितपणाचे बाळकडू; खरं तर, काही प्रमाणात आताच्या वैयक्तिक पालकत्वामधूनच त्यांना मिळत आहे. सध्याची चंगळवादाकडे जाणारी जीवनपद्धती आपण मुलांना देत राहिलो, तर आपण सामाजिक पालकत्वापासून दूर जाणार. चंगळवाद आला की, अमूक हे हवंच आलं. मग आली स्पर्धा आणि 'आहे'–'नाही' असे दोन वर्ग. मग या दोन वर्गांमधली उच्चनीचता आली. म्हणून पालकत्वामध्ये पालकांनी आपल्या गरजा, सुविधा आणि चैन याच्या असणाऱ्या व्याख्या तपासून पाहिल्या पाहिजेत. आपल्यासाठी गरजा म्हणजे काय, सुविधा म्हणजे काय आणि चैन म्हणजे काय याचा विचार केला पाहिजे. यामध्ये मुलांच्या आणि पालकांच्या व्याख्या वेगवेगळ्या असणार. पण मग त्या वेगळ्या काय आहेत? त्याच्यामध्ये समन्वय कसा काढता येईल हे पाहिलं पाहिजे. हे पाहणं ही सामाजिक पालकत्वाकडे नेणारी वैयक्तिक पालकत्वाची पहिली पायरी ठरू शकते.

समाजातले चोर, गुंड, बदमाश असे लोक काही अंशी आईवडलांनी किंवा समाजातल्या घटकांनी केलेल्या दुर्लक्षामुळे तयार होतात हे कितपत सत्य आहे आणि त्यासाठी काय करायला हवं या प्रश्नाचं उत्तर थोडं गुंतागुंतीचं आहे. फक्त एकच घटक माणसाच्या व्यक्तिमत्वावर काम करतो, असं काही विज्ञानाने अजून सिद्ध केलेलं नाही. आपण असा विचार केला की, समाजविघातक काम करणाऱ्या व्यक्तीच्या मागे काय काय असेल? तर त्याच्या मागे सामाजिक वातावरण म्हणजे 'कल्चर' असेल. त्याचबरोबर त्या व्यक्तीचं 'नर्चर' म्हणजे त्याच्यावर झालेले संस्कार असतील. तसंच त्या व्यक्तीचं 'नेचर' म्हणजे त्याची जेनेटिक जडणघडणही असणार. त्याचबरोबर एका व्यवसायातील दोन गुंडही वेगवेगळे असू शकतात, त्याला आपण सिग्नेचर असं म्हणू. म्हणजे नेचर, नर्चर, कल्चर, आणि सिग्नेचर हे चारही घटक प्रत्येक व्यक्तीच्या विकासामध्ये असतात.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनेक वेळेला या संस्कृती किंवा सामाजिक वातावरणाचा एकंदर समाजाच्या क्रिएटिव्हिटीवर सुद्धा परिणाम होतो. यावर 'Geography of the Genius' हे पुस्तक वाचण्यासारखं आहे.

कल्चर म्हणजे सामाजिकता. समाजावर छाप पाडणारी व्यक्तित्त्व निर्माण झालं की, त्यातून समाजाचं भवितव्यदेखील बदलत असतं. म्हणजे ते चांगल्याकडे किंवा वाईटाकडे जाणारं असं काहीही असू शकेल. पूर्वी गाद्यांना गाद्या लावून माणसं झोपायची. तेव्हा पर्सनल स्पेस आणि कॉमन स्पेस यात फरक नव्हता. आता प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र बेडरूम झाली. मग आपल्या या कंफर्ट झोनमधून ही मुलं कशाला बाहेर पडतील? आपण त्यांचं बाहेर पडणं जर आकर्षक, मनोवेधक केलं तर ती आपल्या कोशातून बाहेर येतील. आपण यासाठी काय करायला हवं? समजा आपला एखादा कौटुंबिक कार्यक्रम आहे. मुलांना अशा ठिकाणी जायला आवडत नाही. कारण, त्यांच्या वयाचं तिथे कोणी नसतं. अशा प्रसंगी या मुलांना या कार्यक्रमाचं आयोजक केलं, त्यांना तशा जबाबदाऱ्या दिल्या आणि मान दिला तर ही मुलं खूप चांगल्या प्रकारे सहभागी होतात.

दुसरं असं, आपण या मुलांची सामाजिकतेची संदर्भ चौकट समजून घेण्याच्या प्रयत्नात पालक म्हणून कमी पडतो. प्रत्येक पिढीचे संदर्भबिंदू असतात. उदाहरणार्थ, घरामध्ये जर तीन पिढ्या असतील तर सर्वात सीनियर लोकांना शास्त्रीय संगीत आवडतं, मधल्या पिढीला भावगीतं आवडतात आणि आताच्या पिढीला वेस्टर्न म्युझिक आवडतं. आता या ठिकाणी संगीताच्या या तीनही प्रकारांची देवाणघेवाण होणं गरजेचं आहे. असं जर झालं तर तिथे सामाजिकता वाढीस लागेल.

तसंच आजूबाजूचे व्यावसायिक, स्थानिक लोक, पर्यावरण या सगळ्यांची आपली जाण आणि भान वाढलं पाहिजे. महाराष्ट्रात अनेक शाळा आहेत, जिथे मुलांकडून अनेक प्रयोग करून घेतले जातात. कधी सामान्य लोकांच्या मुलाखती ही मुलं घेतात. उदाहरणार्थ, कोळिणीची, आंबेवालीची मुलाखत. यातून मुलांचं समाजाबद्दलचं शिक्षण होत असतं. 'वयम्' सारखं मासिक आणि 'बहुरंगी बहर' सारखे उपक्रम मुलांच्या जाणिवा विकसित करत असतात. मुलांचं शिक्षण लोकली आणि ग्लोबली असं दोन्ही बाजूने झालं पाहिजे.

अजून एक म्हणजे बरेचदा बेगडीपणा हा अस्सल म्हणून मिरवला जातो. अशा वेळी अस्सल म्हणजे काय हे सांगण्याची जबाबदारी पालकांची असते. 'वेध'सारख्या उपक्रमांमधून समाजातली अस्सल माणसं जेव्हा



सर्वांसमोर येतात, तेव्हा ही माणसं प्रसिद्धीपासून दूर आहेत; पण अस्सल आहेत हे समजतं. अस्सलाचं भान आणून देणारे उपक्रम किंवा अशा तऱ्हेची व्यासपीठं आपण जर निर्माण केली आणि ती मुलांपर्यंत पोहोचवली तर खूप योग्य होईल. समाजातला चांगुलपणा मुलांपर्यंत कसा जास्तीत जास्त पोहोचेल हे पाहिलं पाहिजे. Rutger Bregman यांचं 'Human Kind ¬ Hopeful History' हे पुस्तक वाचण्यासारखं आहे. हा हॉलंडमधला डच अभ्यासक. याची भूमिका अशी की, Kind of human पेक्षा desrtuctive human जास्त मांडला गेला`. Its an eye opener book. तसंच William Goldingचं "Lord of the Flies' हे पुस्तकदेखील वाचायला हवं. सहा मुलं एका बेटावर जातात आणि मग त्यांच्या आदिम भावना कशा वर येतात हे त्यात आहे. नोबेल पुरस्कार मिळालेलं हे पुस्तक. त्याने ऑस्ट्रेलियाच्या जवळचा एक केस स्टडी शोधून काढला. तिथे अशीच मुले अडकलेली. त्या वेळी त्यांनी एकमेकांना को-ऑपरेट केलं. हा केस स्टडी सांगतो की, फक्त चांगुलपणा दाखवा. चांगुलपणा आहे; पण तो प्रसिद्ध नाहीये.

मुलांसाठी काय काय करता येईल याचा विचार करताना आम्ही एक प्रयोग करण्याचा विचार करतोय. पाचवी, सहावी आणि सातवीच्या निवडक मुलांना 'mentoring' शिक्षण द्यायचं. मग ही मुलं पुढच्या इयत्तेत गेली की त्यांच्यापेक्षा लहान

इयत्तेतल्या मुलांबरोबर त्यांना जोडून द्यायचं. आता ती त्यांचे मेंटॉर होतील. ती या लहान मुलांना येणाऱ्या अडचणी सोडवतील. याला मी नाव दिलंय 'दोस्त' (Developmental Observer Study Trainer). यामुळे या मुलांना सामाजिकतेचं भान आपोआपच येईल आणि या मुलांच्या निमित्ताने Total school eco system बदलू शकेल. सामाजिकतेचा प्रचार आणि प्रसार करताना सर्वप्रथम आपण जे biological नात्यांना अवास्तव महत्त्व देतो, ते कमी करून समाजातली नाती वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सिंगल चाईल्ड फॅमिलीमधील मुलांना समाजातूनच खूपसे दादा ताई मिळवून द्यावेत.

चांगुलपणाचे उपक्रम तयार करणं, त्याची माहिती समाजाला देणं हे आपल्याला करता येईल.

हे सर्व करताना असे केल्यामुळे होणारा पालकांचा फायदा त्यांना सांगावा जेणेकरून अशा उपक्रमामध्ये त्यांचा आणि त्यांच्या मुलांचा सहभाग वाढेल. मला वाटतंय या सगळ्या गोष्टी करणं हे सामाजिक पालकत्वाच्या व्यासपीठासमोरचं पुढचं काम राहील. आपला हा गट काय काम करू शकतो, हे पाहिलं पाहिजे. हा गट सगळ्यांचा समन्वयक म्हणून काम करू शकतो. म्हणजे वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या छोट्या छोट्या प्रयोगांना व्यासपीठ देणं, त्यांना लोकांपर्यंत पोहोचवणं, त्यातल्या ज्या प्रयोगाचा आपल्याला भाग बनता येईल तिथे भाग घेणं, या उपक्रमाची डिरेक्टरी उपलब्ध करून देणं हे झालं पाहिजे. या कामासाठी संस्था करण्यापेक्षा याची एक चळवळ बनावी. एकाच संस्थेच्या आधारानं विविध संरचना तयार झाल्या पाहिजेत.

(पान १७ वरून)

आली की काय. त्यानं हाक मारली जोरात. आत गेला तर टॉयलेटमधून पाण्याचा आवाज येत होता. शॉवर घेतेय बहुतेक.

त्याच्या नकळत उत्साह संचारला त्याच्या अंगात. त्याच्या रूममध्ये जाऊन त्यानंही शॉवर घेतला. शॉवर घेऊन तो बाहेर आला तेव्हा सोफी हातात कॉफीचे मग घेऊन उभी होती. तिला जवळ घेऊन तो म्हणाला, ''थँक गॉड तू आलीस. नाहीतर मी आज आत्महत्या करायच्याच मूडमध्ये होतो.''

त्याला ठोसा मारत ती म्हणाली, ''विचार तर करून बघ. मीच फासावर चढवेन तुला.'' एकूण मूड छान दिसत होता तिचा.

खूश आहेस सोफी. कशी आहे तुझी आई.

सोफी हसून म्हणाली, ''मस्त. आठ दिवस काढले तिच्याबरोबर म्हणजे छानच असणार ना. मग ती सांगत राहिली तिची कथा.''

तिला सोडून दिलं त्यानंतर कुठं कुठं भटकत राहिली तिची आई, किती नोकऱ्या केल्या, कोणाकोणाला भेटली. किती जणांच्या प्रेमात पडली परत आणि किती लग्न आणि किती डिव्होर्स. पन्नाशीला पोचेपर्यंत आणखी तीन मुलं झालेली दोन लग्नातून. आता मात्र एकटीच राहात होती.

किती सहज सांगत होती सोफी हे सगळं.

''तुझी आठवण नाही आली तिला कधी,'' त्यानं विचारलं.

''येत होती रे. ती म्हणालीही मनात होतीस तू कायम म्हणून.''

''मग शोधलं नाही ते तिनं तुला.''

''त्यावेळी परिस्थितीत नव्हती ती मला सांभाळण्याच्या. घर सोडून आली होती ती इथं. प्रेमात पडली त्या माणसाच्या. पण त्यानं नंतर हात झटकले. एकटी मुलगी. काय करणार होती ती. मला कशी सांभाळणार होती. आपल्याला जे जमणार नाही ते कोणीतरी करेल माझ्यासाठी असं वाटत होतं तिला. म्हणून सोडून गेली ती मला.''

''तू जसा तिचा शोध घेत होतीस, तसा घेत होती का तीही तुझा शोध.''

''अर्थात. तिला भेटायचं होतंच मला. पण धाडस होत नव्हतं. आणि तुला माहीत आहेच सुरुवातीला मलाही नव्हतीच इच्छा. पण खरं सांगू छान आहे ती. मस्त मोकळी, मला आवडली.''

तो पाहात राहिला तिच्याकडे आवाक होऊन. तशी ती म्हणाली, ''असं काय पाहतोस?''

काही नाही म्हणून गप्प बसला तो. मग म्हणला, ''मला तुझ्यासारखं माफ करता आलं असतं तर किती बरं झालं असतं.''

''कर की माफ. बोलायचं का तुझ्या डॅडशी.''

नाही म्हणून मान हलवली त्यानं. पण डोळे भरले होत त्याचे. ते पाहून सोफीनं काय झालं म्हणून विचारलं. तेव्हा बाबा हॉस्पिटलमध्ये असल्याचं सांगितलं त्यानं. नेहाला फोन केलास का म्हणून विचारलं तिनं, तर म्हणाला, ''दोन दिवस झाले तिचा काहीच मेसेज नाही. काही कळायला मार्ग नाही सोफी.''

''अरे, पण तू करायचा ना कॉल.''

तो गप्प झाला तसा सोफीनं त्याचा मोबाईल घेतला त्याच्याकडून, लेट मी कॉल हर.

''नको.''

''नको काय. अनलॉक कर फोन.''

त्यानं मान हलवली तशी चिडली ती. मेसेजेस आले असतील जरा पाहा.

त्यानं फोन उघडला. तर नेहाचा जस्ट मेसेज आला होता. बाबा इज सिरिअस. आणि आईलाही अडमिट केलंय. तिची ऑक्सिजन लेव्हल साठवर आली आहे.

त्याला घाम फुटला. हात थरथरायला लागला आणि डोळे

वाहायला लागले.
''आपण फोन लावूयात आशु. नेहाला फोन लाव.''
त्यानं फोन लावला. खूप वेळ कोणीच उचलला नाही. शेवटी बंद झाला. त्याच्या हृदयाचा ठोका चुकला. तो लहान मुलासारखा सोफीकडे पाहात राहिला. सोफीनं त्याला जवळ घेतलं. मुसमुसत कुशीत शिरला तिच्या. खूप वेळ थोपटत राहिली तीही.
रात्री कधी तरी फोन वाजला तेव्हा तो स्वप्नात होता. हॉस्टेलच्या दारावर उभा राहून पाठ फिरवून निघून जाणाऱ्या बाबांकडे पाहात. डोळ्यांतून पाणी वाहत होतं आणि तो पुटपुटत होता नका जाऊ मला सोडून म्हणून. पण ते निघून गेले काहीही न बोलता. शाळेची घंटा वाजत राहिली दूर आणि कोणीतरी त्याला जबरदस्तीनं ग्राऊंडवर घेऊन जात होतं.
सोफीनं फोन उचलला होता. काहीतरी बोलत होती ती नेहाशी. आणि एकदम म्हणाली, ''सॉरी टू हिअर इट नेहा. आय विल टेल आशु. ही वॉज वरीड अँड ट्राईंग टू कॉल यू... आय नो आय नो... आय अंडरस्टँड. हाऊ इज किरण अँड ममा...एव्हरीथिंग विल बी ओके... यू आर ब्रेव्ह. टेक केअर डिअर.''
कानावर पडणारे शब्द ऐकू येत होते त्याला आणि त्याला वाटत होतं, ग्राऊंडवरच्या स्टेजवर उभं राहून सोफी काहीतरी सांगते आहे त्याला, 'रडू नकोस... एव्हरीथिंग विल बी ओके.'
काय होणार आहे ठीक. नक्की कोणाचं होणार आहे ठीक. डोळे उघडून पाहायचं होतं त्याला आणि अंधार पसरला होता डोळ्यांसमोर. काही केल्या दिसत नव्हती एकही प्रकाशाची तिरीप.
सोफीचा आवाज यायला लागला. ''आशु... आशु.. उठतोस का?'' त्यानं डोळे उघडायचा प्रयत्न केला. हळूहळू आला या जगात. तर सोफी म्हणाली, ''सॉरी आशु, बाबा इज नो मोर. नेहा वॉज नॉट इन अ मूड टू सेन्ड यू एनी मेसेजेस. बिकॉज काही सांगण्यासारखं नव्हतं.''
तो खडबडून उठत म्हणाला, ''कधी?''
''पंधरा मिनिटं झाली.''
''आणि आई?''
''शी इज ओके. ऑक्सिजन लेव्हल एटीवर आली आहे आता. पण तरी वेळ लागेल. तिला काहीच सांगितलं नाही. तुझा चुलत भाऊ पोचलाय. किरण इज नॉट इन द पोझिशन टू डू एनी फॉर्मालिटीज.''
तो तसाच बसून राहिला. सुन्न झाल्यासारखा. काय रिॲक्शन द्यायची नेमकी. आई बरी आहे म्हणून आनंद मानायचा की बाबा गेले म्हणून हंबरडा फोडायचा. काही कळत नव्हतं त्याला. काय वाटतंय नेमकं आपल्याला. वाईट वाटतंय की आणखी काही. ते गेल्याचं दुःख होतंय की आपल्यात एवढी वर्ष चाललेलं कोल्ड वॉर संपलं आता म्हणून बरं वाटतंय. काय करायचं आता इथं असं बसून. त्यांचे गुण असलेले जीन्स घेऊन जन्माला आल्याचा न संपणारा शोक करत राहायचं का आता की सरळ उठून भारतात जायचं. काहीच कळत नव्हतं.
त्यानं सोफीकडे पाहिलं. त्याच्या वाहणाऱ्या डोळ्यांकडे पाहून ती म्हणाली, ''जरा वॉश घे. मी कॉफी करून आणते छान.'' ती किचनमध्ये गेली. पण तो उठला नाही तसाच बसून राहिला. टीशर्टच्या बाहीनं डोळे पुसत राहिला.
डोळे बंद करून घेतले त्यानं. सोफी म्हणत होती, तसे गेलो असतो आपण त्यांना भेटायला आणि मांडला असता हिशेब सगळ्याचाच समोरासमोर बसून तर काही वेगळं घडलं असतं का. सोफीच्या आईनं जशा कबूल केल्या तिच्या चुका आणि सांगितल्या मोकळेपणानं तिच्या अडचणी तशा सांगितल्या असत्या का त्यांनी आपल्याला? की ओठांची शिवण आणखी घट्ट केली असती. आपल्याला तरी जमलं असतं का सोफीसारखं त्रयस्थपणे पाहणं साऱ्या गोष्टींकडे. समजून घेतलं असतं का त्यांना? कदाचित नसतंच. आई म्हणते तसं त्यांच्यासारखेच हट्टी झालो आहोत आपण.
आज सोफी किती मोकळी झालीय आईला भेटून आल्यापासून. तिचं सारं शरीर आणि मन रिलॅक्स होतं आज. तिच्या हालचालीतच एक प्रकारचा ताण हलका झाल्याचा भाव होता. आपण ताण मोकळे होऊ नयेत हाच प्रयत्न करत राहिलो सतत. माणसं गेली आयुष्यातून की काय राहतं बाकी. न बोललेल्या अनेक गोष्टी तशाच राहून जातात बंद संदुकीत. आणि मग ती उघडताही येत नाही कधीच इच्छा असूनही. आपली पेटी अशीच बंद राहील आता कायमची. कोणाशी बोलणार आणि काय. आई माफ करेल का आपल्याला? आणि नेहा? ती कशी रिॲक्ट होईल? संबंध ठेवेल का आपल्याशी की तोडून टाकेल कायमचे?
सहा वर्षांत केवळ त्यांना भेटायचं नाही म्हणून एकदाही गेलो नाही भारतात. कोणाला शिक्षा देत होतो आपण? त्यांना की स्वतःला की त्यांच्यामुळे माझ्याशी जोडलेल्या साऱ्या नात्यांना. का वागलो आपण असे. आता कसा होणार आपल्या ताणलेल्या नात्याचा अंत. कसा होणार आईसब्रेक?
आशु.. सोफीनं कॉफीचा कप समोर धरत त्याच्या केसांतून हात फिरवला. त्यानं तो बाजूला करून तिच्या कमरेभोवती मिठी घातली. आणि ओक्साबोक्शी रडायला लागला. सोफी समजावत होती त्याला आणि तो समजण्याच्या पलीकडे पोचलेला. बाहेर पावसाचा जोर वाढत चालला होता. आणि आत पूरच आला होता.

***नीरजा, मुंबई***
*nrajan20@gmail.com*

## वाचणारे लिहितात

नमस्कार,

'मिळून साऱ्याजणी'चा ऑगस्टचा अंक ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक सुमित्रा भावे ह्यांना आदरांजली स्वरूप आहे. अतिथी संपादक उत्पल व.बा. आहेत. त्यांचे छोटेसेच संपादकीय आहे. अंकात समाविष्ट सर्वच लेख अतिशय उत्तम आहेत. सुनील सुकथनकर ह्यांचा लेख अप्रतिम आहे. बाईंशी असलेल्या नात्याचा, त्या नात्यातून बाहेर पडून, तटस्थपणे घेतलेला वेध, गणेश मतकरी ह्यांनी बाईंच्या चित्रपटांची तीन वर्गात विभागणी करून घेतलेला आढावा, शिल्पा बल्लाळ ह्यांनी बाईंच्या मनोभूमिकेचा केलेला विचार, क्षितिज पटवर्धन ह्यांनी मुलाखतीतून विचारलेले अभ्यासपूर्ण प्रश्न व बाईंनी दिलेली उत्तरे, अक्षय शेलार ह्यांचा ग्रंथ लेखनाच्या निमित्ताने लिहिलेला चिंतनपर लेख, तसेच बाईंच्या कन्येने लिहिलेला लेख हे सर्वच अतिशय वाचनीय आहे. बाईंच्या हस्ताक्षरातील कविता, पेन, चष्मा, चहाचा मग इ. वस्तूंनी मुखपृष्ठ व्यापले आहे. पाहून मन व्याकूळ झाले. अंक संग्राह्य ठेवावा असा आहे. बाईंच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!

***सुनीती देव, नागपूर.***

---

सुमित्रा भावे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काढलेला ऑगस्टचा 'मिळून साऱ्याजणी'चा अंक भलताच अप्रतिम आहे. या पलीकडे त्यावर बोलण्यासाठी माझ्यापाशी शब्द नाहीत.

***अवधूत परळकर, मुंबई.***

---

गीतालीताई,

वर्षारंभ अंक सुपर्ब! सुनील सुकथनकरांचा लेख is a coup! अशा नात्यांचा शेवट बरेच वेळा असाच होताना दिसतो. या विषयावर एखादा अंक काढता येईल. कोणतेही नाते विषम तेशिवाय पक्के होत नसावे का?

अंकामधे नव्या पिढीचेही लेखक आहेत. त्यामुळे मूल्यमापनाला छान तोल आला आहे.

आपले मनापासून अभिनंदन!

***नीलिमा भावे, मुंबई.***

---

Dear Geetalitai,

Firstly, I would like to wish you and all at 'Miloon Saryajani' a very Happy Birthday on the magazine's 32nd anniversary. Indeed a remarkable achievement. the latest August 2021 issue is very nice.

सुमित्रा भावे यांच्यावर खूप सुंदर लेख दिले आहेत. त्यांच्या व्यक्तिचित्रावर प्रकाश टाकणारे छान लेख वाचायला मिळाले.

सोबत रु. पाच हजाराचा चेक पाठवत आहे. अंकाच्या १० वर्षाच्या वर्गणीकरता. त्याचा स्वीकार करावा, ही विनंती.

***मंदार वैद्य, पुणे.***

---

'मिळून साऱ्याजणी'चा सुमित्रा भावे विशेषांक मिळाला–वाचला. हा अंक मिळवण्यासाठी बरीच धडपड झाली. पण एका समनादी मित्रामुळे आणि सज्जन वृत्तपत्र विक्रेत्यामुळे अंक उपलब्ध होऊ शकला! अंक वाचला आणि निराश झालो!

काही निवडक लेख, आणि भावे यांच्या कविता वगळता, सुमित्रा भावे कुठेच सापडल्या नाहीत...

प्रत्येक जण, स्वतःच्या दृष्टीने सुमित्रा भावे मांडत राहिला. यात ज्याच्या–त्याच्या आठवांचे कढच होते. किंबहुना, भावेंच्या माध्यमातून, स्वतःची डायरीच खुली करत ते राहिले.

असंवेदनशीलतेचा धोका पत्करून लिहू वाटतं की, नको होतं मला ते... माणसाला माणसाशी जोडणारी; त्यांची स्थळ–काळ एकवटणारी दृष्टी ही शोधत राहिलो... अशा वेळी 'प्रत्येक क्षणांचे, कणांचे गाणे कर'– ही सुमित्रा भावे यांची ओळच एक शिडकावा बनून गेली!

***निरंजन कुलकर्णी, कोल्हापूर.***

---

ऑगस्टचा अंक आवडला. वेगवेगळे पैलू छान घेतले आहेत. गौरी देशपांडे अंकाची आठवण झाली (पण त्यात होते, तेवढे फोटो नाहीत यात)

सुनील सुकथनकरांचा लेख खूप सुंदर आणि प्रांजळ.

***प्राजक्ता महाजन, पुणे.***

---

खूपच छान झाला आजचा ३२ वा वाढदिवस. ३२ व्या वर्षीची समृद्ध वाटचाल बघता पुढे नक्कीच ३२ वर्ष वाढदिवस होत राहील याबाबत शंकाच नाही. गीतालीताईंनी विद्याताईंचा वारसा समृद्धपणे चालवला आहेच. नवीन तरुण पिढीही तो समर्थपणे पेलते आहे. मासिकाच्या जन्मापासूनची वाटचाल बघते आहे. हे मी माझे भाग्य समजते. खूप खूप आभार!

***विजू शेटे, पुणे.***

---

विद्याताईंच्या नंतर गीताली खूप समर्थपणे 'मिळून साऱ्याजणी'चे अंक काढत आहे. जुलै आणि ऑगस्ट दोन्ही अंक छान झाले आहेत. सुनील सुकथनकर, गणेश मतकरी याचे लेख छान आहेत. ऑगस्टचा अंक आणखी थोडा मोठा असता तर बरे झाले असते. दिवाळी अंकाची वाट पहात आहे. पुढील वाटचालीस अनेक शुभेच्छा.

***स्वानुमती पटवर्धन, पुणे***

# प्रतिनिधी यादी

**हे मासिकाचे विस्तारित कुटुंबच आहे. प्रतिनिधी म्हणजे मासिकाच्या विस्तारित कुटुंबाचे घटक. प्रतिनिधी विनामानधन काम करतात. आपणही 'साऱ्याजणी'च्या संदर्भातील कामासाठी त्यांच्याशी संपर्क साधू शकता. वर्गणीही देऊ शकता.**

**महाराष्ट्र प्रतिनिधी**
सरिता आवाड :
मो. ९८३३९८७५६८

**अहमदनगर**
प्रज्ञा हेन्द्रे–जोशी :
मो. ९८५००७५४४३

**अकोला**
दीप्ती जोशी :
फोन ०७२४/२४२१६१३
मो. ९४२३१५०५११५

**अमरावती**
शोभा रोकडे :
मो. ९९६०९३७७६९

**आंबेजोगाई**
अरुंधती पाटील :
मो. ९४२२७४४१६६

**औरंगाबाद**
सुलभा खंदारे :
मो. ९४२२२०११२१
प्रतिभा अहिरे :
मो. ९२८४१९६३०४,
७२१९१३१३६८

**बेळगाव**
मनीषा सुभेदार :
फोन. ०८३१/२४०३९३८
मो. ९३४२५४१८८६

**बीड**
हेमलता पाटील :
फोन. ०२४४२/२२२४२०
मो. ९८२२६३११४४

**बारामती**
सीमा गोसावी :
फो. ९८५०९३४३४२

**बार्शी**
भारती रेवडकर :
मो. ९६०४५१५५२३

**बुलडाणा**
नरेंद्र लांजेवार :
मो. ९४२२१८०४५१

**बेंगळुरू**
नीता जाधव :
मो. ०९८४५०६६१७३

**चाळीसगाव**
वैशाली निकम :
मो. ९४२१५१२५३३

**चंद्रपूर**
गीता देव्हारे–रापुरे :
मो. ९९७५३४९५५५

**दौंड**
अरुणा मोरे :
मो. ९८५००१४५७३

**गोवा(पणजी)**
उज्ज्वला आचरेकर :
मो. ०९४२११५७९४६

**हैदराबाद**
शुभांगी परळीकर :
मो. ९२९६०५०००२
फोन. ०४०/२४६०८५६६

**जळगाव**
शमा सुबोध :
मो. ९३७३०३५५३५

**कणकवली**
शमिता बिरमोळे :
फोन. ०२३६७–
२३२९०९/२३२५०७

**कऱ्हाड**
सविता मोहिते :
मो. ९८२२४०३७७१
(वेळ : सां ५ ते ६)

**कोल्हापूर**
उज्ज्वला हिरकुडे :
मो. ९८९०८३८६५५
समिक्षा फराकटे :
मो. ८००७१९०१०५

**इचलकरंजी, जि. कोल्हापूर**
प्रियंका म्हेत्रे :
मो. ७२४९८९२०८४

**पद्मानगर, लातूर**
शैलजा बरूरे :
मो. ९४२३७१४५३४

**महाबळेश्वर**
नीता भिसे :
मो. ९४२०७७१५४३

**मालगुंड**
अस्मिता रुग्गे :
फो. ०२३५७/२३५०१३
मो. ९६२३६९९१५४

**मुंबई**

**मालाड (प.)**
मीनाक्षी दादरावाला :
फो. ०२२/२८८२३२४९

**मुलुंड**
रजनी करंदीकर :
मो. ९८९२४७३३२७

**विलेपार्ले (पू.)**
विनिता हाटे :
फो. ०२२/२६१३०६४२
(वेळ : सायं. ८ नंतर)

**वाशी (नवी मुंबई)**
शरयू देशपांडे :
मो. ९३२५००१९६२

**मालवण**
वैशाली पंडित :
फोन ०२३६५/२५२९९२
मो. ९४२२०४३०२५

**नागपूर**
सुभाष तुलसीता :
मो. ९३७१५९९९२३
वर्षा पतके थोटे
(शब्दाली) :
मो. ७५५८४१९७६५

**नांदेड**
अनघा जोशी मुधोळकर :
मो. ९४२२४३४४४०

**नाशिक**
मेधा वैजापूरकर :
फोन ०२५३/२५३०१०३

**निपाणी**
शोभा तळेकर :
मो. ८३१७४६६३१५

**परभणी**
ज्योती चौंडे :
मो. ९०९६५०५१७६

**पुणे**
सुनीता भागवत
(स्वारगेट) :
मो. ९४२२३१०३७८
दीपा देशमुख
(बाणेर–बालेवाडी) :
मो. ९५४५५५५५४०
गौरी जानवेकर
(सिंहगड रोड) :
मो. ९८८१८८७५९०
मीरा कुलकर्णी (पाषाण) :
मो. ९४२२१८९२६४

**पुरंदर जि. पुणे**
अजरुद्दीन नदाफ :
मो. ९१३०५७६६९६

**सफाळे जि. पालघर**
स्वाती भोईर :
मो. ८१०८३२२३९९

**सातारा**
श्रीकांत के. टी. :
फोन ०२१६२/२३२०६०
मो. ९८२२०६४८००

**देऊर, जि. सातारा**
तरुजा भोसले :
मो. ९५६१०९३८३८

**सावंतवाडी**
अर्चना वझे :
फोन ०२३६३/२७२८२८

**शिंदखेडा, जि. धुळे**
संदीप गिरासे :
मो. ९४२३४९४५१५

**सोलापूर**
सरोजनी तमशेट्टी :
मो. ९९६०१०३२९४

**सांगली**
छायाश्री जाधव :
फोन ०२३३/२३७६८६१
मो. ९८६००४९८८०

**सांगली जिल्हा**
सोनिया कस्तुरे :
मो. ९३२६८१८३५४
नामदेव कस्तुरे :
मो. ९४२२४१०८५४

**तासगाव, जि. सांगली**
मिनल कुडाळकर :
मो. ९४२३८७२४१६

**सिंधुदुर्ग जिल्हा**
अर्पिता मुंबरकर :
मो. ९४२०२६११९६

**रिसोड, जि. वाशिम**
चाफेश्वर गांगवे :
मो. ९०९६६७५००१

**यवतमाळ**
आशा देशमुख :
मो. ९४२३४३६०४३
मंगला सरोदे : फोन
०७२३२/२४२८२९

## परदेशातील प्रतिनिधी

**VIDWANS SHAILA** :
10, Inverness Drive, Kendall Park, **NJ** 08824
Email : Shaila@vidwans.com

**ADITI KELKAR HATE :**
Flat no. 410, Burj I Nahada Tower, I Nahada 1, P. O. Box No. 341235 Dubai, **UAE.** PH. 971-4-2389467, Mobile- 971-56-1798331
Email : aditikelkar21@gmail.com

**DEVINA ASHISH DEVALEKAR :**
12, Bushnell place, Maidenhead. Post Code - SL65FD London. **UK.** Ph - 0044 7961099087.
Email - ddevalekar@yahoo.com

**JYOTI KANITKAR :**
13228 Stable Brook Way, **Herndon**, VA20171
Phone no : 703-478-2680
Email : jyoti@kanitkar.com

**खालील ठिकाणीही 'मिळून साऱ्याजणी'ची वर्गणी स्वीकारली जाईल.**
(१) हिराचंद नेमचंद वाचनालय : १३४, 'मुरारजी पेठ, सोलापूर – ४१३००१. फोन : २७२६६२०
(२) साधना : ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – फोन : २४४५९६३५

**आमचे वितरक :**
पूनम एजन्सी – २४४९४६६८, बी. डी. बागवे आणि कंपनी, मुंबई– २३८५७०१२


दिव्यांचा सण, मांगल्याची नांदी,
आकांक्षापूर्तीने मन झाले आनंदी...
फेस्टिव्ह ऑफर
महाबँकेच्या क्रेडिट कार्डवर खरेदी करा आणि मिळवा,
5X रिवॉर्ड पॉईंटस्
महासुपर
गृह कर्ज
व्याज दर
6.80%*
पासून
ईएमआय
रू.652/-
प्रति लाख
महासुपर
कार कर्ज
व्याज दर
7.05%*
पासून
ईएमआय
रू.1512/-
प्रति लाख
*नियम व अटी लागू
शुभ दीपावली
0% प्रक्रिया शुल्क
आता गृह कर्ज आणि कार कर्ज त्वरित मिळवा, अर्ज करण्यासाठी स्कॅन करा :
मिस्ड कॉल द्या
8010 614 614
किंवा एसएमएस टाईप करा :
BOM (SPACE) HOME/CAR
आणि पाठवा 57575 वर
फॉलो करा @mahabank
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
आमच्या सर्व ग्राहकांना आणि हितचिंतकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**REGISTERED**
License to post without prepayment of postage No.: **WPP - 34**
RNI Regd.no. MAHMAR/2000/02001 Declaration No SDO/Pune City/ SR/11/2021
Postal Regd.No. PCW/043/2021-2023
Published & Posted on 01/11/2021
Posting at PSO, Pune GPO - 411001

